

परदेशी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग
उजवीकडून पहिल्या सौ. इंदुमती शेवडे

# इये साहेबाचिये नगरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५४४४

सौ. इन्दुमती शेवडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
समृद्ध योजना
१९७०

मूल्य : रु. ६·००

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : ऑगस्ट १९६६

मुखपृष्ठ : अनंत सालकर

ब्लॉक्स : धारगळकर प्रोसेस

प्रकाशक :
सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
तपश्चर्या, ३८१ क, शनिवार, पुणे २

मुद्रक :
स. कृ. जोशी
मॅनेजर, विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.
सातारा, यांचा विमा छापखाना, सातारा

# प्रास्ताविक

'इये साहेबाचिये नगरी' या प्रवासवर्णनांत काय आहे म्हणून मला कुणी विचारलें, तर त्यांत एका रसिक, सुसंस्कृत, समतोल मनानें परदेशांत घेतलेल्या अनुभवांचा आस्वाद आहे असें मी चटकन् उत्तर देईन. इंग्लंड मधल्या समाजजीवनाचें यांत चित्रण आहे किंवा साहेबाच्या देशाचें यांत वर्णन आहे, असे न म्हणता विशिष्ट व्यक्तित्वाचे यात अनुभव आहेत असे मी मुद्दामच म्हणतो. एखाद्या चांगल्या समाजशास्त्रीय इतिहासाच्या पुस्तकांत आपणाला तिथल्या समाजजीवनाचें यथार्थ चित्रण आढळेल, किंवा चांगल्या भूगोलांत साहेबाच्या देशाचें व्यवस्थित वर्णन मिळेल पण प्रवासवर्णन हा एक ललित वाङ्मयाचा प्रकार आहे. त्यांत समाजजीवनाचें चित्रण नसावें किंवा विशिष्ट देशांतल्या निसर्गाचें वर्णन असता कामा नये, असें नाहीं. प्रवासवर्णनांत या दोन्ही गोष्टी थोडयाबहुत येणारच. सौ. इंदुमती शेवडे यांच्या या प्रवासवर्णनांत अधूनमधून त्या आहेतच. पण इंग्लंडची प्रवासवर्णनें आता मराठींतहि पुष्कळच उपलब्ध आहेत. मग 'इये साहेबाचिये नगरी' हे आणखी एक कशाकरिता वाचायचें? या प्रश्नाचें उत्तर हेच की, या वर्णनाच्या लेखिकेचें वेगळें असें कांहीं व्यक्तित्व आहे; आणि इंग्लंड-चेंच पण वेगळें असे कांहीं अनुभव आपणाला त्यांत वाचावयाला मिळतात.

सौ. इंदुमती शेवडे या चांगल्या लघुकथालेखिका आहेत, वृत्तपत्र-सृष्टीशीं त्यांचा निकटचा संबंध आहे, आणि नागपूर रेडिओकेंद्राच्या मराठी विभागांत त्या सहायक नियोजिका आहेत. त्यांचें व्यक्तित्व घडविणाऱ्या या सर्व गोष्टींचा प्रत्यय 'इथे साहेबाचिये नगरींत' ठिकठिकाणीं येतो. प्रवाश्याच्या मनात उठणाऱ्या भाव भावनांचे आणि विमानतळावर दिसणाऱ्या दृश्यांचे पुस्तकाच्या प्रारंभींच केलेलें वर्णन अंतःकरणाची पकड घेणारें आहे. लेखिका म्हणते, '...एका काळोख्या मध्यरात्री, अपूप घडीला, एका नव्या अज्ञात जगांत पाऊल टाकायला मी निघाले. सोबतीला एक अनामिक हुरहूर, लंगडं धैर्य, प्रियजनांचं शुभास्ते पथानः, अन् बी. बी. सी. चं पत्र, हें पाथेय.

" सांताक्रूझ विमानतळावर असंख्य निऑन दिवे बटबटीत डोळ्यांनी पाहत होते. तरीहि प्रकाश जडावला होता. माणसांची अबोल गर्दी इथून तिथे भिरभिरत होती. कस्टम्सच्या दाराशी निरोप दिलेघेतले जात होते. हारतुरे अंगावर चढत होते. फोटो निघत होते. डोळे पाणावत होते. आसवं पुसलीं जात होतीं .. कस्टम्सच्या कडक तपासणीच्या दिव्यांतून बाहेर पडलेली मंडळी मधल्या लाऊंजमधील कोचावरून वाटसरू वृत्तींत बसली होती, अन् विमानाच्या घोषणेची वाट पाहत होती. पुरुषांचे वर्तमान पत्राच्या आड दडलेले चेहेरे, गडबडी मुलं, त्यांना आवरणाऱ्या आया, सगळा अनोळखी चेहेऱ्यांचा समुदाय......

अखेर अंतिम घोषणा झाली अन् उतारूंची रांग सामानांनी भरलेल्या जड हातांनी विमानाकडे चालू लागली, शिडयावरून चढू लागली. प्रवेशद्वाराशीं गणवेषातला पायलट आपल्या तुकडीसह स्वागताला उभा होता. उतारूंची रांग विमानानं पोटांत घातली अन् त्याच्या नाकावरचं चक्र फिरू लागलं. पंख फडफडले अन् गच्चीवरचे केविलवाणे रुमाल हलू लागले..."

इंग्लंडचें सामर्थ्य कशांत आहे? असा प्रश्न उपस्थित करुन त्याचें उत्तर देतांना, तिथल्या दोनतीन महिन्यांच्या वास्तव्यांत इंग्रज लोकांच्या सहवासांत वावरतांना, त्यांच्याबरोबर काम करतांना त्यानां जे अनुभव आले त्यांचें त्यानीं मोजक्या शब्दांत विवेचन केलें आहे. त्या म्हणतात, '...एके काळीं ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीं मावळत नव्हता. जगाच्या नकाशांत टीचभर लांबीरुंदीचा, चिमूटभर लोकांचा, मुख्य भूखंडापासून विलग असलेला हा देश, एकेकाळीं अर्ध्या जगावर राज्य करू शकला; विशेष म्हणजे ब्रिटिश साम्राज्याचा हा अफाट पसारा अलेक्झांडर, सीझर, दारियस किंवा नेपोलियन यांच्यासारखे पराक्रमी जगज्जेते ब्रिटनजवळ नसतानाही झाला. तो कसा? हा विभिन्न जागतिक ऐतिहासिक घटनांचा परिपाक व त्यांचं एक मार्मिक निष्पन्न? कीं अगम्य काळाची नुसती लहर? की ब्रिटिश लोकांच्या राजकीय चाणाक्षपणाची, चातुर्याची, कर्तबगारीची एक साक्ष?...

......व्यक्तिशः माझ्या मनाचा कौल तिसऱ्या उत्तराकडे अधिक झुकतो....'

बी. बी. सी. मध्यें काम करीत असतां राष्ट्रकुलांतल्या देशांतले आणि इतर देशांतलेहि तिथें काम शिकायला आलेले अनेक लोक लेखिकेला

भेटले. या आफ्रिकी किंवा यूरोपी लोकांचे स्वभाव विशेष त्यांनीं जितक्या सूक्ष्म नजरेनें टिपले आहेत तितक्याच सूक्ष्मतेनें त्यांनी वृद्धाश्रमासारख्या इंग्लंडमधल्या कांहीं सामाजिक संस्थांचेंहि निरीक्षण केले आहे. इंग्लंडमध्यें अलिकडे कामासाठीं स्थायिक होणाऱ्या श्वेतेतरांची संख्या फार वाढली आहे. त्यामुळें वर्णविद्वेषाचे प्रकारहि फार होऊं लागले आहेत. लेखिका म्हणते, '... इंग्लंडमध्यें चार-चौघे भारतीय जमले कीं त्यांच्या बोलण्यांतून एकच सूर निघतो,— 'या गोऱ्या लोकांना आपण त्यांच्या देशांत नको आहोंत...' या विषयावरली लेखिकेची अनुभवसिद्ध मतें लक्षणीय आहेत. सगळ्याच श्वेतेतरांना घाणेरडे समजणारे इंग्रज जितके चुकतात तितकेच सगळ्याच इंग्रजांना शिष्ट किंवा तुसडे समजणारे भारतीयहि चुकतात असें म्हणून लेखिकेनें एका गोऱ्या सद्‌गृहस्थाशीं झालेले आपलें संभाषण दिलें आहे. तो गृहस्थ म्हणतो, '... वर्ण समानता हवीच–ती हवीच असं मी मानतो–तर सर्व वर्णांना राजकीय, सामाजिक, आर्थिक अधिकार समान द्यावे असं आम्ही म्हणूं. पण समानतेच्या नांवावर आमच्या खासगी जीवनावर, आमच्या घरावर आक्रमण का ?...' या उद्गारांनीं आपणाला अंतर्मुख केलें पाहिजे, असें लेखिकेला वाटतें.

दोनशें वर्षे भारतावर राज्य करुन घरी परत गेलेला साहेब आपल्या घरी राहतो तरी कसा, असें एक कुतूहल भारतीय जनतेला विशेष आहे. त्याचें प्रत्ययकारी समाधान 'इये साहेबाचिये नगरी' करील, असा विश्वास वाटतो.

१४ जुलै १९६६

अनंत काणेकर

# थोडेसे या प्रवास-कथेबद्दल—

लहानपणी जी कोलमन यांची एक कविता कुठे तरी वाचलेली आठवते.

" Oh, London is a fine town,
A very famous city
Where all the streets are
paved with gold,
And all the maidens pretty !"

या विख्यात नगरीतल्या सर्वच स्त्रिया अप्सरा असल्याचं आणि सर्वच रस्ते सोन्यानं मढविलेले असल्याचं कवीनं केलेले हे वर्णन, " एके काळी आपल्या या सुवर्णभूमीतून सोन्याचा धूर निघत होता, " अशा थाटाचं असलं, तरी त्यावेळी माझ्या बालमनात तिच्याबद्दल कुतूहल निर्माण करायला पुरेसं ठरलं होतं.

आपल्या राज्यकर्त्यांच्या राजधानीबद्दलचं हे कुतूहल डन साहेबांच्या 'इन इंग्लंड' या पाठ्य पुस्तकाने पुढे जागृत ठेवलं. त्यांत इंग्लंडमधील भव्य राजप्रासाद, प्रचंड इमारती, प्रेक्षणीय स्थळं, सुंदर देवळं आणि आकर्षक दुकानं यांचे रसाळ वर्णन होतं. मला वाटतं, इंग्लंडबद्दल आमच्याकाळी प्रत्येकाच्या मनात उत्कंठा असावी. त्यामुळे तिथली वारी करून आलेल्या यात्रेकरूला मोक्ष-नगरीला जाऊन आल्याप्रमाणे कृतकृत्य झाल्यासारखं वाटत असे. आमच्या पिढीची ती एक Never-Never-Land होती.

× × ×

आज स्वतंत्र्यप्राप्तीनंतर या पश्चिम पंढरीचं महात्म्य कमी झालं असेल, पण तिच्याविषयीची उत्कंठा मात्र सर्वांच्या मनात अजून कायम आहे. अलीकडे पाश्चात्य देशाकडे जाणाऱ्यांचा सतत ओघ सुरू झाला आहे. आजच्या प्रवासा-कांक्षी तरुण पिढीला, कदाचित 'स्टेट्स' कडे जाण्याचं वेड अधिक असेल. लंडनची जागा न्यूयार्कनं घेतली असेल...पण माझ्या मनात मात्र विलायते-बद्दल वाटणारी जुनी ओढ कायम राहिली अन् कधी काळीं परदेशात जायला मिळालं, तर ते विलायतेलाच असंच मला वाटत राहिलं.

हा योग कधीकाळी येईल, अशी मात्र कल्पना नव्हती. भविष्यवाद्यांनी वर्तवलेले असे कित्येक योग यापूर्वी नशिबाने खोटे पाडले होते. पण शेवटी एक योग आला...माझा मुलगा नोकरीनिमित्त लंडनमध्ये जाऊन राहिला होता. त्याचं निमंत्रण आलं...अन् सुदैवाने आकाशवाणीनेही माझ्या विनंती-नुसार त्याचवेळी माझ्यासाठी बी. बी. सीच्या प्रशिक्षणाची सोय केली...

× × ×

आज आपल्या इथून परदेशी जाणाऱ्या लोकांची सतत रीघ लागलेली असली तरी परदेशगमन या घटकेलाही मोठं दिव्य आहे. जुन्या परीकथांतून सातासमुद्रापलीकडे जाणाऱ्या नायकांच्या मार्गात संकटपरंपरेची योजना केलेली असायची. आजही तांबडा, काळा, पांढरा, प्रशांत, पीत यांपैकी कुठलाही समुद्र ओलांडण्यासाठी पासपोर्ट, व्हिसा, परदेशी चलन, 'पी'-परवाना, तिकिटासाठी प्रवास कंपन्याशी करावा लागणारा पत्रव्यवहार, आंतर-राष्ट्रीय स्वास्थ्य परवाना इत्यादि दिव्यांतून प्रवाशाला जावं लागतं...यातून तो शिताफीने वाट काढू शकला तरच पुढे तरून जायचा. पण यासाठी त्याला ज्या यमयातनांतून जावं लागतं, त्याची आठवण झाली की परदेशगमनापेक्षा परलोकगमन परवडलं, असं एखादेवेळी वाटून जातं. पण अखेरीस या सर्व दिव्यांतून मी सुरक्षितपणे वाट काढली...अन् जायला सिद्ध झाले.

× × ×

आज पण परदेशगमनाबद्दल पूर्वीसारखी नवलाई वाटेनाशी झाली आहे. आज परदेशांत जाऊन आलेले लोक गल्लोगल्ली सापडतात. 'पश्चिमेकडे चला' हे आजच्या पिढीचं ध्येयवाक्य. त्यामुळे भारत-युरोप-अमेरिका ही जणु घरअंगणं बनलेली आहेत. रात्र भारतात, 'लंच' युरोपात, 'डिनर' अमेरिकेत अशी आजची भाषा आहे. आपल्या इथून नानाप्रकारच्या लोकांचा जो महापूर परदेशात जात आहे, त्या गर्दीपैकी मी एक होते...

× × ×

परदेशी जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी वाढली, त्याबरोबर प्रवास-पुस्त-कांचीही संख्या वाढली. विशेषतः इंग्लंड-लंडनविषयी आतापावेतो सान-थोरांनी मिळून इतकं विपुल लेखन केलं आहे की त्यावर आणखी नव्यानं कुणी काय सांगणार अशी शंका मनात डोकावणं साहजिक आहे. तशात माझं तिथलं

वास्तव्य अवघ्या तीन महिन्यांचं. एवढ्या अवधीत लंडनसारख्या अफाट शहराची, फार तर प्रेक्षणीय स्थळं पाहून होतात...तिथल्या माणसांचा संबंध येतो तो ओझरता, वरवरचा...त्यांचं अंतरंग फारसं उकलत नाही...जीवनाचे आतले कप्पे उघडत नाहीत. त्याविषयी लिहायचं म्हणजे एखादं पुस्तक वरवर चाळून त्यावर परीक्षण लिहिल्यासारखं होतं...

× × ×

असं असलं तरी, आजच्या आंतरराष्ट्रीय सहजीवनाच्या युगात या प्रवासांना विशेष महत्त्व आहे...तसंच प्रवास-पुस्तकांनांही आहे. परदेशाशी प्रत्यक्ष परिचय करून घेण्याचं प्रवास हे एक उपयुक्त साधन आहे. तसंच आपल्या देशाचं चित्रही आपल्याद्वारे परदेशांत उभं करीत असतो. प्रवासानं मनुजा चातुर्य येतं, ही गोष्ट तर खरीच; आपण परंतु त्यानं दृष्टीच्या कक्षाही विस्तारतात. ठिकठिकाणी अहंकाराला ठेच लागते. दुसऱ्याकडे व स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोन पालटतो. आपले गुणदोष तुलनात्मकरीत्या पाहण्याची प्रवृत्ती निर्माण होते. आपला मोठेपणा जाणवतो, तसे दोषही स्पष्ट होतात ...आत्मसंतुष्टता मानवेनाशी होते. कासवाची दृष्टी जाऊन पक्ष्याची दृष्टी येते...ही गोष्ट पाश्चिमात्य व पौर्वात्य या दोन्हींही जगांना लागू आहे. लंडनमध्ये एकदा एका मित्राला मी म्हटलं होतं. "तुम्ही जगाकडे फक्त एकाच डोळ्यानं बघता... म्हणून जगाचा दुसरा आमचा भाग तुम्हाला नीट दिसत नाही..." दोन्ही डोळ्यांची दृष्टिकक्षा आज सर्वांनांच हवी आहे.

या दृष्टीनेच प्रवास पुस्तकांनाही महत्त्व आहे. ही पुष्कळदा ठरीव ठशाची असण्याचा संभव असेलही. त्यातील लिखाणाला मर्यादाही असतील...परंतु मला वाटतं, प्रवासाला निघालेला प्रत्येक माणूस हा आपला दृष्टिकोन बरोबर घेऊन जातो, त्याला आलेले अनुभवही वेगळे असतात. ते सांगताना त्याची निवेदन पद्धतीही वेगळी असते.

अशा प्रकारचा काहीसा वेगळेपणा कदाचित या लिखाणांत दिसू शकेल. वास्तविक, या लेखनप्रकाराबद्दल मला आकर्षण नाही. लहानपणी वर्गात प्रवासवर्णन लिहिली तेवढ्यानं धसका घेतल्यावर पुन्हा त्यांच्या वाटेला मी जाईन असं कधी वाटलं नव्हतं. पण लंडनला गेले आणि मती पालटली ... या साहेबाच्या नगरीनं लिहायला लावलं म्हणा हवं तर. माझा पहिला प्रवासलेख

मी लिहिला आणि कुठलीही पूर्वसूचना न देता माझे बंधू व तरुण भारताचे संपादक श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या प्रकाशनार्थ पाठविला...तो त्यांनी छापला, एवढंच नव्हे, तर आणखी प्रवास–लेखांची मागणी केली व पुस्तक लिहिण्याचाही आग्रह धरला. त्यांच्या प्रेरणेनेच हा प्रयत्न होऊ शकला.

× × ×

ही मी माझी "प्रवास कथा" म्हणेन...वाचकाला या कथेत काही नाविन्य आढळल्यास या लिखाणाचं सार्थक झालं म्हणायचं...नाही तर त्याला असलेल्या माहितीची उजळणी झाली असं समजायचं. हेही नसे थोडके!

मराठीचे ख्यातनाम साहित्यिक आणि आपल्या विविध लेखनाने महाराष्ट्राला लोकप्रिय झालेले सिद्धहस्त लेखक श्री. अनंत काणेकर यांनी या प्रवास-कथेसाठी चारशद्ब लिहिले. त्यांची मी ऋणी आहे. तसंच 'व्हीनस' प्रकाशनाचे संचालक श्री. पाध्ये यांनी अशा महागाईच्या दिवसातही हे पुस्तक काढण्याचा खटाटोप केला, याबद्दल त्यांचे व ते छापल्याबद्दल विमा मुद्रणालयाचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच.

× × ×

३४, शंकरनगर, नागपुर
१५ जुलै १९६६

सौ. इंदुमती शेवडे

" As to the Sage, no one
will ever know,
whether he existed or not "

—Lao Tse.

त्या 'Sage' हॅरीस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

एका काळोख्या मध्यरात्री, अप्रूप घडीला, एका नव्या अज्ञात जगात पाऊल टाकायला मी निघाले. सोबतीला एक अनामिक हुरहुर, लंगडं धैर्य, प्रियजनांचं ' शुभास्ते पंथानः ', अन् बी. बी. सी. चं पत्र, हे पाथेय.

सांताक्रूझ विमानतळावर असंख्य निऑन दिवे बटबटीत डोळ्यांनी पहात होते. तरीही प्रकाश जडवला होता. माणसांची अबोल गर्दी इथून तिथे भिर-भिरत होती. कस्टम्सच्या दाराशी निरोप दिले–घेतले जात होते. हारतुरे अंगावर चढत होते, फोटो निघत होते. डोळे पाणावत होते. आसवं पुसली जात होती.

या गुदमरणाऱ्या वातावरणात आमचं संभाषण वारंवार थबकत होतं, पूर्णविराम घेत होतं. . .तेच ते शब्द आवर्तन घेत होते. काही ओठावरून मागे फिरत होते. माझ्या प्रवास-कंपनीचा एजंट पुन्हा एकदा कस्टम्सच्या तपासणी-साठी घाई करून गेला.

" आता मात्र खरंच निरोप घ्यायला हवा हं ! वेळ होत आलीय. "

मी उठले. निरोप देणाऱ्यांना घेणाऱ्यांपासून अखेरचं विलग करणारी कस्टम्सची ती भिंत पाहून मला बर्लिनच्या भिंतीची आठवण झाली.

मघाशीच दुसरी दोन विमानं सुटली होती. परदेशी जाणारी विमानं मध्य-रात्रीलाच सोडण्यात कुठली योजना आहे, देव जाणे ! दिवसाच्या प्रकाशात हे निरोप अधिक सह्य होणार नाहीत का ?

कस्टम्सच्या कडक तपासणीच्या दिव्यातून बाहेर पडलेली मंडळी, मधल्या लाऊंजमधील कोचांवरून वाटसरूवृत्तीनं बसली होती, अन् विमानाच्या घोषणेची वाट पहात होती. पुरुषांचे वर्तमानपत्रांआड दडलेले चेहरे, गडबडी मुलं, त्यांना आवरणाऱ्या आया; सगळा अनोळखी चेहऱ्यांचा समुदाय. . .

पुन्हा आणखी एक विमान सुटलं; आमचं शेवटचं. तेल पिऊन ते ताजंतवानं होऊन उभं होतं अन् आपल्या लखलखत्या वाटोळ्या नेत्रावलीनं आमची वाट पहात होतं. त्याच्या अंगावर शिड्या चढल्या होत्या. पोचवायला आलेले आप्तस्नेही निरोप देऊन आता गच्चीवर जाऊन विमान सुटायची वाट पहात उभे होते.

अखेर, अंतिम घोषणा झाली अन् उतारूंची रांग सामानांनी भरलेल्या जड हातांनी विमानाकडे चालू लागली, शिड्यावरून चढू लागली. प्रवेश-द्वाराशी गणवेशातला पायलट आपल्या तुकडीसह स्वागताला उभा होता. उतारूंची रांग विमानानं पोटात घातली अन् त्याच्या नाकावरचं चक्र फिरू लागलं. पंख फडफडले अन् गच्चीवरचे केविलवाणे रुमाल हलू लागले.

तेवढ्यात विमानानं गरूडझेप घेतली. पाय पोटाशी कवटाळले अन् वरच्या अथांग अंधार पोकळीत ते पोहू लागलं. खाली जणु सहस्र रत्नांच्या प्रकाशांत मुंबापुरी चमकत होती. मुंबईचं हे असं रत्नजडित दर्शन यापूर्वी मी कधी घेतलं नव्हतं....मनात कविवर्य टिळकांची ओळ तरळली, "अशी रूपसंपन्न तू निस्तुला..." पाहता पाहता लक्षदीप दिसेनासे झाले. मग पुढे अंधार.

निरोप घेतलेल्या स्वकीयांचे उदास चेहरे विमानानं केव्हाच मागे टाकले होते. त्यांची रेंगाळणारी आठवण, नवख्या प्रवासातला एकटेपणा अन् पुढच्या जगाविषयी कुतूहल, या संमिश्र भावना आलटून पालटून मनात मागेपुढे सरकत होत्या. बाहेरची अंधार पोकळी मनातही दाटल्यासारखी काही वेळ वाटत होती.

हळूहळू विमानानं वेग धरला आणि आतल्या प्रवासी जीवनाला प्रारंभ झाला. प्रवाशांच्या हालचाली सुरू झाल्या. यजमान, यजमानिणींची ये जा चालू झाली. " नो स्मोकिंग, " " फासन युवर सीट बेल्टस " ही दारावरची विजेरी अक्षरं चौकोनी पाटी रिकामी टाकून अदृश्य झाली अन् हळूहळू धुम्र-वलयं निघू लागली. गंभीर प्रकृतीचे आपापल्या डोक्यावरचे अंगठ्याएवढे रात-दिवे लावून वाचनात मग्न झाले. मी खिडकीबाहेर पहात स्वस्थ बसून राहिले.

तेवढ्यात प्राणवायू पिशव्यांचं प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी पर्सर समोर येऊन उभा राहिला.

" हें निव्वळ रुटीन डेमॉन्स्ट्रेशन आहे " असं यजमानीण आपल्या मधुर बेफिकीर स्वरात बजावीत होती. तरी विमानी प्रवासाच्या अपघातांची आठवण अनेक चेहऱ्यांवरून पुसटती निघून गेली. माझ्या शेजारी अद्ययावत पोशाखातला एक शीख बसला होता पण तो डोळे मिटून स्वस्थ पडून होता. विमान न्यूयार्कला जांणार असल्यामुळे अमेरिकन लोकांचा भरणा खूप होता, पण त्या दिवशी कोण जाणे का, विमानात लहान मुलांचं पीक फुटलं होतं. मुलांना एवढा महागाईचा प्रवास कुणी आई-बाप घडवीत नसतील, असा तो-पर्यंत माझा ग्रह होता. त्यांचं केकाटणं आळीपाळीने चालू होतं. माझ्या रांगेत दोन कृष्णवर्णी मुलं होती. ती आपल्या साडी अन् गरमकोटातल्या म्हाताऱ्या आजीजवळ सारखी हट्ट करीत होती ..अन् प्रत्येकवेळी " यू नॉटी चाइल्ड, आईल टेल युवर डॅडी," म्हणून आजी त्यांना धमकावीत होती. त्यांचा हा डॅडी विलायतेत होता. त्याच्याकडे जायला ती निघाली होती. हें असं बराच वेळ चाललं होतं. शेवटच्या रांगेत आपल्या चारपाच कच्चाबच्च्यांच्या पसाऱ्यात, आपलं निसटतं तारुण्य सांभाळून एक अमेरिकन माता बसली होती. त्यांचं खाणपिणं, रडणं आरडणं पार्श्वसंगीताप्रमाणे अखंड चालू होतं. त्यांची बुटकी काळी आया विमानाच्या पिछाडीकडे त्यांची नेआण करतांनां जेरीस आली होती. हे केकाटणारे पाच पांडव समोर बसलेल्या दोघा अमेरिकनांपैकी एकाचे असावे. कारण मधून मधून रडताना ते त्यांच्याकडे पहात होते, पण त्यांचा पिता आपण त्या गावचेच नाही, अशा बेफिकीरनं वाचत बसला होता. एकूण समस्त भूतलावरची ' बाप ' ही संस्था सर्वत्र एक सारखीच निष्क्रिय होती म्हणायची!

इकडे हास्यवदना यजमानीण लवंगा, वेलदोडे, पेपरमिंट, चॉकलेट घेतलेलं तबक प्रत्येकाच्या नाकासमोर धरीत ' तुम्ही कोणतं पेय घ्याल ? " म्हणून विचारपूस करून गेली. माझ्या शेजारी स्तब्ध बसलेल्या शिखाजवळ ती येते, तेव्हा तिच्या मोहरी रंगाच्या रेशमी साडीकडे तो निसटता कटाक्ष फेकतो. त्या वेळी क्षणभर त्याच्या दाढीचा त्रिकोण हलल्यासारखा वाटला. आयुष्यातला माझा हा पहिलाच शीख–सत्संग.

पेपरमिंटची चव तोंडात विरघळण्या पूर्वीच गरम-थंड पेयांचीं तबकं फिरू लागली. क्वचित मद्याचे प्यालेही. त्या शिखाने एक घेतला. पाठोपाठ

" थँक यू हनी... " " हॅलो डार्लिंग " हे शब्द घुमू लागले. माझ्या शेजारी चुळबूळ सुरू झालेली मला जाणवली.

" आता पुढे हेच सारख ऐकायला मिळणार." माझ्या कानाशी लागून तो जटायू पुटपुटला.

" असं ? " मी भोळेपणानं विचारलं.

" नाही तर काय ? ऐकून ऐकून कान किटतील तुमचे ! " पाश्चात्य शिष्टाचाराचे धडे देण्याच्या बुद्धीनं तो म्हणाला.

" त्या हनीतली गोडी केव्हाच मेलेली असते अन् डार्लिंगमधेही प्रेमाचा लवलेश नसतो... " मद्याचे घोट घेत तो सांगत होता. ..

" अस्सं ? "

" कारण भेटणारी प्रत्येक मुलगी यांची ' हनी ' नि ' डार्लिंग ' असते. मी अमेरिकेत होतो, तेव्हा... " त्याने आपल्या त्रिकोणी दाढीवरून हात फिरविला.

" असं का ?

" हो ना ! अहो, खरं सांगतो बेहेनजी, ह्याही पलीकडचं नाही नाही ते या देशातून पाहवं लागतं आपल्याला... ". या ' नाही नाही ' च्या आठवणीनं बिघडलेली तोंडाची चव जणू धुवून काढण्यासाठी त्याने भराभर मद्याचे दोनचार घोट घेतले.

" खरं म्हणजे, बेहेनजी, तुम्हालाही संभाळून राहवं लागेल तिथं. "

" मला ? का बर ? "

" अहो, तुम्हाला ठाऊक नाही... तुमची जराशी ओळख झाली, की मागेपुढे न पाहाता तुम्हालाही ते तसंच म्हणतील. "

" मला ? ह्या वयात ? " मी अविश्वासानं विचारलं.

" तेच म्हणतो. तुम्हाला कल्पना नाही दिसत अजून ह्या लोकांच्या वागण्याची . मी अमेरिकेत होतो तेव्हा " पुन्हा एक मद्याचा घोट.

" पण मी अमेरिकेला जात नाहीय...लंडनला जातेय " त्याचं पालुपद वरच्यावरच झेलीत मी म्हटलं.

" म्हणून काय झालं ? तेही यांचेच भाईलोक ! दुकानात भाजी घ्यायला गेलात, तरी तुमच्या पदरात ती टाकताना दुकानदारसुध्दा एखाद्यावेळी तुम्हाला ' डार्लिंग ' म्हणायचा."

"हा त्यांच्या भाषेतला शिष्टाचार असेल ... कदाचित"

"तुम्ही तिथ प्रथमच जाताय वाटत ?"

"हो" मी अपराधीं स्वरात म्हटलं.

"म्हणूनच !... ह्या लोकांच्या नीतिमत्तेची कल्पनाच आपण भारतीय करू शकत नाही... आपल्याकडे परस्त्री, म्हटली की ती आपली बहीणच मानायची असते, नाही का बेहेनजी...?"

पण या अवघड प्रश्नाला मला उत्तर द्यावं लागल नाही. कारण तेवढ्यात यजमानीण त्याच्या कानाला लागून म्हणालीं,

"तुम्हाला हाच पेला हवा होता ना मघाशी ? व्हिस्की आहे !

"हो, हो, हवाय ना !..." दाढीला पुन्हा कुरवाळीत तो म्हणाला. यजमानीण पुढच्या खुर्चीकडे वळली होती.

" बाकी, एअर इंडियातल्या सर्व पोरी... एकजात ... 'ह्या' असतात पहा—अगदी 'हनी' 'हनीव्हॉरुड' आय मीन," तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडें पाहत तो बोलत होता... 'मी अमेरीकेत होतो तेव्हा ..."

पृथ्वीतलावरील अखिल स्त्री—जातीला 'बेहेनजी' मानून, मग त्यांच्याकडे "ह्या" दृष्टीने पाहणारी त्याचीं भारतीय (?) नजर ..मी ओळखली. अन् कॉफीचा कप तोंडाला लावला. तेवढ्यात त्याला हवा असलेला पेला त्याच्या हाती आला. तो घेत यजमानिणीकडे एका तुसडं "थँक यू" त्यान भिरकावलं दोन घोट घशात लोटले... मग...

"ओह ! माय हेड इज स्प्लिटिंग."

असं म्हणत, बहूधा मला झाला तेवढा बोध पुरे असं समजून तो उठला अन् पलिकडच्या एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसला. पाच मिनिटांनंतर माझ्या मागच्या खुर्चीवर बसलेली एक किरकोळ अंगाची, उंच गालफडं असलेली... तरुण पोरगी उठली व माझ्या शेजारी बसत आपल्या घोगऱ्या आवाजात म्हणाली,

"तुमची हरकत नसेल तर मी बसते इथं..."

"बसा ना" तिच्या हातातील हिरव्या बांगड्या मोजण्याचा वृथा प्रयत्न करीत मी म्हटलं. तेवढ्यात तिन खुलासा केला "आमच्यात लग्नापूर्वी असा हिरवा—चुडा भरतात..."

" थँक यू हनी... " " हॅलो डार्लिंग " हे शद्ब घुमू लागले. माझ्या शेजारी चुळबूळ सुरू झालेली मला जाणवली.

" आता पुढे हेच सारख ऐकायला मिळणार." माझ्या कानाशी लागून तो जटायू पुटपुटला.

" असं ? " मी भोळेपणानं विचारलं.

" नाही तर काय ? ऐकून ऐकून कान किटतील तुमचे ! " पाश्चात्य शिष्टाचाराचे धडे देण्याच्या बुद्धीनं तो म्हणाला.

" त्या हनीतली गोडी केव्हाच मेलेली असते अन् डार्लिंगमधेही प्रेमाचा लवलेश नसतो... " मद्याचे घोट घेत तो सांगत होता. . .

" अस्सं ? "

" कारण भेटणारी प्रत्येक मुलगी यांची ' हनी ' नि ' डार्लिंग ' असते. मी अमेरिकेत होतो, तेव्हा... " त्याने आपल्या त्रिकोणी दाडीवरून हात फिरविला.

" असं का ?

" हो ना ! अहो, खरं सांगतो बेहेनजी, ह्याही पलीकडचं नाही नाही ते या देशातून पाहवं लागतं आपल्याला... ". या ' नाही नाही ' च्या आठवणीनं बिघडलेली तोंडाची चव जणू धुवून काढण्यासाठी त्याने भराभर मद्याचे दोनचार घोट घेतले.

" खरं म्हणजे, बेहेनजी, तुम्हालाही संभाळून राहवं लागेल तिथं. "

" मला ? का बर ? "

" अहो, तुम्हाला ठाऊक नाही... तुमची जराशी ओळख झाली, की मागेपुढे न पाहाता तुम्हालाही ते तसंच म्हणतील. "

" मला ? ह्या वयात ? " मी अविश्वासानं विचारलं.

" तेच म्हणतो. तुम्हाला कल्पना नाही दिसत अजून ह्या लोकांच्या वागण्याची . मी अमेरिकेत होतो तेव्हा " पुन्हा एक मद्याचा घोट.

" पण मी अमेरिकेला जात नाहीय...लंडनला जातेय " त्याचं पालुपद वरच्यावरच झेलीत मी म्हटलं.

" म्हणून काय झालं ? तेही यांचेच भाईलोक ! दुकानात भाजी घ्यायला गेलात, तरी तुमच्या पदरात ती टाकताना दुकानदारसुध्दा एखाद्यावेळी तुम्हाला ' डार्लिंग ' म्हणायचा."

" हा त्यांच्या भाषेतला शिष्टाचार असेल ... कदाचित"

" तुम्ही तिथ प्रथमच जाताय वाटत ? "

" हो " मी अपराधीं स्वरात म्हटलं.

" म्हणूनच !... ह्या लोकांच्या नीतिमत्तेची कल्पनाच आपण भारतीय करू शकत नाही... आपल्याकडे परस्त्री, म्हटली की ती आपली बहीणच मानायची असते , नाही का बेहेनजी... ?"

पण या अवघड प्रश्नाला मला उत्तर द्यावं लागल नाही. कारण तेवढ्यात यजमानीण त्याच्या कानाला लागून म्हणालीं ,

" तुम्हाला हाच पेला हवा होता ना मघाशी ? व्हिस्की आहे !

"हो, हो, हवाय ना !..." दाढीला पुन्हा कुरवाळीत तो म्हणाला. यजमानीण पुढच्या खुर्चीकडे वळली होती.

" बाकी, एअर इंडियातल्या सर्व पोरी... एकजात ... 'ह्या' असतात पहा–अगदी 'हनी' 'हनीव्हॉस्ड ' आय मीन, " तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडें पाहत तो बोलत होता... 'मी अमेरीकेत होतो तेव्हा ..."

पृथ्वीतलावरील अखिल स्त्री–जातीला ' बेहेनजी ' मानून, मग त्यांच्याकडे " ह्या " दृष्टीने पाहणारी त्याचीं भारतीय ( ? ) नजर .. मी ओळखली. अन् कॉफीचा कप तोंडाला लावला. तेवढ्यात त्याला हवा असलेला पेला त्याच्या हाती आला. तो घेत यजमानिणीकडे एका तुसडं " थँक यू " त्यान भिरकावलं दोन घोट घशात लोटले... मग...

" ओह ! माय हेड इज स्प्लिटिंग. "

असं म्हणत, बहूधा मला झाला तेवढा बोध पुरे असं समजून तो उठला अन् पलिकडच्या एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन बसला. पाच मिनिटांनंतर माझ्या मागच्या खुर्चीवर बसलेली एक किरकोळ अंगाची, उंच गालफडं असलेली... तरुण पोरगी उठली व माझ्या शेजारी बसत आपल्या घोगऱ्या आवाजात म्हणाली,

"तुमची हरकत नसेल तर मी बसते इथं..."

"बसा ना" तिच्या हातातील हिरव्या बांगड्या मोजण्याचा वृथा प्रयत्न करीत मी म्हटलं. तेवढ्यात तिन खुलासा केला " आमच्यात लग्नापूर्वी असा हिरवा–चुडा भरतात... "

"मी न्यूयॉर्कला चाललेय ...माझ्या मंगेतरशी लग्न करायला."

"असं का?" तिच्या अंगावरील दागिन्यांच्या प्रदर्शनाचाही अर्थ मला आता कळला.

"हो ते तिथं नोकरीला आहे...मी होमसायन्स अन् क्राफ्ट्सचा डिप्लोमा घेतलाय...अमेरिकेत पुढे शिकेन म्हणतेय..."

"वा! छान!" तिच्या हातातील विणकाम बघत मी म्हटलं.

तिनं अंगात घातलेला लोकरीचा पोलका अन् मांडीवर कुरवाळून घेतलेली मण्यांची बॅग ..ही मात्र तिच्या डिप्लोमाबद्दल प्रश्नचिन्हं निर्माण करीत होती. थोड्या वेळानं, तसलंच भरतकाम केलेली शालही तिनं अंगावर घेतली. आपला डिप्लोमा सिद्ध करण्यासाठी की वाढत्या थंडीमुळे, ते तीच जाणे!

"माझं नाव सुस्मिता! तुमचं?" हातातल्या बाटलीतलं संत्रासव नळीनं तोंडात ओढीत तिनं विचारलं. तिच्या रुक्ष, खडकाळ चेहऱ्याकडे पाहून एका दीडशे पौंडी 'लतिकेची'--मला माझ्या एका जुन्या वर्गभगिनीची–मला आठवण आली. विसंगत नाव ठेवून मातेपिते आपल्या मुलांचा असा सूड घेतात कधीकधी! हे थंड पेय सुस्मितेला थंड करण्याऐवजी उत्तेजित करीत असलेलं दिसलं. त्या भरात परदेशी चलनावळीबाबत सरकारचं 'दुष्ट' धोरण, त्यासाठी पडलेला त्रास, त्यासाठी अमेरिकानिवासी 'मंगेतर' कडून मागवावी लागलेली सर्टिफिकेटं, त्यांचा पत्रव्यवहार, व्हिसा व तत्सम इतर अडचणी, इत्यादि विषयांतून तिचं बोलणं वाट काढीत राहिलं. त्या अखंड वाक्प्रवाहातून माझं लक्ष वारंवार निसटून बाहेर जात होतं...केव्हा तरी पुढे या सुस्मितेचं स्मित अन् वाचा बंद पडली. अन् तिच्या घोगऱ्या आवाजाऐवजी...विमानाच्या घरघरीशी सुसंवादी असं घोरणं माझ्या कानाशी ऐकू येऊ लागलं.

मला अजून झोप नव्हती. शिखानं आणखी एक पेला मागवला होता बहुधा!

समोरच्या खुर्चीत बसलेल्या नाजुक पारशी मुलीला विमान लागलं होतं. दर अर्ध्या तासानं यजमानीणतिच्या तोंडाशी प्लॅस्टिकची पिशवी धरत होती अन् मघाशी 'हनी' 'डॉर्लिंग हे शब्द झेलले, त्याच निर्विकारपणे तिची मळमळही झेलत होती.

रात्रभर हे असंच चालू होतं.

विमानातली हालचाल आता मंदावली होती. विमान किती उंचावरून, किती वेगानं, किती हवेच्या दावात चाललंय याविषयी अधूनमधून घोषणा होत होत्या...परंतु एवढ्या उंचीवर हे गणिती आकडे शून्यासारखे वाटत होते. सर्व सुखसोयींनी सुसज्ज असं ते एक उडतं घरच होतं जणू. 'एअर इंडि-या'च्या जाहिरातीतून पुष्कळदा 'अरेबियन नाईट्स' मधल्या जादूच्या गालिचावर बसलेला एक महाकाय बादशहा अलगद उडताना दाखवलेला असतो... पण हे विमान त्या गालिचापेक्षाही अधिक सुखावह असावं, असं म्हणायला हरकत नाही. एकच कमतरता होती. देह आडवा करता येत नव्हता.

उत्तेजक पेयांमुळे आणि यजमानिणीच्या तत्पर सेवाभावाने सुखावून, देहाचे तऱ्हतऱ्हेचे कोन करुन मंडळी विसावली होती. बहुतेक निजानीज झाली होती. डझनावर असलेली पोरंही आता थकून माकून झोपी गेली होती. बहुते-कानी आपले दिवे बंद केले होते. तो शीखही रेलून स्वस्थ पडला होता.

पण मला झोप नव्हती. मी बाहेरच्या गडद अंधाराकडे पहात बसून राहिले. ते दोघे अमेरिकन प्रवासी तेवढे कामं करीत राहिले. विमानाबाहेर एक-दाही डुंकून त्यांनी पाहिलं नव्हतं. त्यांच्या या उपेक्षावृत्तीमुळे 'रात्रीला मुंबई, लंचला लंडन अन् डिनरला अमेरिका," अशा सराईत वर्गातले ते असावे, असा मी अंदाज केला.

थोडा वेळ मीही पुस्तकाशी लगट करुन पाहिली. नेहमी प्रवासात वाचनाचं भरपूर साहित्य घेण्याचा माझा सोस, पण या प्रवासात कुठलंही जड साहित्य मानवणार नाही, या दूरदृष्टीनं मी ॲगथा ख्रिस्तीची एक हलकीफुलकी खून-कथा ठेवून घेतली होती. दहा-बारा पानं उलटल्यावर कंटाळून तीही बाजूला सारली. बाहेरचा अंधारच अधिक लक्षवेधी होता.

ह्या नितळ, रेशमी अंधारानं अवकाश व्यापलं होतं. क्षितिज शेकडो मैल लांब राहिलं होतं. पृथ्वी अन् तिच्यावरची सुखदुःखंही त्याक्षणी क्षुद्र भासत होती. दिशांचही भान नसलेली ही अथांग, अंधारी पोकळी किती रम्य होती ? अंधाराच्या ह्या सौंदर्याचा असा साक्षात्कार यापूर्वी मला कधीही झाला नव्हता. मला शरच्चंद्राच्या 'श्रीकांत' मधील कृष्णरात्रीचं वर्णन

आठवलं. प्रकाशातच सौंदर्य असतं अन अंधार असुंदर असतो, हे कुणा वेड्यानं सांगितलं ?··· पण ते कळायला तीन हजार फूट वर यावं लागलं होतं.

वर लखलखत्या चांदण्याचं तेज ठिबकत होतं अन् वरच्यावर विरून जात होतं. अंधाराला आकार नव्हता. कारण विरोधी प्रकाशच नव्हता. हा अंधार निराकार, अरूप होता... तरीही रिकामा वाटत नव्हता. प्रकाशगर्भ होता. निर्मितीपूर्व 'नासदीय' स्थिती म्हणतात, ती अशीच रहात असेल का ?

केव्हा तरी या गूढ अंधाराची झापड मनावरून डोळ्यांवर सरकली अन् मला झोप लागली.

पुढे तीतून यजमानिणीच्या घोषणेनंच जागं केलं.

"कैरो !"

तो शब्द ऐकून, सर्वजण खडबडून उठले. मी बाहेर पाहिलं रात्रीच्या त्या रम्य अंधाऱ्या गर्भातून उषःकाल बाहेर पडत होता. वस्तूंना आकार फुटत होते. आसमंत गात होतं. " भद्रा ददृक्ष उर्विया विभास्यत्ते शोचिर्भानवो द्यामपन. अनादि काळापासून ह्या उषेने मानवाला गायला लाविले. " उघडी नयन रम्य उषा " आजची ही उषा माझ्या डोळ्यांना अपूर्व भासली. वास्तविक दररोज हसत हसत येणारी ही रम्य उषा आपले डोळे असेच उघडत होती. फक्त ते पहायला म्या सूर्यवंशीयेचे डोळे त्यावेळी कधीही उघडे राहत नव्हते.

तेवढ्यात कुणीतरी 'पिरॅमिड' असा शब्द बोललं...अन् जो तो वाटोळ्या काच-खिडक्यांवर नाक घासू लागला. पण मला मात्र साधा उंचवटाही कुठे दिसला नाही.

मी हळहळले. तेवढ्यात कुणी तरी विघ्नसंतोषी पुटपुटला, " खरं म्हणजे इथून पिरॅमिड दिसतच नाहीत. "

ते ऐकून मला वरं वाटलं.

तेवढ्यांत विमानानं जमिनीवर पाय टेकले. समोर कैरोच्या विमानतळाची प्रचंड इमारत दिव्यांच्या झगझगाटानं आमचं स्वागत करीत उभी होती. शिडीवरून खाली येताच प्रसन्न वारा स्वच्छंदपणे अंगाशी येऊन झोंबला...

अखेर, क्लिओपात्राच्या देशातलाच तो वारा!

× × ×

इजिप्त म्हणजे भारताप्रमाणेच पुरातन संस्कृतीचा देश. युरोपचा इतिहास या संस्कृतींपासून लिहिला जातो. ख्रिस्तापूर्वीच या संस्कृतीने अनेक शतकं काढून टाकली होती. ज्यू लोकांचा प्रेषित मोझेस याच मरूभूमीत जन्मला; इथल्या राजवैभवात वाढला. इथून त्याने ज्यू लोकांना "प्रॉमिस्ड लँड" – हिरवळ–दाखवली अन् ज्यू दस्यूंची सुटका केली. जुलमी सत्तेविरुद्ध दस्युंनी उभारलेलं मानवाचं ते पहिलं बंड असावं... त्यानंतर आज हजारो वर्षांच्या इतिहासाची पानं फडफडून गेली होती. अनेक उलथापालथी झाल्या होत्या. साम्राज्यांची वाळवंटं बनली होती... पण इजिप्शियन–ज्यू लोकांच्या मधलं पुरातन हाडवैर नीलनदीप्रमाणे कायम राहिले होतं...इतिहास पुसले जातात..संस्कृतीची राख होते, पण बऱ्यावाईट मानवी भावना मात्र साऱ्यांना पुरून उरतात ..असा याचा अर्थ करायचा?

इथल्या प्राचीन संस्कृतीचे काही अवशेष तरी अवतीभवती दिसतील असं वाटलं होतं. पिरॅमिड ओझरताही दिसला नाही, म्हणून चटका लागला. अर्थात त्यातले 'ममी' दिसणारच नव्हते. नाईल ही इजिप्तची गंगा...निदान ती इथं 'दुर्लभ दर्शन' असेल, असं वाटलं नव्हतं...पण तीही म्हणे लांब राहिली होती. इथल्या वाळवंटातलं जहाज उंट...तो कुठे दिसतो का म्हणून उंटाच्या मानेनं दूरवर नजरा टाकून पाहिल्या...परंतु या हवाईजहाजाच्या युगात तो ही 'सेवानिवृत्त' झालेला दिसला. उंट, शेळ्या किंवा त्यांना हाकणारा 'उंटावरचा,' ह्यांपैकी एकही प्राणी आमच्या दिशेनं फिरकला नाही. निदान चहाला खजुराची साखर तरी!···पण तीही जागा आधुनिक शर्करा– स्फटिकांनी घेतली होती. फक्त त्यांची खुरटी झाडं मात्र इतस्ततः दिसली.

ह्या प्राचीन वाळवंटांत कैरोच्या विमानतळाची ती अत्याधुनिक इमारत पाहून थोडा विरस झाला. ओळीनं बांधलेल्या एकाच धर्तीच्या घरांची ती वसाहत झोपेतून जागी होत होती. इथं प्राचीन असं काहीही नव्हतं··· आधुनिक स्थापत्य हे अंतरराष्ट्रीय आहे. तीतून प्रादेशिकतेचं उच्चाटण झालेलं दिसतं. सिमेंट-कांक्रीट, प्लास्टिक, काच, क्रोमिअम, स्टील या आधुनिक स्थापत्य-

साधनांनी बांधलेल्या ह्या वास्तू सर्वत्र इतक्या सारख्या असतात, की आकार-मानापलीकडे त्यात फारसा वेगळेपणा दिसत नाही.

चित्रविचित्र, अकल्पित आकारांच्या या भपकेबाज पसाऱ्यात··· प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला इजिप्शियन शैलीतलं एक मोठं कोरीव भित्ति-चित्र ममीसारखं गुदमरून उभं होतं. बाकीचं फर्निचर, रक्षापात्र, फुलदाण्या, चहापात्र ह्या साऱ्या वस्तू आधुनिक कलेचे नमुने होते. या आंतरराष्ट्रीय वातावरणात वेगळे दिसले ते इथले परिचारकांचे पोशाख. फेजटोप्या घातलेले अन कलावतूचे लाल-निळे पायघोळ डगले चढवलेले हे परिचारक, एखाद्या राजवाड्यातून उचलून आणल्यासारखे भासत होते. पेयं देताना ते दरबारी पद्धतीनं वागत होते, सफाई-दार इंग्रजी बोलत होते. नीटस नाकाडोळ्यांचे, ऊंचपुरे हे परिचारक एकजात नासेरी शरीरयष्टीचेच दिसले. या सर्वांवर अधिराज्य करीत, कोपऱ्यातल्या एका डेस्कवर बसलेली देखणी मुलगी जणू क्लिओपात्रा अन् पिरॅमिड या दोन्हींची उणीव भरून काढत होती. क्लिओपात्राचं रूप, अन डोक्यावर केसांचा ऊंच निमुळता पिरॅमिड तिनं बांधला होता.

कैरोला विमान चाळीस मिनिटं थांबलं. आता दिवसाच्या उजेडांत, रात्रीची निराकारता गेली होती. वस्तूंना तसेच माणसांनाही आकार येत होते. चेहऱ्यांत ओळख भरत होतीं.

तो कालचा शीख इथेच उतरला होता. जाताना त्यानं 'बाय' म्हटलं अन कस्टम्सच्या दिशेनं तो नाहीसा झाला. मी, सुस्मिता अन् रातभर ओकणारी पारशी मुलगी असा आमचा ग्रूप जमला. त्यांत मुंबईचे कुणी तेंडुलकर पति-पत्नी सामील झाले. ते दोघे अमेरिकेला चालले होते. श्रीयुत एम. ई. टी. आय की तत्सम कसल्याशा कोर्ससाठी जात होते. अन् सौ. अमेरिका पहायला सोबत होत्या. चहा पीतस्तवर विमानाची वेळ होऊन गेलेली होती.

× × ×

कैरोनंतर पुढचं स्टेशन प्राग. ही कम्युनिस्ट झेकोस्लोव्हाकियाची राजधानी. वाटेत भूमध्य समुद्र, इटली, आल्पस ह्या गोष्टी दिसतील, असं वाटलं...पण त्याही कल्पनेतच ओलांडल्या. तीन हजार फुटावरून ऐटीत उडणाऱ्या विमानांना भूतलावरील या गोष्टी किरकोळ वाटत असाव्या.

प्रागला पोचलो, तेव्हा सकाळचे आठ वाजले होते. कोवळी, हसरी, ओलेतीं सकाळ होती. पावसाचा शिडकावा अजून आजूबाजूच्या गवतावर दिसत होता. चहुकडे हिरवंगार... सुरम्य दृश्य होतं. इथली माणसं मात्र अत्यंतशांत, गंभीर वाटली. कुणीकुणाशीकुजबुजताना सुध्दा दिसत नव्हत. सारी कामात व्यग्र होती.

इथ भाषा बदलली. डोळ्यांचे, केसांचे रंग बदलले. एक निळ्या डोळ्यांचा सोनेरी केसांचा म्हातारा वेटर निमूटपणे चहाचे ट्रे ठेवून गेला, पण त्यात दूध नव्हतं. आम्ही उच्चारलेला 'मिल्क' हा शब्द त्याला समजला नसावा... बाकीचे सारे दुधाशिवाय चहा-कॉफी पीत होते. दुसरा वेटर येऊन त्याने दूध आणेतो विमान सुटायची वेळ होत झाली. मग घाईघाईनंच चहा ढोसला...

चहा पीत असताना समोरच्या टेबलाशी डोक्यावर मद्रदेशीय पागोटं चढवलेले न् लाल गंधाची उभी चीर लावलेले डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार दिसले. प्रथम ते डॉ. रामस्वामी आहेत अशीच समजूत झाली. रामस्वामीना मी पूर्वी पाहिलं होतं. नेपामिल्सला त्यांच्या एका खान्यात सामीलही झाले होते. म्हणून मी त्या रामस्वामीना नमस्कार केला...पण रामाला केलेला नमस्कार लक्ष्मणाला पोचत होता हे वर्तमानपत्र वाचल्यावर कळलं. ते कुठलंसं शिष्टमंडळ घेऊन चालले होते...दोन भावांत इतकं विलक्षण साम्य होतं.

× × ×

प्रागहून परिस. पुन्हा तास-दींड तासाचा प्रवास. आता सूर्य स्वच्छ उगवला होता. ढगांची लुडबुड नव्हती. विमानाखालचा भूप्रदेश, जंगल शहरं, नद्यापर्वत एखाद्या नकाशातल्यासारखी दिसत होती. करंगळीसारख्या नद्या, लहान लहान मातीच्या ढिगासारखे पर्वत, अन् त्रिकोणी--चौकोनी हिरवळीचे पट्टे, लहानपणी खाल्लेल्या बुढीच्या केसासारखे पांढरे शुभ्र ढग विमानाखालून अलगद उडत होते. लहान लहान खेड्यांची घरकुलं भराभर सरकत होतीं पॅरिसवरून विमान जाऊ लागलं, तेव्हा त्याचा अफाट विस्तार जाणवला परंतु एवढ मोठं शहर 'लिलीपुट' सारख भासत होतं.

पॅरिसला येताच नव्या आधुनिक जगात प्रथम पाऊल टाकत असल्याची जाणीव होते. तिथलं विमानतळ पाहून पॅरिस हवाई-जंक्शन आहे, याची कल्पना आली. तळावर वेगवेगळ्या प्रवास कंपन्यांची विमानं उभी होतीः काही

उतारू आत घेत होती; काही बाहेर टाकीत होती. नाना देशांचे, नाना भाषांचे नाना पोशाखातले प्रवासी इकडून तिकडे येजा करीत होते. समोरची तीन मजली इमारत कैरोच्या इमारतीपेक्षा अधिक मोठी अन नेत्रदीपक होती. अंगावर लाल गणवेश चढवलेल्या अन डोक्यावर पालथ्या तव्यासारख्या लाल टोप्या टेवलेल्या देखण्या चुणचुणीत पोरी ठिकठिकाणी कामं करताना दिसत होत्या. सगळीकडे घाई, लगबग, थंड सराईत चेहरे, मेलेल्या नजरा. एकालाहि दुसऱ्याकडे कुतूहलाचा कटाक्ष टाकायलाही वेळ नाही; जणु समोरची माणसं चालती बोलती यंत्रं असावीत अशी निर्विकारता. इथं माणसामाणसांतले दुवे नष्ट झालेल्या यांत्रिक, अमानवी संस्कृतीची घटकाभरात चुणूक येते.

सर्वत्र फ्रेंच भाषेतल्या पाट्या ... अन तोंडात गुळगुळीत फ्रेंच (पण पाट्यांवर इंग्रजी प्रतिशब्द जोडीला होते.) पण एवढ्या प्रचंड इमारतीत चहाचं कँटीनच हरवलं . पंधरावीस मिनिटं तिथल्या लांबलचक व्हरांड्यातून आमचा ग्रूप रिकाम्या खेपा घालीत राहिला. त्या स्थितींत गोऱ्या स्त्रीपुरुषांचा एक अत्याधुनिक घोळका आमचे बावळट पोशाख अन त्याहून बावळट मुद्रा यांच्याकडे तुच्छतेचा कटाक्ष टाकून आमच्या अंगावरून निघून गेला. पॅरिसमध्ये आमच्याकडे कुणाचं लक्ष वेधल्याची तेवढीच एक आठवण ! त्यानंतर कँटीन शोधण्याचंही त्राण आमच्यात उरलं नाही अन् चहाशिवायच खाली उतरायचं आम्ही ठरविलं.

'एस्केलेटर' हा फिरता जिना इथं प्रथम पाहिला. पायांना श्रम न पडता आपोआप चढउतर होते. आमचा भारतीय थवा जिन्याशी किंचित अडखळला, तेवढ्यात सत्तरीवर पोचलेले लक्ष्मणशास्त्री दोन्ही हात सोडून त्यावरून लीलया उतरताना दिसले. मग काय ? आम्हीही त्या लक्ष्मणा पाठोपाठ ती लक्ष्मणरेषा ओलांडली.

ती ओकणारी पारशी मुलगी इथे उतरून, जर्मनीला जाणारं दुसरं विमान घेणार होती. तिनं आम्हाला 'गुडबाय' म्हटलं अन ती गेली. इथे विमानाचं सारं पथक बदललं.

पॅरिस हा शेवटचा मुक्काम ... आता फक्त चाळीस मिनिटांत लंडन. निघालो तेव्हा साडेनऊ झाले होते... घड्याळ्याच्या काट्यांची पुन्हा एकदां फिरवाफिरव केली. मुंबई सोडून आता बारा तासाच्यावर होऊन गेले होते. अंग आंबली होती. आता मंडळी हळूहळू अबोल होत गेली अन खिडक्यांशी डोळे लावून

बसली. सव्वीस मैलांची इंग्लिश खाडी एखाद्या लहानशा ओहोळाप्रमाणे भासली ती पाहून एकेकाळी क्रांतिवीर सावरकर ती अर्धी पोहून गेल्याचं आठवलं अन आता तर लहानसहान पोरीसुद्धा ती संपूर्ण पोहण्याचा विक्रम गाजवू लागल्या आहेत.

खाडी संपली अन विमान लंडनवरून घिरट्या घालू लागलं. पॅरिस पाहताना कुतूहल होतं ... पण लंडन पाहताना उत्सुकता होती. परंतु वरुन सारी शहरं पुष्कळशी एकसारखी दिसतात. विमानाच्या प्रवासात आगगाडीच्या प्रवासाची जवळीक अन दृष्टिसुख नाही. आगगाडीनं कल्याणची खाडी ओलांडली, की मुंबईची कल्पना येऊ लागते. गाडी तिच्या अगदीं मध्यभागामधून जात असते ... पण दुरावा ठेवणारी ही अस्मानी दृष्टी शहराची ओळख करून घ्यायला कामी पडत नाही.

लोक आवराआवर करू लागले. स्त्रिया ओष्ठ शलाका फिरवू लागल्या. मुलं तयार होऊन बसली.

पाहता पाहता विमानानं खाली झेप घेतली. क्षणात ते जमिनीला लागलं, अन मलाहि इंग्रज कवीबरोबर गावंसं वाटू लागलं.

" ......Ah LONDON ! . ...
What fortunes be within you ? "

× × ×

विमानाच्या दाराशी उभ्या असलेल्या यजमानिणीला 'धन्यवाद' देऊन आम्ही खाली उतरलो अन कस्टम्सच्या दिशेनं आमची रांग चालू लागली.

'कस्टम्स' हे देशाचं प्रवेशद्वार. इथे येणारा परकीय घटकाभरांत शत्रू किंवा मित्र होतो. तुमच्या देशाविषयी भलीबुरी मत इथंच प्रथम बनतात. इथं मिळणाऱ्या वागणुकीवरून तुम्हीं कुठल्या प्रकारच्या लोकांच्या देतात जात आहात, याची अटकळ बांधायला हरकत नसते.

समोरच्या बसक्या, साध्या, इमारतीत 'कस्टम्स' च्या कठड्याशी आपली तिकिटं अन परवाने काढून, झडतीसाठी आमची रांग उभी राहिली. देशी अनुभवावरून, निदान तासभर तरी ताटकळत उभं राहण्याच्या तयारीत आम्ही होतो. परंतु एकंदरीत विलंबित लयीत साहेबाला रस असलेला दिसला नाही. इथे द्रुताचीच आवड फार. गाडी गाठण्याच्या चालीनं दरेकाचं चालणं. माझा

"आंतरराष्ट्रीय स्वास्थ्य परवाना" एका मिनिटात 'थँक यू' सह परत मिळाला. कस्टम्सची झडतीही अशीच झटपट. माझ्या बॅगा निरपराध असल्याचं अधिकाऱ्यांनी बहुधा माझ्या चेहऱ्यावरून हेरलं असावं

"हॅव यू एनीथिंग टु डिक्लेअर, मॅडम ?"

गणवेशातल्या त्या साहेबानं ज्या नम्रतेनं हा प्रश्न विचारला, त्यानं मी क्षणभर बावरले. इंग्रज सरकारच्या जमान्यात 'नेटिव्ह' लोकांवर खेकसणारा साहेब पाहिल्या, ऐकलेल्या मला क्षणभर या नम्रतेनं गोंधळात पाडलं.

"नथिंग" भानावर येऊन मी कसंबसं म्हटलं.

"मे आय नो हाऊ लाँग यू विल स्टे हियर ?" थोडासा दुखावणारा प्रश्न. पण ब्रिटनचा नवा 'आगतांचा कायदा' नुकताच चालू झाल्यामुळे हा प्रश्न अपरिहार्य होता.

"मी बी. बी. सी. च्या शिक्षणासाठी आलेय. ते संपलं की जाईन... अदमासे तीनचार महिन्यांत."

"आय सी. ओके." हसत त्यानं बॅगांवर खडूच्या फुल्या मारल्या. हमालासाठी मी भोवताली नजर टाकली. हे सामान बाहेरच्या बसमध्ये ठेवायचं होतं पण इथे हमाल म्हणून ओळखूं येईल असा कुणी दिसला नाही. शेवटी स्वतः हमाली करावी अशा विचारात होते. तेवढ्यांत

"मे आय कीप दिस फॉर यू, मॅडम ?" म्हणून दुसऱ्या एका सुटाबुटातल्या गोऱ्यानंच माझं लक्ष वेधलं नि सामान बसकडे नेलं. हा हमाल होता की, स्त्रीदाक्षिण्य असलेला साहेब ? ते मला आजवर कळलं नाही. सुटाबुटातला हमाल म्हणावा, तर त्याने हमालीही मागितली नाही. . .बसच्या उघड्या पिछाडीत सामान टाकून तो अदृश्य झाला होता.

या देवदूताचा शोध घेण्यात माझे डोळे गुंतले असतांनाच. . . समोर माझा मुलगा अरुण दिसला.

भोवताली हसरं ऊन सांडलं होतं... त्याचं हसणंही त्या उनासारखंच मला वाटलं. अडीच वर्षांनंतर माझी भेट होत होती. त्याचं वागणं बोलणं मी निरखीत राहिले. अरुण इंग्रजाळला होता. इंग्रजी बोलण्याची लकब बदलली होती. मराठी धड बोलता येत नव्हतं. एकेक दोनदोन भेदरलेले शब्द बाहेर पडत होते.

"मराठी पार विसरलास वाटतं ?

"ह्या अडीच वर्षांत मराठी बोलायला मिळालंच नाही जवळपास."

"तेवढ्याचसाठी मुद्दाम मी मराठीत पत्र लिहीत असे."

"पण तो महिन्यातून एखदाच घडा व्हायचा." थोडावेळ असंच काहीतरी बोलत उभे राहिलो. मग बसमध्ये जाऊन बसलो. आम्हाला बराच वेळ ताटकळत बसावं लागलं. अजून उतारू येतच होते. सामान चढत होतं... शेवटी एका लांबलचक पुलाखालून बस निघाली अन् रस्त्याला लागली...

भोंवतालीं आसमंत नवखेपणानं पाहात होतं. सकाळचे अकरा वाजले होते. पण सकाळ चिरतरूण भासत होती. वातावरणांत आल्हाद होता.... माझी नजर आधाशीपणे सारा नवखेपणा टिपून घेत होती. रस्त्यावरून सांडलेलं मुलायम ऊन सोन्याप्रमाणे चकाकत होत. त्यावरून आंग्ल-सुंदरी द्रुतगतीन चालत होत्या. कोलमनच्या " Pavement of Gold " चा अर्थ हा होतां म्हणायचा! अन् त्या सोनेरी पथावरून चालणाऱ्या अप्सराही याच तर!

वाटेवर दुतर्फा साध्याच पण सुबक अन् नीटस इमारती दिसत होत्या. सारं काही स्तब्ध, स्वच्छ, सुंदर होतं... गडबड, घाण, कोलाहल यांचा मागमूस नव्हता. रहदारी होती .. पण गोंगाट नव्हता. पानांचे ठेले नव्हते. रेडिओं किंचाळत नव्हते. मोटारींचे भोंगे आरडत नव्हते. शांतपणे वाहनं सरपटत होती. गडद पोशाखातली गोरीगोरी माणसं मुकाट्यानं चालली होती. जो तो आपल्यातच चूर होता... बसमध्येही कुणी कुणाशी बोलत नव्हतं... सभोवतालच्या देखाव्यावर कुणाला भाष्य करावंसं वाटत नव्हतं... थंड प्रदेशात वाणीही थंड पडते की काय, असा विचार माझ्या मनात येत होता. घरीदारी गोंगाटात उभा जन्म गेलेल्या भारतीयांना या शांततेनं सुरुवातीला चुकल्याचुकल्यासारखं होतं... पुढे ह्या मुक्या इंग्रजाची आपल्याला सवय होते अन ती लागण आपल्यालाही लागते.

'व्हिक्टोरिया टर्मिनल' वर बस केव्हा पोचली, ते कळलंसुद्धा नाही. तिथल्या एका पोर्टरनेच सामान उतरवलं. त्याच्याजवळ घरी कसं जावं याची चौकशी अरुण करीत होता ... तोवर मी तिथल्या बाकावर बसून दोघांचा संवाद ऐकत राहिले.

"टॅक्सीवाला काय घेईल?" अरुण

"कुठपर्यंत जायचंय?"

"फिंचले सेंट्रल"

" ही विल फ्लीस यू ! उगाच दोन तीन पौंड लागून जातील तुम्हाला. " पोर्टर बोलला.

म्हणजे इथलेही टॅक्सीवाले आपल्या इथल्यांच्या जातीचेच म्हणायचे !

" ... त्यापेक्षां इथून फक्त अंडर ग्राऊंडपावतो टॅक्सीनं जा."

आम्ही पोर्टरचा सल्ला पाळला.

फिंचले स्टेशनपासून घर दोनच फर्लांगावर, रेडबोर्न एव्हेन्यूवर होतं. दाराशी तीन चार छोटी मुलं खेळत होती. मला पाहताच ती थबकली. त्यापैकी एक, अंतरावर असलेल्या दुसऱ्याला बोलवीत हळूच म्हणाला,

" टॉमी, ... कम .. क्विक ! .. सी ! " त्या टॉमीनं धावत येऊन मला बघितलं नि तोंड वळवलं. त्या इंग्रज ' बाळा'साहेबानं केलेलं तेवढच आमचं इथलं स्वागत !

बाकी सर्वत्र शुकशुकाट होता. सकाळचा प्रहर असूनही आजूबाजूच्या घरांची खिडक्यादारं बंद होती. खालच्या मजल्यावर दोन बिऱ्हाडं राहत होती, पण त्यांची सुतकी दारं लोटली होती. कुणालाही मी येत असल्याची वार्ता नव्हती. अशाप्रसंगी आपल्या देशात एव्हाना चार दोन खिडक्यांची उघडझाप झाली असती. दोघेचौघे डोकावून गेले असते.

पण माणसाऐवजी, इथलं ऊन मात्र स्वयंपाकघराच्या खिडकीतून डोकावलं .. त्या सुखद उन्हाच्या सहवासात, खिडकीशी असलेल्या झाडावर गात बसलेल्या एका अनोळखी पक्षाच्या सोबतीत, अरुणने तयार केलेलं लंच मी खात बसले ... हा वर्डस्वर्थचा " कक्कू " होता ? की शेलेचा ' स्कायलार्क ' ?

# २

लंडनमधली ती पहिली संध्याकाळ.

आम्ही कर्नल शेवड्यांकडे जायला निघालो होतो. कर्नलसाहेब माझे चुलत दीर, पण या मधल्या चुली आम्ही कधीच मध्ये येऊ दिल्या नव्हत्या. मी पोचायच्या आधीच या 'मोठ्या' घरचं जेवायचं नियंत्रण येऊन पोचलं होतं.

सगळेच पहिले अनुभव अपूर्व असतात. मला त्यादिवशी इथल्या लहानसहान गोष्टीत अपूर्वाई दिसत होती. आम्ही निघालो तेव्हा संध्याकाळ होती–म्हणजे आठ वाजले होते, पण आकाशात सूर्य होता. आभाळ जांभळ्या-निळ्या ढगांनी भरलं होतं. लंडनचं हे आभाळ मला कधी आकळलं नाही. इथले कलावंत वर्षानुवर्षं नुसतं हे आभाळ का रंगवीत बसतात, याचं कोडं इथे आल्यावर समजलं. हवेत आल्हाद होता. पावलं अलगत पडत होती...

आमचा रेडबोर्न एव्ह. लहानसा ऐकतोंडी बोळ. हा 'कूल–द- साक' सायंकाळी तरी माणसांनी फुलला असेल असं वाटलं होतं, पण आताही तो शांत होता. सकाळी नसलेल्या मोटारींच्या रांगा दुतर्फा उभ्या होत्या. म्हणजे 'मंडळी' कामावरून परतली होती. पण दारं बंद होती. खिडक्या लेसच्या पडद्यांनी झाकल्या होत्या. घरासमोर सुंदर बागा फुलल्या होत्या. काहीत मोठाले गुलाब बहरले होते, पण त्यांचा वास दरवळत नव्हता. फुलं गंधहीन अन् घरं रंगहीन.

बोळाच्या तोंडाशी फिंचले वस्तीतील प्रेस्बिटीरियन चर्च होतं व दुसऱ्या हाताला समोर ज्यू लोकांचा सिनेगॉग. वळसा घालून गेलं, की फर्लांगभर अंतरावर बसस्टॉप. या रस्त्यावर मंडळी रात्रीसाठी घराबाहेर पडलेली दिसत होती, पण सकाळची लय संध्याकाळला नव्हती. आता चालण्यात वेग नव्हता, घाई नव्हती. रेंगाळणारी पावलं रेंगाळणाऱ्या संध्येच्या तालात पडत होती.

बसेस आपल्यासारख्याच तांबड्या; पण आमची बस-कंडक्टर एक चुणचुणीत कोवळी नवयुवा होती. तिचा गणवेश, तिची निर्भीड वागणूक, सराईत हालचाल, कामाचा उरक, सारं पुरुषी. पण थोड्या वेळानंतर रिकामा वेळ पाहून तिनं तेवढ्यातल्या तेवढ्यात ओष्ठ-शलाका फिरवली. पण ही रंगरंगोटी संभाळूनही आपल्या कामाकडे तिचं दुर्लक्ष नव्हतं. म्हाताऱ्यांना हात देऊन वर चढवणं, मुलांना रस्त्याच्या कडेला उतरून सोडणं, तरुण प्रेमिकांना हसून वरच्या मजल्याची वाट दाखवणं हे तिचं चालू होतं. साध्याच कामात आपल्या कलेनं तिनं अशी काही गंमत पैदा केली होती, की, तिनं माझ्या डोळ्यासमोर ' अल्फा ऑफ द प्लौ ' नं रंगवलेल्या बस-कंडक्डरचं चित्र उभं केलं. इथल्या मुक्कामात कधी काळी प्रसंग ओढवला, तर पोटासाठी कोणकोणती काम करायची, याची मी मनात यादी करून ठेवली होती. तीत बस कंडक्टरच्या कामाचीही नोंद करुन ठेवली.

रस्त्यावरून लंडनची नांवाजलेली सुंदर दुकान दिसतील, अशी माझी कल्पना. म्हणून दोन्ही कडांनी मी बघत होते. पण तिथेही सार गडीचिप्प. आपल्याकडे यावेळी दुकानं, बाजारहाट माणसांनी घोंघावतात, पण इथली दुकान म्हणे सहाच्या ठोक्याला बंद होतात. पण ही बंद दुकांन म्हणजे माणसाची गर्दी नव्हती एवढच. बाकी सगळा झगझगाट, त्यांच्या दर्शनी खिडक्यातून मांडलेल्या आकर्षक वस्तू आणि त्यात तऱ्हतऱ्हेच्या फॅशन्स दाखवीत उभ्या असलेल्या ' डमीज ' लक्ष वेधून घेत होत्या. ' विंडो ड्रेसिंग ' ह्या शब्दाचा खरा अर्थ त्यावेळी कळला. ' गोल्डर्स ग्रीन ' स्टेशनाशी बस थांबली. चौकात एक विजय-स्तंभ उभा होता. गोल्डर्स ग्रीन ' वस्तीतून जाऊ लागलो, तेव्हा प्रथम भारतीय चेहरे दिसले. परदेशात गेल्यावर आपली माणसं पाहिली, की किती बरं वाटतं, हे त्यावेळी कळलं ... मी अरुणजवळ तसं बोलले, तेव्हा तो म्हणाला,

" इथे पावलापावलावर हिंदी माणसं दिसतील. गोल्डर्स ग्रीन त्यांचीच वस्ती आहे, असं समज."

एकमेकांना चिकटून असलेल्या, एकसारख्या दिसणाऱ्या घरांच्या ओळीतून वाट काढीत आम्ही अण्णांच्या ' २, द ड्राईव्हवर ' पोचलो. अंगावर पुरळ उठल्यासारख्या खडबडीत, राखडी भिंती असलेली, व डोक्यावर कानटोपी सारखं छप्पर असलेली ती छोटीशी दुमजली होती. परंतु इंग्रजी

घरांचं हे बाहेरचं रूप फसवं असतं, हे आत गेल्यावर समजलं. वहिनींनी दार उघडलं. अण्णा परसदारची हिरवळ कापण्याच्या आवेशात कात्री घेऊन उभे होते. त्यांची दोन मुलं-विजू बंडी अवतीभवती करीत होती. गेल्याबरोबर अरूणशी 'गुडईव्हनिंग' ची देवाणघेवाण झाली. या आंग्ल अभिवादनानंतर आपला देशी, वाकून नमस्कार इथं कसा काय दिसेल, म्हणून मी बुचकळ्यात पडले, पण अण्णांना नमस्काराची जुनीच रीत माझ्याकडून अपेक्षित होतीसं दिसलं.

अण्णांचा अर्धा जन्म ह्या साहेबाच्या नगरीत गेलेला. राहणी, बोलणं-चालणं सारं साहेबी. घरात मराठीची जागा इंग्रजीनं घेतलेली. जेवणाचाही सारा थाट अर्थात विलायतीच. टेबलावर इंग्रजी जेवणातली सारी उपकरणी हजर होती, पण जेवणाचा 'मेनू' मात्र अस्सल मराठी होता. पापड, सांडगे, कढी, पिठल्याचा! कढी, पिठल्याची खरी लज्जत इथेच, भारतात नाही; तशी इथली भूकही तिथं नाही. वहिनीचं मंगळवारचं उपोषण, ते पिठल्यानंच सुटलं. आपल्या विटेसह विठ्ठलही एका विलायती कपाटावर अवतरलेला दिसला. वरचा साज बदललेला होता...पण मनं मात्र मराठीच राहिली होती.

जेवणानंतर सर इक्रामुल्ला आले, त्यांच्याबरोबर लेडी सलमाही... आपल्या दोन मुलींसह होत्या. सर इक्राम पूर्वी पाकिस्तानचे हायकमिशनर... अन् आता राष्ट्रकुटुंबातील एशियाई राष्ट्रांचे अर्थ सल्लागार होते. (आता ते पैगंबरवासी झाले आहेत.) ते अण्णांचे बाळमित्र. बाळमित्रासारखेच ते वागत होते. त्यांचा मोठेपणा त्यांच्या गावीही नव्हता. सर इक्राम यांचं बोलणं जितकं काटकसरीचं, तेवढं लेडी इक्रामचं अघळपघळ. त्यांनी पाकिस्तानी स्त्रियांचं नेतृत्व एकेकाळी केलं होतं. 'लंडन स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज' इथून 'इंग्रजी कथेचा उर्दू कथेवर परिणाम' या विषयावर डॉक्टरेट मिळवली होती. सहाजिकच उर्दू कथा अन् मराठी कथा तुलनेला निघाल्या. खय्याम चर्चिला गेला. पहिल्याच भेटीत आमचे बरेच विषय जुळल्यासारखे दिसत होते. अन् ते तसे दिसले म्हणजे प्रत्येक वेळी ... 'अजि सुनिये' म्हणून त्या खाविंदांना हाक मारीत होत्या. त्यांची मोठी मुलगी नजमा 'स्लेड स्कूल' मध्ये चित्रकलेचं शिक्षण घेत होती व लौकरच एक प्रदर्शन भरवणार होती. तिचा स्टुडियो पहायचं निमंत्रण मिळालं. त्यांनी बांधलेल्या नव्या घरीही मी एकदा पायधूळ झाडावी, असं बोललं गेलं.

त्यानंतर आणखी माणसं आली नि गेली. अण्णा भारतीय वकिलातीतले प्रमुख वैद्यकीय अधिकारी, त्यामुळे त्यांच्याकडे ही वर्दळ नेहमीचीच होती.

आमचं हे कौटुंबिक स्नेहसंमेलन मध्यरात्रीपावेतो चालू होतं. समोर टी. व्ही. लागला होता. माझ्या अन् वहिनीच्या बायकी गप्पा काही वेळ चालू होत्या. मुलं अधूनमधून भाग घेत होतीं. इथल्या वास्तव्यासाठी मोठ्या जाऊबाई धाकटीला पढवीत होत्या.

" इथली हवा भारी लहरी. ती लक्षात घेऊनच प्रत्येक वेळी छत्री, रेनकोट हे सारं घेऊन, सुसज्ज होऊनच बाहेर पडावं."

त्यानंतर कुठल्या वेळी कुठल्या फॅशनचे कपडे, कुठले कोट, कुठले रंग वापरायचे हे सांगितलं गेलं. मग कुठेकुठे, कुठल्या दुकानात काय काय मिळतं, याची यादी झाली. मग " इकडच्या जेवणाचा लौकर कंटाळा येतो. . . तो आला, की सरळ येत जा जेवायला...शिवाय अरुणचा रविवार इथे लागलाच आहे –" हें निमंत्रण मिळालं.

मग साहेबाचा विषय चर्चेला निघाला. चार भारतीय जमले, की इथं हमखास निघणारा हा विषय.

" कसे काय वागतात इंग्रज आपल्याशी ?" मी कुतूहलानं विचारलं.

" फार गोड ... सभ्य .. पण औपचारिकपणे !" वहिनींचं मत दिसलं.

" पण तुमचा तर पार्ट्यां, जेवणावळी, सभासंमेलनं ह्यांतून त्यांच्याशी निकटचा परिचय होत असेल ... ?"

" होतो ना ! पण तेवढ्यापुरताच ! कांही अपवाद सोडले तर एरवी वर्षानुवर्षं शेजारी राहून रोज ' गुड मॉर्निंग ', ' गुड ईव्हिनिंग ', ' हाऊ डू यू डू ' या पलीकडे इथलं संभाषण जात नाही. फारच मजल गेली, तर ' टुडेज वेदर ' ... या विषयापर्यंत. इथे शिकायला आलेली कितीतरी मुलं... बोलायला कधी मिळत नाही म्हणून ' मेंटल ' झालेली मला ठाऊक आहेत." त्यांनी प्रांजल मत दिलं.

पण तरुण पिढी वहिनीच्या मताशी सहमत दिसली नाही. त्यांच्यापैकी प्रत्येकाला इंग्रज मित्रमंडळी होती. त्यांचे अनुभव वेगळे होते.

घराबाहेर पडताना अरुण म्हणाला,

"वी इंडियन्स ऑलसो बेअर ए चिप ऑन अवर शोल्डर्स !"

मी काही बोलले नाही. . सध्या साऱ्यांचे अनुभव ऐकून घ्यायचे होते. मनात जमा करून ठेवायचे होते.

मध्यरात्र झाली होती, पण माणसांची वर्दळ चालू होती. बसस्टॉपवरची रांग शेवटची बस पकडण्यासाठी वाट पाहत होती. रांगेत माझ्या आजूबाजू दोन तरुण प्रेमी युगुलं उभी होती अन् त्यांचे 'नाही नाही' ते प्रकार चालू होते. मला विमानातल्या त्या शीख प्रवाशाची आठवण झाली. कुठे असेल तो ? कदाचित् इजिप्तच्या वाळवंटात यावेळी तो खजुरासव पीत बसला असेल बिचारा !

थंडी कडाडली होती...कपड्याच्या आत शिरत होती...मला विलक्षण हुडहुडी भरली. इंग्रजी थंडीची ही पहिली ओळख.

× × ×

१० जूनला बी. बी. सी. चे वर्ग सुरु व्हायचे होते.

लंडनला पोचताच बी. बी. सी. चे "परदेश संपर्काधिकारी" मि. वूलर्ड यांना भेटायचा माझ्या ऑफिसचा आदेश होता.

दुसऱ्या दिवशी त्यांना फोन केला.

"आम्ही तुमची वाट पाहात होतो...तुम्ही भेटाल तर कोर्सची माहिती देऊ शकेन मी !" ते म्हणाले.

"व्हेन कॅन आय सी यू ?" मी.

"आय वंडर, इफ यू कुड मेक इट कनव्हीनियंट टु कम हियर अॅट थ्री टुमॉरो."

"कॅन यू कम टुमॉरो," या साध्या वाक्याला लावलेली ही शब्दांची झालर मला गमतीदार वाटली. आपल्या मराठमोळ्या वाणीला सरळसोट भाषेची सवय. त्याउलट इथे अशीच झालरदार भाषा प्रत्येकाच्या तोंडी. मग मलाही त्याच थाटात उत्तर देणं भाग पडलं.

"आय एम् अफ्रेड, आय मे नॉट बी एबल टु कीप दॅट टाइम. कुड यू मेक इट फोर प्लीज ?"

"बाय ऑल मीन्स !" त्यांचं उत्तर आलं, "पण तुम्हाला माझं ऑफिस सापडेल का ?"

त्यानंतर आणखी माणसं आली नि गेली. अण्णा भारतीय वकिलातीतले प्रमुख वैद्यकीय अधिकारी, त्यामुळे त्यांच्याकडे ही वर्दळ नेहमीचीच होती.

आमचं हे कौटुंबिक स्नेहसंमेलन मध्यरात्रीपावेतो चालू होतं. समोर टी. व्ही. लागला होता. माझ्या अन् वहिनीच्या बायकी गप्पा काही वेळ चालू होत्या. मुलं अधूनमधून भाग घेत होतीं. इथल्या वास्तव्यासाठी मोठ्या जाऊबाई धाकटीला पढवीत होत्या.

" इथली हवा भारी लहरी. ती लक्षात घेऊनच प्रत्येक वेळी छत्री, रेनकोट हे सारं घेऊन, सुसज्ज होऊनच बाहेर पडावं. "

त्यानंतर कुठल्या वेळी कुठल्या फॅशनचे कपडे, कुठले कोट, कुठले रंग वापरायचे हे सांगितलं गेलं. मग कुठेकुठे, कुठल्या दुकानात काय काय मिळतं, याची यादी झाली. मग " इकडच्या जेवणाचा लौकर कंटाळा येतो. . . तो आला, की सरळ येत जा जेवायला...शिवाय अरुणचा रविवार इथे लागलाच आहे – " हे निमंत्रण मिळालं.

मग साहेबाचा विषय चर्चेला निघाला. चार भारतीय जमले, की इथं हमखास निघणारा हा विषय.

" कसे काय वागतात इंग्रज आपल्याशी ? " मी कुतूहलानं विचारलं.

" फार गोड ... सभ्य .. पण औपचारिकपणे ! " वहिनीचं मत दिसलं.

" पण तुमचा तर पार्ट्यां, जेवणावळी, सभासंमेलनं ह्यांतून त्यांच्याशी निकटचा परिचय होत असेल ... ? "

" होतो ना ! पण तेवढ्यापुरताच ! कांही अपवाद सोडले तर एरवी वर्षानुवर्ष शेजारी राहून रोज ' गुड मॉर्निंग ', ' गुड ईव्हिनिंग ', ' हाऊ डू यू डू ' या पलीकडे इथलं संभाषण जात नाही. फारच मजल गेली, तर ' टुडेज वेदर ' ... या विषयापर्यंत. इथे शिकायला आलेली कितीतरी मुलं... बोलायला कधी मिळत नाही म्हणून ' मेंटल ' झालेली मला ठाऊक आहेत. " त्यांनी प्रांजल मत दिलं.

पण तरुण पिढी वहिनीच्या मताशी सहमत दिसली नाही. त्यांच्यापैकी प्रत्येकाला इंग्रज मित्रमंडळी होती. त्यांचे अनुभव वेगळे होते.

घराबाहेर पडताना अरुण म्हणाला,

" वी इंडियन्स ऑलसो वेअर ए चिप ऑन अवर शोल्डर्स ! "

मी काही बोलले नाही. . सध्या साऱ्यांचे अनुभव ऐकून घ्यायचे होते. मनात जमा करून ठेवायचे होते.

मध्यरात्र झाली होती, पण माणसांची वर्दळ चालू होती. बसस्टॉपवरची रांग शेवटची बस पकडण्यासाठी वाट पाहत होती. रांगेत माझ्या आजूबाजू दोन तरुण प्रेमी युगुलं उभी होती अन् त्यांचे ' नाही नाही ' ते प्रकार चालू होते. मला विमानातल्या त्या शीख प्रवाशाची आठवण झाली. कुठे असेल तो ? कदाचित् इजिप्तच्या वाळवंटात यावेळी तो खजुरासव पीत बसला असेल बिचारा !

थंडी कडाडली होती...कपड्याच्या आत शिरत होती...मला विलक्षण हुडहुडी भरली. इंग्रजी थंडीची ही पहिली ओळख.

× × ×

१० जूनला बी. बी. सी. चे वर्ग सुरु व्हायचे होते.

लंडनला पोचताच बी. बी. सी. चे " परदेश संपर्काधिकारी " मि. वूलर्ड यांना भेटायचा माझ्या ऑफिसचा आदेश होता.

दुसऱ्या दिवशी त्यांना फोन केला.

" आम्ही तुमची वाट पाहात होतो...तुम्ही भेटाल तर कोर्सची माहिती देऊ शकेन मी ! " ते म्हणाले.

" व्हेन कॅन आय सी यू ? " मी.

" आय वंडर, इफ यू कुड मेक इट कनव्हीनियंट टु कम हियर ॲट थ्री टुमॉरो. "

" कॅन यू कम टुमॉरो, " या साध्या वाक्याला लावलेली ही शब्दांची झालर मला गमतीदार वाटली. आपल्या मराठमोळ्या वाणीला सरळसोट भाषेची सवय. त्याउलट इथे अशीच झालरदार भाषा प्रत्येकाच्या तोंडी. मग मलाही त्याच थाटात उत्तर देणं भाग पडलं.

" आय एम् अफ्रेड, आय मे नॉट बी एबल टु कीप दॅट टाइम. कुड यू मेक इट फोर प्लीज ? "

" बाय ऑल मीन्स ! " त्यांचं उत्तर आलं, " पण तुम्हाला माझं ऑफिस सापडेल का ? "

“ नाही. मला काहीच ठाऊक नाही इकडचं. ”

त्यांनी पत्ता दिला व कसं पोचायचं त्याचा तपशील दिला.

क्वीन्स रोडवर होबर्न भुयारी स्टेशनाजवळ त्यांचं ऑफीस होत. लंडनच्या भुयारीशी माझा घट्ट परिचय व्हावा, म्हणून त्या रात्री अरुण भुयारीचा नकाशा काढून खनपटीला बसला.

“ आपलं स्टेशन फिंचले सेंट्रल. फिंचले नांवाची तीन स्टेशनं आहेत म्हणून बजावतो. ”

इथून वेगवेगळे मार्ग कस घ्यायचे, कुठे कुठे कसकशा गाड्या बदलायच्या, भुयारीच्या वेगवेगळ्या शाखा कोणत्या, स्टेशनावरच्या पाट्या कशा वाचायच्या अन् इष्टस्थळी कसं पोचायचं, इत्यादी हे धडे मध्यरात्रीपावेतो चालू होते. मी रेल्वेमार्गांचा अभ्यास शाळेच्या भूगोलात जो काय केला असेल तेवढाच. त्यानंतर पुन्हा हाच. आजवर रेल्वे-वेळा-पत्रकाच्याही वाटेला मी कधी गेले नव्हते. तक्ते, रकाने, आराखडे, नकाशे किंवा तत्सम गोष्टींनी युक्त असं साहित्य माझ्या प्रकृतीला मानवत नाही. त्यामुळे प्रत्येकवेळी दुसरेच माझ्या गाड्या मला पाहून देतात. पण आता इथं ते स्वतः करणं भाग होतं.

मध्यरात्रीपर्वेतो चाललेल्या या अभ्यासाचं प्रात्यक्षिक म्हणून वुलर्ड साहेबांकडे जाताना अरुणने मला होबर्न स्टेशनापर्यंत सोडायचं अन् परत येताना मी एकटीनंच यायचं असं ठरलं.

आपल्या ‘ इंडियन स्टँडर्ड टाइम’चा इथल्या ‘ घड्याळवेळ्या ’ देशात उद्धार व्हायला नको, म्हणून आम्ही चांगली वीस-पंचवीस मिनिटं आधी होबर्न स्टेशनवर जाऊन पोचलो. त्यानंतर घरनंबर शोधायचा अन् तोही लंडनच्या गजबजाटात, म्हणजे काय सोपी गोष्ट ? घरनंबर शोधणं ही मला कधीच अवगत न झालेली कला. आपल्या इथे तरी त्याला पोस्टमनचीच प्रतिभा लागते, असा माझा प्रामाणिक समज आहे. शंकरनगरच्या लहानशा वस्तीतही मला घरनंबर सापडत नाही ( बहुधा ते दिलेलेच नसावे ). पण मुंबईला ते दिलेले असतात म्हणतात. तिथंही दोनचारदा घरं सापडली. पण नंबर शेवटपर्यंत सापडले नाहीत, हा माझा अनुभव; पण लंडनमध्ये घरं आपले हे नंबर उजळमाथ्यानं वागवताना दिसली.

त्यामुळे वूलर्डसाहेबांचं ऑफिस चटकन सापडलं.

आत शिरताच तिथल्या "कमिशनर"ने आमचं स्वागत केलं; पण हा कमिशनर आपल्या इथला पुराणा 'मोठा' साहेब नव्हे. अधिकारीश्रेणीच्या तळाशी असलेला माणूस. हा प्राणी आपल्या आकाशवाणीतही असतो. या कमिशनरसाहेबानं मला विजेरी पाळण्यात नेऊन बसवलं अन् वरची वाट दाखवली. प्रथम डावीकडे, मग थोडं पुढे सरळ, उजवीकडे, पुन्हा डावीकडे. खोली नंबर अमुक अमुक.

माझ्या डोक्यात दशदिशांनी गोंधळ माजवला.–शेवटी या चक्रव्युहातून पुढची वाट काढीत मी एकदाची त्यांच्या ऑफिसात पोचले.

त्यांच्या सेक्रेटरीनं माझं स्वागत करीत हसून म्हटलं "माफ करा, पण तुम्ही पाच मिनिटं आधी पोचलात. आता थोडं बसावं लागेल."

तिनं मी आल्याची साहेबांना वर्दी दिली नि म्हटलं, "माफ करा . पण एवढा मजकूर मला आता पुरा करायला हवाच आहे."तिची बोटं टाइपरायटरवरून वळवळू लागली. तोपर्यंत तिच्या कामाचा वेग, ऑफिसातली टापटीप, स्वच्छता निरखीत आणि आपल्या इथल्या ऑफिसांच्या आठवणी काढीत मी बसले.

पाच मिनिटांनंतर उंचपुरे, देखणे वूलर्डसाहेब दार उघडून बाहेर आले. माझ्याशी हस्तांदोलन केलं अन् आत नेऊन मला खुर्ची दिली.

"विमानानं आलात ना ? कसा काय झाला प्रवास ?"

"हो...फार सुखकर झाला. धन्यवाद."

"तुमच्या देशातून आल्यावर इथे फार थंडी वाजत असेल नाही ?"

"हो. तुमच्या उन्हाळ्यात नागपूरच्या हिवाळ्यापेक्षाही अधिक गारठा आहे." नाटकाच्या नांदीसारखं इंग्रजी संभाषणातलं हे हवामानचं प्रास्ताविक. –तेवढ्यात समोरच्या माणसाची मोजमाप करायला अवकाश मिळतो अन समोरच्याला निरीक्षणाला. लख्ख खोली, गुळगुळीत फर्निचर, सायीच्या रंगाचे पडदे...अंथरलेले गालिचे...माझ्या नजरेनं टिपले.

"बरं झालं तुमचा फेब्रुवारीत येण्याचा बेत तुम्ही रद्द केला. यंदा भलताच थंडीचा कडाका होता."

"हो, मी तर गोठूनच गेले असते."

"शिवाय आताचा आमचा हा विशेष कोर्स आहे. उपयुक्त वाटेल तुम्हाला...जगातल्या निरनिराळ्या देशांतले लोकही भेटतील..."

" कितीजण आहेत ? "

त्यांनी समोरची यादी दाखवून सांगितलं, " वीस जण. "

" यंदाची यादी तरी थोडी मोठीच झालीय .. एरवी पंधराच्या वर माणसं आम्ही घेत नाही. कारण मग प्रत्येकाकडे व्यक्तिगत लक्ष पुरवणं कठीण होतं प्राध्यापकांना "

परदेशी माणसांची भीड चेपावी, अशी मधुर भाषा, सौजन्य अन शिष्टाचार. बोलताना दोन निळ्या डोळ्यांच्या चिमटीत समोरच्या माणसाचं व्यक्तित्व पकडण्याची त्यांची विशिष्ट लकब होती.

" कोर्स किती दिवसांचा आहे ? "

" सहा आठवड्यांचा ... पण त्यानंतर ज्या खात्यांतून तुम्हाला कामं करायची इच्छा असेल ... ते मि. सेमो यांना सांगा .. ते सोय करतील .. "

त्यानंतर प्रशिक्षणाच्या किरकोळ मुद्यावर आमचं संभाषण चाललं .. पंधरा मिनिटानंतर मी जायला उठले.

" तुमची राहायची सोय नीट झाली ना ? "

" हो ... माझ्या मुलाच्या घरीच आहे मी ... "

" काही अडचण पडली तर सांगा .. बरंय. पुन्हा लवकरच भेट होईल." नको नको म्हणत असता ते जिन्यापावेतो पोचवायला आले.

" वाट लवकर सापडायची नाही तुम्हाला " म्हणत लिफ्टमध्ये त्यांनी मला सोडलं अन बटन दाबलं.

बाहेर आले अन स्टेशनवर आठवणीनं ' फिंचले सेंट्रल ' चं तिकिट घेतलं. नॉर्दर्न लाईन पकडली पण ' कॅमडन टाऊन ' हें जंक्शन गेल्यावर अनोळखी स्टेशनं येऊ लागली, तेव्हा कुठेतरी घोटाळा झाला, हे लक्षात आलं. पण कुठे ते समजेना.

शेवटी मघापासून वर्तमानपत्राआड तोंड झाकून बसलेल्या शेजारच्या उतारूकडे मी मदतीसाठी कटाक्ष टाकला. बोलावं कीं नाही, या विचारात मी होते. पण त्या संकट समयी ' हाऊ टु लिव्ह इन ब्रिटन ' च्या लेखकानं इंग्रज माणसाबद्दल दिलेला निर्वाळा आठवला. " तो घुमा, अबोल असतो. गाडीतून वाचताना दिसेल, पण तो माणूसघाणा नसतो. मदत मागितल्यास आनंदानं देतो."

मी खाकरून त्याचं लक्ष वेधलं.

" माफ करा, पण मला वाटतं माझी गाडी चुकलीय."

" कुठे जायचंय ? "

" फिंचले सेंट्रल. "

" मग लाईनच चुकली तुमची. बार्नेट लाइन घ्यायला हवी होती. ही एजवेअर लाईन आहे. गाडीवर लिहिलेलं असतं तें. "

63936 दि: 4/31 442

" बार्नेट ? एजवेअर ? ही काय भानगड आहे ? " मी मनात म्हटलं अन कालच्या अभ्यासक्रमात तर अरुणनं ही नावंही घेतली नव्हती.

" मग आता ? " मी प्रकटपणे.

" आता एक स्टेशन मागे जा. कॅमडन टाऊनला उतरा. तिथे बार्नेट गाडी घ्या."

शेवटीं मी घरीं पोचले. संध्याकाळी मला घरी पाहून अरुणनं निश्वास टाकला.

" सुखरूप पोचलीस म्हणायची तू "

" दिसतेय ना ? "

" तसं नाही, पण काल रात्री आपल्या नॉर्दर्न लाईनचे दोन फाटे असतात हे सांगायचं राहिलं. ऑफिसात आठवण झाली अन मग काळजी वाटत राहिली. आपली ही बार्नेट लाईन ... "

" ठाऊक आहे मला."

" काय ठाऊक आहे ? दुसरी लाईन घेतलीस तर कुठे पोचशील, सांग बरं ? "

" एजवेअरला ... "

" कसं कळलं ? "

" नकाशात दिलंय ना ? "

" मला वाटलं चुकशील ... ! "

" चुकेन कशी ? प्रत्येक गाडीवर मार्गसूचक पाटी असते ना ! ती वाचायाची. फक्त डोळे उघडे हवे. एरवी लंडनची भुयारी फूलप्रुफ आहे अगदी ! "

पण त्याचं प्रूफ मी दाखवूं शकले नव्हते, हें अरुणला कळलं नाही. या प्रसंगानंतर भुयारीचा नकाशा मी गंभीरपणे अभ्यासला अन पचवला.

# ३

अजून शाळा सुरू व्हायला चार दिवस होते. अन लंडन आपल्या वैभवानिशी माझी वाट पाहात होतं:

भारतांतून येण्यापूर्वी, इथे पंधरा वर्षं वास्तव्य करून चुकलेल्या एका स्नेह्याचा सल्ला मी घेतला होता.

" इंग्लंडमध्ये कसं राहयचं ? कसं वागायचं, बोलायचं ? "

त्याचं उत्तर होतं, "विलायतेविषयी ऐकून-वाचून बनविलेल्या सर्व पूर्वग्रहांचं गाठोडं घरी टाका अन मुक्त मनानं, उघड्या डोळ्यांनी, स्वतः पहा; स्वतः शोधा"

खरंय ते. इथं शोधण्यासारखं पुष्कळ आहे. स्वतःच भटकावं अन शोधावं. लंडन ही कलावंतांची, कारागिरांची नगरी; विचारवंतांचं, बुद्धिमंतांचं माहेरघर; जगाची बाजारपेठ; राजकारणपटु रणधुरंधर लोकांचं केंद्र. एके काळची विशाल साम्राज्याची राजधानी, नशीब काढायला निघालेल्यांची मोक्ष-नगरी नि आणखीही इतर पुष्कळ काही. ही अनेकांची " नेव्हर-नेव्हर-लँड." इथं तुम्हाला काय पाहायचंय, काय शोधायचंय त्यावर अवलंबून आहे. चारू-दत्तानं पौर्णिमेच्या चंद्रमात कामिनीचा मुखचंद्रमा शोधला, पण विदूषकाला मात्र त्याच चंद्रम्यात मोदक दिसला. हा दृष्टिभेदाचा प्रश्न आहे.

या बहुअंगी, बहुरूपी नगरीच्या अनेकविध विलासांतून तिचं अंतरंग शोधण्यासाठी कुठेही भटकावं, काहीही पहावं, अनिर्बंधपणे. मनमुराद. भुयारीचा एक नकाशा, अन ' ए टु झेड ' लंडन गाईड, हीं दोघं रेनकोटाच्या खिशात कोंबावी आणि पाय नि मन जिथं नेतील तिथ जावं. लंडनमधले हे माझे पहिले दोन मित्र. या मित्रांच्या सोबतीनं लंडनमधली भुयारी तुम्हाला कुठेही सुरक्षितपणे नेते. तिच्याइतकं स्वस्त, जलद, सोईचं अन हमखास वाहन दुसरं नाही. इथं वाट चुकू म्हटलं तरी चुकत नाही. कोपऱ्या कोपऱ्यावर लंडनचा जगमित्र बॉबी


तुमची वाकडी वाट सुधारायला उभा असतो. [ तिथून फोन केला म्हणजे तुम्ही कुठल्या भागात, कुठल्या दिशेला, कुठून किती अंतरावर, किती अंशावर आहात अन तिथून कुठे कस जायचं, हे तो सांगतो. ] माणसं हरविण्याची भीती इथं नाही. हरवलीच तर ती मनानं हरवतात.

या भुयारींनी अख्खं लंडन पोखरलं आहे. त्याचं जाळं रक्तवाहिन्याप्रमाणे लंडनच्या शरीरभर पसरलेले आहे. या भुयारी अव्याहतपणे लक्षावधी उतारुंचे लोंढे एका तोंडाशी पोटात घालतात अन दुसऱ्या तोंडाशी बाहेर नेऊन टाकतात. भुयारातच असलेले त्यांचे जाहिरातींनी भरलेले फलाट, त्यांची स्टेशनं, तिकीटघरं, अखंड चढउतार करणारे फिरते जिने, हा भुयारीचा संसार. वरच्या उजेड्या जगाला त्यांचं अस्तित्व कळतं, ते अंतराअंतरावर असलेल्या लालनिळ्या वर्तुळांच्या, 'अंडर ग्राऊंड' अक्षरं असलेल्या पाट्यांमुळे. हे वर्तुळ पाहवं अन भुईच्या पोटांत जावं.

सुरवातीला ह्या भुयारीतून भटकण्याची, तिच्या विजेरी फिरत्या जिन्यांवरून वरखाली करताना लहान मुलासारखी गंमत वाटते. एका बाजूनं वरच्या उघड्या जगातून खाली पाताळात लोटलेली उतारुंची घरंगळणारी रांग अन दुसऱ्या जिन्यानं अंधारातून वरच्या उजेड्या स्वर्गात जाणारी रांग. कुठलंही तिकीट घ्यावं, मुद्दाम चुकीच्या गाड्या घ्याव्या, पुन्हा मागे यावं. जिन्यावरून सरपटत खाली यावं, वर जावं, पुन्हा खाली यावं, पुढे जावं.

या मनमुराद भटकण्याच्या आड येते ती फक्त इकडची हवा; पण सध्याचा ऋतू सर्वांत उत्तम. कोवळं कोवळं ऊन दिवसभर असतं, पण हवाबाईची लहर केव्हा फिरेल याचा नेम नाही. म्हणून माझ्या इथल्या भटक्या दैनंदिनीतलं सर्वांत महत्त्वाचं पहिलं आन्हिक म्हणजे रेडिओवरचं हवामानवृत्त ऐकणं. इथे ढगांना काळवेळ नसतो, तसाच उन्हालाही. " क्षणात येती सरसर शिरवे, क्षणात पिवळे ऊन पडे "—असाच प्रकार. पण लंडनचा हा शिरवा अंगावर घ्यावासा वाटतो. ओझरत्या उन्हात चमकणाऱ्या या सोनेरी कणांची बरसात सुखद वाटते. अन या ऊनपावसाच्या खेळांत मनही खेळकर बनतं ( म्हणून रेनकोट अन छत्री सदैव उरावर बाळगण्याचा वहिनीचा उपदेश मी केव्हाही पाळला नाही. ) ह्या खेळकर हवेत वय मागे सरतं, पावलं उगाच अलगद पडतात. बागडावसं वाटतं. आपोआप लय वाढते.

लंडनच्या या गजबजलेल्या रस्त्यांवरून, तिच्या सार्वजनिक गर्दीतून वाट काढीत, दुकनांच्या आकर्षक 'दर्शनी' खिडक्यांमधून डोकावीत, मधूनमधून विखुरलेल्या हॉटेलांतील नानाविध खाद्यवस्तूंचे वास घेत, सावकाऽशपणे भटकत रहावं अन लंडनचं आणि तिथल्या सामान्य जीवनाचं अतरंग शोधत रहावं. ऑक्सफर्ड स्ट्रीट, बॉंड स्ट्रीट (अत्युत्कृष्ट बाजारओळी) पिकॅडली सर्कस, ऑक्सफर्ड सर्कस ( इथले व्हारायट चौक,) फ्लीट स्ट्रीट ( वृत्तपत्रांची ओळ, ) लीस्टर स्क्वेअर, ट्राफलगार स्क्वेअर ( सिनेमा-नाट्यगृहांचे विभाग ). थोडं पुढे गेलं की



**फ्लीट स्ट्रीटकडून दिसणारे सेंटपॉलचे देऊळ**

पार्लमेन्ट गृह, वेस्ट मिनिस्टर ॲबे, बकिंगहॅम राजवाडा, त्यापुढचं व्हिक्टोरीया राणीचं स्मारक. आणखी पुढे गेलं, की राणीचा धक्का, गढूळ टेम्स नदी, तिच्यावरचे इतिहासप्रसिद्ध पूल अन सेंट पॉलचं देऊळ ही सारी नांव (डन-साहेबांच्या " इन इंग्लंड " पुस्तकाच्या कृपेनं) ओळखीची वाटतात. इथल्या ऐश्वर्याची, संस्कृतीची ती प्रतीकं. चालतांना इतिहास इथ पावलोपावली घुट-मळतो. पार्लमेन्टगृह पाहीलं, की इथली लोकशाहीचीपरंपरा आठवते. वॉरन



**टेम्स नदीवरील पार्लमेंटगृह**

हेस्टिंग्सची निर्भर्त्सना करणारा वाकपटू बर्क आठवतो. व्हिक्टोरिया राणीच्या काळची ग्लॅडस्टन डिझरायली ही जोडी आठवते, तशीच ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा सावरून धरणारा चार्चिल अन त्यावर उदक सोडणारा ॲटली, याची

जोडी दिसू लागते, आणि मॅकमिलन व विल्सन या दोन हॅरॉल्डसची जोडीही आठवते. वेस्टमिनिस्टर ॲबे पाहिला, की राज्यरोहणाचे सोहळे, नेत्यांचे प्रचंड पुतळे अन प्रतिभाशाली इंग्रजी "कवींचा कोपरा" ( Poets Corner) डोळ्यासमोर दिसू लागतो.

पण या सगळ्या इमारती मळकट, धुरकट, काळवंडलेल्या थंड वाटतात... कदाचित तो रंग त्यांचं प्राचीन रूप राखण्याला मदत करीत असावा; पण इथली घरंही तशीच. कुठेही जा. एकाच प्रकारची, एकाच आकाराच्या दारं-खिडक्यांची. विटक्या रंगाची, उदास अन थंड, माथ्यावर त्रिकोणी छपरांच्या टोप्या अन त्यांवर धुराड्याचा तुरा! भिंतीना रंग जणू भीतभीतच वापरलेला. रंगाची लयलूट कुठे दिसत असेल तर ती फक्त या मलूल घरांसमोर फुललेल्या बागांतून अन सार्वजनिक उद्यानांतून. कदाचित या रंगविहीनतेची भरपाई इंग्रजी माणसाच्या अंतःकरणात झाली असल्यास नकळे! पण अजून त्या माणसाचा माझा परिचय व्हायचा आहे.

तूर्त परिचय होता तो या गर्दीतल्या इंग्रजाचा. या भटकण्यात फक्त गर्दी भेटते, माणूस नाही. भेटला तरी तो एखाद्या गर्दीचा भाग म्हणून. सामान्य नामानं, विशेषनामानं नव्हे. ही गर्दी पहायची असेल तर सेंट्रल लंडनमधील कुठल्याही चौरस्त्यावर उभं राहावं. मुखवटे घातलेल्या, मुकाट्यानं हालचाली करणाऱ्या माणसांचे थवे घाईघाईनं कुठूनतरी येतात अन् कुठेतरी जातात...प्रत्येकाच्या चालण्यात घाई असते...तरतराट असतो. चार चार इंचाचे, उंच टाचांचे बूट ठक्ठक् वाजवीत तरतरा चाललेल्या स्त्रिया आपलं लक्ष वेधून घेतात. ह्या पडत कशा नाहीत, याचं मला कौतुक वाटायचं. या अपार गर्दीत आपलं चालणं सुरक्षातीला ठेचाळल्यासारखं दिसतं...हा विलायती तोल अन् ताल शिकायला निदान पंधरवडा तरी लागतो, पण एकदा का हा ताल कळला, की इकडच्या जीवनाची चाल कळते. या जीवनाला विलक्षण वेग आहे. इथे क्षणाक्षणाला महत्त्व आहे. कालचा विषय आज शिळा होतो अन् सकाळचा संध्याकाळला राहत नाही. अमेरिकेला गेलेल्या एका चिनी माणसाला "अमुक केलं म्हणजे दोन मिनिटं वाचतात. तमुक केल्यानं एक मिनिटाची बचत होते," असं गर्वानं सांगणाऱ्या अमेरिकनाला "पण त्या मिनिटाचं तरी काय होतं?" असा सवाल त्या भावड्या चिन्यानं केला होता.

आपल्याही भावड्या मनाला इथं तोच सवाल विचारावासा वाटतो अन् आपली गती मंदावते. भटकंतीला गती मानवत नाही. परंतु लौकरच मी ह्या गर्दीचा, गतीचा, धडपडीचा भाग होणार होते; कारण इथल्या जीवनाचा वेगच तुम्हाला आपल्याबरोबर खेचतो. त्याच्याबरोबर तुम्ही गेला नाहीत, तर तुम्ही मागे पडता.

× × ×

अन् अशी भटकंती चालू असताना आकाश काळ्या ढगांनी गच्च भरून आलंय. पाऊस टिपटिपतोय. छत्र्या अन् रेनकोट रस्त्यावरून हालचाल करीत आहेत. पण क्षणानंतर पावसाचं नावनिशाण नाही. ढगांच्या आडून ऊन किलकिल्या डोळ्यांनी पाहतंय्...रस्त्याच्या कडाशी... टाकलेल्या बाकांवरून, घरातल्या बागांतून, पार्कमधल्या हिरवळीवरून माणसं उन खात बसली आहेत...कुणी लोळली आहेत. कुणी बागडत आहेत. तरुण जोडपी, तशीच वृद्धही. इथं यौवन फुलतं, तसंच वृद्धत्वही. इथं जरा रेंगाळते—यौवनात घुटमळते, बुजरी पावलं टाकीत येते अन् मागे सरते.

या वातावरणानं मलाही झपाटलं आहे. अन् माझंही भटकणं वाट फुटेल तिथे, पाय नेतील तसं चालू आहे. असं अहेतुकपणे, अनिर्बंधपणे चालत असताना, जर्मन कवी गटेच्या ओळी मनात गुणगुणत आहेत.

I walked ... alone ...
Alone thinking of nothing ... nothing ...
I walked on and on ...

अन् अजून मला भटकायचं होतं ... या विशाल नगरीत पुष्कळ शोधायचंहोतं... पुष्कळ !

× × ×

# ४

१० जूनला बी. बी. सी. चे वर्ग सुरू झाले. आमची शाळा सेंट्रल लंडनच्या लँघम वस्तीत होती. बी. बी. सी. चं आठ--मजली केंद्र अन आमचं सात मजली स्टाफ ट्रेनिंग स्कूल समोरासमोर होती. मधल्या चौरस्त्यावर वाटोळं, नव्या धर्तीचं 'ऑल सोल्स कॅथीड्रल.' चार पाच रस्ते त्याला वळसा घालून जात. इथून अवघ्या दोन फर्लांगावर ऑक्सफोर्ड सरकस ...

आमचा वर्ग शाळेच्या चौथ्या मजल्यावरच्या खोलीत भरत असे. ही खोली रस्त्याच्या कडेला होती .. अन तिथून 'ऑल सेल्स' चा कळस खिडकीतून दिसायचा. दुसऱ्या महायुद्धात बी. बी. सी. चा वरचा मजला अन हे देऊळ बांबवर्षावानं उध्वस्त झाली होती. बी. बी. सी. ने उध्वस्त मजल्याऐवजी एक अद्ययावत सुंदर स्टुडिओ उभा केला अन जॉन नॅश स्थापत्यविशारदानं देवळाला एका नव्या धर्तीचं वाटोळं रूप दिलं. त्याच्या वर्तुळाकार पायऱ्यांवर पुष्कळसे लोक रिकाम्या वेळात जाऊन बसत .. कधीमधी मी ही 'लंच अवर' मध्ये मंदिरात जाऊन बसायची. हळूहळू हे ठिकाण मला आवडू लागलं.

पहिल्या दिवशी वीस अनोळखी माणसांत मी आपली जागा घेतली. नव्या घाटाच्या खुर्च्या–डेस्कं, त्यावर प्रत्येकाच्या नावाच्या पाट्या, अभ्यासक्रमाची फाईल, रक्षापात्रं, खाली गालिचा, खिडक्यांना पोपटी रंगाचे रेशमी पडदे, समोर शिक्षकाचं टेबल, त्यामागे लांबलचक फळा, खडू, बाजूला रेकॉर्ड प्लेयर्स, प्ले-बॅक-डेक, इ. रेडिओची यंत्रसामुग्री, असा वर्गाचा थाट होता. वर्गात बसताना वाटलं, विलायतेत शिकण्याची वयाच्या पंधराव्या वर्षी उरी बाळगलेली भाबडी इच्छा, आयुष्याचा मध्यान्ह उलटल्यावर एकापरीनं साकार होत होती. पण ही तिची परीपूर्ती म्हणायची की ... विकृती ? खूप शिकावं, विलायतेला जाऊन उच्च शिक्षण घ्यावं, विद्वान व्हावं, हे त्या वयात

बाळगलेलं स्वप्न, ह्या वयात विरलं होतं. जन्ममृत्यूच्या दोन टोकात मर्यादित असलेल्या मानवी आयुष्यात काळाला किती महत्त्व आहे? गोष्टी वेळेवारी होण्यातच खरी गंमत ... पण जाऊ दे ...! आमच्या बाबतीत सगळ्याच वाटा चुकीच्या घेतल्या गेल्या होत्या ..हिशेब उलटे झाले होते...त्यापैकी एक हा काळाचा हिशेब!

× × ×

बरोबर दहाच्या ठोक्याला शाळेचे मुख्य संचालक मि. ह्यूज आपल्या चार प्राध्यापकांच्या तुकडीसह वर्गांत शिरले अन् त्यांनी व्यासपीठावर जागा घेतली. कडक इस्त्रीतले, चापूनचोपून बसवलेल्या केसाचे ह्यूजसाहेब खांकरून पुढे सरसावले, तेव्हा लांबलचक भाषणाचा भरपोट खुराक मिळणार, असा रंग दिसला. पण अहो आश्चर्यम्! पाचसात मिनिटातच आपलं स्वागताचं प्रास्ताविक संपवून हा साहेब आपल्या साथीदारांवर वर्ग टाकून चालता झाला. थोडंसं चुकल्यासरखं वाटलं. वास्तविक आजचा दिवस त्यांचा, पण त्याचं महत्त्व त्यांच्या गावीही नव्हतं असं दिसलं.

त्यांच्यानंतर धिप्पाड देहाचे, गुबऱ्या गालाचे, दुहेरी हनुवटीचे, टक्कल पडलेले एव्हनसाहेब मधल्या खुर्चीत सरकले. हे शाळेचे चीफ इन्स्ट्रक्टर... त्यांनी बी. बी. सी. संस्थेची माहिती, त्यातलं हे प्रशिक्षण, त्यात समाविष्ट केलेले विषय ..इ. आराखडा मांडताना पंधरा मिनिटंही घेतली नाहीत अन् थोडक्यात आपला कारभार आटोपला. नंतर आलेले प्राध्यापक जॉन कोर्डे, अन् इंजिनीयर रेक्स हॉवर्थ हेही तसेच...सवाअकराच्या कॉफी ब्रेकच्या आत, बोलणारे सर्व गडी बाद झाले होते. इथला साराच खाक्या वेगळा. साहेबाला संभाषणाचं वावडं, तसंच भाषणाचंही. श्रोत्यांच्या जांभयांची विरामचिन्हं घेत वर्तुळात फिरणाऱ्या लांबलचक भाषणातली लज्जत त्याला अजून कळलेली दिसली नाही.

पण त्या मध्यंतरानंतर शाळेनं जे वेठीला धरलं...ते मात्र सतत दीड महिना. दहा ते साडेपाच अशी शाळेसारखी ही शाळा सुरु झाली. शनिवार, रविवार हेच तेवढे सुटीचे दिवस.

× × ×

चार-आठ दिवस इकडच्या लहरी हवामानाचा रागरंग पाहिल्यावर कळून चुकलं, की इथे येण्यापूर्वी, महिनाभर आधीपासून सतत विचार करून इथल्या मुक्कामासाठी केलेली आपली तयारी चुकली आहे. जे नको ते आणलं गेलं होतं अन् हवं ते मागे राहिलं होतं.

केव्हाही भडभडून येणारं इथलं आभाळ, दोन दोन दिवस खुशाल बुट्टी मारणारा सूर्य, उन्हाळ्यातही नागपूरच्या हिवाळ्यापेक्षा खाली उतरलेला पारा.. रात्रीची गारठणारी थंडी...या गोष्टीची घ्यावी तेवढी दखल मी घेतली नव्हती. इथे पावसाळा, उन्हाळा, हिवाळा ते तीन्ही ऋतू एकसमयावच्छेदेकरून हातात हात घालून नांदत होते...अन् म्हणे...हा इथला उन्हाळा! त्यात इथे राहून गेलेल्या 'अनुभवी' लोकांनी आपला फुकट सल्ला देऊन माझी किती दिशाभूल केली होती, हे घडोघडी जाणवत होतं. उदा. मी आणलेल्या दोन डझन साड्यांची –विशेषतः उंची साड्यांची – इथं बिलकुल जरूर नव्हती. यात साड्यांच्या इतर पेठांबरोबर भारतीय हातमागाचा उत्कृष्ट नमुना म्हणून बनारसी शालूही– "आता एवढं घेतलंच आहे...या एकट्यानंच काय पाप केलंय? असू दे बिचारा!" म्हणून पेटीत शिरला होता; पण त्या 'बिचाऱ्या' ला एकदाही विलायती हवा लागली नाही. साडी एकंदरीतच इथल्या पावसाळी हवेला मानवत नाही, हा माझा अनुभव. तशात, पावसात तिच्यावर उमटलेली चिखलाची (विलायती चिखलाची जात वेगळी असते.) खडी धुवायला धोबी हा प्राणीही इथे दुर्लभ. जी गत साड्यांची, तीच ब्लाऊजेसची. माझे डझनभर ब्लाऊजेसही फुकट आणले गेले होते. तसेच चपलांचे सहा जोडही नको होते. त्याऐवजी छत्री, रेनकोट, पावसाळी पादत्राणं ही आणायला हवी होती. 'उन्हाळ्यात यांची काय जरूर?' म्हणून हे तिघेही मागे राहिले अन् लोणची, पापड, मिरच्या ही मंडळी उगाच बरोबर आली...(कारण ती इथल्या बाजारात हजर होतीच.)...लोणच्याच्या बाटलीऐवजी त्याच जागेत रात्रीसाठी गरम पाण्याची पिशवी सहज ठेवता आली असती, असंही इथली रात्रीची थंडी पाहून वाटल्याविना राहिलं नाही ...

× × ×

आठपंधरा दिवसातच मला इथल्या हवामानाची सवय झाली. अन्

इथल्या जीवनाला मी रुळले. जुन्या सवयी बदलल्या, नव्या लावल्या. इथलं सगळंच वेळापत्रक वेगळं. साडेनवाला अरुणचं ऑफिस. माझी शाळा त्याच्या वाटेवर होती. जाताना तो मला सोडायचा. ऑफिस घरापासून नऊदहा मैल लांब. म्हणजे रोज कामठी ते नागपूर एवढी चक्कर. शिवाय सकाळी ऑफिसला जाणाऱ्या वाहनांची विलक्षण गर्दी. अर्धा अर्धा मैल लांब मोटारींच्या रांगाच्या रहदारीतून वाट काढायला अर्धा-पाऊण तास लागायचा. त्यासाठी घरून पावणे नवाला निघावं लागे. त्यापूर्वी चहा, वेणी, आंघोळ, ब्रेकफास्ट सारं उरकून निघायचं म्हणजे साडेसहा सातला निजून उठणं आलं. सातला उठणं म्हणजे इथलं पहाटे उठणं ! तेवढ्या पहाटे दूधवाले भय्ये अन् वर्तमान-पत्रविक्रे तेवढे रस्त्यावरून फिरकतात. कारण उन्हाळ्यात इथे रात्रीं साडेनऊ-पावेतो सूर्यास्त व्हायचा...अन् पुन्हा चार साडेचारला फटफटीत उजाडून सूर्य निघायचा...त्यामुळे सूर्याच्या झोपेशी आपल्या झोपेचं वेळापत्रक जुळवता येत नाही. त्यामुळे सूर्योदयापूर्वी उठणं वगैरे भाषा इथं नाही. सुरवातीला काही दिवस दहाला निजून पाचला उठण्याची सवय कायम होती. पण तो अरुणचा मित्रांशी चर्चेचा विषय झाला हळूहळू रात्री एकदीडला झोपून, उन्हं चांगली वर आल्यावरही निजून राहण्याची इथली सवय लावली. तशीच रोजच्या आंघोळीशिवाय रहायची सवय केली. इथे आंघोळ म्हणजे एक अवघड प्रकरण. पुढे हा कार्यक्रम साप्ताहिकच करावा लागतो. आपल्यासारखे 'चटकन् दोन तांबे अंगावर घेणं,' हा वाक्प्रचार इथे नाही. इथे फक्त 'टबबाथ'. टबभर पाणी घ्यायचं म्हणजे प्रत्येक वेळी एक शिलींग तरी मीटरच्या घशात घालायचा. हवामान, पैसा अन् वेळ या तिन्ही दृष्टीनं रोज आंघोळ परवडत नाही. ती फक्त जुम्मे के जुम्मेच होऊ लागली. कारण शुक्रवार हाच बहुधा आंघोळीला सोयीचा दिवस.

पण आंघोळीचाच कशाला ? इथले साऱ्या कामाचे वार ठरलेले. वेळा-पत्रक आठवड्यात बसवलेलं. माणसं आठवड्यानं जगतात. आठवड्यानं वेतन घेतात अन् देतात. भाडं आठवड्यानंच द्यायचं. बाजारहाट आठव-ड्याचा. कामाचा आठवडा पाच दिवसांचा. शनिवार-रविवार सुटीचे. आंघोळ जशी साप्ताहिक, तसंच कपडे धुणंही आठवड्याचंच. तो कार्यक्रम शनिवारचा. आठवड्याचे कपडे पिशवीत घालायचे, लाँड्रीत न्यायचे, वॉशिंग मशिन्सवर

स्वतः धुवायचे, वाळवायचे, घरी आणून इस्त्री करायचे. दर रविवारी येणारा आपला धोबी इथे नामशेष झालेला आहे. शनिवार हा बाजारहाटाचाही दिवस. कारण रविवारी दुकानं बंद असतात. शनिवारी सकाळी दुकानासमोर पिशव्या घेतलेल्या गिऱ्हाइकांच्या लांबचलांब रांगा उभ्या असतात. आपल्या धरमपेठेतल्या बापटबंधूंच्या दुकानातली झुंबड म्हणजे नागपुरातली पिशवीवाल्यांची प्रसिद्ध गर्दी. इथल्या मानानं ती काहीच नाही, पण इथे ती झुंबड वाटत नाही. कारण बारीत उभं राहणं ही इथली जणू जन्मजात सवय. सर्व वस्तू... भाज्या-फळं सुद्धा, पाकिटात घालून मिळतात.

इथली दुकानं म्हणजे इंग्रजांच्या कलात्मक वृत्तीचे नमुने. सजविलेल्या दर्शनी खिडक्यांची, मोठमोठाली कपड्यांची, दागिन्यांची दुकानं सोडाच, पण साधी भाज्यांची, किराणा मालांची दुकानंही व्यवस्थित व आकर्षक पद्धतीनं मांडलेली असतात. मासाहारी वस्तूंची दुकानंही अशा पद्धतशीरपणे मांडलेली मी इथंच प्रथम पाहिली. तासलेल्या कोंबड्या, गोसूकरादी प्राण्यांच्या शरीराचे वेगवेगळे भाग, काचेच्या कपाटातून मांडलेले रस्त्यावरूनही दिसले. पण माझ्यासारख्या पूर्ण निव्वळ शाकाहारी माणसालाही इथे पंचाईत पडत नाही. आपल्या सगळ्या डाळी, कडधान्यं, तांदूळ, कणिक सारं मिळतं. अगदी पापड-लोणची, वड्या, मेतकूटसुद्धा मिळतं; शिवाय हिंदी शाकाहारी जेवणाच्या खाणावळी भरपूर आहेत. पुष्कळदा रुचिपालट म्हणून इंग्रज माणसंही आपलं जेवण चवीनं घेताना दिसतात. आपले इडलीदोसे, पापड इथं लोकप्रिय झाले आहेत. तसेच करी पुलावही. सेंट्रल लंडनमधला 'ओव्हरसीज स्टीअर' केवळ भौगोलिकदृष्ट्या लंडनमध्ये आहे म्हणायचं, एवढंच. पण त्यात हिंदी माणसाला लागणाऱ्या बहुतेक सगळ्या खाद्यवस्तू मिळतात. आपल्या भाज्याही इथं मुबलक. पालकमेथीपासून मिरच्या-कोथिंबीरपावेतो. कोथिंबीर ही खास आपली वस्तू. फक्त, ती आणायला मात्र सेंट्रल लंडनमध्ये जावं लागतं एवढंच. भाज्या ताज्या, अन् उत्तम तरी किती? लहानबोरीएवढा वाटाणा, खरबुजा एवढी वांगी, मुठीएवढाले बटाटे. सेंट्रल लंडनमधला एक ग्रीक दुकानदार आम्ही ठरवूनच ठेवला होता. ह्या भाज्या म्हणे ग्रीसमधून येत.

इथे खायची आबाळ होत नव्हती पण शारीरिक कष्टच फार पडायचे. कारण बाजारहाटापासून भांडी घासण्यापर्यंत सारी कामं स्वतःलाच करावी

लागायची. इथे हमाल, धोबी, तसेच नोकरही दुर्मिळ. महिन्याला तीनशे चारशे पौंड मिळविणारी माणसंही रोजचा नोकर ठेवू शकत नाही. एखाद्या विशेषप्रसंगी सुटी मदत देणारी माणसं मिळतात अन् आपलं तर नोकराशिवाय पाऊल पडत नाही. त्यामुळे सुरवातीला पावलापावलाला त्याची आठवण यायची. चहा पिताना कपबशा विसळण्याची आठवण येऊन चहा बेचव लागू लागायचा. जेवत असताना, तेही आपणच शिजवलेलं, घासाव्या लागणाऱ्या भांड्याचा ढीग डोळ्यासमोर उभा राहयचा. मात्र स्वयंपाक करावा लागत नव्हता. सारं विकत मिळतं. डबे–बंद भाज्या, फळं, चटण्या, पेलेबंद दही, साय, तऱ्हेतऱ्हेची ब्रेड. पोळीला मी अजीबात काटच मारला होता... ती दर रविवारी वहिनीकडे मिळायची. इथल्या बायकांचं मला नेहमी कौतुक वाटायचं. केव्हाही पहा, कधीही त्या गांज-लेल्या, मरगळलेल्या अजागळ दिसत नाहीत सदैव हसतमुख, तरतरीत व नीट-नेटक्या. बूटपॉलिश लावण्यापासून चुलीपावेतो सारं त्या बघतात. आपली चाकरी संभाळतात, मुलं संभाळतात, बाजार हाट उरकतात, आपली घरं अन् बागा जोपासतात, अन् स्वतःलाही जोपासतात. पुन्हा 'वीकएंड'ला 'आऊटिंग' ला जायला तयार... केव्हाही वेळी अवेळी घरी जाऊन पाहिलं तरी विस्कटलेले केस, गबाळे पोशाख अंगावर दिसायचे नाहीत. घरं तरी किती टापटिपीची नि स्वच्छ. इथली घरं तुम्ही भाड्यानी घेता, तेव्हाच इतकी स्वच्छ अन् नीटनेटकी लाव-लेली तुम्हाला मिळतात, की त्यांत कचरा करणं, ती अव्यवस्थित टाकणं, आपल्याहातून घडतच नाही. आमचं घर तीन खोल्यांचं. एवढ्या घराला किमान आठवड्याचे पाचसहा पौंड द्यावे लागतात, पण घर साऱ्या गोष्टीनी सुसज्ज मिळतं. खाली गालिचे, भिंती रंगीबेरंगी कागदांनी मढवलेल्या, फर्निचर पडदे, रुमाल, हीटर, कूलर, पाण्याचा बंब, गॅस अन कुकिंगरेंज या सर्वांनी परिपूर्ण.

स्वतःच्या देहाप्रमाणे स्वताची घरंही स्वच्छ ठेवण्याची इंग्रजी माणसाची शिकस्त असते. त्याला स्वच्छतेचं, नीटनेटकेपणाचं वळण जन्मतः लागलेलं. बहुधा रविवारी घराचं उद्घार्चन होतं... रविवार हा स्वच्छतेचा वार. त्या बरोब-रच रविवार हा विश्रांतीचा वार. पण त्या दिवशी इंग्रजाला घराबाहेर पडल्याशिवाय चैन पडत नाही. रविवार हा चर्चला जाण्याचा, मित्रमडंळीला भेटण्याचा, नाटकं सिनेमा पाहण्याचा, सहलीचा दिवस...त्यादिवशी लंडनहून उपनगराकडे जाणारे रस्ते मोटारीनी भरलेले दिसतात. लंडनच्या आसपास अशी छोटीछोटी

प्रेक्षणीय, सोयीस्कर ठिकाणं पुष्कळ आहेत. त्यापैकी काहीच नसलं तर निदान स्वतःची बाग असते. आपल्या बागेत तासनतास इंग्रजाला घालवायला आवडतं. प्रत्येक घरासमोर सुंदर फुलांनी भरलेल्या बागा असतात. हे काम स्वतः घरमालक नाहीतर मालकीण करते. भांडीधुण्याला नोकर नाहीत, तर बागेसाठी माळी कुठला ? हे एवढं सगळं करायचं म्हणजे हातासरशी वेळेवारी काम करणं प्राप्त आहे. घड्याळाच्या काट्यांशी स्पर्धा करणं क्रमप्राप्त आहे. इथं राहणाऱ्या प्रत्येकाला या काट्याबरहुकूम चालावंच लागत. हळू हळू हे घड्याळ अरेबियन नाईटसमधल्या म्हाताऱ्या कुबड्याप्रमाणे माझ्याही मानगुटीवर बसलं अन त्याचीच सवय जडली.

× × ×

बी. बी. सी. शाळेत आम्ही एकंदर वीस विद्यार्थी होतो. . .अर्थात बहुतेक तिशी किंवा चाळिशी उलटलेले. त्यांत सर्वांत मोठे पाकिस्तान रेडिओचे कराची स्टेशनचे डायरेक्टर चागला... अन सर्वांत लहान स्वित्झर्लन्ड रेडिओचा डॉ. ड्राक. अगदी किरकोळ फाटक्या अंगाचा, पोरगेलासा होता, पण जर्मन साहित्यात डॉक्टरेट मिळवलेला. त्याला 'ड्रॉक' म्हणून हाक मारली, की तोंडाने 'डॅकड्रॅक' असा बदकासारखा आवाज काढून सर्वांना हसवायचा. ही विनोदमूर्ती इंग्रजी भाषेची, अशी काही विटंबना करायची,की सांगून सोय नाही. त्यांची क्रियापदं, कर्ताकर्म यांची रचना पाहून कर्म आठवायचं. 'काळाचा' ताळ नसायचा. वचनांचं भान नसायचं, वर्गात मात्र धडाकून बोलायचा.

पण त्याच्याहीपेक्षा मोठे वीर होते. चाचरत बोलणारे एकदोघे होतेच; पण व्हिएतनामच्या जेनेट विलायला इंग्रजी बोलताना होणारे कष्ट पाहवत नसत. त्याचं अर्धअधिक बोलणं हातवारे अन् पायवारे यांच्या मदतीनं व्हायचं, पण मॉरिटॅनियाच्या विद्यार्थ्यानं ··· तेही कष्ट घेतले नाहीत. कुणी बोललं, की तो नुसता हसायचा. 'यस्', 'नो', 'ऑफकोर्स' ही त्याची कमालमर्यादा; पण एकदोन दिवसांतच त्याच्या ह्या हसरेपणामागचं बिंग बाहेर पडलं. दोनतीन दिवसानंतर त्यानं जी दांडी मारली, ती शेवटपर्यंत. शिक्षक मंडळी त्याच्याबद्दल बरीच हैराण झालेली दिसली. 'तो का येत नाही,' म्हणून त्यांनी सर्वांजवळ चौकशी केली. शेवटी वर्गातलं इंग्रजी त्याच्या डोक्यावरून जात असावं, असा तर्क केला अन नाद सोडला.

बाकीच्याना बोलण्याची पंचाईत पडत नसे .. पण प्रत्येकाचं बोलणं म्हणजे इंग्रजीचं एकेक तद्देशीय रूप. ह्यूसनचं ऑस्ट्रेलियन इंग्रजी, टकाकुराचं जपानी, जळालीचं अफगाणी, आमचं भारतीय. तिच्या जिवंतपणीच झालेले आपल्या मातृभाषेचे एवढे नवे अवतार, आमचे शिक्षक निर्विकारपणे, उघडया डोळ्यांनी पाहयचे. आपली भाषा जगाच्या कानाकोपऱ्यात खेळवली जात आहे, हे पाहून त्यांना अभिमान वाटत असेल, की ती तशी 'बहुरुपी' बनलेली पाहून जीव तळमळत असेल, हे सांगणं अवघड आहे. कदाचित त्यांना याची सवय झाली असावी. आम्हाला अभ्यासक्रमांनुसार समयसूचक कार्यक्रम–म्हणजे अलिखित भाषणं, चर्चा, धावती वर्णनं इ. प्रकार रेकॉर्ड करावे लागत; त्यावेळी "तुम्ही इंग्रजीची फिकीर करू नका.. फक्त कार्यक्रमाच्या बरेवाईटपणाकडे लक्ष द्या", असं सुरवातीलाच सांगून टाकण्यात आलं होतं, ते बहुधा हे पाहूनच. शिक्षकांची बिचाऱ्यांची नावंही आम्ही कधी धड उच्चारली नाहीत. मि. कोर्डू (Cordeaux) यांना 'कोर्डो', 'कोर्डोक्स' किंवा आणखी काही, जो तो आपल्या समजुतीप्रमाणे हाक मारी. Haworth या इंजिनीयराची 'हा-वर्थ' 'हॉर्थ", "हॉअर्थ" हीं नामकरणं झाली. 'Evans' साहेबाचे साधे सरळ 'ईव्हान्स', अगर 'एव्हान्स' होत... अन सेमो (Seymour) यांचं 'सेमोर' किंवा सीमूर असं बाळबोध रूपांतर होई. पण स्वतःच्या नावाची ही तद्देशीय रूपं साहेब मुकाट्यानं ऐकायचा आणि आमच्या हाकेला ओ द्यायचा...

आपण इंग्रजी विषय घेऊन एम. ए. झालो आहोत, हा माझा अभिमान इथं आल्यावर चार दिवसांत धुळीला मिळाला. सुरवातीला माझ्या बहुतेक वाक्याला 'पार्डन' असंच प्रत्युत्तर येई... किंवा ऐकणाराला एकाग्रतेनं तरी ऐकावं लागे. स्टेशनवरचे तिकीट मास्तर, बस कंडक्टर्स, दुकानांतील विक्रेते, अशी साधी माणसंसुद्धा सुरवातीला प्रश्नार्थक मुद्रेनं मजकडे पाहत... अगदी कमाल केली ती आमच्या वर्गातल्या आफ्रिकन विद्यार्थ्यांच्या चमूनं. वास्तविक संस्कृतोद्भव खडया बोलीला आपली जीभ रुळलेली असल्यामुळे आपण भारतीय इंग्रजी फार स्पष्ट व खडं बोलतो, असा आपला समज. पण सपाट गुळगुळीत इंग्रजी बोलणारी ही आफ्रिकन मंडळीसुद्धा मला म्हणायची,

" आम्हाला इंग्रजांचं इंग्रजी समजतं., पण तुमचं समजायला कठीण जातं. "

" कसं काय ? " मी दुखावून विचारायची.

" तुम्ही अगदी छापील बोलता ! "

वास्तविक त्यांच्या संबंधीही माझी नेमकी हीच तक्रार होती. इंग्रजांचं इंग्रजी परवडलं; पण आफ्रिकन इंग्रजी नको. आपण भारतीयांनी इंग्रजी भाषेची पुष्कळ विटंबना केलीय; पण आपली मजल 'आंग्ल-भारतीय' इंग्रजी पावतोंच गेली. परंतु 'पिग इंग्लिश'-सारखा नवा प्रकार जन्माला घालणं आपल्याला जमलं नाही... हा शब्दसुद्धा प्रथम मी इथेच ऐकला. त्यांच्यापैकी एक–मि. ओपारा–हाच तेवढा 'ऑक्सफोर्ड'-- उच्चार करायचा. बाकी सगळयांचे देशीच उच्चार.

× × ×

अशा अंतरराष्ट्रीय मेळाव्यात वावरण्याचा माझा हा पहिलाच अनुभव. पुष्कळ नवं पाहयला, ऐकायला मिळालं. नायजेरियाच्या तिघीजणी होत्या. या आफ्रिकन–ललना नित्य नवे आफ्रिकन पोशाख अन् केशरचना करून येत. रंगाच्या बाबतीत आपल्या भडक रंगांनाही मागे टाकीत अन दुपारच्या सुटीत रोज बाजारात जात. त्यांच्या राष्ट्राला दोन वर्षांपूर्वीच स्वातंत्र्य मिळाल होतं. त्यामुळे नव्या गोष्टी शिकण्याची, जगातील पुढारलेल्या राष्ट्राबरोबर येण्याची ईर्षा त्यांच्यात दिसायची. अस्सल ऑक्सफोर्डचं फर्डं इंग्रजी बोलणारे त्यांचे पंतप्रधान सर अल्लाजी यांच्याबद्दल त्यांच्या बोलण्यातून नितांत आदर व्यक्त होत असे. त्यांच्यापैकी यंग हॅरीस ही 'नुकतीच बॅरिस्टर झाली होती. आफ्रिकन सौंदर्याचा तो एक नमुना असावा. कारण तिला पाहिलं, की मला ब्रिटिश म्युझिअममधल्या एका निग्रो पुतळ्याची आठवण होत असे.

रेडिओ सिलोनचा डायरेक्टर 'विजयदासा' त्याच्या नावांतल्या ह्या जास्तीच्या आकारान्तावरुन तो सिलोनी होता, हे ओळखायचं, बाकी रूप मद्रदेशीय. तो तरुण होता, उपवधू होता अन त्याला मुली सांगून येत होत्या. आपल्यासारखंच मुली बघणं, शिक्षण–नोकरी इ. वरून मुलांची किंमत ठरवणं, हुंडा इ. प्रकार तिथेही होते.

काबुलचा जलाली याच्या डोळ्यांत नेहमी लाली असायची. तो नव-

विवाहीत होता...अन रोज बायकोला पत्र लिहायचा. त्यामुळं वर्गात तो प्रेमपत्रं लिहीत आहे, की व्याख्यानाच्या 'नोट्स' घेत आहे, हे कळायला मार्ग नसे. जपानचा टाकाकुरा अगदीच दूरस्थ वृत्तीचा अन गंभीर. तो जपानी आद्याक्षरं N.H.K. ... कोटावर लावून वर्गात यायचा. त्याचं 'एनएचके' हेच नाव मी पाडलं...टाकाकुराच्या उलट कैरोचा बोलघेवडा एडवर्ड हबीब...हा उत्तम नट होता...अन शेक्सपीयरच्या नाटकातल्या भूमिका उत्कृष्ट करण्याबद्दल त्याची ख्याती होती. तो कुठल्या भूमिका करायचा देव जाणे! मात्र दिसायचा फॉलस्टाफसारखा — "A mountain of flesh!"

पण माझं सर्वांत अधिक जुळत असे ते पाकिस्तानच्या मि. चागला यांच्याशी. त्यांच्या नावात अनुस्वार चुकून द्यायचा राहिला, असं मला वाटायचं. आम्ही हिंदीत बोलू लागलो, की इतरांना "तुम्ही दोघं वेगवेगळ्या देशाचे, मग तुमची भाषा एक कशी?" याचं आश्चर्य वाटायचं. ब्रिटिश साम्राज्यातला सर्वांत मोठा, अभिनव पद्धतीनं स्वातंत्र्य मिळविणारा अन आशियाई राष्ट्रांचं नेतृत्व करणारा आपला देश, असं आपल्याला घरी बसून वाटतं अन बाहेरच्या जगात आपल्याविषयी एवढं ज्ञान असावं, ते पाहून मला कुणाची कीव करावी, तेच समजेनासं होई. पण त्याहीपेक्षा अधिक आश्चर्य लोकांना वाटायचं ते याचं, की चागला अन मी सदैव वितुष्ट असलेल्या शेजारी राष्ट्रांतली देशाभिमानी माणसं इतक्या गोडीगुलाबीनं कशी वागत होतो? फावल्या वेळात आम्ही एकमेकांच्या चालीरीतीविषयी गप्पा करीत असू. परस्परांची थट्टाही चाले. हस्तसामुद्रिकही चालायचं. त्यात अधूनमधून शिक्षकही हात घालायचे. मि. जॉर्डन हा वर्गाचा 'अटेंडंट', पण सर्वांसारखाच सुटाबुटात. आमच्या गप्पात, सहलीतून, पार्ट्यांतून सामील व्हायचा अन आपल्या 'कॉकनी' तून आम्हा 'लायडीज अन जन्नमन' ची करमणूक करायचा.

सुरवातीला काही दिवस जॉर्डनचं-ऑफिसातलं पदनाम (Designation) आम्हाला कळलं नव्हतं. वर्ग झाडूनपुसून ठेवणं, जिथल्या वस्तू तिथं लावणं, पाण्याचे जग भरून ठेवणं, ही त्याची कामं, पण आम्ही वर्गात येण्या-पूर्वीच ती झालेली असायची. साहेबाला मध्येच चहापाण्याची हुक्की आली,

तर इतरांसारखा तोही स्वतःच बाहेर जाऊन आपली तहान भागवायचा. साहेबाच्या कमऱ्यात चहापाण्याची नेआण करणारे 'बेरें'–चपरासी इथे कुठेच दिसले नाहीत. तसंच उठसूट घंटी दाबून बोलावले जाणारे अन् कागदपत्रांची चालढकल करणारे चपरासीही इथे नव्हते. प्रत्येक ऑफिसातली डाक वेळा-वेळानं ढकलगाडीतून जिथल्या तिथं पोचवली जाई. ऑफिसच्या वेळा-व्यतिरिक्त साहेबाच्या घरची अवांतर कामं करणं, मुलं संभाळणं, धुणी धुणं हा आपल्या इथल्या चपराशांचा व्यवसाय इथल्या चपराशांच्या कपाळी नाही. जॉर्डनने पॅनेथॉनं साहेबाच्या मडमेचे झगे किंवा मुलांचे लंगोट धुणं, त्यांच्या न्याहारीसाठी अंडी किंवा बेकन आणून देणं, ही गोष्ट स्वप्नातही इथं शक्य नाही.' साहेब तसा जात्या हुशार. हिंदुस्थान सोडून जाताना त्यानं आपली गोरी सेना तेवढी बरोबर नेली, पण ऑफिसातली चपराशांची सेना अन् आपली साहेबी मागे ठेवली. पुढे इसापच्या गोष्टीतल्याप्रमाणे आपल्या देशी साहेबानं ती 'साहेबी' वाघाच्या कातडीसारखी अंगावर घातली...अन् खरा साहेब स्वतः मोकळा होऊन आपल्या देशात वाटेल ती हलकीसलकी कामं करायला सिद्ध झाला.

× × ×

"तुमच्या नावातलं पहिलं नाव काय?" आमच्या लेक्चररनं एकदिवशी पार्टीत मला विचारलं.

"इंदुमती"

"स्पेलिंग?"

"Indumati",

ओऽऽ! म्हणजे इंडोमाटी! मग मी तुम्हाला ह्याच नावानं हाक मारणार तुमची हरकत नसेल तर! अन् हे पाहा, मला तुम्ही जॉन म्हणायचं!"

दुसरे दिवशी वर्गात आम्ही तयार केलेल्या 'रेडिओ मॅगझिन प्रोग्रॅम' वर चर्चा होती. त्यावेळी चौघा प्राध्यापकांनी त्यावर आपापली मतं सांगितली. आमचे प्रमुख मि.एव्हॅन्स म्हणाले, "मला मिसेस शेवड्यांचा 'टॉक' आवडला. सबजेक्टिव्ह होता पण...!" त्यानंतर त्या 'जॉन' नं आपलं मत मांडताना 'इंडोमाटी' म्हणून माझा उल्लेख केला. तेव्हापासून वर्गातील कांहीजण–त्यापैकी एक दोघं माझ्या मुलाच्या वयाचे होते–मला 'इंडोमाटी' म्हणू लागले अन एक दोघांनी

तर इंदूचं हिंदूच बनवून टाकलं मला. पण माझ्याहून दहा-पंधरा वर्षांनी मोठ्या असलेल्या गृहस्थाला 'जॉन' म्हणणं मला मात्र अवघड वाटलं. म्हणून मी त्यांच आडनाव घेत असे. त्यामुळे ते थोडेसे दुखावले. दोघेतिघे विद्यार्थी मात्र वर्गातसुद्धा त्यांना 'जॉन' अन् दुसऱ्या एका–स्त्री लेक्चररला "शर्ली" म्हणून हाक मारायचे. आमच्या शाळेच्या प्राचार्यांनाही कांही प्राध्यापक त्यांच्या नावानेच हाक मारीत. आपल्याकडे सुरेश डोळके किंवा मनोहर सरपटवार उद्या डॉ. कोलत्यांना कॉलेजांत 'विष्णू' म्हणून म्हणू लागले तर आपल्याला किती गंमत वाटेल ?

पण इथे अल्पपरिचयातच एकमेकांची नाव घेतात. माझ्या मुलाला ऑफिसमध्ये 'अरुण' म्हणूनच ओळखतात. अन् तो ही खुशाल आपल्या बॉसच नाव घेतो. परवा माझ्या एका आर्किटेक्ट स्नेह्यानं ( तिसऱ्या भेटीनंतर ) आभाराच्या पत्रात मला लिहिल " तुम्ही मला पत्रांत कृपया मि. रॉजर्स म्हणू नये. मला आवडणार नाही " त्याऐवजी नुसतं फिलिप म्हणा " मलासुरवातीला चमत्कारिक वाटायचं.पण मग बदल करावा लागला. " When in Rome, do as Romans do ! "

इथे ऑफिसांतून, कॉलेजांतून, संस्थातून अत्यंत खेळीमेळीचं वातावरण आढळलं. लोक एका कुटुंबातल्या सारखे वागायचे. रोज आमचा स्टाफ ट्रेनिंग स्कूलचा अटेंडंट आमचे ॲशट्रे स्वच्छ करावयाचा. व्हॅक्यूमक्लीनरनं वर्ग झाडायचा, पण आमच्या सर्व पार्ट्यांमधून आमच्या प्राचार्यांबरोबर सामिल असायचा ! एकदा एका लेक्चररकडच्या पार्टीत लेक्चरर पिआनो वांजवीत होते. तेव्हा हा इतरांसारखाच नृत्य करीत होता. पण कौटुंबिक खेळीमेळीचा अर्थ घरगुती ढिलेपणा किंवा घरचा शिष्टाचार नव्हे. सामाजिक शिष्टाचाराच्याबाबतीत ब्रिटिश लोक अगदी पक्के आहेत. मला तर पुष्कळदा वाटे की इथल्या बोलण्यात 'थँक यू' व 'एक्सक्यूज मी' ही जणू विरामचिन्हांप्रमाणेच वापरली जातात. प्रत्येकाने आपापली कामे चोखपणे वेळेवर व तत्परतेनं करा–याची. म्हणूनच बी. बी. सी. सारख्या प्रचंड संस्थेची कामं अगदी यंत्राप्रमाणे 'Slick' अचूक — चालतात.

× × ×

बी. बी. सी. चा कारभार अवाढव्य आहे. एकट्या टी. व्ही. विभागात

पाच हजारांच्या जवळपास लोक आहेत. अन् टी. व्ही. हा बी. बी. सी. चा एक दशांश हिस्सा. अवघ्या लंडन शहरभर तिची कार्यालयें वेगवेगळ्या वस्त्यांत पसरलेली आहेत. आयर्लंड, स्कॉटलंड व वेल्स ह्या राष्ट्रीय शाखांच्या व्यतिरिक्त इंग्लंडमध्ये खुद्द दक्षिण, उत्तरमध्य, पूर्व, पश्चिम. व नैऋत्य असे प्रादेशिक विभाग अन् त्यांची केंद्रं आहेत. बी. बी. सी. ची विभिन्न खाती, अन त्यांची रचना आपल्या आकाशवाणीप्रमाणेच आहे. खात्यांची विभागणी मात्र थोडी वेगळी आहे. इकडचा बी. बी. सी. चा प्रोडयूसर हा फक्त रेडिओवरील कार्यक्रमापुरता जबाबदार असतो. कार्यक्रमाची आखणी दुसरें खातें करते. 'प्लॅनिंग' व 'सप्लाय' खाती. अशी दोन वेगळी आहेत. पण मुख्य फरक म्हणजे बी. बी. सी. ही बिनसरकारी संस्था आहे व तो फरक कार्यक्रमांतून अन खात्याच्या कार्यवाहीतून वारंवार जाणवतो. 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स' हे बी. बी. सी. चं वरिष्ठ मंडळ, पण ते रेडिओवरील कार्यक्रमात ढवळाढवळ करीत नाही. त्यामुळे भिन्न भिन्न मतप्रणालीचे लोक ध्वनिक्षेपणासाठी बोलावले जातात. आपलें हे स्वातंत्र्य बी. बी. सी. कटाक्षानं व जागरूकतेनं पाळते, असा बी. बी. सी. चा दावा आहे.

× × ×

बी. बी. सी. चं स्टाफ ट्रेनिंग स्कूल फार मोठं आहे. आमच्याबरोबर एकाच वेळी इतर अठरा कोर्सेस चालू होते, त्यावरून याची कल्पना येईल. जगातील विभिन्न आकाशवाणी खात्यातील लोकांनाच फक्त इथे प्रवेश मिळतो. आमची वीस जणांची तुकडी सर्ववर्णीय होती. काळे (आफ्रिकी), निमकाळे (भारतीय, पाकिस्तानी व सीलोनी), पीतवर्णी (जपानी, मलायन व लाओशियन), निमगोरे (इजिप्शन, अफगाणिस्तानी व इटॅलियन) आणि गोरे (न्यूझीलंडर्स व स्वीस) अशी आमची ही सर्ववर्णीय वरात पुष्कळदा लंडनच्या रस्त्यावरून वेगवेगळ्या ठिकाणी जाण्यासाठी निघायची.

आमच्या अभ्यासक्रमात व्याख्यानाच्या जोडीला प्रात्यक्षिकाचाही भरपूर समावेश असल्यामुळे इथले सर्व प्रमुख स्टुडिओ व कार्यक्रम पाहयला मिळाले. इथली यंत्रसामुग्री, तांत्रिककौशल्य, कामाचा नीटनेटकेपणा एकदम नजरेत भरतात. लंडन हे बुद्धिवंताचं, तज्ञांचं, लेखकांचं आणि कलावंतांचं क्षेत्र असल्यामुळे कार्यक्रमाचा दर्जाही वरचा असतो. काही स्टुडिओ अन् कॉन्सर्ट

हॉल्स अप्रतिम आहेत. टी. व्ही. स्टुडिओ तर प्रचंड आहेत. रेडिओफोनी विभागातला सर्व साधनांनी सुसज्ज असा 'मैदाव्हेल' येथील स्टुडिओ हॉल मला फार आवडला. तालमी अन् ध्वनिमुद्रणाचा वाखाणण्यासारखा वक्तशीरपणा याचा अनुभव मलाही आला.

एकदा एका नाटकाच्या तालमीसाठी मला ६॥ ला पोचायचं होतं. आपल्याला उगाच उशीर व्हायला नको, म्हणून १५ मिनिटं आधी जाऊन पोचले. तो त्या स्टुडिओत दुसरीच तालीम चाललेली दिसली. दोन मिनिटांत ती संपली, तोच चारजणांची दुसरी एक तुकडी आत शिरली. मला वाटलं मी भलत्याच स्टुडिओत आले, पण दहा मिनिटांनंतर ती तुकडी बाहेर आली व ६॥ ला दोन मिनिटे असताना भराभर आमच्या नाटकाची मंडळी आत शिरली. एका मिनिटानंतर अल्प सूचना देऊन तालीम सुरु झाली अन् ठरल्या वेळी संपली.

सायंकाळी ६ ला बातम्या प्रसारित होतात. आम्ही त्या विभागात ज्या दिवशी गेलो, त्या दिवशी दहा मिनिटं कमी असताना बातम्या देणारा आत शिरला, पण आपल्या मजकुराशिवायच. एक अत्यंत महत्त्वाची बातमी अचानक १५ मिनिटापूर्वी हाती आल्यामुळे रेफरन्स लायब्ररीत त्या विषयाचा मजकूर संपादक तयार करीत होता, त्यानंतर तो त्या वाचकाच्या हाती यायचा होता. त्यासबंधी अधूनमधून त्याला फोन येत होते. सहाला एक मिनिट राहिलं तरी बातम्या वाचणारा स्वस्थपणे सिगारेट फुंकीत बसून होता. आम्हीच चुळबुळ करीत होतो. वीस सेकंद राहिली, तेव्हा त्वरेनं त्याच्यासमोर एक कागद धरण्यात आला व क्षणार्धात त्यावर नजर फिरवून त्याने सराईतपणे वाचायला सुरुवात केली. इथे क्षणाक्षणाची मोजमाप होते ती अशी!

× × ×

आपल्या इकडे अजून न आलेले बी. बी. सी. चे नवे प्रयोग म्हणजे रेडिओफोनी, स्टीरीओफोनी आणि रंगीत टेलिव्हिजन. रेडिओफोनी हे एक अगदी साध्या आवाजाचे,--भिन्न गतीच्या (Speed) श्रेणीच्या (Volume) आणि मिश्रणाच्या साह्यानं तयार केलेल्या ध्वनींचं--एक विलक्षण नादब्रह्मच आहे. त्याचा इथे अलीकडे फार वापर करतात. युरोपमध्येही सध्या त्याचे प्रयोग चालू आहेत. स्टेरिओफोनी हे निव्वळ वेगवेगळ्या ध्वनिक्षेपकांचं एक-

त्रित संयोजन आहे. रंगीत टी. व्ही. चेही सध्या चालू असलेले प्रयोग आम्हाला दाखविण्यात आले.

× × ×

आमच्या प्रात्यक्षिकाचा भाग म्हणून आमच्या दोनदोन तीनतीन जणांच्या तुकड्या खांद्यावर टेपरेकॉर्डर्स घेऊन बाहेर पडत. कुठेही जाऊन काहीही ध्वनिमुद्रित करून आणीत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने लंडनच्या कानाकोपऱ्यातून आम्ही भटकलो. प्रेक्षणीय ठिकाणं पाहिली. दुकानं पाहिली. बाजारहाट शोधले. बगीचे अन् खेळाची मैदानं पाहिली.

लंडनच्या 'झू' मधल्या प्राण्यांचे आवाज ध्वनिमुद्रित करण्यासाठी नायजेरियाची मिसेस हमाम व मी बरोबर गेलो. 'झू' म्हणजे केवळ लहान लहान मुलांनी पाहण्याचे ठिकाण, अशी माझी धारणा आहे....पण मुलांबरोबर मोठेही इथे जातात अन लहान होतात. मला मात्र मुळीच गंमत वाटली नाही. गेली वीस वर्षे नागपुरात राहूनही अजून महाराज बागेतले प्राणी मी पाहिलेले नाहीत. प्राणीसंग्रहातले पिंजऱ्यामधले हे पशुपक्षी माझ्या नजरेला नेहमीच दीन, केविलवाणे दिसतात. आपल्या 'संग्रह' बुद्धिपायी त्या बिचाऱ्या मुक्या प्राण्यांना "स्वातंत्र्याची अनुपम सुखे" या स्वातंत्र्यप्रेमी माणसाने मुकायला लावली आहेत.

× × ×

"झू" हा पशुपक्ष्यांचा तुरुंग, तर लंडन टॉवर हा माणसांचा तुरुंग. इथंही आम्ही 'टेपरेकॉर्डर' नेला होता. इजिप्तचा एडवर्ड हबीब बरोबर होता. इंग्लंडचा पहिला नॉर्मन राजा 'विजेता विलियम' यानं स्वरंक्षणासाठी बांधलेला हा किल्ला पुढे राजकैद्यांना ठेवण्याचा तुरुंग बनला. भोगलोलुप आठव्या हेन्रीनं आपली एकेकाळची आवडती राणी 'ॲन बुलीन' हिला इथं कैदेत ठेवलं अन पुढे तिचा शिरच्छेद केला. तिच्यानंतर झालेली राणी जेन सीमूर, तीही याच वाटेनं गेली. तिथले आठव्या हेन्रीच्या काळचे गणवेश घातलेले ते पहारेकरी पाहून नकळत त्या शिरच्छेदाची आठवण मनाला झाली. टॉवरच्या काळ्या भिंतीवर पडलेल्या छाया आम्हाला त्यानंतर अधिकच उदास वाटू लागल्या.

"ह्या दोघी राण्यांचे आत्मे इथं घुटमळत असतील का?" असा विचार माझ्या मनाला चाटून गेला.

तेवढ्यात कुणीतरी हळूच कुजबुजलं

" ॲन बुलीनचं भूत इथं अजून वावरतं म्हणतात. "

वाटाड्यानंही अशी किंवदंती असल्याचं सांगितलं. मग काय? गोष्टींचं पीक फुटलं.

" इथल्या चौकीवरल्या एकदोघा शिपायांना पांढरा शुभ्र पोषाख केलेली ॲन बुलीन राणी दिसत होती असे म्हणतात. " एक.

" एकदा इथल्या पहारेकरी-सार्जेंटाला राणीचं पांढरं शुभ्र भूत... इथल्या चॅपेलमध्येच आपल्या सवंगड्यासमवेत दिसलं होतं ना! ऐकलं बुवा असं " दुसरा.

" हाच तो चॅपल! मीही वाचलंय असं कुठेतरी! ",


आम्ही चॅपलच्या पायऱ्या चढीत असताना तिसरा बोलला.

पण मध्यरात्र नव्हती...अन टळटळीत दुपार डोक्यावर होती. म्हणून बरं. त्यामुळे ही अवकाशवासी कुणीच मंडळी आमच्या वाटेला गेली नाही अन आम्हीच निर्धास्तपणे भुतासारखे हिंडत राहिलो.

लंडन टॉवरमध्ये आपला 'कोहिनूर' हिरा पाहिला. हा राणीच्या मुकुटात असतो ..अशी तोपर्यंत माझी समजूत होती, पण राणीची जडजवाहिरं या टॉवरमध्ये सक्त पाहऱ्यात ठेवलेली असतात... त्यात कोहिनूरही होता ... हा हिरा जगातलं एक आश्चर्य! पण मी रत्नपारखी नसल्यामुळे, त्याच्या आकारमानापलिकडे काहीच आश्चर्यकारक आढळलं नाही. इतिहासांतली त्यापायी झालेली भांडणं अन लढाया ही मात्र आश्चर्यकारक वाटली. माझ्यासारख्या सामान्य नजरेला इतर हिऱ्यांसारखाच तो दिसत होता, पण एकेकाळी तो आपला होता, हें मनात आल्यावाचून राहिलं नाही.

× × ×

टेम्सच्या काठी असलेला हा टॉवर पाहायचा म्हणजे ज्या पुलावरून जावं लागतं, तोच सुप्रसिद्ध टॉवरब्रिज. हे स्थापत्य युगातलं एक आश्चर्यच आहे. या पुलाखालून जहाजांची ये-जा होते... परंतु पुलापेक्षाही अधिक ऊंच जहाजं जाउ लागली, की हा दुभंगतो, दोन भुजांनी जणू बोटींना सलामी देतो... अन पुन्हा हात जोडतो. टॉवर ब्रिज प्रमाणेच लंडनब्रिज, वेस्टमिन्स्टर ब्रिज, वॉटर्लू ब्रिज, चेलसी ब्रिज असे अनेक पूल टेम्स नदीच्या अंगावर



टॉवर ब्रिज

आडवे पडलेले आहेत. ते लंडनच्या उजव्या अन् डाव्या अंगांना जोडतात.

पण लंडनमध्ये वाहणारी टेम्स ही अजीबात सुंदर नाही. गढूळ आहे. बोटींची ये–जा, काठाशी असलेल्या गोदी अन् गिरण्या, त्यामुळे तिच्यावर तेलाचा तवंग सदैव पसरलेला दिसतो. टेम्सचं ते रूप पाहून "टेम्स" हा 'तमसे' चा अपभ्रंश तर नसावा, असाही विचार मनात आला. पण आपल्या तमसेचं महात्म्य हिला नाही. इथल्या देशात नद्यांना–डैन्यूब अन् नाईल सोडली तर–आपल्या नद्यांचं वैभव नाही. एकतर आकारमाननंही त्या लहान आणि आपल्या तमसेचं महात्म्य हिला नाही. इथल्या देशात नद्यांना–डॅन्यूब अन् नाईल सोडली तर–आपल्या नद्यांचं वैभव नाही. एकतर आकारमानानंही त्या लहान... आणि धार्मिक भावनेशी कुठल्याही प्रकारे निगडीत नाहीत. इथं "लोकमाता" वगैरे भानगड नाही... पण पवित्र नदी पाहतांच हात जुळून येणं, तिच्या प्रवाहात पैसे शिरवणं, तिच्यांतील स्नानानं पावन होणं, वगैरे गोष्टींचं भाग्य इथल्या नद्यांना लाभलेलं नाही. नदी म्हणजे निसर्गाची एक सुंदर देणगी. वाहतुकीचं एक साधन. त्यांच्या काठी केलेल्या रात्रीच्या प्रकाश योजनेच्या झगझगाटात, त्यांची जी काय शोभा दिसत असेल तेवढीच... पण टेम्स लंडनमध्ये गढूळ असली, तरी वरच्या प्रवाहात लंडनपासून विंडसर

किल्ल्याकडे जाताना तिच्यावरचं दृश्य फार सुंदर असतं व प्रवासासाठी अशा सहलीची सोयही केली आहे म्हणतात. मला मात्र ते पाहयचा योग आला नाही.

× × ×

आम्ही लंडनचे इतके बाजारहाट पाहिले, पण त्यांतला ' पेटीकोट लेन'चा बाजार मात्र 'यासम हा' च. हा इकडचा चोरबाजार समजावा. इथे 'सेकंडहॅंड' वस्तू मिळतात. लंडनचं हें दर्शन अपूर्व आहे. जो लंडनकर इतरत्र कुठेही दिसायचा नाही, तो तिथं दिसतो. जे जे लंडनमध्ये अभावानं आढळतं, ते ते इथं आढळतं. दर रविवारी सकाळी स्वस्त वस्तू खरीदण्याच्या लोभाने अन आपल्या जुन्या विकण्याच्या आशेनं, इथं मंडळी येतात. यांत चांगले सभ्य स्त्रीपुरुषही असतात. आपली 'शनिचरा' किंवा 'सोमवार' बाजारातली गर्दी यापुढे काहीच नाही. ती गर्दी नाही. धक्काबुक्की असते. धक्के खाण्याचा लंडनमधला हा माझा पहिलाच अन् एकमेव प्रसंग. इथं माणसं घोंगावतात. लांडीलबाडी, आरडाओरडा, शिवीगाळ, भांडाभांड, हमरीतुमरी हे प्रकार इथे एकसमयावच्छेदेकरून आढळले. इथले दुकानदार पठडीचे वक्ते अन अभिनयकुशल नट. त्यांच्या जिव्हेवर जणुं सरस्वती नाचत असते अन् पाहता पाहता ते गिऱ्हाइकास फसवतात. अन तेही गिऱ्हाइकाला न कळत. कारण तो बिचारा तृप्त मनानं घरी जातो. पेटीकोट लेनमधला इंग्रज दुकानदार आपल्या दुकानदारापेक्षा अधिक उजवा... किंबहुना गुरुस्थानी समजावा. याला 'पेटीकोट लेन' असं नाव का पडलं याचा उलगडा मात्र कुणीच करू शकलं नाही. पेटीकोटाशी याचा संबंध आहे, की नाही देव जाणे, परंतु इथलं सारं 'पेटी' ( Petty ) आहे; अगदी 'बाजार' या संस्थेची धडकी भरण्याइतपत, अशी मात्र माझी पक्की खात्री झाली.

× × ×

बो. बी. सीत, दीड महिना हां हां म्हणता निघून गेला. कोर्स संपायला आला, तसं पार्ट्यांचं पीक फुटलं. त्यात नुसता चहा, चहापार्टी, कॉकटेल पार्टी, असे नाना प्रकार होते.

ऑफिसातला इंग्रज अन पार्ट्यांतला इंग्रज हे दोन वेगळे असतात... दोन वेगवेगळे मुखवटे. एरवी मुका असलेला इंग्रज पार्ट्यांतून बोलका होतो.

इथ चहाचा कप किंवा मद्याचा पेला घेऊन तासन तास उभा राहून तो बोलू शकतो. तासन् तास मूक राहण्याची त्याची योगसाधना जबर, तशीच उभं राहण्याचीही. एखाद्या तासातली अपुरी राहिलेली चर्चा बी. बी. सी बारमध्ये ' मागील अंकावरून पुढे चालू ' अशा थाटात चालू व्हायची... तीही उभी राहूनच. शिवाय प्रत्येक ठिकाणी 'क्यू' मध्ये उभं राहणं असायचं. पुन्हा खुर्चीवर बसलं तरी पाय सदैव खाली टेकूनच. आसनमांडी घालणं, पाय दुडपणं इत्यादि आपली आसनं इथं एकूण अज्ञातच. या देशात यायचं असेल, तर प्रथम स्वतःच्या पायावर घट्ट ऊभं राहायला शिकून मग यावं, अशी खूणगाठ ह्या पाटर्यांतून मी बांधली. शेवटच्या दिवशी वर्गातआम्हाला आमची 'प्रशस्तिपत्रं' मिळाली. जोडीला स्टीलची बटनं. ही 'सिंह' छाप बटन म्हणजे बी. बी. सी. क्लबाचं चिन्हं. ते अंगावर असलेला मनुष्य पृथ्वीतलावर कुठेही आढळला, तर तो 'ध्वनिक्षेपण संघा'चा ( ब्रॉडकास्टिंग फ्रॅटर्निटी ) माणूस आहे, हे समजायचं. ती मिळाल्यावर आपण एखाद्या अंतरराष्ट्रीय संघाचे सभासद झाल्यासारखं वाटलं.

कोर्स संपला. शेवटच्या दिवशी आमचे सर्वांत धाकटे प्रोफेसर मि. कीन



उपनगरांतील एक रस्ता

यांच्या घरी ऑफिसतर्फे पार्टीची मुद्दाम योजना होती. हॉटेलात किंवा ऑफिसात दिलेली पार्टी अन घरी दिलेली पार्टी यातही पुन्हा सूक्ष्म भेद आहेच. अधिक जवळीक दाखविण्याच्या हेतूनं म्हणा, अगर इंग्रजी घराचा नमुना पाहायला मिळावा या उद्देशाने म्हणा, पण या पार्टीसाठी आमच्या प्रोफेसरांनी मुद्दाम आपलं घर देऊ केलं होतं. लंडन शहरापासून लांब, 'सेव्हन ओक्स' या रमणीय उपनगरात प्रो. कीनची बंगली होती.

अगदी आधुनिक पद्धतीचं छोटसं घर. टुमदार दुमजली. मोठमोठाल्या प्लॅस्टिकच्या खिडक्या, लाकडी गुळगुळीत फरशी. सभोवताली सुंदर बाग. त्यांत राहणारी माणसंही तशीच सुंदर. प्रो. कीन हे वर्गात सर्वांत देखणे. त्यांच्या दोन मुली पितृमुखी होत्या. पांढरे शुभ्र तलम पोशाख केलेल्या या दोन मुली जेव्हा दाराशी आम्हाला आपल्या आईसमवेत अभिवादन करायला आल्या, त्यावेळी आकातल्या पऱ्याच समोर पंख हलवीत उभ्या आहेत, असं क्षणभर वाटलं. खाणंपिणं गप्पा-विनोद, नृत्य, गाणं यांत पार्टी अकरा वाजेपावतो चालली. त्यात आमचे लहान मोठे प्राध्यापक आपली वयं अन् दर्जा विसरून वागत होते. आमच्या सुरात सूर, तालात ताल मिसळत होते; उड्या मारीत होते. इंग्रज म्हातारा झाला तर तो शरीरानं. तो आपल्या वयाचा आकडा चेहेऱ्यावर वागवीत नाही. त्यामुळे वार्धक्यही इथ वचकून राहतं... सुरकती चेहऱ्यावर येते. मनावर नाही. पण मी मुळांतच 'सिनिक'. या खेळीमेळीनं माझं मन संतुष्ट होत नव्हतं. या खेळकरपणाचा, खेळीमेळीचाही या प्रसंगापुरता या साहेबानं चढवलेला हा मुखवटाच का? निदान माझ्यातरीं 'सिनिक' मनात हा प्रश्न वारंवार डोकावीत होता. दिवसभर तुमच्याबरोबर राहून, मित्रत्व दाखवून, तुम्हाला नावानं हाक मारून, काही तासांच्या आत या एकेरी वर येणारा अमेरिकन, दुसऱ्या दिवसाला तुमची ओळख विसरतो, ह्या 'अमेरिकन मैत्री' च्या प्रकाराबद्दल मी इथे काहीजणाकडून ऐकलं होतं. साहेबही त्याच जातीतला का? एक ओळख अंगाला लागू देत नाही, दुसरा कदाचित मनाला लागू देत नसावा. म्हणजे हा केवळ शिष्टाचाराचा एक भाग? आज मला नावानं हाक मारण्यासाठी 'इंडोमाटी' या उच्चाराशी धडपडताना हा दिसतोय. उद्या कदाचित या नावाच्या आठवणीचीही खरोखरच माती व्हायची!

एक आठवण माझ्या ठेवणीत होती. ती सारखी सलत होती. इथलीच

बी. बी. सी. ची गोष्ट. पहिल्याच दिवशी आमच्या स्वागताप्रीत्यर्थ एक पार्टी दिली गेली. त्यात बी. बी. सी. ची संबंधित अधिकारी मंडळीही उपस्थित होती. त्यातले एक साहेब माझा परिचय करते झाले. पार्टीच्या दोन तासात कितीतरी वेळ त्यांनी माझ्याशी गप्पा केल्या. मी कुठल्या स्टेशनवर काम करते, कामाचं स्वरूप काय? अडचणी कोणत्या, त्या आम्ही कशा सोडवतो, इत्यादि विषयांवर बोलणं झालं. "पुन्हा भेटूच कधीतरी," ह्या नेहमीच्या भरतवाक्यानं ओळखीवर शिक्कामोर्तब झालं.

अगदी त्याच संध्याकाळी पार्टीनंतर मी अरुणबरोबर 'हॅम्स्टेड हीथ' वर फिरायला गेले. तिथे हे साहेब दिसले. इतक्या लवकर त्यांच्या पुनर्भेटीचा योग आला, हे पाहून मला बरं वाटलं...पण त्यांना तसं काहीच वाटलेलं दिसलं नाही. क्षणभर त्यांनी आपली अनोळखी नजर माझ्यावर रोखली अन् दोनदा आमच्या वाटा आडव्या होऊनही दोन्ही वेळ त्यांनी शिताफीनं तोंड वळवलं. कदाचित् अमेरिकन मैत्रीची ही 'इंग्रजी आवृत्ती' असावी अशी मनात नोंद केली अन् पुढे गेले...त्यांच्याबरोबर एक स्त्री होती. कदाचित ऑफिसातली ओळख ऑफिसातच ठेवण्याचा इथला शिष्टाचार असावा, अशी माझी समजूत मी घातली. शिवाय दाट ओळख झाल्याचा आभास निर्माण करून अल्पकाळातच ओळख न दाखवणारे अशिष्ट आपल्याकडेही थोडे नाहीत; याचीही मी आठवण केली...अन् प्रसंग पोटात घातला. पण शिष्टाचाराच्या मुखवट्यांची भीती मात्र मनात कायम राहिली.

— परंतु असा चिमटा पुन्हा बसला नाही अन् पुढे याला अपवादही भेटले.

× × ×

असाच एक अपवाद भेटला, याच दिवसात.

एका ओल्या दुपारी, बॉंड स्ट्रीटवर, एअर इंडियाच्या ऑफिसातून बाहेर पडल्यावर, भारत सरकारच्या माहिती केंद्रासमोर, गार वाऱ्याच्या झोताबरोबर त्याची गाठ पडली. हातात घेतलेलं आमचं काम झालं नव्हतं. हवाही प्रतिकूल होती. पावसाची भुरभुर होती—इथली प्रसिद्ध "ड्रिझल" – रेनकोट, छत्री जवळ नव्हती. पावसाची सर आली, की दुकानाच्या आडोशाला आम्ही उभे

राहत होतो... असे उभे असतानाच तो अरुणला समोर दिसला...अन् त्याने परिचय करवून दिला.

"हा हॅरी, ज्याच्याबद्दल मी तुला पुष्कळसं सांगितलंय्...दिस इज दॅट वंडरफुल फ्रेंड."

ह्या 'हॅरी' चा पुढे मी 'हरी' केला.

× × ×

माझा पुढचा आठवडा बर्मिंगहममध्ये जायचा होता.

× × ×

# ६

बर्मिंगहॅम हे ब्री. बी. सी. चं प्रादेशिक केंद्र. तिथे टी. व्ही. शिकण्यासाठी माझी सोय करण्यात आली होती. मला पत्र देण्यात आलं होतं, त्यानुसार सोमवारी सकाळी अकरा वाजेपावेतो तिथे मला ऑफिसात रुजू व्हायचं होतं. तिथल्या प्रोड्यूसर मिस् हीली माझी सोय करणार होत्या.

बर्मिंगहॅम लंडनपासून सुमारे शंभर मैल. गाडीनं पोचायला तीन तास लागतात. सकाळी आठ वाजता, पॅडिंग्टन स्टेशनवरून स्नो हिलला जाणाऱ्या गाडीत अरुणनं मला बसवलं. इथल्या गाड्या बहुतेक आपल्या सारख्याच, पण मऊ गाद्या, स्वच्छ डबे अन् त्याहून स्वच्छ ' टायलेट ', ही आपल्याकडे नसलेली वैशिष्ट्यं. इथं पहिला अन् दुसरा हे दोनच वर्ग. आपला ' थर्ड ' इथं नाही. अन् त्यातली गर्दी, घाण, गोंगाट जागेसाठी होणारी धक्काबुक्की हीही नाहीत. फलाट जवळपास ओसाड. त्यावर आपल्या इकडचे ठेले, नानाविध आरोळ्या, गजबजाट हीही नसतात.

× × ×

लंडनच्या दोन महिन्यांच्या नागरी जीवनानंतर, इंग्लंडच्या निसर्गरम्य, निर्मळ खेड्यांतून प्रवास करण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग. या देशाचं खरं सौंदर्य खेड्यांत आहे. या देशातली दहापाच मोठी औद्योगिक शहरं सोडली तर...संपूर्ण देश अंतराअंतरावर विखुरलेल्या खेडयांनीच व्यापला आहे. इथला निसर्ग पाहायचा असेल, तर तो खेडयात. खेडयातील जीवनाची ओढ इंग्रज माणसांच्या रक्तात आहे. शहरी जीवनाच्या धकाधकीचा त्याला लवकर उबग येतो...अन् त्याचं मन या ' कंट्री ' कडे धाव घेतं. म्हणूनच परदेशात असताना ब्राऊनिंगला मायभूमीचं स्मरण झालं, ते तिच्या खेडयातील निसर्गाचं! गाडीनं जात असताना :

" सभोवार राने हिरवळली
गंधाने शेते दरवळली
जळे ओहळातुनि खळखळली "

हे दृश्य मोहून टाकतं. ठेंगणी ठुसकी टेकाडं, जमिनीचे गमतीदार चढउतार, त्यांच्या कुशीत वसलेली चिमुकली खेडीं, मधूनच वाहणारा एखादा ओहळ, शेवाच्या झाडांच्या रांगा, त्यामधून उंच मान काढणारं एखादं प्रार्थना मंदीर. हिरवीगार कुरणं, त्यावर संथपणे चरणाऱ्या पुष्ट गाई अन् मेंढरं, गुटगुटित मुलं, हिरवळीवर हुंदडणारी तरुण पोरंपोरी, अन्, तुष्ट शेतकरी...सारंच प्रसन्न अन् रमणीय. इथं लंडनच्या जीवनाचा वेग नव्हता. धावपळ नव्हती. काळ संथ, मंद पावलं टाकीत चालताना दिसत होता.

" ...Lovliest village of the plain,—
When health and plenty cheered the labouring swain."

ह्या गोल्डस्मिथच्या ओळी हीं खेडीं पाहताना मला आठवत होत्या. पण लगेच आपल्या इथल्या शेतकऱ्यासंबंधीच्या दुसऱ्याही ओळी मनात डोकावीत होत्या.

अन् मनाला चटका बसत होता.

डब्यात आमच्या कप्प्यात सात-आठ उतारू बसले होते, वर्तमान-पत्राचा नेहमीचा आडपडदा समोर धरून. स्टेशन आलं, की काही मुक्यानं सामान घेऊन उतरत होते, तसेच काही चढत होते. गाडी फलाटावर थांबली म्हणून स्टेशन म्हणायचं...एरवी...आपल्या स्टेशनावरचा जिवंतपणा इथं नाही. दोन मुखस्तंभ गेले अन् तीन आले, असाच हिशेब...रोजच्या भुयारीच्या प्रवासाची गोष्ट वेगळी...रोज घाई असते, वर्तमानपत्र संपवायचं असतं, प्रवास लहान असतो...पण प्रवासातला हा ऱ्हस्व-दीर्घ भेद इथल्या माणसाला मान्य दिसला नाही. बोलण्यात केव्हाही वेळ न दवडणं, हीच त्याची एकमेव धारणा. फार काय, ज्या दृश्यानं मी भारावले होते, त्याचं कौतुक करायलाही त्याच्याजवळ फुकट वेळ नव्हता. फुकट शब्द नव्हते... गाडीतल्या ह्या मुक्या प्रवाशांचा एकटेपणा घालविण्यासाठी, त्यांना बोलकं करण्यासाठी, " टॉकिंग कंपेनियन्स पाहिजेत " अशा अर्थाची एक जाहिरात

लंडनच्या वर्तमानपत्रात एकदा वाचल्याचं माझ्या एका मित्रानं मला इथं सांगितलं होतं. ह्या अनुभवानंतर मलाही ते खरं वाटलं.

ह्या तीन तासाच्या प्रवासात मी संभाषण केलं ते फक्त एकदाच. पॅडिंग्टन-नंतरचं पहिलं स्टेशन आलं . . . मी पाटी वाचली : ' WYCOMB '. माझ्या शेजारचा माणूस मला कोण जाणं का शिक्षक वाटत होता. ह्या शिक्षकाची बोलकी नजर पाहून मी समोरच्या टेकडीवरील चर्चकडे बोट दाखवून विचारलं :

' काल टी. व्ही. वरचा रविवारच्या धर्मसंगीताचा कार्यक्रम ज्या चर्च-मधला होता . . . ते याचं गावचं बहुतेक ? "

" कुठलं गाव होतं ? मी पाटी पाहिली नाही. "

" वायकोंब की कायसं ! "

" पार्डन ? "

" वायकोंब . . . "

" माफ करा . . . पण . . . स्पेलिंग काय होतं ? "

" WYCOMB "

" ओहोहो ! . . . यू मीन वीकम . . . ? "

" अस्सं ! . . . असा उच्चार करता तुम्ही ! "

जणू त्याच्या शुद्ध इंग्रजी उच्चाराबद्दल त्यालाच बोल लावीत मी हसत म्हटलं : . . . आपल्याला " किंग्स इंग्लिश " शिकविताना साहेबानं इथलं खरं इंग्रजी आपल्यापासून चोरून ठेवलं होतं . . . ही खात्री गेल्या दोन महिन्यात होऊन चुकली होती . . . तेव्हा अशा चुकांची जबाबदारी आपली नव्हे, अशा अविर्भावात मी बोलले. हा शिक्षक पुढच्या स्टेशनावर उतरला. अन् माझी वाचा बंद पडली ती शेवटपर्यंत.

× × ×

स्नोहिल स्टेशनावर गाडी थांबली, तशी सारे उतारू भराभर आपलं सामान घेऊन खाली उतरले . . . अन् पाच मिनिटात फलाटावर शुकशुकाट झाला. हमाल ही संस्था इथेही नव्हतीच. त्यामुळे आयुष्यात प्रथम हमाली केली अन् टॅक्सीत सामान ठेवलं.

इथं लंडनची ऐट, तिथली धावपळ, गर्दी, टापटीप, झकपकाट नव्हता.



बी. बी. सी. च्या शिक्षणसत्रातील
परदेशी विद्यार्थ्यांची तुकडी
(१९६३)

दुय्यम प्रतीचं शहर दिसत होतं. मोठमोठाल्या टोलेजंग इमारती नव्हत्या. दुकानं, हॉटेलही बेताचीच दिसली.

बी. बी. सी. ची इमारत पाहूनही थोडीशी निराशाच झाली. अगदीच टांपट्ट होती. पुष्कळशी आमच्या नागपूर केंद्रासारखी, दोन तीन उपांगात विभागलेली.

इथेही प्रथमदर्शन घडलं ते कमिशनराचं.

" मिस हीली–त्याना भेटायचंय मला, " मी त्याला सांगितलं.

" माडीवर बसतात त्या..."

त्यांच्या शोधार्थ आत जाऊ लागताचं, त्यानं मला अडवलं :

" मिस हीलीकडून मला कसलीही सूचना नाही. "

" पण मी येणार, हे माहीत होतं त्यांना. लंडनच्या तुमच्या ऑफिसनं कळवलंय तसं त्यांना.

" पण मला त्यांनी काही सांगितलेलं नाही. मी फोन करीपावेतो थांबावं लागेल इथंच... सॉरी ! "

मला चीड आली. परदेशी पाहुण्याला स्टेशनवर उतरून घ्यायला येणं लांबचं राहिलं, परंतु तो येणार असल्याचीही सूचना नाही, म्हणजे अनास्थेचा कळसच...

मिस हीलीना यायला तब्बल दहा मिनिटं लागली. तोवर कमिशनर माझ्याशी बोलता झाला होता...

" हिंदुस्थानच्या कुठल्या विभागातून आलात तुम्ही... ? "

" नागपूरहून " मी तुसडेपणानंच उत्तर दिलं.

" ओहो ! ...वंडरफुल ! " त्याचे निळे डोळे चमकले. हे विशेषण नागपूरसाठी होतं की मी नागपूरकर असण्याला ?

" म्हणजे ? " माझी शंका.

" मी एकेकाळी होतो नागपूरला. "

" अस्सं ? "

" मी आर्मींत होतो त्यावेळी ...अन् सीताबर्डी किल्यावर राहत होतो. पुष्कळ वर्षं झाली त्याला. त्यावेळी किल्याच्या जवळच...एक " बल्डी पिक्चर हाऊस " होतं. अजून असेल. "

" आहे ना... परंतु आतां त्याचं नाव रीजंट आहे. "

" अस्सं... "

" हो अन्...त्याचे मालक मि. नायडू नुकतेच वारल्याचं वृत्त ऐकलं मी... "

" च्च् ! नागपूरच्या दोन गोष्टी आणखी आठवतात मला. तिथली सुंदर संत्री ...अन्...भयंकर उन्हाळा ! "

" नागपूरचा तो ' भयंकर उन्हाळा ' कायम आहे अजून " मी म्हटलं, " पण ' सुंदर संत्री '...मात्र तिथल्या रहिवाशांना क्वचितच दिसतात हल्ली. बहुतेक बाहेरगावीच पाठवली जातात ती आताशा परदेशी निर्यातीत... "

" ओह ! पिटी...'

तेवढ्यात ज्यांची प्रतीक्षा चालली होती त्या मिस हीली समोरच्या जिन्यावरून टाण टाण उड्या मारीत पंखासारखे हात हलवीत समोर येऊन थडकल्या...पण जवळ आल्यावर पाहिलं तों त्यांची चाळीशी उलटून गेलेली दिसली. "

" सॉरी ! तुम्हाला ताटकळत ठेवलं मी " हस्तांदोलन करीत त्या म्हणाल्या...

आम्ही कॅन्टीनमध्ये कॉफी प्यालो. वर ऑफिसात गेलो अन माझ्यासाठी तयार केलेलं आठवड्याचं वेळापत्रक हीलीबाईनी माझ्या पुढ्यात टाकलं.

बर्मिंगहॅमचं आकाशवाणी केंद्र सध्या ज्या इमारतीत आहे अन् पूर्वी जिथे होतं त्याठिकाणी पूर्वी आंधळे आणि बहिरे यांची वसतिगृहं होती. ध्वनी आणि दृष्टी या दोन माध्यमांवर सर्वस्वी अवलंबून असलेल्या रेडिओ अन टेलिव्हिजन या गोष्टींना नेमकी अशी जागा लाभावी, हा एक गमतीदार योगायोग वाटला.

इथून टी. व्ही. वर दररोज ' बर्मिंगहॅम सिक्स ओ. क्लॉक ' हा एक वार्तापट प्रसारित होतो. याशिवाय काही नाटकं, भाषणं, विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, संगीत इत्यादि कार्यक्रमही प्रक्षेपित होतात. ते बहुतेक लंडनच्या कार्यक्रमाशी संलग्नित असतात.

गुबऱ्या गालाचे, मिस्किल डोळ्याचे, अन् हसरे मि. पार्किन्स हे टी. व्ही. वार्ताविभागाचे अधिकारी. बी. बी. सीतला मला भेटलेला हा पहिला हसरा अन्

मोकळा गृहस्थ. " बर्मिंगहॅम सिक्स ओ क्लॉक " साठी दररोज वार्तापटात काम करणाऱ्या माणसांची बैठक भरते. पहिल्या दिवशी पार्किन्सनसाहेब मला या सभेला घेऊन गेले. सभेत दिवसाच्या वार्तापटात कोणकोणतं वृत्त, कोण कोण, किती मिनिटाचं, कसं देणार यावर चर्चा झाली. इथे टी. व्ही. वर दिसणारे ओळखीचे चेहेरेही भेटले.

दुसरे दिवशी सकाळी ऑफिसच्या जिन्याशीच मि. पार्किन्स हसत उभे असलेले दिसले. ' गुडमॉंग ' म्हणून ते काही वेळ घुटमळले. मग म्हणाले ;

" एक व्यक्तिगत प्रश्न विचारू का ? "

" विचारा ना ! " व्यक्तिगत प्रश्न दीड महिन्याच्या मुक्कामात बी. बी. सी. तल्या एकाही माणसानं विचारला नव्हता.

" तुमच्या कपाळावर हा लाल ठिपका लावलाय...तो ब्यूटी मार्क म्हणून का ? "

" नाही...सौंदर्यचिन्ह नाही. सौभाग्यचिन्ह आहे हे ! याला कुंकू म्हणतात. "

" पण आणखी एक प्रश्न... "

" बोला... "

" काल तो ठिपका काळा होता...अन् आज लाल आहे. याला काही अर्थ ? "

" नाही. खरं सांगू ? प्रवासात माझी कुंकवाची बाटली फुटली ... म्हणून आज हे लिपस्टिकचं कुंकू लावावं लागलं ... " मी हसत सांगितलं.

" ओ हो. आय सी ! "

ही कुंकवाची उठाठेव एवढ्यावरच संपली. त्यानंतर टी. व्ही. स्टुडिओ. तिथे नाटकाच्या तालमी पाहायच्या होत्या.

× × ×

इथला प्रमुख टी. व्ही. स्टुडिओ—' कास्टा ग्रीन ? ' मी पोचले त्यावेळी " प्रायव्हेट अन् पर्सनल " ह्या नाटकाच्या तालमी चालू होत्या. लंडनहून त्यासाठी प्रसिद्ध दिग्दर्शक चार्लस बर्टन हा मुद्दाम आला होता. आपल्या चार पाच तज्ञाच्या तुकडीसह तो ज्या 'कंट्रोलरूम' मध्ये बसला होता ती वरच्या मजल्यावर होती अन् तालमी ज्या स्टुडिओत चालल्या होत्या, ते खालच्या मजल्या-

वर. परंतु त्यांची चित्रं समोरच्या टी. व्ही. खोक्यांतून वर स्पष्ट दिसत होती. त्या सेटवर येणाऱ्या चित्रांकडे पाहूनच दिग्दर्शक नटांना सूचना करीत होता.

" माय लव्ह, " " हनी, " " स्वीट हार्ट " " डकी " असल्या नाना संबोधनांची पेरणी वाक्यागणिक होत होती.

" लुक, 'माय हनी.' तू जरा उजवीकडे एक इंच सरक. ते वाक्य म्हणतांना शेवटचा शब्द...थोडा अडखळत ठेव... तो जॉनने...उचलून...पुढचं वाक्य म्हणायचं, थोडं जलद...थोडी मान उजवीकडे कलती ठेव ' डकी ! " हं, अश्शी ! "

ही संबोधनं वापरणं हा इथला सामान्य वाकप्रचार, शिष्टाचाराचा एक भाग म्हणा हवं तर. त्याचं म्हणणाऱ्याला तसंच ऐकणाऱ्यालाही काही वाटत नव्हतं. तो प्रकार पाहून मला विमानांतल्या त्या जटायूचं स्मरण होऊन गेलं.

मी पाहत होते...ती नाटकाची रंगित तालीम होती... त्यापूर्वी चार पाच तालमी होऊन गेल्या होत्या. प्रत्येकाला त्याची फर्दी संपूर्ण, अगदी विराम चिन्हांसह पाठ होती...नट क्षणभरही अडखळत नव्हते. ( नाहीतर कॉंट्रॅक्ट जातो.) दिग्दर्शक कुठल्याही पानावर, केव्हाही मागे जायचा...अन " अमुक पानावरच्या अमुक शब्दापासून पुन्हा तालमी सुरू करा " असं पुनःपुन्हा सांगायचा. कॅमेऱ्यासमोरची ही पूर्ण तालीम...तिला ' वॉक थ्रु' म्हणतात... कुठे कुठल्या रेषेवर किती अंशानं वावरायचं...याची ही तालीम...बव्हंशी किचकट, तांत्रिक व शेवटचा सफाईचा हात फेरणारी असते.

हे टी. व्ही. स्टुडिओ म्हणजे बहुतेक प्रचंड हॉल. म्हणजे बहुतेक छतामधून झुंबरा सारखी टी. व्ही. यंत्र अन् कॅमेरे डोक्यावर लोंबत असतात. विजेच्या तारांचं जाळं सर्वच पसरलेलं. ह्या हॉलच्या पार्टिशनं घालून वेगवेगळ्या खोल्या बनवलेल्या असतात. ध्वनिमुद्रणापूर्वी सगळे प्रवेश...त्यांच्या नेपथ्यासह, सहित्यासह, तयार मांडून ठेवलेले असतात...अन् ध्वनिमुद्रणाच्या वेळी कॅमेरा एका पाठोपाठ वेगवेगळ्या प्रवेशातून फिरत जातो. टेलिव्हिजनमध्ये सिनेमा, नाटक, रेडिओ या तंत्रांचा त्रिवेणीसंगम. दोन–तीन दिवस लागोपाठ... मी टी. व्ही. वरच्या या तालमी चार–चार तास पाहत बसले, परंतु अतिशय किचकट असूनही मला त्यांचा कंटाळा आला नाही.

× × ×

बर्मिंगहमला खाण्याचे हाल मात्र फार झाले. ‘ हेगली ’ रोड वरच्या एका प्रशस्त हॉटेलात हीलीबाईनी माझी सोय केली होती अन मी संपूर्ण शाकाहारी आहे, याचीही मॅनेजरला कल्पना अगाऊ दिली होती. पण दुसऱ्याच दिवशी सकाळी न्याहारीला माझ्यासमोर बेरानं उकडलेली अंडी आणून ठेवली. तेव्हा मॅनेजरला मी म्हटलं,

“ मी शाकाहारी आहे ! ”

“ पण शाकाहारी लोकांना अंडी चालतात. ”

“ पण मला चालत नाहीत. सॉरी ! ”

मग माझ्यासाठी एक केळं अन कॉर्न फ्लेक्स घेऊन यायला सांगत तो म्हणाला:

“ बाकी इथल्या हवेत .. भरपूर खायला लागतं. अन नुसत्या शाकाहारावर कसं काय चालणार तुमचं ? ”

“ बर्नाड शॉचं उदाहरण मला ठाऊक आहे. त्यांचं चाललंच ना ? तसंच समजा . . . ”

“ छान ! ” तो हसून म्हणाला, . . . “ पण इथे खूप हिंदी लोक आहेत अन ते तर खुशाल मांसाहार करतात . . . ”

“ खरंय . . . सगळेच हिंदी लोक शाकाहारी नसतात . . . ” माझा खुलासा. एव्हाना आमचं संभाषण बाजूच्या टेबलावरून ऐकलं जात होतं . . त्यात बरेच हिंदी विद्यार्थी होते .. तसेच गोरेही होते. त्यांतल्या एका गोऱ्यानं. जाणकार माणसाच्या स्वरात विचारलं :

“ मला वाटतं, तुम्ही ब्राह्मण आहात, होय ना ? ”

“ हो ”

“ पण इथे मांसाहार करणारे ब्राह्मण काय कमी आहेत ? ”

दुसऱ्यानं शंका काढली . . . हिंदी विद्यार्थी नुसते गप्प बसून ऐकत होते . . . . अन समोरच्या मांसाहाराचा फन्ना उडवीत होते. त्यातले किती ब्राह्मण होते दवेजाणे !

“ हे कसं काय ? ” पहिला.

“ बाकी तुमच्या किती तरी गोष्टी आम्हाला कळत नाही . . . उदा तुमचा धर्म. परवाच मी एक गंमतीदार गोष्ट वाचली तुमच्या धर्मासंबंधी . . .

'Believe it or not' या सदरातली. म्हणे, तुमच्याकडे एक प्रकारचं पवित्र झाड आहे, त्याचं लग्न दरवर्षी एका काळ्या दगडाशी लावतात!"

क्षणभर मी बुचकळ्यात पडले. या अवघड प्रश्नाला काय उत्तर देणार, कपाळ? पण कपाळावर हात मारण्याची वेळ येण्यापूर्वीच मला आठवलं:

काळ्या दगडाचं म्हणजे शाळिग्रामाचं. मग चटकन लक्षात आलं "तुळशीच लग्नं!"

तुळशीच्या लग्नाचं आधुनिक पाश्चात्य मनानं केलेलं हे विश्लेषण मला बरं वाटलं नाही. मी म्हटलं,

"खरं आहे! आमचं ते विशिष्ट झाड ... औषधियुक्त असतं ... त्या भोवतालची हवा शुद्ध अन गुणकारी असते ... म्हणून ते आम्ही अंगणात लावतो .. अन पवित्र मानतो. तुमच्यातली IVY नाही का? तसंच! वस्तू पवित्र मानली, की ती माणसाला सहवासात ठेवावीशी वाटते ... म्हणून ते आमच्या घरांत येतं ... त्याच्या पूजेच्या निमित्तानं आम्ही त्याच्या जवळ जातो. जुन्या बायका त्याला एकशे आठ प्रदक्षिणाही घालतात. उपयुक्ततेची धर्माशी घातलेली अशी सांगड आमच्या जीवनात पदोपदी दिसेल तुम्हाला"

या तुळशीच्या लग्नानं ब्राह्मणांच्या मांसाहाराचा नाजुक अन अवघड मुद्दा मात्र बाजूला पडला अन मी सुटकेचा निश्वास टाकून समोरचा पाव अन केळी निमूटपणे खात बसले.

न्याहारीला मिळणाऱ्या या पाव-केळ्यांनी इथे असेतो शेवटपर्यंत माझा पिच्छा पुरवला. इतरवेळी सँडेविचेस अन् उकडलेल्या भाज्या! त्या खाऊन-खाऊन तोंडाची चवच गेली. इंग्रजी माणसाबरोबरचं जेवणही बेचवच. बर्मिंगहॅमला हिंदी लोकांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे; त्यामुळं हिंदी जेवणाच्या खानावळीही बऱ्याच आहेत. पण रोज उठून जेवणासाठी हॉटेल हुडकत बसणं कसचं जमणार? पहिल्या दिवशी हीलीबाई मला तिथल्या "साकी" ह्या हिंदी हॉटेलात घेऊन गेली. 'साकी' चा हा इंग्रजी अवतार. ते गावातलं सर्वांत चांगलं हिंदी जेवण देणारं उपाहारगृह... त्यांत सर्व थाट इंग्रजी, जेवण हिंदी अन् वेटर मुसलमान, असा संगम होता. माझी जीभ इंग्रजी जेवणानं बेचव झाली होती, तशीच इंग्रजी भाषेनंही. वेटर ऑर्डर घ्यायला येताच त्याच्याशी आधी थोडं

हिंदी बोलून घेतलं. मग हिंदीतच फर्माईश केली. त्यानं आणलेला गरम भात, फोडणीचं मसरीचं वरण, अन् भरलेल्या वांग्याची भाजी पाहूनच अर्धी भूक शमली अन् ते जेवण घेऊन अनेक दिवसांनंतर माझा आत्माराम 'जेवुनिया तृप्त झाला,' सुखानं विस्तारला. हीलीबाईही आपलं वरणभाताचं जेवण चवीनं खात होत्या.

मग वेटरशी मी सुखाचे चार शब्द बोलले. त्याची विचारपूस केली. तो डाक्याहून नोकरीनिमित्त आला होता अन् दरमहा बायकोपोरांना पैसे पाठवीत होता. ते सांगताना त्याचा चेहरा आनंदानं उजळलेला दिसत होता.

"पण या वेटरच्या धंद्यात असे काय मिळत असतील तुला ?" अगदीं भारतीय धर्तीचा 'पर्सनल' प्रश्न मी केला. अन् वेटरला तो आवडलाही. तो म्हणाला :

"आपल्या मानानं या धंद्यात खूप पैसे मिळतात इथे. शिवाय फावल्या वेळी इतर हमालीही करतो मी.. इथे हलकी कामं करायला माणसं कमी आहेत."

त्यानं आणलेल्या बिलावर मोठीशी बक्षिसी देऊन मी उठले. त्यानंही आपली दोन हडकुळी बोटं कपाळाला लावून मला 'सलाम' केला. म्हणाला, "पोटासाठी परदेशात इतक्या लांब आलो... आता पुरेसे पैसे जमले, की घरी जाईन परत..." त्याच्या स्वप्नासह मी त्याचा निरोप घेतला...

× × ×

हीलीबाईंना तसे घरचे पाश नव्हते. घरचं कुणीच नव्हतं. संसारही नव्हता. फक्त एक चुलत म्हातारी मावशी त्यांनी आपल्याजवळ ठेवली होती. विवाह–संस्थेवर त्यांची फारशी श्रद्धा नसावीसं दिसलं.

घरची ओढ नसल्यामुळे त्यांना घरी जायची घाई दिसायची नाही, त्यामुळे रोज ऑफिस संपल्यावर, तर कधी ऑफिसातल्या फावल्या वेळात, मला आपल्या मोटारीत घालून त्या रपेट मारून आणायच्या. बर्मिंगहॅमचे बहुतेक प्रेक्षणीय भाग मी त्यांच्याबरोबर पाहिले, पण फारसं पाहण्यासारखं नव्हतंच ! बर्मिंगहॅम हे ब्रिटनमधलं नंबर दोनचं शहर. नागपूरपेक्षा थोडं मोठं, दहा लाख वस्तीचं ... बहुतेक वस्ती कारखान्यांनी व्यापलेली. कामगार, मजूर ह्यांचाच भरणा विशेष. दाटीवाटीनं बसलेली मजूर–वस्ती, अपुरे, मळके कपडे घातलेले

मजूर, इथंच मला प्रथम पाहायला मिळाले. लंडनमध्ये असा मजूर दिसला नव्हता.

× × ×


बर्मिंगहॅम हे उद्योगधद्याचं केंद्र. परंतु इथे दीड हजार उद्योगधंदे चालत असतील, अशी कल्पना नव्हती. सोळाव्या शतकात लेलंड नामक प्रवाशानं ह्या शहराबद्दल " There were many smiths in the town that used to make knives and all manner of Kutlying tooles " असा उल्लेख केला आहे. ह्या " cutlying Tooles " म्हणजे तलवारींनीच--या शहरांचा पुढे घात केला. इंग्लंडच्या अंतस्थ यादवीच्या वेळी, क्रॉम्वेलच्या सैन्याखेरीज इतरांना तलवारींचा पुरवठा करण्याचं इथल्या लोहारांनी नाकारलं. त्यामुळे पुढे बरीच वर्षे राजपक्षीयांची ह्या शहरावर वक्रदृष्टी होती. लोखंडी यंत्रांची आणि हत्यारांची ही परंपरा पुढे वाढत जाऊन, आज ह्या शहरात ब्रिटनचे बहुतेक सर्व उद्योगधंदे एकवटले आहेत. सुप्रसिद्ध संशोधक जेम्स वॅट, मॅथ्यू बोलटन अन् विलियम मुरडोक, हे औद्योगिक-संशोधनक्षेत्रांतील तीन महापुरुष याच शहरात निपजले. या तिघांचे प्रचंड पुतळे एकाच चौथऱ्यावर--एका प्रमुख चौकात या शहरानं उभे केले आहेत. आज इथे सुया, टाचण्या, बटणं, खिळे, यासारख्या किरकोळ वस्तूपासून सायकली, बाबागाड्या, मोटारगाड्या, आगगाड्यांचे डबे, या सर्व प्रकारच्या वाहनांपर्यंत अनेक वस्तूंचे कारखाने आहेत. तसंच पितळ, चांदी आणि सोनं या धातूंच्या कलाकुसरीची कामं पाहावी इथंच. ख्रिस्ती देवालयांतून वापरण्यात येणाऱ्या सुंदर समया, सोनेरी गदा आणि रंगीत चित्रित तावदानं, यासाठीही हे शहर प्रसिद्ध आहे. तसंच तऱ्हतऱ्हेच्या औषधी अन् फ्रिजिडेअर्स हीही इथंच तयार होतात. येथील एका सोन्याचांदीच्या कला-वस्तू प्रदर्शनात इथल्या सोनारांचं परंपरागत कसब पाहायला मिळालं. तसंच एका वास्तुप्रदर्शनात घरबांधणीसाठी लागणाऱ्या खिळ्यापासून खापरापावेतो अन् शेगडीपासून फ्रिजिडेअर्सपावेतो जुन्यानव्या सर्व वस्तू दिसल्या. हे प्रदर्शन म्हणजे वास्तुविज्ञानात मानवानं केलेल्या प्रगतीचा आढावाच होता जणू.

यंत्रयुगाची कमाल मर्यादा कुठवर जाऊ शकते, याची कल्पना इथल्या एका कारखान्यावरून येऊ शकते. अशा एका अत्याधुनिक पद्धतीच्या कारखान्यात

फक्त एकटा एकच माणूस संपूर्ण कारखाना चालविण्यास पुरेसा होतो. एका टोकाला बटन दाबलं, की दुसऱ्या टोकाला संपूर्ण तयार वस्तू बाहेर पडते. या यंत्ररूपी भस्मासुरानं बेकारीचं महान प्रश्नचिन्ह उभं केलं आहे!

जी. ई. सी. ही ख्यातनाम कंपनीही इकडचीच. मक्का इथल्या सुप्रसिद्ध मशिदीतली अद्ययावत दीपयोजनाही यांचीच आहे म्हणे!

अवाढव्य कारखान्यांच्या या फाफटपसाऱ्यात बर्मिंगहॅमचं चिमुकलं विद्यापीठ " PER ADUA AD ALTA " (परिश्रमाने शिखर गाठता



**बकिंगहॅम राजवाड्यासमोरील व्हिक्टोरिया राणीचे स्मारक**

येतं. ) हे ध्येयवाक्य माथ्यावर घेऊन शहराच्या एका कोपऱ्यात नम्रपणे उभे असलेलं दिसलं.

× × ×

पण बर्मिंगहॅमच्या मुक्कामाची आठवण राहील, ती मि. चार्लस पार्कर यांच्या भेटीमुळे. शेवटच्या दिवशी तो योग आला. साधा पोशाक, आंखूड दाढी व भेदक नजर असलेले पार्कर हे बी. बी. सी. चे अंतराष्ट्रीय कीर्ती पावलेले नामवंत निर्माते. ' जॉन एक्सन ' अन् ' फाईट गेम ' या दोन संगीतिकांत त्यांनी नवी कथा अन् जुनं लोकसंगीत, यांचा नवा प्रयोग केला आहे. पोवाड्याच्या ( Ballads ) धर्तीवर केलेल्या ह्या दोन रचनांचा नवे प्रयोग म्हणून बराच बोलबाला झाला होता. पैकी ' फाईट गेम ' ला आंतराष्ट्रीय नभोवाणी कार्यक्रमाच्या स्पर्धेत ' इटालिया प्राईश ' मिळालं होतं. लंडनला असताना बी. बी. सी. च्या शाळेत आमच्या एका तासाला पार्कर व्याख्यान द्यायला आले होते. त्या दिवशी ' फाईट गेम ' आम्ही ऐकली. त्यावर झालेली चर्चा प्रथम बरीच रंगली अन् शेवटी गरम झाली. ती बी. बी. सी. बारमध्ये जाऊनच संपवावी लागली. आम्ही दोघातिघांनी त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला होता. चर्चेच्या शेवटी मी बर्मिंगहमला पुढच्या शिक्षणासाठी जाणार असल्याचं त्यांना सांगितलं. तेव्हाच त्यांनी घरचं आमंत्रण दिलं होतं.

पण हे आमंत्रण निव्वळ शिष्टाचाराचं होतं, की मनापासून, ते कळायला मार्ग नव्हता. शेवटच्या दिवशी हीलीबाईंनी मी आल्याचं त्यांना फोनवर सांगितलं, तेव्हा ते म्हणाले,

" आज संध्याकाळी पॅट बेंजामिन ही एक अमेरिकन शिक्षिका माझ्याबरोबर येणार आहे. त्यांची हरकत नसेल . . . तर दोघींना घरी नेईन मी. "

पाच वाजता त्यांची छोटी हिरवी गाडी दाराशी उभी राहिली. पॅट त्यात होतीच. वाटेत चहासाठी तऱ्हतऱ्हेच्या केक्स अन् कुकीज घेणं त्यांनी चालविलं.

" तुम्ही येणार आहात हे माझ्या पत्नीला ठाऊक नाही... घरी काय असेल नि काय नाही. तेव्हा तिचीही गैरसोय व्हायला नको अन् तुमचीही. "

“ पण आमच्यापेक्षा त्यांचीच गैरसोय अधिक महत्त्वाची, ” पॅट म्हणाली.

“ तिला माझा स्वभाव आता ठाऊक झाला आहे. मी केव्हा, कुणाला अन् कितीजणांना घरी नेईन, याचा नेम नसतो. तिला सवय झालीय आता...”

“ एकूण सारे नवरे इकडून तिकडून सारखेच. भारतीय नवऱ्याप्रमाणे वर्तन आहे तुमचं हे... अन् इंग्रजी शिष्टाचाराच्या विरुद्ध ..” मी म्हटलं. ते हंसत म्हणाले :

“ शिष्टसंमत गोष्टीच्या चाकोरीत राहणारा मी नव्हे. म्हणून तर माझं कुणाशी पटत नाही... माझी मतं लोकांना चमत्कारिक वाटतात. ”

पार्करसाहेबांचा पोशाख, त्यांचं वागणं, बोलणं, साधारण इंग्रज माणसापेक्षा फार वेगळं वाटलं. पोशाखी शिष्टाचाराची त्यांना नावड दिसली. त्यामुळे त्याचं वागणं अकृत्रिम, सहज होतं.

“ ते फार लहरी आहेत, स्वतःतच गर्क असतात. फार रागीट आहेत. आपल्या कार्यक्रमाच्या वेळी सर्वांना सळो की पळो करून सोडतात ! ” इ. बरचसं त्यांच्याबद्दल ऐकलं होतं, पण त्यांची प्रतिभा कुणीही अमान्य केली नव्हती.

आम्हाला बर्मिंगहॅम शहरातल्या काही इमारती दाखवण्याच्या उद्देशानं ते मुद्दाम गाडी लांबच्या वळणावरून हाकीत होते. पण आश्चर्य असं की कुठल्याच मोठ्या अन् सुप्रसिद्ध इमारती त्यांनी दाखवल्या नाहीत. पण एक छोट्याशा पुरातन चुन्याविटांच्या देवालयासमोर गाडी उभी करून ते भावनेनं म्हणाले :

“ हे विटांचं बारकं बारकं काम पाहिलंत ना ! किती सुंदर, नीटस आहे पण ही कारागिरी आता नाहीशी होत चालली आहे. आज ठिकठिकाणी दिसतात ती आजच्या स्थापत्यानं उभी केलेली प्रचंड धुडं...ज्याना इमारती म्हणतात . हा यंत्रयुगाचा महिमा. ! ”

एका छोट्याशा जुन्या-पुराण्या देवालयासमोर पार्करसाहेबांचं टुमदार पाचसहा खोल्यांचं घर होतं...दाराशी गाडी उभी राहतांच त्यांची पत्नी हसत मुखानं आमचं स्वागत करायला पुढे आली. जणू आमचीच ती वाट पाहत होती.

मजूर, इथंच मला प्रथम पाहायला मिळाले. लंडनमध्ये असा मजूर दिसला नव्हता.

× × ×


बर्मिंगहॅम हे उद्योगधद्याचं केंद्र. परंतु इथे दीड हजार उद्योगधंदे चालत असतील, अशी कल्पना नव्हती. सोळाव्या शतकात लेलंड नामक प्रवाशानं ह्या शहराबद्दल " There were many smiths in the town that used to make knives and all manner of Kutlying tooles " असा उल्लेख केला आहे. ह्या " cutlying Tooles " म्हणजे तलवारींनीच—या शहराचा पुढे घात केला. इंग्लंडच्या अंतस्थ याद-वीच्या वेळी, क्रॉम्वेलच्या सैन्याखेरीज इतरांना तलवारींचा पुरवठा करण्याचं इथल्या लोहारांनी नाकारलं. त्यामुळे पुढे बरीच वर्षे राजपक्षीयांची ह्या शहरा-वर वक्रदृष्टी होती. लोखंडी यंत्रांची आणि हत्यारांची ही परंपरा पुढे वाढत जाऊन, आज ह्या शहरात ब्रिटनचे बहुतेक सर्व उद्योगधंदे एकवटले आहेत. सुप्र-सिद्ध संशोधक जेम्स वॅट, मॅथ्यू बोलटन अन् विलियम मुरडोक, हे औद्योगिक-संशोधनक्षेत्रांतील तीन महापुरुष याच शहरात निपजले. या तिघांचे प्रचंड पुतळे एकाच चौथऱ्यावर—एका प्रमुख चौकात या शहरानं उभे केले आहेत. आज इथे सुया, टाचण्या, बटणं, खिळे, यासारख्या किरकोळ वस्तूपासून सायकली, बाबा-गाड्या,मोटारगाड्या, आगगाड्यांचे डबे, या सर्व प्रकारच्या वाहनांपर्यंत अनेक वस्तूंचे कारखाने आहेत. तसंच पितळ, चांदी आणि सोनं या धातूंच्या कलाकु-सरीची कामं पाहावी इथंच. ख्रिस्ती देवालयांतून वापरण्यात येणाऱ्या सुंदर समया, सोनेरी गदा आणि रंगीत चित्रित तावदानं, यासाठीही हे शहर प्रसिद्ध आहे. तसंच तऱ्हतऱ्हेच्या औषधी अन् फ्रिजिडेअर्स हीही इथंच तयार होतात. येथील एका सोन्याचांदीच्या कला–वस्तू प्रदर्शनात इथल्या सोनारांचं परंपरागत कसब पाहायला मिळालं. तसंच एका वास्तुप्रदर्शनात घरबांधणीसाठी लाग-णाऱ्या खिळ्यापासून खापरापावेतो अन् शेगडीपासून फ्रिजिडेअर्सपावेतो जुन्यानव्या सर्व वस्तू दिसल्या. हे प्रदर्शन म्हणजे वास्तुविज्ञानात मानवानं केलेल्या प्रगतीचा आढावाच होता जणू.

यंत्रयुगाची कमाल मर्यादा कुठवर जाऊ शकते, याची कल्पना इथल्या एका कारखान्यावरून येऊ शकते. अशा एका अत्याधुनिक पद्धतीच्या कारखान्यात

फक्त एकटा एकच माणूस संपूर्ण कारखाना चालविण्यास पुरेसा होतो. एका टोकाला बटन दाबलं, की दुसऱ्या टोकाला संपूर्ण तयार वस्तू बाहेर पडते. या यंत्ररूपी भस्मासुरानं बेकारीचं महान प्रश्नचिन्ह उभं केलं आहे!

जी. ई. सी. ही ख्यातनाम कंपनीही इकडचीच. मक्का इथल्या सुप्रसिद्ध मशिदीतली अद्ययावत दीपयोजनाही यांचीच आहे म्हणे!

अवाढव्य कारखान्यांच्या या फाफटपसाऱ्यात बर्मिंगहॅमचं चिमुकलं विद्यापीठ " PER ADUA AD ALTA " (परिश्रमाने शिखर गाठता



**बकिंगहॅम राजवाड्यासमोरील व्हिक्टोरिया राणीचे स्मारक**

येतं. ) हे ध्येयवाक्य माथ्यावर घेऊन शहराच्या एका कोपऱ्यात नम्रपणे उभे असलेलं दिसलं.

× × ×

पण बर्मिंगहॅमच्या मुक्कामाची आठवण राहील, ती मि. चार्लस पार्कर यांच्या भेटीमुळे. शेवटच्या दिवशी तो योग आला. साधा पोशाक, आंखूड दाढी व भेदक नजर असलेले पार्कर हे बी. बी. सी. चे अंतराष्ट्रीय कीर्ती पावलेले नामवंत निर्माते. ' जॉन एक्सन ' अन् ' फाईट गेम ' या दोन संगीतिकांत त्यांनी नवी कथा अन् जुनं लोकसंगीत, यांचा नवा प्रयोग केला आहे. पोवाड्याच्या ( Ballads ) धर्तीवर केलेल्या ह्या दोन रचनांचा नवे प्रयोग म्हणून बराच बोलबाला झाला होता. पैकी ' फाईट गेम ' ला आंतराष्ट्रीय नभोवाणी कार्यक्रमाच्या स्पर्धेत ' इटालिया प्राईश ' मिळालं होतं. लंडनला असताना बी. बी. सी. च्या शाळेत आमच्या एका तासाला पार्कर व्याख्यान द्यायला आले होते. त्या दिवशी ' फाईट गेम ' आम्ही ऐकली. त्यावर झालेली चर्चा प्रथम बरीच रंगली अन् शेवटी गरम झाली. ती बी. बी. सी. बारमध्ये जाऊनच संपवावी लागली. आम्ही दोघातिघांनी त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला होता. चर्चेच्या शेवटी मी बर्मिंगहमला पुढच्या शिक्षणासाठी जाणार असल्याचं त्यांना सांगितलं. तेव्हाच त्यांनी घरचं आमंत्रण दिलं होतं.

पण हे आमंत्रण निव्वळ शिष्टाचाराचं होतं, की मनापासून, ते कळायला मार्ग नव्हता. शेवटच्या दिवशी हीलीबाईंनी मी आल्याचं त्यांना फोनवर सांगितलं, तेव्हा ते म्हणाले,

" आज संध्याकाळी पॅट बेंजामिन ही एक अमेरिकन शिक्षिका माझ्याबरोबर येणार आहे. त्यांची हरकत नसेल ... तर दोघींना घरी नेईन मी. "

पाच वाजता त्यांची छोटी हिरवी गाडी दाराशी उभी राहिली. पॅट त्यात होतीच. वाटेत चहासाठी तऱ्हतऱ्हेच्या केक्स अन् कुकीज घेणं त्यांनी चालविलं.

" तुम्ही येणार आहात हे माझ्या पत्नीला ठाऊक नाही... घरी काय असेल नि काय नाही. तेव्हा तिचीही गैरसोय व्हायला नको अन् तुमचीही. "

" पण आमच्यापेक्षा त्यांचीच गैरसोय अधिक महत्त्वाची," पॅट म्हणाली.

" तिला माझा स्वभाव आता ठाऊक झाला आहे. मी केव्हा, कुणाला अन् कितीजणांना घरी नेईन, याचा नेम नसतो. तिला संवय झालीय आता..."

" एकूण सारे नवरे इकडून तिकडून सारखेच. भारतीय नवऱ्याप्रमाणे वर्तन आहे तुमचं हे... अन् इंग्रजी शिष्टाचाराच्या विरुद्ध .." मी म्हटलं. ते हंसत म्हणाले :

" शिष्टसंमत गोष्टीच्या चाकोरीत राहणारा मी नव्हे. म्हणून तर माझं कुणाशी पटत नाही... माझी मतं लोकांना चमत्कारिक वाटतात."

पार्करसाहेबांचा पोशाख, त्यांचं वागणं, बोलणं, साधारण इंग्रज माणसापेक्षा फार वेगळं वाटलं. पोशाखी शिष्टाचाराची त्यांना नावड दिसली. त्यामुळे त्याचं वागणं अकृत्रिम, सहज होतं.

" ते फार लहरी आहेत, स्वतःतच गर्क असतात. फार रागीट आहेत. आपल्या कार्यक्रमाच्या वेळी सर्वांना सळो की पळो करून सोडतात ! " इ. बरचसं त्यांच्याबद्दल ऐकलं होतं, पण त्यांची प्रतिभा कुणीही अमान्य केली नव्हती.

आम्हाला बर्मिंगहॅम शहरातल्या काही इमारती दाखवण्याच्या उद्देशानं ते मुद्दाम गाडी लांबच्या वळणावरून हाकीत होते. पण आश्चर्य असं की कुठल्याच मोठ्या अन् सुप्रसिद्ध इमारती त्यांनी दाखवल्या नाहीत. पण एक छोट्याशा पुरातन चुन्याविटांच्या देवालयासमोर गाडी उभी करून ते भावनेनं म्हणाले :

" हे विटांचं बारकं बारकं काम पाहिलंत ना ! किती सुंदर, नीटस आहे पण ही कारागिरी आता नाहीशी होत चालली आहे. आज ठिकठिकाणी दिसतात ती आजच्या स्थापत्यानं उभी केलेली प्रचंड धुडं...ज्याना इमारती म्हणतात .. हा यंत्रयुगाचा महिमा. ! "

एका छोट्याशा जुन्या-पुराण्या देवालयासमोर पार्करसाहेबांचं टुमदार पाचसहा खोल्यांचं घर होतं...दाराशी गाडी उभी राहतांच त्यांची पत्नी हसत मुखानं आमचं स्वागत करायला पुढे आली. जणू आमचीच ती वाट पाहत होती.

" या दोन परदेशी स्त्रियांना घेऊन आलोय मी.... झक्कसा चहा पिऊ या आता...." सहजपणे मि. पार्कर म्हणाले.

चहा तयार होईपावेतो त्यांनी आम्हाला त्यांच्या दोन मुलांचा परिचय करून दिला. मोठी मुलगी अकराची, अंगणात आपलं तट्टू घेऊन त्याच्यावर स्वार होण्याच्या तयारीत होती. ते तिला वाढदिवसानिमित्त वडिलांकडून मिळालं होतं. पाच दहा मिनिटं पॅटजवळ तिच्या तट्टिणीचं गुणवर्णन चालू होतं. ' अडेलतट्टू ' या प्राणिविशेषाखेरीज ह्या प्राणिवर्गाचा माझा परिचय नसल्यामुळे मी पार्करसाहेबाबरोबर त्यांच्या अभ्यासिकेत गेले. खोलीभर पुस्तकं, जुन्या जतन करून ठेवलेल्या वस्तू, टेप्स, रेकॉर्डस इत्यादि विखुरलेली पडली होती. स्वयंपाकघरापर्यंत सगळ्या खोल्या दाखवीत ते म्हणाले ;

" हे आमचं छोटंसं घर ! फारसं सुंदर, आधुनिक पद्धतीचं नाही....पण मला आवडतं. कारण... थोडसं शहराच्या बाजूलाही आहे. "

चहानंतरचा दोन तासांचा वेळ कसा गेला, हे समजलंच नाही ... आमच्या गप्पा चालू असताना त्यांचा पांच वर्षाचा मुलगा पॉल माझ्याजवळ येऊन बसला. मला आमच्या राजूची – नातवाची – आठवण झाली. मी त्याला मांडीवर घेतलं.

"मला तुमच्या देशात यायचंय .. एकदा ..." तो म्हणाला.

"कशासाठी ?"

"तुमच्या देशात मोठमोठाले हत्ती असतात ना ?"

"हो ..."

"अन् सुसरीही ..."

"हो ... पण ह्या सुसरी क्वचितच, नदीकाठी तेवढ्या दिसतात."

"तुम्ही पाहिलीय् सुसर ?"

"हो ..."

मग एक पुस्तक उघडून त्यानं चित्रावर बोट ठेवीत म्हटलं,

"हा ... प्राणी बघा ... अगदी सुसरीसारखा दिसतो ... नाही ?"

"हो. ही ... लिझर्ड म्हणजे पाल ! अरे, ह्या तर आमच्या घरात डझनवारी असतात ..."

"घरात ?" त्याच्या आश्चर्याला पारावर नव्हता.

"हो ... हो ! घरात ... भिंतीवरून सतत फिरत असतात!"

"अन् त्या तुम्हाला चावत नाहीत? भीती नाही वाटत तुम्हाला? तुम्ही मारीत नाहीं त्यांना?"

"नाही ... त्यांना मारत नाही आम्ही ... काही करीत नाहीत त्या बिचाऱ्या. अगदी गरीब असतात." पण पॉलला पालीचा निरुपद्रवीपणा पटत नव्हता. माझ्याकडे आश्चर्यानं तो पाहत होता. पालीसमवेत एकाच घरात राहू शकणारा हा कुणीतरी अजब प्राणी, असं त्याची नजर सांगत होती. क्षणभर मनात आलं की त्याला सांगावं, पालीच कशाला, झुरळं, उंदीर, घुशी इत्यादी मंडळीही आमच्या घरांत वावरतात अन् 'जगा व जगू द्या' या सहिष्णुवृत्तीने आम्ही त्यांचा सहवास पत्करतो.

आठ वाजायच्या सुमारास कसलीशी आठवण होऊन पार्कर म्हणाले,

"साडेआठला मला एका मीटिंगला जायचय्. मी जाऊन येतो तासाभरात... तोपर्यंत बसा तुम्ही इथंच ..."

"त्यापेक्षां आम्ही तुमच्या सभेलाच येतो...तुमची हरकत नसेल तर" पॅट म्हणाली.

"या ! जरूर या...मग तर प्रश्नच मिटला. मी गेलो नसतो; पण मीच त्या संस्थेचा अध्यक्ष आहे...म्हणून जाणं भाग आहे."

"तुम्ही अध्यक्ष अहात...मग तर अवश्य यायलाच हवं आम्हाला" पॅट.

"पण एक आग्रह आहे माझा...आता कुठे आपल्या गप्पांना सुरवात झाली होती...तुम्ही रात्रीचं 'सपर' इथंच घ्यायला हवं...त्याशिवाय पोट भरणार नाही माझं."

शिष्टाचाराला आवश्यक तेवढे आढेवेढे आम्ही घेतले अन् मग होकार दिला.

"तुम्ही सभेहून येताहात तोपर्यंत मी जेवण तयार करून ठेवते...पण जेवण अगदी साधं राहील...काही विशेष करता यायचं नाही."

"मला फक्त पाव अन टामॅटो असला की पुरे." मी म्हटलं.

"किंवा चीज अन् बिस्किट." पॅट म्हणाली.

आम्ही बोलेतो पार्कर तसेच उठून मोटारीत जाऊन बसले होते.

" सभा कशाची आहे ? " मी विचारलं.

" आमची एक ह्या वस्तीतली सर्व्हे सोसायटी आहे एक. सध्या बर्मिंग-हॅमची नगर-पुनर्रचना चालू आहे ना ? त्यात जुन्या वस्त्या पाडून नव्या बांधल्या जात आहेत पण त्यामुळे लोकांना जागेचा प्रश्न पडेल...एकदम सारी घरं पाडू नयेत, हप्त्या हप्त्यानं पाडावीत असं आम्ही म्हणत आहोत. त्यामुळे नवी-जुनी अशी वर्गवारी सध्या आम्ही करीत आहोत. काही स्थापत्य विशारदही आमच्या सोसायटीत आहेत.... "

सभेला पाचपंचवीस मंडळी होती. तरूण होते, तसेच वृद्धही. इथेही समाजकार्यात स्त्रियाच आघाडीवर दिसत होत्या. त्यात मनुताई, जनुताई होत्या...तशाच भीमाकाकू, मथूकाकू दिसत होत्या...संसार सांभाळून दारो-दार भटकून ही पाहणी त्या करणार होत्या. पाहणी करण्यासाठी आळी वाटून दिल्या जात होत्या.

अध्यक्षांच्या पाहुण्या म्हणून आम्हाला सन्मानानं बसविण्यात आलं होतं ... सभेचं काम चालू असताना पॅट माझ्या कानाशी लागून मि. पार्कर बद्दल माहिती देत होती.

" गेल्या आठ दिवसांपासून त्याच्या सहवासात मी आहे. त्यांची वृत्ती, त्यांची मतं ... त्यांच वागणं पाहून मी त्यांना ठाऊक आहे काय नाव दिलंय् ते ? टॉलस्टॉय. फरक एवढाच, की ते गरीब कुळात जन्मले, पण कळकळ तीच आहे. अमेरिकेत माझा जन्म गेला ... पण अशी माणुसकी मला दिसली नाही ... He is a wonderful man ! आमच्या अमेरिकन ब्रॉड-कास्टिंगमध्येही ते होते... पण तिथे त्यांना समाधान लाभलं नाही. इथं नवे प्रयोग करायचे होते त्यांना ! "

कामाच्या वाटणीनंतर घराच्या रंगीत स्लाईड्स दाखवण्यात आल्या. ॲन पद्धतीची घरं, पूर्व-व्हिक्टोरियन, उत्तर-व्हिक्टोरियन, युद्धपूर्व, युद्धोत्तर ही नावंच तोपर्यंत कानांवरून गेली होती. त्यांतला फरक त्यादिवशी दोघा तरुण स्थापत्य-विशारदांनी समजावून सांगितला. पार्कर रगून गेले होते.

सभा तब्बल दोन तास चालली. परत येतांना वाटेत पार्कर म्हणाले,

" सभा चालू असताना तुम्हा दोघीजणींच्या कसल्या कानगोष्टी चालू होत्या ? "

" पॅटचं पार्कर-पुराण ! " मी म्हटलं.

" बापरे ! म्हणजे एव्हाना मी कुणीतरी फार मोठा बडा माणूस आहे, अशी तुमची समजूत झाली असेल... पण खरं सांगतो. हा बडेपणाच माणसामाणसांत भिंती निर्माण करतो... मला लहान माणूस म्हणून रहायचं आहे ! "

परतलो तेव्हा सौ. पार्कर जेवण तयार करून वाट पहात होत्या. मुलं झोपली होती. टी. व्ही. चालू होता. खोलीत पाऊल टाकताच पार्करसाहेबानं तो बंद केला अन् म्हणाले,

" मध्यमवर्गीय कुटुंबात टी. व्ही. ठेवण्याची फॅशन आहे ... शिवाय माझ्या व्यवसायाशी त्याचा संबंध आहे, म्हणून तो माझ्या घरात आहे. एरवी तो मला मुळीच आवडत नाही ... या टी. व्ही.नं माणसामाणसातले दुवेच नष्ट केले आहेत. आजचं इंग्रजी घर म्हणजे एक प्रकारचा बालेकिल्ला. त्यात इंग्रज माणूस स्वतःला कोंडून घेऊन इतरांपासून अलिप्त राहतो. "

मग रात्रीच्या शांत वातावरणात, खोलीतल्या फायरप्लेस समोर बसून आम्ही जेवण केलं. पार्कर रेडिओतंत्र, अभिजात कला, माणसाची आजची समस्या इ. विषयांवर एकसारखे बोलत होते. मी विचारलं,

" रेडिओवरचे नवीन प्रयोग करून पाहण्याची प्रेरणा तुम्हाला कशी काय मिळाली ? "

" बीबीसीत आल्यावर, मी जेव्हा सामान्य लोकांतून त्यांची जुनी गाणी, त्यांच्या चाली, कथानक गोळा करण्यासाठी खेड्यातून, कामकरी लोकांतून हिंडू लागलो, तेव्हा आम्ही आज वापरतो ती भाषा किती कृत्रिम असते अन् म्हणूनच आमचे कार्यक्रम किती पोशाखी, कृत्रिम असतात, याची मल जाणीव झाली ... ती खरी बोलभाषा ( Spoken Word ) नव्हेच. सामान्य लोकांची व्यवहारातली उत्स्फूर्त भाषा... ही खरी रेडिओची भाषा, असं मला पटलं... अन् त्या भाषेसाठी राबवलं तर ' मायक्रोफोन ' हेच यांत्रिक माध्यम किती प्रभावी अन् बोलकं होऊ शकतं, हे मी शिकलो. "

बारा वाजले आम्ही जायला निघालो. तृप्त मनानं त्या सुखी, प्रेमळ जोडप्याचा निरोप घेतला. दूरवर निघून गेल्यावरही दाराच्या चौकटीत आम्हाला हात दाखवीत निरोप देत उभं राहिलेलं ते जोडपं माझ्या डोळ्यांना

समोवतालच्या अंधारातही दिसत होतं... ते मला अखंड, सनातन, सार्वकालिक वाटलं. देशकालपरत्वे त्यांचे पोशाख बदलले होते. खाणंपिणं वेगळं बनलं होतं. शिष्टाचार भिन्न होते... पण भावना त्याच होत्या. पुरुषाची खोल प्रीती अन् ऋजुता तीच होती, स्त्रीचे कोमल भाव, पतिभक्ती तशीच अखंड होती.

पॅटच्याही मनात तसेच विचार घोळत असावेत. ती भारावून म्हणाली,

"माझ्या या भटकंतीत एक गोष्ट मी शिकले. ती ही की जगाच्या पाठीवर कुठेही जा, माणसांची मनं एका मातीचीच आहेत !"

× × ×

हॉटेलमध्ये पोचले तो मध्यरात्र उलटून गेली होती. रात्रीच्या स्तब्धतेत ती रिकामी, थंड खोली खायला धावली- ही इथली शेवटची रात्र. रस्त्यावर एखाद दुसरी मोटार सरपटत होती, पण हॉटेल गडीचिप होतं. मागच्या तुसड्याबागेत फिक्कट गोठलेलं चांदणं पडलं होतं. थंडी वाढत होती. खोलीच्या भिंती सारख्या दूर उभ्या होत्या. ऊब आणण्यासाठी मी गॅसला काडी लावली अन् मग रेडिओ लावला. तो एकाएकी पूर यावा तसे वेगवान एकदम स्वर कानावर आदळले. कुठेतरी बेटोव्हनचा "Seventh symphony orchestra" चालू होता. बॅटोव्हनचं संगीत वेड लावणारं आहे. ते असं या वेळी, या ठिकाणी, असं अनपेक्षित ऐकायला मिळेल, अशी कल्पना नव्हती. त्याचे गूढ स्वर अवकाशात भरून गेले... मला त्यांचा अर्थ कळत नव्हता. भाषा कळत नव्हती. फक्त सामर्थ्य जाणवत होतं. स्वरांच्या लहरी मागून लहरी वातावरणात जमा होत होत्या ... एकावर एक चढत होत्या, अन् स्वरांचं शिल्प उभं करीत होत्या ... अन् पाठोपाठ दुसरंही एक शिल्प. आठवणींचं !

"संगीताला स्वतःची भाषा असते. त्यांतील लयीला, प्रत्येक स्वराला, विरामांना अन् पुनरावृत्तीला विशिष्ट अर्थ असतो. त्यात निरर्थक काही नाही. या साऱ्यांचं मिळून एक शिल्प तयार होत असतं. एकसंध, सुसंवादी, लयबद्ध !" हॅरीचे शब्द आठवत होते !

× × ×

बर्मिंगहम संपलं. आता पुढचे तीन आठवडे पुन्हा बी. बी. सी. च्या वेगवेगळ्या खात्यांतून काम पाहयचं. पण सुख एवढंच की दहा ते पाच हे

शाळेचं बंधन नव्हतं. वेळापत्रक नव्हतं. व्याख्यानं नव्हती. नुसत्या तालमी पाहयच्या. ध्वनिमुद्रणं पाहयची, प्रश्नोत्तरं करायची, वाटल्यास नोट्स घ्यायच्या. एवढाच काय तो अभ्यास!

आता लंडन पालथं घालायला भरपूर वेळ होता.

× × ×

तसं लंडनमध्ये पाहण्यासारखं भरपूर आहे अन् तेही अनेकविध विषयांवर. रोज सावकाशीनं, बारकाईनं ठिकाणांची ओळख करून घेऊन चव घेत पाहयचं म्हटलं, तर महिनाही पुरू नये. परंतु गोष्टीतील त्या अमेरिकन तरुणाच्या मनोवृत्तीनं लंडन 'उरकायचं' म्हटलं, तर दोन दिवसही पुरे. हा तरुण युरोप उरकण्याच्या बुद्धीनं इटॅली, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स इत्यादि देशांचा तुफानी दौरा दोन दिवसांत संपवून इंग्लंडला आला. दिवसभर लंडन अन् आसपासची ठिकाणं उरल्यानंतर, रात्री एका ठिकाणी त्याला वाट विसरल्यासारखं झालं.

"मी कुठे आहे सध्या?" त्याने जवळच्या बॉबीला प्रश्न केला.

"तुम्ही बॉंड स्ट्रीट अन् ऑक्सफर्ड स्ट्रीटच्या संगमावर आहात ..."

"तपशील नको ... कुठल्या शहरात आहे ते सांगा!"

हा अमेरिकन उरक भारतीय रक्तात नाही. पौर्वात्य ढिलेपणाच आपल्या हाडीमासी खिळलेला. त्यामुळे बरंचसं पाहूनही आणखी बरंचसं पाहयचं राहून गेलं, ही चुटपुट आपल्या मनाला लागून राहते.

लंडनमध्ये पाऊल ठेवल्यापासून इथली प्रेक्षणीय स्थळे पाहण्याचा सपाटा मी चालवला होता; परंतु मुख्य पाहयची होती ती इथली कला. त्यामुळे मी इथल्या आर्ट गॅलरीज, स्टुडिओज, हंगामी प्रदर्शनं, रस्त्याकाठची नवोदित चित्रकारांची प्रदर्शनं बघितली. इथल्या प्रचंड संग्रहालयांचे अक्षरशः उंबरठे झिजवले.

× × ×

# ७

"Art does not render the visible ;
rather it makes visible"

PAUL KLEE

"And Art is the ever–living question asked of the visible world by the visual sense"

KONRAD FIEDLER

इथली प्रचंड संग्रहालयं आणि विविध कलाप्रदर्शन पाहाताना एक गोष्ट प्रकर्षानं जाणवते ती म्हणजे कलाविश्वात घडून आलेली क्रांती, आणि कलेच्या प्रांतातील आजची गतिमानता. १९ व्या शतकाच्या अखेरी-पावेतो दृश्यसृष्टिबरहुकूम प्रतिसृष्टी निर्माण करण्यात धन्यता मानणारी, प्रतिकृती आणि अनुकृतीलाच कला समजून त्यात प्रावीण्य मिळवणारी जुनी सुबोध कला आज चित्रविचित्र रंगांच्या, अनोळखी आकारांच्या, वेड्यावाकड्या अर्थशून्य भासणाऱ्या रेषांच्या सृष्टीत जाऊन बसली आहे. वास्तविक, दृष्टीच्याद्वारे विश्वातील वास्तवाचा शोध घेणे, हे कलेचं कार्य, परंतु या चतुर्परिमाणात्मक विश्वाचा अर्थ लावणं आणि तोही त्रिपरिमाणात्मक मानवी दृष्टिकक्षेच्या ( Perspective ) मध्यमाने आणि फक्त लांबी रुंदी असलेल्या द्विपरिमाणात्मक जागेत, ही कलेची खरी समस्या. वेगळ्या प्रकारांनी हा अर्थ लावण्याचे प्रयत्न झाले अन् त्यनुसार वेगवेगळे कला संप्रदाय अस्तित्वात आले. आधुनिक वैज्ञानिक संशोधनाने मानवी ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या तशा कलेच्या कक्षाही विस्तारल्या. या संशोधनाने युरोपीय कलेला एक अपूर्व अशी दृष्टी दिली. मानवी दृष्टीकक्षासंबंधीच्या तिच्या कल्पना बदलून टाकल्या. कलेला नवं तत्त्वज्ञान दिलं. किंबहुना, या वैज्ञानिक संशोधनातूनचं आधुनिक युरोपीय

कलेचा जन्म झाला. छायाचित्राप्रमाणे वस्तूची प्रतिकृती निर्माण करणं म्हणजे कला, या चित्रकलेच्या परंपरागत कल्पनेला पहिला धक्का दिला तो कॅमेऱ्याच्या शोधानं. जर कलावंतापेक्षा कॅमेरा अधिक चांगली प्रतिकृती निर्माण करू शकतो, मग कलावंत अन् कॅमेरा यांत भेद कोणता उरला? अन् छायाचित्रात जे नसतं आणि कलेत असतं, ते काय? या प्रश्नांनी कलावंतांची दृष्टी अंतर्मुख केली आणि चित्रकलेसंबंधीच्या पूर्व--कल्पनात आमूलाग्र क्रांती घडून आली. त्याच सुमारास रंगपट्टातील ( Spectrum ) रंगांचा शोध लागला. या संशोधनाने चित्रकाराचं संपूर्ण 'पॅलेत' बदलून टाकलं. काळा अन् पांढरा या दोन रंगाच्या दरम्यान समाविष्ट असलेला रंगपट जाऊन इंद्रधनुष्यातील सप्तरंग त्या जागी खेळू लागले. नवे रंगसिद्धांत जन्माला आले. दृष्टीकक्षेच्या नव्या कल्पना अस्तित्वात आल्या. त्यात फ्राईडच्या मानसशास्त्रीय सिद्धांतांनी मानवी मनासंबंधीच्या आणि 'वास्तवा' संबंधीच्या कल्पना बदलल्या. नवा संप्रदाय स्थापन झाला. वैज्ञानिक संशोधनाने पाश्चात्य कलाक्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवून आणली आहे व कलेची समस्या सोडविण्याचे नव्या दिशेने प्रयत्न होत आहेत.

लंडन हे तर कलेचं माहेरघर. आज इथली आधुनिक कला या संशोधनानं खुल्या केलेल्या अनुभवाच्या नव्या कक्षा धुंडाळीत आहे. मानवी अंतर्मनाच्या गूढ प्रदेशातून शोध घेत आहे. 'प्रतिकृती' आणि 'अनुकृती' या अवस्था ओलांडून 'प्रतिमा' आणि 'प्रतीकां' च्या जगात वावरत आहे. नित्य नवे प्रयोग करीत आहे. आज कलेची भाषाच झपाट्याने बदलत आहे. कलामूल्यं बदलत आहेत, नवनवीन कलापद्धती जन्माला येत आहेत. गेल्या तीस-चाळीस वर्षात आधुनिक चित्रकलेचं रूप इतकं बदललं आहे, परंपरागत कलेपासून ती इतकी लांब गेलेली आहे, की सामान्य प्रेक्षक या चित्रकलेच्या प्रदर्शनातून जाऊ लागला, की भांबावून जातो आणि लुई कॅरॉलच्या अद्भुत नगरीत वावरणाऱ्या 'एलीस' सारखी त्याची स्थिती होते. ही स्थिती पूर्वग्रहदूषित कुचाळखोरांची होते, तशीच, ही कला प्रामाणिकपणे समजून घेण्याचा यत्न करणाऱ्या अभ्यासूंची आणि जिज्ञासूंचीही होते. अशा स्थितीत, त्याची अनभिज्ञता आणि चित्रकाराची कला याच्या दरम्यान एखाद्या पुरोहिताप्रमाणे उभ्या असलेल्या तज्ञ टीकाकाराचं बोट धरण्याशिवाय त्याला गत्यंतर

उरत नाही. हे कलातज्ञ ही दुर्बोध कला स्वतः समजून घेण्याच्या आणि समजवून देण्याच्या प्रयत्नात असतात. यात हर्बर्ट रीड हे आज अग्रेसर आहेत व ह्या प्रांतातील गोंधळाचा आणि अराजकाचा विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या साह्याने अर्थ लावण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

× × ×

मी इथे पोचले तेव्हा " ब्रिटन १९६३ " हे प्रदर्शन चालू होते. ह्यात ब्रिटनच्या जेष्ठ-कनिष्ठ हयात चित्रकारांच्या ६२ सालच्या चित्रांचं प्रदर्शन मांडलं होतं. त्यावर रेडिओवरून आणि वृत्तपत्रांतून सतत भाष्यं येत होती. टी. व्ही. वर चित्रकारांच्या मुलाखती येत होत्या. प्रदर्शनाचे दोन भाग पाडले होते. चाळीशी उलटलेल्या चित्रकारांची चित्रं ' टेट गॅलरी ' त ठेवली होती, तर त्याखालील तरुण चित्रकारांना पूर्वलंडनमध्ये ' व्हाईट चॅपल ' इथे जागा देण्यात आली होती. या नवचित्रकलेचा मी काहीसा अभ्यास केला आहे, थोडंफार वाचलं आहे, चित्रं पाहिली आहेत, अल्पसं लिहिलंही आहे; परंतु मलाही ही चित्रं अवघड वाटली. ही बहुतेक अमूर्त शैलीतील ( ॲब्स्ट्रॅक्ट ) चित्रं होती. जुन्यात मला बेन निकलसन, ग्रॅहम सदरलंड आणि फ्रांसिस बेकन यांची चित्रं आवडली. बेकनचं ' थ्री स्टडीज ' हे सर्वोत्कृष्ट ठरलं होतं, तसंच टीकाकारांनी नव्यांतून ' knot ' हे साधंच एका गाठीचं चित्र नावाजलं होतं. प्रदर्शन पाहताना बरोबर असलेल्या एका इंग्रज स्नेह्याला मी विचारलं, " इथे तुम्हाला ही चित्रकला समजते का ? "

" आमच्या जन्मापासून आम्ही हीच कला पाहत आलो...तिचीच सवय झालीय आम्हाला... " तो म्हणाला.

ह्या चित्रकलेची लोकांना सवय झाली असली, तरी त्यावरून ही कला इथे लोकप्रिय आहे, असं विधान करणं चुकीचं ठरेल. परंतु ह्या प्रकाराबद्दल लोकांचं कुतूहल व जिज्ञासा, विशेषतः ही चित्रं ज्या किंमतीला विकली जातात, त्यावरून वाढती आहे, असं म्हणता येईल आणि ती वाढती ठेवायला वृत्तपत्रं, रेडिओ, टी. व्ही. आणि कलातज्ज्ञ हातभार लावतात.

× × ×

इथलं सरकारही कलेला भरपूर उत्तेजन देतं. कलेसाठी वेगळं मंत्रालय नसलं, तरी म्युझियम्स आणि गॅलरीज् यांच्या स्थायी समित्या, ' रॉयल फाईन

आर्ट कमिशन्स ' इत्यादी संस्था सरकारला सल्ला देण्याचं कार्य करतात. परंतु सरकारची कलेबद्दलची आस्था मुख्यतः " आर्ट कौन्सिल " आणि " ब्रिटिश कौन्सिल " या प्रमुख कला-संस्थांना दिलेल्या वार्षिक अनुदानांतून दिसून येते. सरकारी कोषातून निव्वळ कलेसाठी १० लाख पौंड वर्षाला खर्च होतात. ( हा सरकारी आकडा आहे. )

सरकारखेरीज काही खासगी व सार्वजनिक संस्थाही कलेच्या उत्तेजनार्थ आज खपत आहेत. CEMA ( Council for Encouragement of Music and Arts ) आर्ट्स कौन्सिल, कार्नेगी ट्रस्ट, पिलग्रिम ट्रस्ट, कॅलहूस्ट गुलबॅंकियन ट्रस्ट ही नावं आज इथे प्रसिद्ध आहेत.

× × ×

विलायतेत ..म्हणजे संपूर्ण ग्रेट ब्रिटनमध्ये आज ९०० च्या जवळपास संग्रहालयं आणि आर्ट गॅलरीज आहेत, अशी सरकार-दप्तरी नोंद आहे आणि एकट्या लंडनमध्ये जगात कुठल्याही एका शहरात नसतील, इतकी विविध संग्रहालयं आहेत. ही संग्रहालयं इंग्रज लोकांच्या कलासक्त, साक्षेपीवृत्तीची आणि संग्रहबुध्दीची साक्ष देतात, पण इंग्रजांच्या कलासक्तवृत्तीला आस्थेची जोड आहे. एके काळी अर्ध्याअधिक जगाचे ते राज्यकर्ते होते. त्यामुळे जगातील कानाकोपऱ्यातून जे जे संग्रही ठेवण्यासारखं असेल, ते ते इथल्या संग्रहालयातून आस्थेनं जपून ठेवलेलं आढळतं.

× × ×

ब्रिटिश म्युझियम हे इथलं सर्वांत मोठं संग्रहालय. या संग्रहालयाची प्रचंडता, त्यातील विविध वस्तूंचा संग्रह आणि ज्या आस्थेनं तो काळजीपूर्वक जतन करून ठेवला आहे, ती पाहिली म्हणजे मन थक्क होऊन जातं. हे जगातील एक अद्वितीय संग्रहालय आहे. जगातील बहुतेक सर्व देशांतील संस्कृतींच्या प्राचीन वस्तूंचा अफाट संग्रह या ठिकाणी आहे. या संग्रहालयात ' काय आहे ? ' असं विचारण्यापेक्षा ' काय नाही ? ' असा प्रश्न विचारणं अधिक योग्य ठरतं. एकटं हे संग्रहालय पाहयलाच आठवडा हवा. अर्थात् इतका वेळ देणं मला शक्य नव्हतं. तरी जितकं पाहता आलं, तितकं मी अधाशीपणे पाहून घेतलं. इथं पुरातन अशा इजिप्शियन, बाबिलोनियन, असीरियन संस्कृतीचे अवशेष आहेत, तसेच आदिमानव संस्कृतीचे अवशेषही

आहेत. चीन, जपान ह्या अतिपूर्व देशांतील चिनी मातीची कला आहे, तशीच ब्रह्मदेश, कंबोडिया, तिबेट आदि देशांतील सोन्या-चांदीची कलाकुसर आहे. ग्रीक रोमन अभिजात कलाकृती आहेत. त्याचबरोबर आफ्रिकन, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन वन्य जमातींच्या कलाकृतीही आहेत. बायबलच्या जुन्या प्रती आहेत, अन् रामायण, भागवत यांच्यातील काही खंडांची हस्तलिखितंही आहेत. या विविध आणि संपन्न कलाविभागांतून जाऊ लागलं, की जगातील कलेच्या इतिहासाचेच ओझरतं दर्शन घडतं आणि अत्यंत रानटी अवस्थेपासून कलानिर्मितीच्या गूढ संवेदनेनं मानव सर्वत्र एकसारखाच कसा पछाडलेला होता, याची कल्पना येते. मानवजातीच्या विभिन्न संस्कृतीचं सम्यक दर्शन घडविण्याच्या दृष्टीने अशी संग्रहालयं किती मोलाची आहेत, याची जाणीव होते, आणि अमुक एका देशातलीच कला श्रेष्ठ आहे, असा अहंकारही किती वृथा आहे, याचाही प्रत्यय येतो.

× × ×

इजिप्शियन विभागात हिंडत असताना क्लिओपात्रा राणीची शवपेटी आणि तिचा शीर्ष–पुतळा पाहिला. क्लिओपात्रा फार देखणी होती, असा सामान्यतः समज आहे. परंतु ह्या पुतळ्याचे पोपटासारख नाक, जराशी मोठी जिवणी पाहिली म्हणजे क्लिओपात्रा इतिहासकारांनी वर्णिल्याप्रमाणे " Ravishing Beauty " होती, असं वाटलं नाही.

क्लिओपात्राच्या मृत्यूनंतर जवळजवळ दीड हजार वर्षांनी रोमच्या उत्खननात हा पुतळा सापडला ... अन–तो क्लिओपात्रा राणीचा खरा व एकमेव पुतळा. इजिप्तची चित्रलिपी (Hieroglyphics) ज्या शिलापटामुळे प्रथम संशोधकांना उपलब्ध झाली–तो सुविख्यात ' रोझेटा ' शिलापट इथं दिसला. सीरियावर इजिप्तमार्गे आक्रमण करण्यास नेपोलियन निघाला असताना, वाटेत ' रोझेटा ' या गावी हा शिलापट नेपोलियनचा इंजिनीयर बोसार्ड याला सापडला. नेपोलियनने या इजिप्शियन लिपीचा छापा घेण्यासाठी मुद्दाम दोन लिथोग्राफर्स पॅरिसहून बोलावले आणि युरोपीय विद्वान संशोधकांकडे या शिलापटाचा अर्थ लावण्यासाठी त्याच्या प्रती रवाना करविल्या होत्या म्हणतात. नेपोलियनचा पराभव झाल्यावर हा मूळचा शिलापट ब्रिटिश म्यूझियममध्ये आणण्यात आला. ह्या शिलापटामुळे इजिशियन चित्रलिपीचा अर्थ

लागून इजिप्तच्या सर्व जुन्या लिखितांचीही भाषा कळली, त्यांच्या 'बुक ऑफ द डेड' या धर्म ग्रंथाचा अर्थ लागला आणि इजिप्तच्या हजारो वर्षांपूर्वीच्या इतिहासाची माहिती उपलब्ध झाली.

युरोपीय चित्रकलेवर प्रभावी रीतीनं परिणाम घडवून आणला त्या इजिप्शियन चित्रकलेचेही काही उत्कृष्ट नमुने इथं आहेत. जगातील सर्वांत लांब–१३३ फूट 'पापीरस' कागदही इथे आहे. या पापीरस चित्रकलेचं निरीक्षण करताना इजिप्तची कला किती पुढे गेली होती, याची कल्पना येते. एका चित्रात नेचेमेत राणीच्या 'हृदयाची तुला' दाखवली आहे. हृदय हे विविध भावना, विकार, इच्छांचे स्थान. मेल्यानंतर प्रत्येकाच्या हृदयाची तुला, सत्य आणि श्रेयस यांचं प्रतीक मानलेलं 'पांढरं पीस' याच्याबरोबर केली जाते, असा समज प्राचीन इजिप्शियन लोकांत होता. ही तुला म्हणजे माणसाच्या पापपुण्याचे मोजमाप! हृदय जसं हलकं वा भारी असेल, त्याप्रमाणात पापही हलकं अगर भारी. ह्या पापपुण्याच्या हिशेबांवर इजिप्शियन स्वर्गात–'ओसिरिस' देवाच्या राज्यात प्रवेश मिळणं न मिळणं अवलंबून. या चित्रात डाव्या बाजूस नेचेमेत राणी आपल्या 'हरहर्न' पुरोहित राजासमवेत उभी आहे .. उजव्या कोपऱ्यांत भगवान ओसिरिस सिंहासनावर बसला आहे आणि मध्ये एका तराजूत तिचं हृदय तोललं जात आहे. चित्रातील रचना कौशल्य, नाजुक संवेदनाक्षम रेषा, ताजे रंग, तपशिलातील कलाकुसर ह्या सर्व दृष्टीनं इजिप्शियन चित्रकलेचा तो एक उत्कृष्ट नमुना वाटतो. अर्थात चित्रांचं वर्णन शब्दांनी करतां येणं शक्य नसतं. ती प्रत्यक्षच पाहयला हवीत. हजारो वर्षांपूर्वी मानवाने प्राप्त केलेलं हे कलेतील प्राविण्य पाहून मन थक्क होतं. आणि आपल्या कलेच्या आजच्या प्रगतीबद्दल वाटणारा अहंकार किती व्यर्थ आहे, याची जाणीव होते. वास्तविक, इजिप्शियन संस्कृतीच्या आणखी किती तरी हजार वर्ष अगोदर, अत्यंत रानटी स्थितीतल्या आदिमानवाने रंगवलेल्या, स्पेनमधील 'अलतामारा' गुहेत काही वर्षांपूर्वी सापडलेल्या भित्तिचित्रांनी आजच्या कलावंताचा उरला सुरला अभिमान केव्हाच नष्ट केलेला आहे. ही चित्रं पाहिली म्हणजे 'प्रगती' 'विकास' आदि विशेषणं इतिहासाच्या कालखंडांना लावताना, त्यातून कलेचा प्रांत तरी वगळायला हवा, असं उत्कटतेनं वाटू लागतं. तशात आफ्रिकेतील विविध आदिवासी लोकांची कला, न्यूझीलंडमधील माओरी लोकांनी केलेले पुतळे,

अमेरिकेतील आदिवासी लोकांचे " टोटेम " खांब आणि त्यांतील उत्कृष्ट कोरीव आकृती हे सारं पाहिले म्हणजे हा विचार अधिक बळकट होतो.

× × ×

पौर्वात्य विभागात चीन आणि जपान या दोन देशांचे कला–विभाग फार मोठे आहेत. त्यातली ' सूंग ' ' मिंग ' राजवटीत निर्माण झालेली चिनी मातीची कला उत्कृष्ट आणि वेधक आहे; शिवाय रेशमी कपड्यांवरील चित्रकला, सोन्या चांदीच्या, मिनाबाच्या वस्तू यांचेही संग्रह विपुल आहेत. त्या मानाने आपला हिंदी विभाग फार लहान आहे. इंग्रजांनी आपल्यावर इतकी वर्षे राज्य केलं, तेव्हा त्यांची संग्रहालयं भारतीय वस्तूंनी भरलेली असतील, असं वाटलं होतं, म्हणून हा विभाग मी मोठ्या उत्सुकतेनं पाहिला ... पण आपल्या देशातल्या इतक्या थोड्या वस्तू या संग्रहालयांत असाव्या ही गोष्ट खटकली. मी माझे विचार बोलून दाखविले, तेव्हा हिंदी वस्तूंचा मोठा संग्रह " व्हिक्टोरिया आणि अलबर्ट " संग्रहालयांत असल्याचं मला सांगितलं. इथली बहुतेक चित्रें ' राजपुत ' आणि ' मोंगल ' शैलीचीच आहेत. ' रागमाला ' ही होत्या, शिवाय ' धर्मपुराण ' आणि ' भागवता ' च्या प्रती, रामायणाची बाल अयोध्या आणि युद्ध अशी तीन काण्डं, दशावताराचा एक चित्रपट आणि फार जुन्या, तुकडे पडायला आलेल्या ताडपत्राच्या पोथ्या.

× × ×

ब्रिटिश म्यूझियममधलं वाचनालय जगात सर्वश्रेष्ठ आणि अद्वितीय मानलं जातं. अमेरिकेतील ' कॉंग्रेसनल लायब्ररी ' अधिक प्रचंड आहे, असं म्हणतात. परंतु जुनी ऐतिहासिक पुस्तकं, हस्तलिखितं, पोथ्या याबाबतीत हे वाचनालय अधिक समृद्ध आणि अतुल आहे. थॅकरे आणि कार्ल मार्क्स यांनी इथे बसून अभ्यास केल्याचं सांगतात.

इथे नामवंत लेखकांच्या हस्ताक्षरांचाही संग्रह आढळला. यांत ब्रिटनचे बहुतेक सर्व लेखक आहेत. ' Alice in wonderland ' या लुई कॅरोलच्या पुस्तकाचं मूळ हस्तलिखित चित्रासह आढळलं. एलिझाबेथ ब्राऊनिंगची वळणदार अक्षरांतली ' पोर्तुगीज सॉनेटस ' होती. ब्राऊनिंगच्या ' The Ring and The Book ' मधलं एक पान उघडून ठेवलं होतं. वर्डस्वर्थ, कार्लाईल, रस्किन आदींची पत्रंही दिसली...त्याचप्रमाणे जेम्स जॉईसच्या ' युलीसिस '

मधली खाडाखोड केलेली पानं होती. हा संग्रह पाहिला की लहानसहान गोष्टींचंही चीज करणाऱ्या इंग्रजाबद्दल कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. त्यांची आस्था जितकी दांडगी तेवढीच दांडगी आमची अनास्था. आपल्या इकडचे लेखकच मुळी विस्मृतीच्या टोपलीत धूळ खात पडलेले राहतात. तिथे त्यांच्या हस्ताक्षरांचा संग्रह करणं इ. फार पुढच्या गोष्टी.

१९६२ सालापासून बकिंगहॅम राजवाड्याच्या एका दालनात एलिझाबेथ राणीचं एक छोटसं संग्रहालय उघडण्यात आलं आहे. 'राणीच्या अफाट विविध संग्रहातील निवडक प्रातिनिधिक वस्तूंचा' हा एक लहानसा संग्रह. वेगवेगळ्या वस्तू, जडजवाहिरं, दागिने, राजमुकुट नामांकित चित्रकारांनी काढलेली राजघराण्यातील व्यक्तींची चित्रं, लिओनार्डो अन् मायकेल एंजेलो यांची काही रेखाटणं इत्यादि वस्तू या प्रदर्शनात ठेवल्या आहेत. मायकेल एंजेलोची ही रेखाटणं. म्हणजे रोमच्या सिस्टिन देवळात त्याने रंगवलेलं "Last judgement" म्हणून जे जगप्रसिद्ध भित्तिचित्र आहे, त्यासाठी केलेली ही प्राथमिक रेखाटणं (studies) आहेत पण या प्रदर्शनात प्रेक्षकांची सर्वांत अधिक झुंबड जमते ती निग्रो स्त्रीच्या डोक्याच्या एका घड्याळाशी. घड्याळाची वेळा या निग्रो स्त्रीच्या डोळ्यांत दर्शविली जाते. डाव्या डोळ्यात रोमन लिपीत तासांचे काटे आणि उजव्या डोळ्यात अरबी लिपीत मिनिटांचे काटे बसविलेले आहेत. फ्रान्सची शिरच्छेद झालेली दुर्दैवी राणी मेरी अंताय नेत हिच्याजवळ असंच एक घड्याळ होतं. ते बहुधा हेच असावं असं तज्ज्ञ म्हणतात ... ... पण त्याचं हस्तांतर केव्हा व कसं झालं, हे मात्र कोडं आहे.

प्रदर्शनाच्या वरच्या मजल्यावर एका लांबलचक कपाटात राजघराण्यातील मुकुट, आंगठ्या, इतर जडजवाहिरं आणि किमती वस्तू मांडून ठेवल्या आहेत. यात चौथ्या जॉर्जने आपल्या अलेक्झांड्रिया राणीसाठी करवलेला हिरेमोती यांनी जडविलेला राजमुकुट आहे. तो त्यानंतर व्हिक्टोरिया राणी आणि आता एलिझाबेथ राणी वापरीत आहे. ब्रिटिश पोस्टाच्या तिकिटावर या राण्यांची चित्रं आहेत, ती या मुकुटातली.

या एवढ्या विविध संग्रहात इथेही आपल्या इकडची एकही मौल्यवान वस्तू दिसली नाही. होत्या त्या दोन हस्तिदंताचं काम केलेल्या लाकडी

' चिपडेल ' खुर्च्या अन त्याही तिसऱ्या जॉर्जनं आपल्या शार्लट राणीसाठी त्या काळचे मद्रासचे गव्हर्नर विंच यांच्याकडून विकत घेतलेल्या.

× × ×

इथली चित्रकला पाहायची म्हणजे ' टेट ' गॅलरी, ' रॉयल अकादमी' अन ' नॅशनल गॅलरी ' इथं जायला हवं.

पाश्चात्य चित्रकलेचा अभ्यास करताना ' टेट ' चा उल्लेख शंभरदा येतो. सर हेन्री टेट यांनी स्थापन केलेली ही गॅलरी लंडनच्या मिलबॅंक विभागात काहीशी एकीकडे होती. राखाडी दगडी रंगाची ही इमारत एका उंच पायथ्यावर एकटीच उभी आहे. आसपास मोठ्या इमारती नाहीत. समोर टेम्स नदी वाहते. तिला समांतर असा रस्ता मधून सरपटत जातो. दोनचार पोक्त झाडं आवारात आहेत.

या सुप्रसिद्ध गॅलरीत आत शिरताच ब्लेक, रेनॉल्डस किंवा टर्नर यापैकी एखाद्या जेष्ठ चित्रकाराचं चित्र आपलं स्वागत करील अशी कल्पना होती. परंतु प्रवेशद्वारासमोरच प्रथम दृष्टीस पडला तो नॅशचा भला थोरला आधुनिक चित्रफलक. यात नुसतेच रंगीबेरंगी चौकोन आहेत. तिथून मागे वळून पाहताच उजव्या कोपऱ्याला " झोन ऑफ लव्ह " हा नावाजलेला पुतळा...पुतळा नाहीच. स्त्रीचं मानेपासून मांड्यापावेतो नुसतं धड. त्याच्यामागे उजव्या गॅलरीत हेनरी मूरचा शिल्पसंग्रह आहे.

डाव्या हाताला पहिलीच खोली ब्लेकची. रंगरेषांच्या जगात मला नेहमीच हरवल्यारखं होतं. सत्य आणि आभास यांची एक विचित्र पाठशिवण असते. कलावंतांची चित्र पाहणं म्हणजे त्यांच्याशी भेट होण्यासारखंच मला वाटत. आठवणीची गर्दी मनात उसळते.

लहान लहान चौकटीतली ब्लेकची ती चित्रं. त्याच्या कवितेप्रमाणेच अज्ञात व गूढ वातावरण त्यांत आहे. ब्लेक जसा मोठा कवी तसाच मोठा चित्रकारही आहे हे पटतं. त्याची चित्रं सर्वस्वी कल्पनेतून जन्मली आहेत. त्याच्या 'ग्लॅडडे'वर माझी नजर खिळून राहिली. पृथ्वीगोलाला आपल्या दोन विशाल बाहूंच्या कवेत घेऊन त्यावर आपला उल्हास उधळणारी मानवी आकृतीतील ही प्रसन्न दिनदेवता होती.

लगतच्या खोलयांतून गेन्सबरो, कॉन्स्टेबल, टर्नर यांचे लँडस्केप्स निसर्गदृश्यं क्रमाने मांडलेले होते, त्यांतून इंग्लिश लँडस्केपच्या इतिहासाचं ओझरत दर्शन घडविण्याचा प्रयत्न होता तो! एकेका चित्रकाराची चित्रं डोळ्याखालून घालत जायचं म्हणजे त्याच्याबद्दलच्या आठवणींच्या गर्दीतून वाट काढत जायचं असं होतं. गेन्सबरो म्हणजे पहिला लँडस्केप पेंटर—निसर्गदृश्यं रंगवणारा पहिला चित्रकार...त्यामुळे त्यात घोडे गाड्या माणसं यांची गर्दी दिसते. कॉन्स्टेबलचा निर्मळ लँडस्केप अजून जन्मायचा होता. पण गेन्सबरो आपल्या रेखाटण कौशल्याबद्दल प्रसिद्ध आहे. लहानपणीच बागेत चोरी करण्यासाठी आलेल्या चोराचं चित्र हुबेहुब त्याने काढल होत अन गंमत अशी की त्या चित्राच्या मदतीने चोर पकडला गेला होता. एकदा शाळेत जायचा कंटाळा आला असतांना वडिलांच्या सहीची हुबेहुब नक्कल करून त्यानं रजेचा अर्ज शाळेत धाडला होता, अन् हेडमास्तर फसले होते. गेन्सबरोची चित्रं पाहिली की रेनॉल्डसची आठवण पाठोपाठ येते, दोघे समकालीन होते. लहानपणापासूनच रेखाटणाचे एवढे कौशल्य मिळवलेला गेन्सबरो बाथ शहरातून लंडनला नशीब कमाविण्यासाठीं आला अन रेनॉल्डसचा प्रतिस्पर्धी ठरला. वास्तविक रेनॉल्डस हा त्यावेळी नुकताच स्थापन झालेल्या रॉयल अकादमीचा पहिला अध्यक्ष होता. त्याला भरपूर मानमान्यता होती. परंतु गेन्सबरोच्या चित्राचं पहिलं प्रदर्शन भरलं आणि त्याबरोबर राजाकडून त्याला निमंत्रण आलं. डचेसेस आणि काऊंटेसेसची त्याच्या स्टुडिओत दाटी होऊ लागली. लोकात रेनॉल्डस—भक्त आणि गेन्सबरो—भक्त असे दोन तट पडले. रेनॉल्डसचा एकही लँडस्केप इथं नाही. कसा असणार? त्या पक्तीत बसण्याची त्याची इच्छाच नव्हती; कारण लँडस्केप हा तोपर्यंत मातब्बर कलावंताच्या चित्रणाचा विषय बनलेला नव्हता! तेव्हा रॉयल अकादमीच्या अध्यक्षानं तो विषय हाताळणं शक्यच नव्हतं. म्हणूनच आपल्या प्रतिस्पर्ध्याला रेनॉल्डस "ग्रेटेस्ट लँडस्केप पेंटर" म्हणून हिणवीत असे. पण गेन्सबरोची व्यक्तीचित्रं ही रेनॉल्डसच्या चित्रांशी बरोबरी करू शकतील अशी आहेत. शेक्सपियरच्या शोकांतिकातून नायिकेच्या भूमिका करणारी सुप्रसिद्ध नटी मिसेस सिडॉन्स हिचं पोर्ट्रेट या दोघांनीही काढलं आहे. परंतु गेन्सबरोच्या चित्रातील साम्य अधिक हुबेहुब आहे असं म्हणतात. मिसेस सिडान्सचा हा 'पोर्टेट' तिनं मरेपावेतो जवळ बाळगला होता. तो पाहयची इच्छा होती. पण तो 'टेट' मध्ये दिसला नाही.

कॉन्स्टेबल अन् टर्नर ही जोडीही समकालीन. परंतु या दोघांच्या जीवनांत विलक्षण तफावत. टर्नर हा कीर्तीच्या शिखरावर चढला. पण कॉन्स्टेबलला जन्मभर दारिद्र्य आणि हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. वास्तविक कलेच्या प्रांतात दोघेही तुल्यबल होते. कॉन्स्टेबलनं रंगविलेला इंग्लंडचा शांत, सौम्य निसर्ग अन त्याची ग्रामीण जीवनाची चित्रं आज पुष्कळांना टर्नरच्या तोडीची किंबहुना श्रेष्ठ वाटतात. व्यक्तिशः मला टर्नरची चित्रं अधिक आवडतात. निसर्गाचे चित्रकार म्हणून दोघांना सारखाच मान देण्यात येतो. पण तो कॉन्स्टेबलला मृत्युनंतर मिळाला. कॉन्स्टेबल आपल्या कलेबद्दल कटुतेनं म्हणत असे. " My art flaters nobody by imitation; it courts nobody by smoothness it tickles nobody by pettiness; how can I then hope to become popular ? "

कॉन्स्टेबलच्या हयातीत निसर्ग-चित्रांची महती लोकांना पुरेशी कळली नव्हती. परंतु निसर्गदृश्यांना चित्रकलेत एक स्वतंत्र स्थान मिळवून देण्याचं कार्य केलं ते टर्नरने. लंडनमधील एका न्हाव्याचा हा मुलगा. लहानपणी त्याची चित्रं त्याचा बाप आपल्या ' सलून ' मध्ये लावायचा. ती पाहून काही गिऱ्हाइकांनी टर्नरला चित्रशाळेत घालण्याचा सल्ला दिला. आणि चौदाव्या वर्षीच "रॉयल अकादमी"त टर्नरनं प्रवेश केला अन् पुढं त्याची चित्रं न्हाव्याच्या ' सलून ' ऐवजी आर्ट ' सलून ' मध्ये जाऊन बसली. टर्नरच्या निसर्ग-दृश्यांनी भरलेलं टेटमधील दालन पाहिल्यावर त्याच्या चित्रांनी तत्कालीन जनतेला वेड का लावलं, याची कल्पना आली. फ्रान्समध्ये अंकनवाद्यांची कला निर्माण होण्यापूर्वीच टर्नरनं इंद्रधनुष्यातील रंगांचे प्रयोग आपल्या चित्रांतून केले. त्याची संपूर्ण चित्रं म्हणजे नुसता रंगांचा खेळ. सृष्टिदेवतेची वेगवेगळी रूपं, वेगवेगळी लहर त्यानं चितारली. आकाशाचं सारं वैभव त्यानं आपल्या चित्रांतून आणलं. त्याचं एकेक चित्र म्हणजे जणु एकेक कविताच. ' सूर्योदय ', ' सूर्यास्त ', ' खवळलेला दर्या ', ' संधिकाल ', ' वारा, पाऊस अन् वादळ '. टर्नरनं चित्रकलेतून कथा सांगण्याऐवजी कविता सांगितली. म्हणूनच त्याच्या प्रत्येक चित्राला, " The terrible beauty in which he has clothed his poetic conception. " असं म्हणावसं वाटतं.

टर्नरची चित्रं म्हणजे कविता, तर व्हिसलरची चित्रं म्हणजे संगीत.

टर्नरनंतर व्हिसलरची चित्रं मला पाहयची होती. " Every picture must tell a story " ... ऐवजी " Every picture must sing a tune. " असं व्हिसलरनं लोकांना शिकविलं. " मेलेडी इन् लाइन " व " हार्मनी इन् कलर " हे त्याचं ध्येय होतं. व्हिसलर हा आंतरराष्ट्रीय कीर्ती पावलेला पहिला अमेरिकन चित्रकार, पण ती मिळविण्यासाठी त्याला तत्कालीन रूढ समजुती-विरुद्ध पुष्कळ झगडावं लागलं.

मला पाहयचं होतं, ते त्याचं " ओल्ड बॅटरसी ब्रिज " हे नावाजलेलं चित्र. गडद निळ्या व सोनेरी-नारिंगी रंगांतलं बॅटरसी पुलावरील एका रात्रीचं हे चित्र आहे...त्याला व्हिसलरनं मूळ नाव दिलं होतं, " Nocturne-Blue And Gold " ते सार्थ होतं. पहिल्यांदा त्यानं हे प्रदर्शनात मांडलं, त्यावेळी रस्किननं ह्या चित्राची " लोकांच्या तोंडावर रंगाचं भांडंच फेकून मारण्या-सारखं आहे ", असं म्हणून संभावना केली होती. व्हिसलरवर त्यानंतर अब्रु-नुकसानीचा खटलाही भरण्यात आला होता, अन् त्याबद्दल त्याला ' एक फार्दिंग ' चा दंड झाला होता! पण व्हिसलरच्या मृत्यूनंतर हे चित्र दोन हजार गिनीला विकत घेतलं गेलं!

× × ×

' टेट ' गॅलरीत विल्यम हंट, रोझेटी आणि मिलेस या तीन ' प्री-राफे-लाईट्स ' चीही चित्रं आहेत. या तिघांत मिलेसची चित्रं अधिक प्रभावी वाटली. त्याची ओढ्यात बुडून मेलेली ' हॅमूलेट ' मधील ' ऑफेलिया ', " द ऑर्डर ऑफ रिलीज " मधील अचानक तुरुंगातून सुटका झालेला स्कॉटिश बंडखोर, रोझेटीचं ' व्हर्जिन मेरीचं बालपण ', मातापित्याच्या घरात वावरणारा खिस्त, ह्या चित्रांचे छापील ठसे पुस्तकांतून पाहिले होते. आता तीच चित्रं जिवंतपणे साकार झाल्यासारखी भासत होती.

ब्लेक, टर्नर, व्हिसलर यांच्या गूढ काव्यात्मक ओळखीच्या जगातून आधुनिक चित्रकलेच्या मॉडर्न आर्टच्या अनोळखी, उद्दीपक जगात जायचं म्हणजे शांतपणे नदीच्या काठी बसून सूर्यास्ताचा देखावा पाहिल्यानंतर, एखाद्या गहन, निबिड अरण्यातून वाट काढीत जाण्यासारखं वाटलं...परंतु त्यातही धाडस आहे. गंमत आहे. मला तरी ही चित्रं पाहून भांबावल्यासारखं झालं नाही. बहुतेक

सारी ओळखीची होती. यातही एक आगळी वेधकता आहे. वेगळं सामर्थ्य आहे. आधुनिक चित्रकला टेटच्या तळमजल्यावर ठेवली आहे. जिन्याच्या दुतर्फा भिंतीवरून, लॅंडिंगवर, खांबावरून ही लावलेली आहेत. यात पिकासो, मातीस, ग्रिस, लेजर, कॅन्डिन्स्की या साऱ्यांची चित्रं दिसली.

आधुनिक चित्रकलेच्या जोडीला आधुनिक शिल्पाचा संग्रहही इथे आहे. रोडिनचा 'जॉन द बॅप्टिस्ट' इथं दिसला. तसंच एपस्टीनचा 'विजिटेशन' ही आहे. डॉब्सनची अर्धी मांडी घातलेली दणदणीत 'सुसाना' आहे. हेनरी मूरच्या संग्रहासाठी तर एक वेगळंच दालन राखण्यात आलं आहे.

× × ×

पण हेनरी मूरचं प्रचंड शिल्प पाहयचं असेल तर बॅटरसी पार्कला जायला हवं. पार्काच्या एका कोपऱ्याला कुंपण घालून, हिरवळीच्या उंचसखल भागातून मोठमोठ्या शिल्पाकृती कायमच्या मांडून ठेवल्या आहेत. बंद जागे-पेक्षा उघड्यावरच ह्या शिल्पाच्या प्रभावाची कल्पना अधिक येते. हेनरी मूरची दोन शिल्पं इथे होती. त्याचा नावाजलेला "Fımily Group" काहीसा एका बाजूस आहे. मोठाल्या तीन उभ्या स्त्रीपुरुषांच्या आकृतीचं मिळून हे शिल्प. हे प्रथम जेव्हा इथे मांडलं, तेव्हा टीकाकारांनी हेटाळलेले मूरचे हे "Ugly Monsters" पाहयला लोकांची गर्दी जमली. असल्या कुरूप आकृति उघड्यावर मांडून पार्कचं सौंदर्य बिघडवू नये म्हणून ओरड झाली, पण आता असलं शिल्प पाहयची लोकांना सवय झाली आहे. जी गोष्ट आधुनिक चित्रकलेची, तीच आधुनिक शिल्पाची, तेही लोकांना दुर्बोध वाटतं. जुन्या शैलीतील शिल्प जवळपास नामशेष झालं आहे. या प्रदर्शनातच एक जुन्या शैलीतला छोटासा पुतळा काहीसा एकीकडे ठेवला होता, पण तो इतर प्रचंड शिल्पापुढे मला दुबळा दिसला. हेनरी मूरच्या शिल्पापेक्षाही जास्त आधुनिक अशा आकृती इथं आहेत. त्यासाठी नानातऱ्हेच्या धातू, निरनिराळ्या प्रकारचे दगड, लाकडं, फळ्या, खिळे, विटा वाटेल ते वापरलंय्. अगदी मोटारचे मोडके तुकडेसुद्धा. एकीकडे जिऑफ्रे पार्कची "बॅटरसी ग्रूप' मधली नांगरासारखी तीन प्रचंड धुडं आडवी पडली आहेत. बार्बरा हेपवर्थचं 'मान्युमेंट,' रुबेन ब्रेकियनचे 'हॅक्यूबा' आणि अलेक्झांडर कॅल्डरचं 'ब्लॅक विडो' ही

लक्ष वेधून घेणारी आहेत. ही ' ब्लॅक विडो ' म्हणजे कुणी काळ्या वस्त्रातली विधवा स्त्री असावी, असं प्रथम आम्हाला वाटलं, पण ती एका कोळ्याची जात आहे, हे नंतर कळलं. बाराही महिने उघड्यावर, उन्हातान्हात ह्या आकृती इथं अशा पडून आहेत.

× × ×

उन्हाळ्यात चित्रकलेच्या जगातली सर्वांत मोठी घटना म्हणजे ' रॉयल अकादमी ' चं उन्हाळी प्रदर्शन. एक दिवस एकटीच वाट काढत काढत मी हे प्रदर्शन पाहून आले. तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत स्थापन झालेली ही अकादमी तेव्हापासून हे प्रदर्शन भरवीत आहे. यात खंड पडला तो फक्त दुसऱ्या महायुद्धात. चित्रकार रेनॉल्ड्स ह्या अकादमीचे पहिले अध्यक्ष. आज अकादमीचे हजारो सभासद आहेत, पण सभासद नसलेले चित्रकारही आपली चित्रं प्रदर्शनासाठी पाठवू शकतात, पण " या प्रदर्शनात आपल्या चित्रकारांना स्थान नाही. नेहमीप्रमाणे इथेही पार्शॅलिटी आहे. ", इ. अशी भाषा आपल्या चित्रकारांच्या तोंडून ऐकली—खरंखोट देव जाणे! तंत्र व कलाकुसर या दृष्टीनं ही चित्रं श्रेष्ठ होती...पण परंपरेचा पदर सोडून फारशी लांब गेलेली वाटली नाही. ॲन रेडपाथ यांची चित्रं आवडली अन् लक्षात राहिली. त्यात निसर्गाचं वातावरण पकडण्याचा प्रयत्न केला होता. लॅारी यांचंही ' ए कॅरेज' हे सुंदर चित्र नावाजलं होतं.

सर ह्यू कॅसन यांचं उदेपूरच्या राजवाड्याचं एक चित्र या प्रदर्शनात दिसलं. तेवढीच एक भारतीय गोष्ट इथं होती.

× × ×

या नंतरचा एक संपूर्ण रविवारचा दिवस मी नॅशनल गॅलरी पाहण्यात घालविला. रॉयल अकादमी ही ब्रिटिश कलेला जोपासणारी, तर नॅशनल गॅलरी ही युरोपीय कलेचा संग्रह करणारी. ट्रॅफलगर चौकात समोरच्या नेल्सन-स्तंभाशी स्पर्धा करीत, एका उंच पायथ्यावर हिची इमारत उभी आहे. मध्ययुगीन पहिले चित्रकार गितो व सिमॅब्यूपासून सेझन, व्हॅनगाऊपावेतो युरोपातील बहुतेक जेष्ठ व श्रेष्ठ चित्रकारांची चित्रं इथं आहेत. इथं एका जागी पाय ठरत नाही.

एका चित्राची पुरती ओळख होण्यापूर्वीच शेजारचं चित्र आपल्याला खुणावतं ..तीनचार तास मी ह्या गॅलरीत भटकत होते...पुन्हा पुन्हा तीच ती चित्रं पाहत होते. मध्ययुगीन चित्रकार ख्रिस्ताच्या आणि ख्रिस्ती-संतांच्या कथा सांगत होते...राफेल, लिओनार्डो आपल्या सुंदर, भव्य, आकृत्यांतून ग्रीक अन् रोमन देवदेवतांच्या जीवनातील नाट्य रंगवीत होते. रेंब्रांट, हॉलबीन, व्हॅनडाईक, रूबेन्स, ड्युरर, मेमलिंक, किती नावं घ्यावी ? गोया हा स्पॅनिश-जीवनाचा भाष्यकार. तिथल्या राजदरबारातलं, राजेरजवाड्यांचं, स्पॅनिश जीवनाच्या अंगोपांगांचं वर्णन त्यानं आपल्या चित्रातून केलं होतं. सारे एकापेक्षा एक वरचढ. ते सारे कलादेवतेच्या दरबारी रुजू झाले होते.

या जुन्या श्रेष्ठींच्या रंगांतून स्वतःला सोडवीत इंप्रेशनिस्टांच्या चित्राकडे वळले······ तेव्हा एकदम वेगळया जगांत गेल्यासारखं वाटलं·· इथेही कलेचा ध्यास घेतलेल्या साधकांची लांबलचक नामावली·· रेनॉर, मोनेट, मॅनेट, पिसारो, डेगा, स्युरात, ल्युत्रेक, रुसो·· हे सारे बंडखोर चित्रकार ' प्रतीकृतीच्या कल्पनेतून कलेची मुक्तता ' करण्यात गुंतले होते. रंगाचे नवे प्रयोग करीत होते, नव्या कक्षा शोधीत होते, एक नवी क्रांती घडवून आणीत होते. त्यासाठी प्रत्येकानं केलेल्या परिश्रमांना मोल नव्हतं. रंगपटाप्रमाणे रंगाचे नित्य नवे प्रयोग करण्यापायी फक्त दोनतीन तास झोप घेणारा अन ह्या कष्टापायी एकविसाव्या वर्षीच अकाली मृत्युला बळी पडलेला स्युराट, उपेक्षा अन शारीरिक व्यंगानी पीडलेला ल्युत्रेक, आपल्या चित्रांतून नृत्यातील चैतन्य अन गती दाखवण्याच्या प्रयत्नात वेडा झालेला डेगास...चित्रामागून चित्रं पाहत जावी. अन् प्रत्येकासाठी कलांवंतानं केलेली साधना आठवत जावी. तोच सेझान, गोगां आणि व्हॅनगाऊ आपल्या चित्रांकडे खेचून घेतात. अंकनवादी कलेच्या मर्यादा ओळखून आपापले नवे प्रयोग तिघांनी केले अन् तिघांच्या प्रयोगांतून तीन नवे संप्रदाय जन्माला आले. अर्धे आयुष्य गेल्यावर चित्रकलेच्या क्षेत्रात शिरून कलेला स्वच्छ, निरोगी बनविण्यासाठी युरोपच्या 'रोगट' किडलेल्या संस्कृतीपासून दूर अशा ताहिती बेटात गोगांने एकांतवास पत्करला. जन्मभर उपेक्षित राहिलेला सेझान निसर्गातील शाश्वत रुपाचा शोध घेत राहिला ... आणि शेवटी "Cubes, Cones and Cylinders" ह्या द्वारेच निसर्गाचे शाश्वत रूप चित्रित करता येतं अशा निर्णायाप्रत पोचला. व्हेनगाऊने

कलेपायी घेतलेल्या कष्टाला तर तोड नाही. निसर्गाचं बाह्य स्वरूप चित्रित करण्याऐवजी, चित्रांतून भावना व्यक्त करण्याची त्याची धडपड होती. गोगानं रंगविलेल्या ताहिती बेटातील निरागस, निरोगी स्त्रिया आणि स्वच्छ, शुद्ध रंग पाहून मन लुब्ध होत होतं. तुलू ल्युत्रेकच्या जमिनीवर पाय न ठरणाऱ्या नृत्यांगनांच्या नृत्यातील लय गवसत नव्हती. व्हॅनगाऊची सुप्रसिद्ध 'सूर्यफुलं' अन् "उदास सायप्रस वृक्ष" पाहिल्यावर तर तिथून पाय हलेना...दोन्हीही चित्रं लहानशीच होती: पण त्यामागची चित्रकाराची वेदना फार मोठी होती. ती डोळ्यासमोर उभी राहिली. आर्ल्समधील वास्तव्यात गोगाचं स्वागत करण्यासाठी व्हॅनगाऊनं स्वतः रंगवलेलं 'पीतगृह' ('Yellow House') आणि ते सजविण्यासाठी शुद्ध, गडद पिवळ्या रंगांतली ह्या सूर्यफुलांची मालिका. पण त्या फुलांचं कौतुक करायचं सोडून फटकळ आणि बोचरं बोलणाऱ्या गोगानं "ह्या फुलांत किंचाळणारा भडक पिवळा रंग तू वापरला आहेस" असं म्हणून त्यावर टीका केली होती. ह्याच पिवळ्या रंगाचं पुढे तज्ज्ञांनी कौतुक केलं. "चित्रकलेच्या इतिहासात असा पिवळा रंग मी कुठे पाहिला नाही. केवळ ही सूर्यफुलं जरी वांचली, तरी तीं व्हॅनगाऊला अमर करणारी आहेत," असं डॉ. गॅशेट म्हणाला होता व त्याचं हे भाकित पुढे खरं ठरलं होतं.

× × ×

व्हॅनगाऊची 'सूर्यफुलं' अमर झाली, तसेच त्याचे "उदास सायप्रस वृक्ष" ही. ही झाडं जमिनीत उगवली अन् त्याच जमिनीत खोल रुतलेली होती. परंतु त्यांचे शेंडे आकाशातील प्रकाशमय सूर्याकडे वळले होते. जणु ती त्याच्याकडे झेप टाकीत होती, असा भास होत होता. दुःख अन् व्याधींनी पीडित अशा आपल्याच आत्म्याची अमरत्वाकडे लागलेली ओढ व्हॅनगाऊला या चित्रांतून सूचित करावयाची होती असं वाटलं. व्हॅनगाऊची चित्रं पाहण्याची अनेक वर्षांची माझी इच्छा पुरी होत होती. अवघ्या पंचवीस-तीस वर्षांत कलेच्या जगात विलक्षण उलथापालथ घडवून आणणारे हे सारे चित्रकार आपआपल्या काळी उपेक्षित राहिले...दारिद्र्यानं गांजले, परंतु "कलादेवता" ही 'सद्यफलदायी'—लवकर प्रसन्न होणारी-देवता नाही. तिला दीर्घ तपस्या हवी

असते. ह्या अंकनवादी बंडखोरांची तशी तपस्या तिच्या मंदिरात रुजू झाली होती ... अन् आज ते सारे आपापला कोपरा घेऊन तिथे अभिमानानं बसले होते...त्यांच्या चित्रांतून इंद्रधनुष्यातील सर्व रंगांची उधळण होत होती...त्या सर्वांना मिळून "होळी" हे नाव देणं सार्थ ठरलं असतं ... असं त्यावेळी वाटलं. या 'होळी' तील रंगात मन रंगून गेलं असताना घड्याळात सहावर काटा सरकला अन् चौकीदारानं आम्हाला बाहेर काढलं.

× × ×

बाहेर आले तो सप्तरंगी इंद्रधनुष्याची कमान डोक्यावर दिसली. पावसाची सर नुकतीच येऊन गेली होती...अन् पुन्हा पिवळं-सोनेरी ऊन सर्वत्र उधळलं होतं. काही वेळ या उन्हात उभं राहून गॅलरीतील एकेक चित्र आठवणीत पुनःपुन्हा साठवून घ्यावंसं वाटत होतं...चित्रांचा सहवासही माणसाच्या सहवासाप्रमाणे परिणामकारी असतो तर !...त्या सहवासात घुटमळावंसं वाटत होतं. म्हणून गॅलरीची दारं बंद झाली, तरी तिथल्या दगडी ओट्यावर आम्ही बराच वेळ बसून आठवणी काढीत व समोरच्या गर्दीकडे पहात राहिलो.

× × ×

समोरचा ट्रॅफलगार स्क्वेअर माणसांनी फुलला होता. त्याच्या मधोमध उंच स्तंभावरचा योद्धा नेल्सन, त्याच्यासमोर तिसऱ्या जॉर्जचा अश्वारूढ पुतळा. डावीकडे 'सेंट मार्टिन इन् द फील्ड' चं भव्य देवालय...उजवीकडे "ॲडमिरॅलिटी आर्च" ... तिच्या एका हाताचा रस्ता पार्लमेंटकडे जाणारा, दुसरा राजवाड्याकडे. कला, धर्म, पराक्रम, राजसंस्था आणि लोकसंस्था...या साऱ्यांचा संगम ह्या चौकात झाल्यासारखा मला वाटला...जणु हे ह्या शहराचं मर्मस्थान होतं.

नेल्सन स्तंभाखालची दोन कारंजी थुईथुई नाचत होती...शेकडो पांढरीकाळी कबुतरं दोन्ही पुतळ्यांच्या अंगाखांद्यावर खेळत होती व लोकांनी खाली टाकलेले दाणे टिपत होती. पलिकडे असलेल्या स्ट्रँड अन् चेरिंग क्रॉस भुयारी स्टेशनावरून लोकांचे थवेच्याथवे बाहेर पडत होते अन् समोरच्या प्रचंड गर्दीत मिसळत होते.


× × ×

# ८

"A work of Art cannot be an Experiment, and it must be unique. It is an act of humility but the artist feels proud when it is appreciated."

भारतीय चित्रकार F. N. SOUZA ह्यांच्या प्रदर्शनपत्रिकेतले हे शब्द. सूझा यांच्या रेखाटणांचं ( Drawings ) एक प्रदर्शन लंडनमध्ये एक ऑगस्टपासून ऑक्टोबरपावेतो भरलं होतं. सूझा हे सध्या यशाच्या शिखरावर आहेत. 'होतकरू', 'नवोदित' इ. कलावंताच्या जीवनातील आवश्यक पायऱ्या केव्हाच ओलांडून, ते पलीकडे गेले आहेत. स्वतःच्या कलेबद्दलचा त्यांचा आत्मविश्वास दांडगा आहे. त्यामुळे नवोदिताच्या नशिबी असलेली धडपड आता त्यांच्या वाट्याला नाही. लंडनमध्ये येण्यापूर्वी पॅरिसमध्ये त्यांनी अगोदरच नाव कमाविलं होतं. लंडनमध्ये आल्यावर प्रसिद्धी त्यांच्या पाठोपाठ आली. उद्घाटनाच्या दिवशी माळी माझी त्यांची मुलाखत करून देणार होते...परंतु नेमका आदल्याच दिवशी अरुणला अपघात झाला, त्यामुळं सगळा बेत फिसकटला.

उद्घाटनाच्या आदल्या दिवशी 'प्रेस शो' अन् 'कॉकटेल पार्टी' होती. आजच्या जगातील प्रसिद्धी तंत्राचा तो एक आवश्यक भाग, पण हे कळूनही हे तंत्र सगळ्यांनाच साधतं, अगर शक्य होतं, असंही नाही. पुष्कळदा गुणी कलावंतही याच्याअभावी मागे पडतो. कलेचा इतिहास हा कलावंतांच्या उपासमारीचा, उपेक्षेचा अन् कित्येकदा मरणोत्तर कीर्तीचा इतिहास. कलेचं वाण हे अखंड विवंचनेचं वाण...लंडन हे कलेचं आगर असलं आणि सुबत्ता आणि संपन्नता या देशाच्या ओसरीवर नांदत असली, तरी कलावंताच्या मागची उपमासार व खोलीच्या भाड्याची विवंचना, ह्या गोष्टी इथंही चुकलेल्या नाहीत.



**"नॅशनल आर्ट गॅलरी", लंडन.**

मोठमोठ्या आर्ट गॅलरीज अन म्यूझियम्समध्ये ज्यांची कला आज विराजमान झालेली आहे किंवा वारंवार भरणाऱ्या मान्यवर प्रदर्शनातून ज्यांचा प्रवेश झाला आहे, अशा कलावंतांना वगळलं, तरी ह्या दोहोंपासून वंचित आणि विवंचित अशा कलाकारांचा वर्गही इथं थोडाथोडका नाही. विशेषतः आधुनिक चित्रकलेच्या प्रांतातील गोंधळ व अराजक, नित्य नव्या शैली आणि त्यांच्याबरोबर बदलणाऱ्या अभिरुची, अभिजात आणि हिणकस कलांची झालेली भेसळ आणि कला--परीक्षक या प्राण्याची वाढती लुडबुड, ह्या साऱ्या अडचणींतून इथल्या कलावंतांना वाट काढावी लागते.

लंडनच्या फुटपाथवरुन मांडलेले किंवा इतर अनेक जत्रा अगर प्रदर्श-

नांच्या एखाद्या कोपऱ्यातून थाटलेले चित्रकलेचे संसार पाहिले, म्हणजे इकडच्या नवोदित कलावंतांची केविलवाणी धडपड लक्षात येते.

× × ×

लंडनमध्ये सूझासारखे काही नावाजलेले भारतीय चित्रकार प्रदर्शन गाजवून जातात... तर काही इथं नशीब काढण्याच्या धाडसानं येऊन राहिलेले आहेत. कलेवर शंभरटक्के उपजीविका करणं हे इथही अजून एक भाबडं स्वप्न आहे. त्यामुळे बहुतेकजण चित्रकलेशी संबंधित अशा शाखांतून काम करतात... अन् उरलेल्या वेळात आपल्या कलेची साधना करतात.

लंडनच्या मुक्कामात, गजानन भागवत, ( मौजेच्या भागवतांचा पुतण्या ) यशवंत माळी अन् सुमेधा शिरगावकर (नागपूरच्या कुसुम धवसे) अशा तीन चित्रकारांची गाठ पडली. त्यांच्या घरचा पाहुणचार घेतला, त्यांची चित्रं पाहिली. शिरगावकर ह्या जी. डी. आर्टनंतर पोर्ट्रेटचं खास शिक्षण हॅमरास्मिथ आर्ट-स्कूलमध्ये घेत आहेत. माळी हेही जे. जे. स्कूलचे माझ्या वेळचे विद्यार्थी. भागवत हेही जे. जे. विद्यार्थी व प्राध्यापक. इटालीत उच्च शिक्षणाची शिष्यवृत्ती मिळवून ते काही दिवस रोममध्ये राहिले होते. रोममध्ये त्यांच्या चित्रांचं एक प्रदर्शन ६२ साली भरलं होतं ... लौकरच लंडनमध्येही माळींच्याबरोबर प्रदर्शन भरविण्याच्या तयारीला ते लागले होते. रोमप्रमाणेच इथलं प्रदर्शनही यशस्वी करण्याची त्यांची ईर्षा होती.

लंडनमधील भारतीय चित्रकारांच्या कलेबद्दल बोलताना एका इंग्रज कलातज्ञाने मजजवळ उद्गार काढले ते मननीय आहेत.

"भारतीय कलेची परंपरा फार पुरातन आहे, असं आम्ही वाचतो. परंतु तुमच्या चित्रकारांची जेवढी प्रदर्शने मी पाहिली, त्यात मला तुमचं देशी वैशिष्ट्य असं काही दिसलं नाही. पाश्चात्य चित्रकलेची ती नुसती नक्कल वाटते... अन् तीही प्रामाणिक नक्कल नव्हे !"

× × ×

पाकिस्तानचे निर्माते जिना आणि गांधीजी हे भारतीय राजकारणात एकत्र नांदले नाहीत. परंतु मॅडम टुसोच्या कलाविश्वात मात्र याची दखल

घेतलेली दिसत नाही आणि त्यांच्या प्रतिमांना कायमचे एकमेकांच्या शेजारी उभे करून ठेवण्यात आले आहे. मॅडम टुसो ( Madame Tussaud जिला आपण तुसादबाई म्हणतो ! ) तिचं हे जगातील ऐतिहासिक व आधुनिक काळातल्या नावाजलेल्या व्यक्तींच्या मेणाच्या पुतळ्यांचे प्रदर्शन.

अगदी थोडा वेळ लंडनमध्ये वास्तव्य असेल तर त्या थोड्या वेळात काय काय, कसं कसं बघावं, याची एक यादी 'लंडन गाईड' मध्ये दिलेली आहे. त्यात या प्रदर्शनाचा समावेश केलेला आहे. सध्या जुलै-सप्टेंबर हा उन्हाळ्याच्या सुट्यांचा मोसम असल्यामुळे परदेशी यात्रेकरूंची दररोज अक्षरशः झुंबड असते. या प्रदर्शनात शिरलं, की ही गर्दी एकदम दुप्पट वाढल्याचा डोळ्यांना भास होतो. पण मागाहून लक्षात येतं की त्यातले अर्धे अधिक पुतळे आहेत. या प्रदर्शनाच वैशिष्ट्य असं की, हे पुतळे अत्यंत हुबेहूब व जिवंत वाटतात, व प्रत्येकावर त्याचा नेहमीचा पोषाख असल्यामुळे जणू काय चालती बोलती जिवंत माणसंच वावरताहेत असा भास होतो. त्यामुळे पुष्कळदा गमतीदार घोटाळे होतात. मलाच याचा अनुभव आला.

मी प्रदर्शन पाहयला गेले त्यावेळी आत शिरल्याबरोबर हॉलच्या दारात एक बॉबी गणवेश घालून जिन्याजवळ उभा असलेला दिसला. प्रदर्शन पाहून झाल्यावर परतले, तरी तो तिथंच उभा होता. माझी पुढची वाट विचारण्यासाठी मी त्याला प्रश्न करणार तोच लक्षांत आलं, की तो प्रदर्शनातला पुतळा आहे ! शेवटी विसरलेली वाट स्वतःच शोधावी म्हणून लंडनचा नकाशा नाकासमोर धरून एका कोपऱ्यात जाऊन मी स्वस्थ बसले. थोड्या वेळानं कॉलेजची दोन मुलं समोर येऊन उभी राहिली. पाठोपाठ एक जोडपं आलं, मला समजेनां. मी मान वर केली, तेव्हा ती सारी मंडळी दचकली अन् ओशाळून हसत म्हणाली "माफ करा हं ! आम्हाला वाटलं की तुम्ही प्रदर्शनातलाच एक पुतळा आहात."

या प्रदर्शनात इंग्लंडचा पहिला प्रमुख राजा ' विलीयम द कॉंकरर ' याच्यापासून दुसऱ्या एलिझाबेथ राणीपावेतो इंग्रज राजे, अब्राहम लिंकनपासून केनेडीपावेतो सर्व अमेरिकन अध्यक्ष, ब्रिटनचे सारे प्रमुख पंतप्रधान, संशोधक आणि लेखक आढळतात तर दुसरीकडे बर्नार्ड शॉ आपल्या समकालीन साहित्यिकांच्या समवेत चर्चा करताना दिसतो. कुठे आठवा हेनरी आपल्या

शिरच्छेद केलेल्या सहा पत्नीसह मगरूरपणे उभा असलेला दिसतो तर दुसरीकडे आफ्रिका आशिया खंडातील आजच्या स्वतंत्र राष्ट्राचे नेते एकमेकांच्या खांद्याला खांदा घाशीत उभे असलेले आढळतात. सिलोनच्या सीरीमावो खुर्चीवर बसलेल्या नेहरूंच्या पाठीशी उभ्या आहेत. प्रदर्शनात सर्वात बिघडलेला पुतळा जर कुणाचा असेल तर तो नेहरूंचा !

गांधीजी आणि नेहरू यांच्या प्रतिमा इतक्या बिघडलेल्या व हिडीस आहेत, की त्याबद्दल अनेक प्रवासी भारतीयाना व भारतीय वकिलातीलाही त्याबद्दल तक्रार करावी लागली होती, असं म्हणतात. या ठिकाणी दाटीवाटीनं मांडून उभे केलेले पुतळे गल्ला भरून ठेवण्याच्या दृष्टीने ते ठेवले गेले आहेत असं वाटत. जगभर नावाजलेल्या या प्रदर्शनातील कलावस्तू उत्कृष्ट हुबेहूब प्रतिकृती आहेत एवढंच या प्रदर्शनाच वैशिष्ट्य. परंतु अभिजात कलाकृतींच्या दर्जाला त्या पोचत नाहीत असं मला तरी वाटलं. नाहीतर 'फोटोग्राफला' पोर्ट्रेट म्हटल्यागत ते होईल.

प्रदर्शनाच्या तळघरात 'चेंबर ऑफ हॉरर्स' आहे. त्यात ब्रिटनच्या नावाजलेल्या खुनी व मारेकऱ्यांच्या प्रतिमा आहेत. त्या पाहताना अंगावर अक्षरशः काटा उभा राहतो. इथे फ्रान्सचा राजा सोळावा लुई आणि त्याची राणी मेरी अंतायनेत यांची क्रांतिकारकांनी कापलेली डोकी आहेत. त्याबरोबर अनेक सुप्रसिद्ध खुनांचे प्रसंग ( Tableau ) मुंडकी छाटलेल्या पुतळ्यांच्या साह्याने जिवंत उभे करण्यात आलेले आहेत. तळघरात शिरतानाच दाराशी तुरुंगातल्या कोठडीत एक खुनी तुमच्याकडे मारेकऱ्याच्या नजरेनं पाहताना दिसतो. तळघरातल्या खुनी व मारेकऱ्याच्या सहवासात जीव गुदमरून तुम्ही वर जिना चढून श्वास टाकू लागता, तोच समोर हिटलर व स्टॅलिन तुमच्यावर तुटुन पडताना दिसतात. मॅडम टुसोच्या हुबेहूब प्रतिमातंत्राचा प्रभाव जाणवतो तो असा.

× × ×

मॅडम टुसोच्या निर्जीव पुतळ्यांच्या सजीव जगातून मी लागून असलेला प्लॅनेटेरियममध्ये शिरले. तेव्हा दुसऱ्या एका अगदी भिन्न व आधुनिक परंतु निर्जीव-सजीव जगात शिरल्यासारखं मला वाटलं. हे जग ग्रह, नक्षत्र, तारे यांचं

आहे. ही सारी मंडळी कृत्रिम तऱ्हेनं निर्माण केली होती. प्रचंड गोलघुमट असलेल्या ह्या वर्तुळाकृती इमारतीत वरच्या मजल्यावर घुमटाखाली एक गोल ऑडिटोरियम आहे. याच्या वर्तुळाकार भिंतीच्या सर्व बाजूंनी चिमुकल्या इमारती, झाडंझुडपं, बुरूज व किल्ले यांची मेहराप आहे. मी आत खुर्चीवर जाऊन बसताच, क्षणार्धात छायाप्रकाशाच्या साहाय्यानं वरचा घुमट आकाशात रूपांतरित झाला. व मेहराप क्षितिजासारखी दिसू लागली. वर सर्व राशी व तारे आणि ग्रह दिसू लागले आणि क्षणभरानंतरच मी बाहेरच्या गजबजलेल्या लंडनच्या एका अत्याधुनिक इमारतीत नसून, आकाशाखाली तारे मोजीत बसले आहे, असं वाटू लागलं.

विलायतेत मला मायदेशातल्या कुठल्या एका गोष्टीचं सर्वात अधिक स्मरण होत असेल, तर ते आपल्या निरभ्र आकाशाचं. कृष्णपक्षातल्या सुंदर रात्रीच्या आकाशाचं आणि लखलखणाऱ्या ताऱ्यांचं वैभव गेल्या तीन महिन्यांत माझ्या डोळ्यांना दिसलंच नव्हतं. ते या कृत्रिम तऱ्हेनं निर्माण केलेल्या आकाशात दिसलं आणि तेही नकळत. ते पाहून —

" का जातिस दुसऱ्यांच्या दारी ।
नवलाख दिवे हे तुझ्या घरी ॥ "

ह्या घाटांच्या कवितेच्या ओळी माझ्या मनात गुणगुणल्या.

मी भानावर आले, ती भाष्यकाराच्या ध्वनिक्षेपकावरील आवाजाने. तो ज्योतिर्विद ज्योतिषशास्त्राची व खगोलशास्त्राची माहिती सोप्या भाषेत देत होता. दिवसभरात या विषयावर कृत्रिम आकाशाच्या साह्याने अशी पाच सहा व्याख्याने होतात. मी गेले त्या दिवशीच्या व्याख्यानाचा विषय 'चंद्र' हा होता — सूर्यमालेतील ह्या प्रीतिदेवतेचे ( Goddess of Love ) स्थान, तिचं इतर ग्रहांशी असलेलं नातं, तिच्या पृथ्वीप्रदक्षिणा व ग्रहणे आणि " चंद्रावर स्वारी " करण्यासाठी रशिया व अमेरिका यांनी केलेलं शास्त्रीय संशोधन, यांची अद्ययावत माहिती प्रात्यक्षिकांसह त्याच्या व्याख्यानात ऐकायला मिळाली.

× × ×

# ९

इंग्रज लोकांच्या सहवासात वावरताना, त्यांच्याबरोबर काम करताना, एक प्रश्न सतत मनात उभा राहयचा "या देशाचं सामर्थ्य कशात आहे ?"

एके काळी ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता. जगाच्या नकाशात टीचभर लांबी-रुंदीचा, चिमूटभर लोकांचा, मुख्य भूखंडापासून विलग असलेला हा देश, एके काळी अर्ध्या जगावर राज्य करू शकला. विशेष म्हणजे ब्रिटिश साम्राज्याचा हा अफाट पसारा अलेक्झांडर, सीझर, दारियस किंवा नेपोलियन यांच्यासारखे पराक्रमी जगज्जेते ब्रिटनजवळ नसतानाही झाला.

तो कसा ? हा विभिन्न जागतिक ऐतिहासिक घटनांचा परिपाक व त्यांचं एक तार्किक निष्पन्न ? की अगम्य काळाची नुसती लहर ? की ब्रिटिश लोकांच्या राजकीय चाणाक्षपणाची, चातुर्याची, कर्तबगारीची एक साक्ष ?

हे एक ऐतिहासिक प्रश्नचिन्ह आहे अन् विलायतेत वावरतांना आपलं मन नकळत या प्रश्नाचा मागोवा घेत राहतं.

"कालाय तस्मै नमः" म्हणून कालमहिम्याच्या दृष्टिकोनातून, कुठल्याही घटनेची कार्यकारण परंपरा शोधणं संभवत नाही. ते व्यर्थ ठरतं. परंतु ऐतिहासिक घटनांच्या मागे कार्यकारण परंपरा असल्याचं मान्य केलं, तर या प्रश्नाचा शोध घेणं भाग पडतं. व्यक्तिशः माझ्या मनाचा कौल तिसऱ्या उत्तराकडे अधिक झुकतो.

इंग्रज लोकांच्या सहवासात वावरताना, त्यांच्या बरोबर काम करताना, त्यांची कार्यपद्धती न्याहाळल्यावर आणि त्यांच्या स्वभावाचा परिचय झाल्यानंतर कुठल्याही संकटातून व अडचणीतून वाट काढण्याची, विशिष्ट घटनांचा कौशल्यानं उपयोग करून घेण्याची, इंग्रजांच्या चातुर्याची अन् कर्तबगारीची साक्ष पटावी, असं मला वाटतं.

× × ×

आमचा एक इंग्रज मित्र फिलीप एकदा म्हणाला :

" आमच्या लहानपणी शाळेत इतिहास-भूगोल शिकवताना नकाशातलं एक छोटसं टिंब दाखवून मास्तर अभिमानानं सांगत: हे टिंब म्हणजे आपला चिमुकला देश!' अन् मग नकाशावर चारी बाजूना पेन्सिल फिरवून इतःस्ततः पसरलेले तांबडे भाग दाखवून म्हणत, 'अन् हे एवढं अफाट ... आपलं साम्राज्य ... हे आपलं आहे. आपण मिळवलेलं.' ते ऐकून आमच्या साम्राज्या-बद्दल कुतूहल वाटे, पण त्याबरोबरच आपण इतर देशांतल्या लोकांपेक्षा कुणीतरी फार आगळे अन् कर्तबगार आहोत, असं वाटायचं. कारण आम्ही एवढेसे मूठभर लोक अन् एवढ्या मोठ्या भागावर राज्य करतो तरी कसं? केवढी असामान्य गोष्ट? असा प्रश्न आम्हाला पडायचा ..."

आज या इंग्रजी साम्राज्याचा डोलारा कोसळून पडला आहे. जगाच्या नकाशावरील त्याच्या ह्या तांबड्या विस्तारसीमा एकामागून एक पुसल्या जात आहेत आणि एके काळचं हे सत्तेच्या शिखरावर असलेलं प्रथम दर्जाचं राष्ट्र आज तिय्यम, चतुर्थ दर्जाचं होऊन बसलं आहे. काळाची पावलं कुठल्या दिशेनं पडत आहेत, हे इंग्रज माणसानं ओळखलं आहे. परंतु इंग्रजांच्या आगळेपणाची अन् काही असामान्य गुणांची, सामर्थ्याची जाणीव आजही झाल्याशिवाय राहत नाही.

× × ×

इंग्रजांचं हे सामर्थ्य त्याच्या साम्राज्यात नाही. ते त्यांच्या मनात आहे. त्याचं मन हा एक बालेकिल्लाच आहे-- अनेक दृष्टींनी संकटातून नवी वाट काढून, पराभवातून नवं सामर्थ्य निर्माण करण्याची त्याची प्रवृत्ती आहे. " Not Failure but low aim is crime " असं त्यांचा जगद्विख्यात नाटककार बोलला आहे. पराभवात कमीपणा नाही. पराभवातून तो चटकन् सावरतो. केवळ गतवैभवाचे गोडवे गात बसण्याचा त्याचा स्वभाव नाही. वर्तमान त्याला अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणून अतीतात घट्ट पाय रोवून, वर्तमानाला आपल्या कवेत घेण्याचा तो प्रयत्न करतो...त्याला नवं रुप, नवी कलाटणी देतो हें जाणवत. दुसऱ्या महायुद्धानंतर उद्ध्वस्त झालेलं आर्थिक व सामाजिक जीवन, विस्कटलेलं गृहजीवन, क्रमाक्रमानं ढासळत गेलेल्या साम्राज्यानं निर्माण केलेल्या अनेक राजकीय व आर्थिक समस्या, नवे करभार, अशा किती-

तरी बिकट समस्या गेल्या काही वर्षांत इंग्रज माणसाला सोडवाव्या लागल्या, पण तिन वर्षांपूर्वीच त्याचा सत्तारुढ कॉन्झर्वेटिव्ह पक्ष "We had never had it so good!" असं घोषवाक्य आत्मविश्वासानं जाहीर करू शकला. युद्धपूर्व ब्रिटन व युद्धोत्तर ब्रिटन यात आज जमीन-अस्मानाचं अंतर दिसतं.

× × ×

इंग्रजांची झगडण्याची, दुर्दम्यवृत्ती पाहिली की, इंग्रजांचा "राजा ऑल्फ्रेड आणि कोळी" याची गोष्ट मला वारंवार आठवायची. उंच जागी एकदा जाळं बांधून खाली कोसळल्यानंतर पुन्हा जाळ्याकडे पोचण्याची धडपड करताना, वीसदा खाली पडूनही, एकविसाव्या वेळी वर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोळ्यापासून कैदी आलफ्रेड राजानं प्रयत्नशीलतेचा धडा घेतला. या गोष्टीत इंग्रज माणसाच्या प्रयत्नशील, चिवट स्वभावाचं प्रतिबिंब पडलेलं दिसतं, असं मला वाटायचं.

इंग्रजांच्या अनेक संस्था पाहिल्या आणि त्यासंबंधी विचार करू लागलं, की हा विचार प्रबळ होतो. जुन्या गोष्टीवर नवं बांधण्याचं, जुन्यातलं चांगलं राखून त्याला नवं रूप, नवी कलाटणी देण्याचं त्याचं कसब दृष्टोपत्तीस येतं. आज साम्राज्य गेलं. परंतु राष्ट्रकुटुंबाच्या रूपानं ते अस्तित्वात आहे. मोठमोठी साम्राज्य बहुतेक युरोपीय राष्ट्रांना होती, पण राष्ट्रकुटुंबाचा प्रयोग फक्त एकट्या इंग्लंडनंच केला. एकेकाळचं जेतं राष्ट्र, जुन्या जित पण आज स्वतंत्र बनलेल्या राष्ट्रांची जननी बनून आहे. ते खऱ्या अर्थानं आहे. लंडनच्या रस्त्यावरून काळ्या, पिवळ्या, निमगोऱ्या, सावळया लोकांची गर्दी पाहिली की ते समजतं. अगदी दोन फर्लांग अंतर चालून गेलात तरी एखादा भिन्नवर्णीय माणूस दिसल्याशिवाय राहात नाही.

× × ×

नव्या जुन्याचा विचित्र पण आकर्षक संगम इथे आढळतो. नवं रूप देताना, जुनं राखण्याची, जुन्या परंपरा टिकविण्याची त्याची प्रकृती भारतीयांप्रमाणेच आहे. इंग्रजी राज-संस्थेचंच उदाहरण घ्या. आजची राणी ही इंग्लंडचा पहिला एगबर्ट राजा याची वंशज. ही परंपरा खंडित झालेली नाही. दीर्घ परंपराप्रियतेची ही एक साक्ष. आज जगातील बहुतेक राष्ट्रांतून राजसंस्था

अखेरचा ‘ रामराम ’ म्हणत आहेत. परंतु अत्यंत ज्वलंत असं व्यक्तिस्वातंत्र्य टिकवून, अत्यंत कणखर अशी लोकशाही निर्माण करूनही आपली राजशाही इंग्रजांला आजही पूर्वीइतकीच प्रिय व आदरणीय आहे. पूर्वी कधी ती हादरली नव्हती, असं नव्हे. क्रॉमवेलच्या गणतंत्राचा प्रयोग इंग्रजांनीही करून पाहिला. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी सारं युरोप हादरलं, भारावलं. इंग्रज माणूसही याला अपवाद नव्हता. इंग्रज कवीबरोबरच —

“ Bliss was in that down to be alive-
Te be young was very heaven ! ”

अशा मनोवृत्तीत सामान्य जनताही होती परंतु बर्कच्या परखड वक्तृत्वानं आणि त्याच्या “ Reflections on the French Revoution ” ह्या पुस्तकाने राजशाहीचं इंग्रजी घटनेतलं स्थान लोकांना पटवून दिलं व राज संस्था उचलून धरली ती आजतागाईत. आज इतर देशांतील राष्ट्रगीतांतून ‘ माय भूमी ’ ला किंवा ‘ पितृभूमी ’ ला मानवंदना असते, परंतु इंग्रज माणूस आपल्या राष्ट्रगीतात आपल्या राज-संस्थेला अभिवादन करतो व ती ‘ शाश्वत राहो ’ असं तेवढ्याच भक्तिभावानं गातो. जुनी राजशाही व नवी लोकशाही हातात हात घालून ह्या देशातच वावरू शकतात.

× × ×

हे नवं जुनं हातात हात घालून चालताना प्रत्येक ठिकाणी दिसतं. ऑक्सफर्ड व केंब्रिज या दोन शिक्षण संस्थांतूनही ते दिसतं. ही विद्यापीठं इथल्या ज्ञानाची, विद्येची गंगोत्री. यांची परंपरा अकराव्या बाराव्या शतकापासूनची आहे. इथल्या कॉलेजांना जोडून त्यांच्या आवारातच त्यांची प्रार्थना मंदिर दिसतात आणि त्यांच्या शेजारी आधुनिक प्रयोगशाळा टिनिटी कॉलेजातल्या चॅपलमधे क्रूसाच्या समोर वैज्ञानिक न्यूटनचा पुतळा डौलानं उभा असलेला दिसेल. म्हणजे अनादि ईश भक्तीबरोबर अद्ययावत विज्ञान भक्तीही जोडीनं वावरते.


× × ×

इंग्लंडचं वैशिष्ट्य त्याच्या पुरातन परंपरात आहे. या वैशिष्ट्याचं त्यानं ठिकठिकाणी जतन करून ठेवलेलं आढळतं. बकिंगहम राजवाड्याच्या जुनाट काळवंडलेल्या भिंती पाहून माझ्या वाटाड्याला मी विचारलं होतं;

" ह्या मळकट भिंती तुम्ही खरवडून लख्ख का करीत नाही ! "

त्यावर तो म्हणाला;

" देन, इट विल सीज टुबी बकिंगहॅम पॅलेस ! " त्याचं हे जुनाट रूप त्याच्या दीर्घ परंपरेची निशाणी आहे, असं त्याला वाटलं. एका सामान्य इंग्रज माणसाचे हे बोल, इंग्रजाची परंपराप्रियताच दर्शवीत होते. प्रचंड, अगडबंब, आपल्या आधुनिकतेनं भांबावून टाकणाऱ्या अमेरिकेसारख्या गगनचुंबी इमारती इथे नाहीत. फ्रान्समधल्या " नोत्रदाम " प्रमाणे प्रचंड किंवा रोममधल्या " सेंट पीटर " " सेंट मेरी मेजर " किंवा सेंट मार्टिन लॅटरन्स " सारखी दिपवणारी देवळं इथे नसतीलही. परंतु इंग्लंडमधलं " वेस्टमिन्टर ॲबे, " " सेंटपॉल " चं देऊळ किंवा लंडनपासून वीस मैल अंतरावर असलेलं " सेंट ॲलबन्स प्रार्थना मंदिर " किंवा बर्मिंगहमजवळचं " कॉव्हेंट्री कॅथिड्रल " हे



'सेंट पॉल'चे एक दृश्य

अर्धं जुनं व अर्धं नवं असं देऊळ, ही सारी भव्य आहेत; वास्तुशिल्पाच्या दृष्टीनं विलोभनीय, वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इंग्लंडमधील अत्याधुनिक व सर्वांत

मोठ्या इमारती म्हणजे बी. बी. सी. चं 'टेलिव्हिजन सेंटर' आणि हाईड पार्कजवळ 'हिल्टन हॉटेल' असावं. मी तिथे असताना लंडन मध्यात एका अती ऊंच टॉवरचं बांधकाम चालू होतं. तो टॉवर सर्वांत उंच राहणार आहे, असं सांगण्यात येतं.

× × ×

इथल्या आर्ट गॅलरीज् आणि म्यूझियमच्या बाबतीतही तेच. ही विविध संग्रहालयं पाहिली म्हणजे केवळ स्वतःच्या देशातीलच नव्हे, तर जगातल्या सर्व भागांतून जिकडून मिळेल तिकडून सारं नवजुनं साक्षेपानं गोळा करण्याच्या आणि व्यवस्थितपणे जतन करून ठेवण्याच्या इंग्रजांच्या वृत्तीची साक्ष तर पटतेच पण यांतून त्यांच्या ऐतिहासिकतेच्या जाणिवेची कल्पना येते.

ह्या परंपराप्रियतेबरोबरच इंग्रजांची शिस्तप्रियता ही पावलो पावली जाणवते; पण ही शिस्त वेळेवर व व्यवस्थित काम करण्यापुरतीच मर्यादित नाही. ती मनाचीही आहे. सामान्यतः इंग्रज माणूस हा स्वयंशासित (self-disciplined) वाटतो. फ्रेंच किंवा इटॅलियन माणसाप्रमाणे तो भावनाशील नाही, बुद्धीशील आहे. त्याचा अबोलपणा, शिस्त नियमितपणा, भावनांच्या प्रदर्शनाची नावड, उद्योगी वृत्ती, वायफळाचा तिटकारा, हे सारे गुण त्याच्या स्वयंशासनातूनच निघालेले असावे. इथल्या प्रमाणे मनाचं शैथिल्य व तज्जन्य कामचोरपणा, रिकामटेकडेपणा, वायफळ बडबड व टवाळखोरपणा ही भावंडं तिथे अभावानं दिसतात. इंग्रजांच्या निरलसतेला तिथली आल्हादकारक हवाही फार साह्यीभूत होते. केव्हाही पाहा, काम करताना उत्साह वाटतो. स्वस्थ बसून राहवंसं वाटत नाही.

शिस्तीचा माणूस सारं काही शिस्तीनंच करतो! तसं ह्या इंग्रजांचं आहे. त्याच्या भावनांना शिस्त आहे, भाषेला शिस्त आहे, वागण्याला आहे तशीच हसण्यालाही आहे. इथे हसणं दिसलं. परंतु 'खिदळण' फारसं आढळलं नाही. इंग्रजाचं सारं दैनंदिन आयुष्यच मुळी घड्याळाच्या काट्यानं चालणारं... वेळपत्रकात बसवलेलं. कामाच्या, खाण्यापिच्या व मौज करण्याच्या साऱ्या वेळ ठरलेल्या. बहुतेक ऑफिसं साडेनऊला किंवा दहाला उघडतात अन् साडेपाचला किंवा सहाला बंद होतात. सकाळी साडेआठ ते नऊच्या दरम्यान उभं

इंग्लंड 'ब्रेकफास्ट' घेतं, एक ते दोन दुपारी जेवतं , दुपारी पावणेचार ते सवाचार चहा-कॉफी पितं अन् सायंकाळी सात ते आठ जेवतं : मग ते ऑफिसात असो की घरी. दुपारी लंचला एकची वेळ टळली, की इंग्रज बेचैन होतो. तसंच चहाच्या सुटीचे इंग्रज कसोशीनं काम करतो व कसोशीनं मौजही करतो. "Work while you work, play while you play," ही त्याची विभागणी आहे. कामाचा खेळखंडोबा त्याला मानवत नाही. तसंच खेळाच्या वेळी कामाचं स्मरण नकोसं होतं. जसं कामाचं माप मोठं, तसंच मौजेचंही.

इंग्रजी माणसाच्या तोडीचा सामाजिक शिष्टाचाराच्या बाबतीत क्वचितच दुसरा असावा, असं मला वाटतं. लंडनच्या विमानतळावर उतरल्यावर तिथल्या कस्टम अधिकाऱ्याने ज्या नम्रतेनं माझ्या सामानाबद्दल मला प्रश्न विचारला तीच नम्रता मला सतत दिसली. इंग्रज माणसाला तुम्ही अप्रिय असलात, तुमच्या 'ब्राऊन' रंगाबद्दल त्याच्या मनात नावड असली, किंवा तुम्ही एकेकाळी त्याचे गुलाम होता, याबद्दल त्याच्या मनात अढी असली, तरी त्याच्या शिष्टाचारात तसूभरही ती दिसायची नाही, तो उठून तुमच्याशी हसून हस्तांदोलन करील, तुमच्यासाठी दार उघडेल. गुडमॉर्निंग, गुडबाय, एक्सक्यूज मी, पार्डन, थँक यू, प्लीज या शब्दांची पखरण करील, संवादात गोडवा व स्निग्धता आणील. कुठल्याही संस्थातून, ऑफिस कचेऱ्यांतून किंवा साधं दुकानात जरी गेलांत तरी "व्हॉट कॅन आय डू फॉर यू मॅडम ?" किंवा "मे आय हेल्प यू ?" म्हणून कुणीतरी येऊन विचारील.

'परंतु हा गोडवा वरवरचा आहे. सामाजिक जीवनापलीकडे दुसऱ्यासाठी इंग्रजाने लक्ष्मण रेषा आखलेली आहे. त्याच्या घराची व अंत:करणाची कवाडे तुमच्यासाठी बंद आहेत. तो तुसडा, अबोल, दुर्बोध आहे.' असा समज इंग्रजाबद्दल असणारे पुष्कळ लोक भेटले. कदाचित थोड्याफार प्रमाणांत सामान्यतः तसा अनुभव येत असावा. मला मात्र त्याच्या उलट अनुभव आला, असंच म्हणावं लागेल. इंग्रजाच्या स्वभावातली वैशिष्ट्यं मनात राखून शिष्टाचारात बोलण्यात-वागण्यात, बुद्धीत, वृत्तीत तुम्ही त्याच्या पातळीचे आम्हात समानशील आहात असं दिसल्यावर तो तुमचा मित्र होतो. तिकडच्या हवेप्रमाणे प्रथम तो थंड असला तरी आतून समुद्राप्रमाणे खोल आहे. उशिरा तापतो व उशिराच थंड होतो. माझ्या मुलाचे बहुतेक मित्र इंग्रज होते. त्यातले काही

मोठ्या इमारती म्हणजे बी. बी. सी. चं 'टेलिव्हिजन सेंटर' आणि हाईड पार्कजवळ 'हिल्टन हॉटेल' असावं. मी तिथे असताना लंडन मध्यात एका अती ऊंच टॉवरचं बांधकाम चालू होतं. तो टॉवर सर्वांत उंच राहणार आहे, असं सांगण्यात येतं.

× × ×

इथल्या आर्ट गॅलरीज् आणि म्यूझियमच्या बाबतीतही तेच. ही विविध संग्रहालयं पाहिली म्हणजे केवळ स्वतःच्या देशातीलच नव्हे, तर जगातल्या सर्व भागांतून जिकडून मिळेल तिकडून सारं नवजुनं साक्षेपानं गोळा करण्याच्या आणि व्यवस्थितपणे जतन करून ठेवण्याच्या इंग्रजांच्या वृत्तीची साक्ष तर पटतेच पण यांतून त्यांच्या ऐतिहासिकतेच्या जाणिवेची कल्पना येते.

ह्या परंपराप्रियतेबरोबरच इंग्रजांची शिस्तप्रियता ही पावलो पावली जाणवते; पण ही शिस्त वेळेवर व व्यवस्थित काम करण्यापुरतीच मर्यादित नाही. ती मनाचीही आहे. सामान्यतः इंग्रज माणूस हा स्वयंशासित (self-disciplined) वाटतो. फ्रेंच किंवा इटॅलियन माणसाप्रमाणे तो भावनाशील नाही, बुद्धीशील आहे. त्याचा अबोलपणा, शिस्त नियमितपणा, भावनांच्या प्रदर्शनाची नावड, उद्योगी वृत्ती, वायफळाचा तिटकारा, हे सारे गुण त्याच्या स्वयंशासनातूनच निघालेले असावे. इथल्या प्रमाणे मनाचं शैथिल्य व तज्जन्य कामचोरपणा, रिकामटेकडेपणा, वायफळ बडबड व टवाळखोरपणा ही भावंडं तिथे अभावानं दिसतात. इंग्रजांच्या निरलसतेला तिथली आल्हादकारक हवाही फार साह्यीभूत होते. केव्हाही पाहा, काम करताना उत्साह वाटतो. स्वस्थ बसून राहवंसं वाटत नाही.

शिस्तीचा माणूस सारं काही शिस्तीनंच करतो! तसं ह्या इंग्रजांचं आहे. त्याच्या भावनांना शिस्त आहे, भाषेला शिस्त आहे, वागण्याला आहे तशीच हसण्यालाही आहे. इथे हसणं दिसलं. परंतु 'खिदळण' फारसं आढळलं नाही. इंग्रजाचं सारं दैनंदिन आयुष्यच मुळी घड्याळाच्या काट्यानं चालणारं... वेळपत्रकात बसवलेलं. कामाच्या, खाण्यापिण्याच्या व मौज करण्याच्या साऱ्या वेळ ठरलेल्या. बहुतेक ऑफिसं साडेनऊला किंवा दहाला उघडतात अन् साडेपाचला किंवा सहाला बंद होतात. सकाळी साडेआठ ते नऊच्या दरम्यान उभं

इंग्लंड 'ब्रेकफास्ट' घेतं, एक ते दोन दुपारी जेवतं , दुपारी पावणेचार ते सवाचार चहा-कॉफी पितं अन् सायंकाळी सात ते आठ जेवतं : मग ते ऑफिसात असो की घरी. दुपारी लंचला एकची वेळ टळली, की इंग्रज बेचैन होतो. तसंच चहाच्या सुटीचे इंग्रज कसोशीनं काम करतो व कसोशीनं मौजही करतो. "Work while you work, play while you play," ही त्याची विभागणी आहे. कामाचा खेळखंडोबा त्याला मानवत नाही. तसंच खेळाच्या वेळी कामाचं स्मरण नकोसं होतं. जसं कामाचं माप मोठं, तसंच मौजेचंही.

इंग्रजी माणसाच्या तोडीचा सामाजिक शिष्टाचाराच्या बाबतीत क्वचितच दुसरा असावा, असं मला वाटतं. लंडनच्या विमानतळावर उतरल्यावर तिथल्या कस्टम अधिकाऱ्याने ज्या नम्रतेनं माझ्या सामानाबद्दल मला प्रश्न विचारला तीच नम्रता मला सतत दिसली. इंग्रज माणसाला तुम्ही अप्रिय असलात, तुमच्या 'ब्राऊन' रंगाबद्दल त्याच्या मनात नावड असली, किंवा तुम्ही एकेकाळी त्याचे गुलाम होता, याबद्दल त्याच्या मनात अढी असली, तरी त्याच्या शिष्टाचारात तसूभरही ती दिसायची नाही, तो उठून तुमच्याशी हसून हस्तांदोलन करील, तुमच्यासाठी दार उघडेल. गुडमॉर्निंग, गुडबाय, एक्सक्यूज मी, पार्डन, थँक यू, प्लीज या शब्दांची पखरण करील, संवादात गोडवा व स्निग्धता आणील. कुठल्याही संस्थातून, ऑफिस कचेऱ्यांतून किंवा साधं दुकानात जरी गेलांत तरी "व्हॉट कॅन आय डू फॉर यू मॅडम ?" किंवा "मे आय हेल्प यू ?" म्हणून कुणीतरी येऊन विचारील.

'परंतु हा गोडवा वरवरचा आहे. सामाजिक जीवनापलीकडे दुसऱ्यासाठी इंग्रजाने लक्ष्मण रेषा आखलेली आहे. त्याच्या घराची व अंतःकरणाची कवाडे तुमच्यासाठी बंद आहेत. तो तुसडा, अबोल, दुर्बोध आहे.' असा समज इंग्रजाबद्दल असणारे पुष्कळ लोक भेटले. कदाचित थोड्याफार प्रमाणांत सामान्यतः तसा अनुभव येत असावा. मला मात्र त्याच्या उलट अनुभव आला, असंच म्हणाव लगेल. इंग्रजाच्या स्वभावातली वैशिष्ट्यं मनात राखून शिष्टाचारात बोलण्यात-वागण्यात, बुद्धीत, वृत्तीत तुम्ही त्याच्या पातळीचे आम्हात समानशील आहात असं दिसल्यावर तो तुमचा मित्र होतो. तिकडच्या हवेप्रमाणे प्रथम तो थंड असला तरी आतून समुद्राप्रमाणे खोल आहे. उशिरा तापतो व उशिराच थंड होतो. माझ्या मुलाचे बहुतेक मित्र इंग्रज होते. त्यातले काही

पुढे माझेही स्नेही बनले व तो स्नेह पुढे कसोटीला लागण्यांचाही प्रसंग आला.

या मित्रांपैकी फिलीपला मी नेहमी थट्टेनं म्हणायची,

"तुझ्या भाषेत नुसती शब्दांची पखरण पाहून घ्यावी. बी. बी. सी. तला माझा वर्ग पाचव्या मजल्यावर आहे. तिथे पोचेपर्यंत 'थँक यू' किंवा तत्सम शब्द ( एकदा मी मोजले तर ) दहावेळा म्हणावे लागतात मला!" पण हाच फिलीपपुढे संकटात सर्वांत अधिक कामास आला.

परंतु या गुणाबरोबरच इंग्रजांच्या स्वभावात चमत्कारिक विसंगती आहेत, नाहीत असं नाही. इंग्रज माणूस समजायला दुर्बोधच खरा, जुन्यातला जुना अन् नव्यातला नवा, असा काहीतरी विचित्र संगम त्यांच्यात आहे. त्याच्या स्वभावातले खाच खळगे अन् विरोधही चमत्कारिक आहे. इंग्रज माणूस अबोल म्हणावा तर ब्यूफे ( उभी जेवणं ), कॉकटेल पार्टी किंवा 'पब्ज' मध्ये हाच माणूस विलक्षण बोलका होतो, दोन दोन तास ह्या प्रसंगी बोलू शकतो. बी. बी. सी. च्या वर्गात अपुरी राहिलेली चर्चा बहुधा इथल्या 'बार' मध्ये पुढे चालू व्हायची ती पूर्ण 'लंच अवर' संपतो! परंतु हाच बोलका इंग्रज माझ्या बर्मिंगहॅम ते लंडन ह्या साडेतीन तासाच्या शंभर मैलाच्या प्रवासात कुणाशीही 'ब्र' सुद्धा बोललेला दिसत नाही. हे नेहमीच दृश्य असतं.

स्वच्छतेच्या बाबतीतही तसंच. लंडनच्या एकदोन विभागाचे अपवाद सोडले तर किंवा भुयारी गाड्यांचे धूम्रपानाचे डबे वगळले, तर बहुतेक सारं लंडन स्वच्छ आढळतं. "लंडन स्वच्छ राखा" अशी मोहीम सतत चालते. बहुधा प्रत्येकजण कचरा रस्त्यात जागोजागी खांबाला लागलेल्या 'लिटर' कचरा पेटीतच टाकतो. स्वच्छ राहणी, स्वच्छ घर, स्वच्छ पोशाख ही साहेबाची वैशिष्ट्यं; परंतु याच साहेबाचं "ओरल हायजीन" मौखिक आरोग्य हे मात्र चमत्कारिक आहे. सकाळी उठल्यावर चूळही न भरता तो चहा पितो, जेवण केल्यावरही तोंड धूत नाही. आठ आठ दिवस आंघोळ करीत नाही. कित्येक मध्यमवर्गीय घरांतून बाथरूम्स नाहीत. ढेकर देणं, शिंकणं इत्यादी क्रिया घडल्यास तो 'सॉरी' म्हणतो, पण रूमालात मोठ्यानं नाक शिंकरलं तर चालतं–तेही जेवताना. बी. बी. सी. मधल्या एका स्वच्छ अद्ययावत महिलेला विस्कटलेल्या भुवया जिभेच्या थुंकीनं बसवताना मी एकदोनदा पाहिलं होतं.

पोशाखाच्या बाबतीतही गंमतच. पुरुष अगदी नखशिखान्त, बोटाचं नखही दिसणार नाही अशा कपड्यांनी आच्छादित, तर स्त्रिया अर्धनग्न. अर्ध्या मांड्या व अर्धी छाती दिसेल इतपत त्यांच्या झग्यांची लांबी-रुंदी कमी झालेली दिसते, पण पुरुषांचा गळा दिसणं हे मात्र असभ्य, अशिष्ट-पणाचं लक्षण !

इंग्रज हा मूलतः गंभीर, पण विनोद त्याला अत्यंत प्रिय आहे. परंतु त्याला आवडणारा विनोद हा चमत्कारिक आहे. रेडिओवर होणारे कित्येक विनोदी कार्यक्रम किंवा टी. व्ही ऐकून किंवा पाहून याला विनोद म्हणायचं की. नाही, हा प्रश्न मला पडायचा. स्पाईक मिलिगनच्या विनोदी 'बेड सिटिंग रूम' खेळात लोक सारखे हसायचे त्यावेळी हसण्यासारखं यात काय आहे, असं कितीदा तरी वाटलं. इकडच्या विनोदाची जात काहीशी वेगळीच आहे असंच म्हणावं झालं.

बरं, इंग्रज माणूस तुसड्या, घुम्या म्हणावा, तर एकंदरीत दयाबुद्धी त्याच्यांत बऱ्याच प्रमाणात आहे. दुसऱ्याला चटकन हात देणं, पडलेल्याला उचलणं, वाट चुकलेल्याना दूरवर जाऊन वाटेला लावणं, ओळख नसताही सामान उचलायला मदत करणं, ही दृश्यं अगदी सामान्य आहेत. सेंट्रल लंडन सारख्या गर्दीच्या विभागातूनसुद्धा वाटाड्या-कुत्र्यांच्या गळ्यातील पट्ट्यांच्या साह्यानं आंधळी माणसं 'पांढरी काठी' घेऊन चालतात. कितीही गर्दी असो, पांढरी काठी पाहिली, की लोक आंधळ्याला वाट करून रस्ता ओलांडायला मदत करतात. पाळीव प्राण्यांच्या बाबतीत इंग्रज माणसाचं प्रेम तर प्रसिद्धच आहे. मी विलायतेत जाण्याच्या काही दिवसापूर्वीच एका मोठ्या लॉर्डसाहेबांनी त्यांना वारस नसल्यामुळे, आपली सारी इस्टेट एक अत्युत्कृष्ट 'श्वानगृह' ( Dog - House ) काढण्यासाठी दान केली होती म्हणे! या श्वानगृहात कुठल्याही बेवारशी कुत्र्याला प्रवेश मिळतो. कुणालाही असं कुत्रं सापडलं, तर त्यानं फोन करायचा, की ते कुत्रं त्या गृहात पोंचवायची सोय व्हायची. नशीब त्या देशातल्या कुत्र्यांचं ! बिचारी बेवारशी मुलं !

बाकी इंग्रज लोक विशेषतः स्त्रिया कुत्र्यांचे जे लाड करतात, ते पाहिले म्हणजे हा विचार अधिकच बळावतो. मोटारीत, बाई मोटार हाकीत असली, तर बाईच्या समोरच्या सीटवर कुत्रं अन् मुलं मात्र मागच्या सीटवर, असं

दृश्य तर कितीदा तरी दिसलं. मुलं कडेवर लादून घेणाऱ्या आया क्वचितच, दिसल्या. परंतु कुत्री अक्षयी अंगावर घेणाऱ्या पुष्कळ! मूल चालू लागलं, की त्याच्या कमरेभोवती थर्मासच्या गळयात असतो तसा चामड्याचा लांबलचक पट्टा बांधून, कुत्री आपण जशी रस्त्यावरून नेतो, तशी मुलं नेलेली पाहिली. शिवाय फुटपाथच्या कडेला, दुकानाच्या बाजूला बाबागाडीतून मुलं ठेवून, आत तासन् तास खरेदी करणाऱ्या आया—हेही दृश्य मला नवीनच होतं. घराबाहेर, विशेषतः गर्दीत क्षणभरही आपल्या तान्ह्याला न विसंबणारी आपल्या इकडची आई हे पाहून भांबावते. अर्थात् तिथं ही मुलं हरवत नाहीत किंवा त्यांची अदलाबदल होत नाही, ही गोष्ट वेगळी.

परंतु ह्या आया आपल्या तान्ह्यांना रस्त्याच्या कडेलाच किंवा कामापुरतंच टाकतात, असं नव्हे; तर रात्री सिनेमा नाटकं, शो इत्यादी पाहायला पतिपत्नी जाणार असली तरी पुष्कळदा त्यांना खुशाल घरात एकटी झोपवून ती बिनदिक्कत जातात. हे मी ऐकलं, तेव्हा माझा विश्वासच बसेना! " मुलं रात्री उठली, तर मग कसं होतं ? " मी विचारलं. त्यावर अगदी सहजपणे उत्तर मिळालं : " त्यात काय ? एखाद्यावेळी मध्ये ते उठलंच तर रडून रडून पुन्हा झोपी जातं ! " राजाराणीचे संसार, नोकरचाकरांचा अभाव आणि बेबीसिटर्स सगळ्यांनाच न परवडणारे, मग काय करायचं ? अर्थात् हा दृष्टिकोनाचा भेद आहे. इंग्रज माता आपल्या मातेपेक्षा कमी प्रेमळ असते, असा निष्कर्ष मला काढायचा नाही. आपल्याप्रमाणे मुलांचे फाजील लाड किंवा कोडकौतुक न करण्याकडे त्यांची प्रवृत्ती आहे असं म्हणावं हवं तर! शिस्त, संयम, मनाचा कणखरपणा यांचं बाळकडूच इकडच्या मुलांना दिलं जातं, परंतु इतक्या तान्हेपणीच त्याचा प्रारंभ व्हावा, हे आपल्या भारतीय मनाला कसंतरीच वाटतं. तसंच इथं मुलं चारपाच वर्षांची झाली, की वेगळ्या खोलीत झोपतात. चार्ल्स पार्करच्या मुलाला मी विचारलं होतं,

" तुला एकटं निजायला भीती वाटत नाही ? "

" आता नाही...आधी वाटायची. "

" कसली ? "

" अंधाराची, भुताखेतांची ! "

" चोरांची ? "

" कधी नाही ! "

पण माझा तो प्रश्नच चुकीचा होता. इंग्रजी चोराला सामान्य घरं फोडणं ही कदाचित् इभ्रतीच्या खालची गोष्ट वाटत असेल. मोठ्या बँका फोडणं, हेच त्याचं ब्रीद. भुरट्या चोऱ्या इथं सहसा नाहीच. घराच्या दाराबाहेर दुधाची रोजची बाटली, पार्सल इत्यादी ठेवली जातात. एक दोनदा आठवड्याच्या बिलाचे पैसेही बाटलीजवळ आम्ही पाकिटात घालून ठेवले होते. दूधवाल्याने सकाळच्या फेरीच्या वेळी ते उचलून नेले होते. विशेष हे की चोरांनाच काय पण रस्त्याच्या कडेला मुलंही खेळत असतात, पण एकालाही त्या वस्तूंना किंवा पैशांनाही हात लावण्याचा विचार शिवत नाही. वर्तमानपत्रं तर इथे नेहमीच रस्त्याच्या कडेला ठेवलेली असतात. ती फुकट कुणी नेत नाही, अगर विक्रीचे पैसेही कुणी लांबवीत नाही. 'ऑल सोल्स' मध्ये तर पुस्तकंही अशीच 'एकटी' ठेवलेली असतात. पुस्तक उचलायचं अन् किंमत पाहून पैसे पेटीत टाकायचे. आपल्याकडे ही गोष्ट संभवतच नाही. बागेतली फुलंसुद्धा चोरायची वस्तू ठरते...मग इतर गोष्टी-बद्दल बोलायलाच नको.

× × ×

इंग्रज एवढा व्यापारकुशल माणूस, अर्धे साम्राज्य त्यानं व्यापारी कौशल्यावर जिंकलेलं. प्रत्येक दुकानाच्या खिडक्यांतून अशी आकर्षक मांडणी केलेली असते, की खिशात पैसा नसला, तरी नुसतंच " विंडो शॉपिंग " करूनही समाधान लाभतं. "विंडो ड्रेसिंगची" कला या इंग्रजांपासून शिकावी. 'सेल्फ्रिझीस', 'जॉन लुई', 'मार्क आणि स्पेन्सर', 'हील्स' किंवा 'हॅरॉड्स' ही जगविख्यात दुकानं आहेत. " जे कुठेही मिळणार नाही, ते हॅरॉड्स मध्ये मिळतं, " असा बोलबाला आहे. इंग्लंडची राणी आणि सरदारदरकदार तिथं आपलं सामान खरेदी करतात. परंतु सहा वाजले की छोटी-मोठी सारी दुकानं एकदम गप्पकन् बंद होतात. मग दाराची अर्धी फट उघडी ठेवून विक्री चालवणं वगैरे प्रकार इथं नाही. कपड्याची दुकानंच काय तर चहाची दुकानं, फळभाज्यांची दुकानं व हॉटेलंही बंद होतात.

सहानंतर बाहेर भूक लागली म्हटलं, की फक्त "पब्स" तेवढ्या उघड्या असतात. त्या बहुतेक सहाला उघडतात व अकरापावेतो राहतात.

× × ×

उभ्या इंग्लंडमध्ये कुठेही जा. इंग्रज माणसांतली कलात्मक वृत्ती आणि सौंदर्यदृष्टी लहानसहान गोष्टीत दिसून येईल. लंडन शहरभर अधूनमधून मोकळ्या जागा, हिरवळी चौक दिसतील. त्यात बसायला बाकं, एखादं पॅविलियन, एखाददुसरा पुतळा असेल. एखादा अगदी लहानसाच ओहोळ असतो, परंतु त्याभोवती कठडा उभारलेला असेल. त्याभोवती छोटीशी बाग, बाकं, सुंदरशी, झाडं पाण्यात बोटी इत्यादी सारं असेल. इंग्रजाला बागेचं अतिशय वेड. बहुतेक प्रत्येक घरासमोर छोटीशी, फुलांनी बहरलेली बाग असतेच. परंतु बाहेरून बहुतेक घरं एकाच प्रकारची, एकाच पद्धतीची. बहुधा भिंतींना बाहेरून प्लास्टर नसलेली. एकाच मापाच्या दारंखिडक्या असलेली ही विटांची घरं बहुतेक एकाच रंगाची असतात. रंगही उगाच थोडासा भीतभीत वापरलेला. विटा ढाळतानाच त्यात घातलेला. त्यामुळे सबंध लंडन शहरात बहुतेक राखडी, फिक्कट पिवळे, रॉ सायन्ना किंवा फिक्कट जांभळे आणि फारच झालं, तर 'ऑफ व्हाईट', एवढेच रंग रस्त्यावरून सारखे दिसतात. लंडन हे रंगहीन शहर आहे. माझ्या बी. बी. सी. शाळेतल्या एका भाषणात मी लिहिलं होतं...

"लंडन हे रंगहीन शहर भासतं. विशेषतः सोनेरी उन्हाच्या व सूर्यप्रकाशाच्या आणि रंगाची लयलूट असलेल्या भूमीतून आलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला इंग्लंडची रंगहीनता उदासवाणी, कंटाळवाणी वाटते. परंतु कुणी सांगावं? कदाचित् इकडल्या माणसांच्या अंतःकरणात ह्या अभावाची भरपाई झाली असेल." बी. बी. सी. तला एक इंग्रज सहकारी त्यावर म्हणाला,

"आय एम अफ्रेड, यू विल बी डिसअपॉईंटेड देअर टू! यू वोंट फाईंड कलर देअर ऑलसो!"

× × ×

# १०

कला – प्रदर्शनांच्या खालोखाल इथल्या नाट्यगृहांचे उंबरठे झिजविण्याची माझी इच्छा होती, पण नाटकं पाहायची म्हणजे तिकिटांची भानगड आली. दरवेळी खिशाकडे हात जायचा आणि सरकारच्या कृपेनं मिळालेल्या तीन पौंड चलनाच्या आठवणीनं खाली यायचा. तरी जमेल तेव्हा, जमतील तितकी, रंगभूमीवरची, रेडिओची, टेलिव्हिजनवरची नाटकं, फार्स, रेव्हू, संगितिका, जसं जे समोर येईल ते ते मी पाहिले.

मराठी माणसाप्रमाणेच इंग्रजालाही नाटकांचं वेड आहे. मराठी रंगभूमीप्रमाणेच इंग्रजी रंगभूमीला दीर्घ परंपरा आहे आणि ती जिवंत ठेवण्यासाठी त्याची धडपड आहे.

आपल्याप्रमाणेच धार्मिक खेळांतून म्हणजे चर्चमधून होणाऱ्या 'मिस्टरी प्लेज' अन 'मोरॅलिटी प्लेज' मधून इंग्रजी रंगभूमिचा उदय झाला. पुढे चर्चमधून नाटक रस्त्यावरील चौकात आलं, 'मग वॅगन्स' च्या पाठीवरून फिरू लागलं. अन मग धर्मशाळेतील आवारात येऊन स्थिर झालं. त्यातून इंग्रजी रंगभूमी उत्क्रांत होत होत अत्याधुनिक साधनांनी सुसज्ज अशा आजच्या अद्ययावत् रंगभूमीचं स्वरूप तिला प्राप्त झालं आहे.

मध्यंतरी आपल्याप्रमाणेच या रंगभूमीला वाईट दिवस आले. तीस वर्षापूर्वी चित्रपटांनी तिला फार मोठा धक्का दिला. पण त्यापेक्षा जबर धक्का आज टेलिव्हिजननं दिला आहे. टेलिव्हिजननं नाटक सर्वांच्या घरात आणलंय. पैशाशिवाय, घराबाहेर पडण्याचे श्रम घेतल्याशिवाय घरच्या दिवाणखान्यात आरामशीर बसून नाटक पाहता येतं. सिनेमापेक्षाही हे अधिक सोयीचं आहे. शिवाय, टेलिव्हिजनवरून होणारी नाटकं कमी वेळाची, नीटनेटकी बसवलेली, खुसखुशीत असतात अन् इथल्या जलद जीवनाला ती अधिक

परवडण्यासारखी आहेत. टेलिव्हिजननं रंगभूमी प्रमाणेच रेडिओवरही आघात केलाय पण तोही आता सावरलाय. आज रंगभूमी, रेडिओ अन टेलिव्हिजन या तिन्ही माध्यमांचं स्वरूप, आणि स्थान निश्चित व स्वतंत्र आहे, हे निदर्शनाला येऊन चुकलं आहे. त्यामुळे आज टेलिव्हिजनमुळे रेडिओ-वरील नाटकं ऐकणाऱ्या श्रोत्यांचं प्रमाण घटलं आहे; तरी तेही नाटक टिकून आहे. त्याचप्रमाणे रंगभूमीकडे जाणाऱ्या प्रेक्षकांचा वर्ग रोडावला आहे निश्चित. तरीही आज ब्रिटनची रंगभूमी केवळ तग धरून आहे, असं नव्हे, तर घट्ट पाय रोवून उभी आहे. हौशी नटांचं पीक सतत निघत आहे. तसंच नाट्यसंस्थांचंही. आणि त्याच्या भरीला नाट्यशिबिरं, नाट्यशिक्षण संस्था, नाट्यलेखन स्पर्धा ह्याही गोष्टी आल्या आहेत.

याचं प्रमुख कारण, ब्रिटिश रंगभूमीला मिळणारा राजाश्रय. आर्ट्स कौन्सिल (ब्रिटनसाठी) अन् सेमा (CEMA उत्तर आयर्लंडसाठी) या संस्थामार्फत हा आश्रय दिला जातो. इथलं नाटक टिकविण्यात, उचलून धरण्यात, त्याची लोकप्रियता जागती वाढती ठेवण्यात, ब्रिटिश कौन्सिलचा फार मोठा वाटा आहे. 'ओल्ड विक थिएटर' किंवा 'रॉयल शेक्सपियर थिएटर' यासारख्या जुन्या नाटक कंपन्यांचे आंतरराष्ट्रीय दौरे काढणं, नाट्यावर तज्ञाचे परिसंवाद, व्याख्यानमाला किवा लेखनस्पर्धा आयोजित करणं आणि विविध नाट्यवाङ्मय, नेपथ्यप्रकार, नटांचा इतिहास इत्यादी गोष्टीची माहिती देणारी प्रदर्शनं भरविणं, ही कामं ब्रिटिश कौन्सिल छप्पन्न सालापासून करीत आहे.

ब्रिटन हा टीचभर लांबी रुंदीचा देश, परंतु त्यात आज अडीचशेच्या वर व्यावसाईक कंपन्या आहेत व एकट्या लंडनमध्ये चाळीसच्या वर नाट्य-गृहे आहेत. हौशी नाट्य–संस्थांची तर गणतीच नाही, परंतु त्यांची संस्था पांच हजारांवर आहे म्हणतात. या साऱ्या गोष्टीवरून इंग्रजांच्या नाट्यप्रेमाची कल्पना येईल. 'कॉव्हेन्ट गार्डन,' 'सॅडलर्स वेल्स' 'ओल्ड विक', 'मरमेड' अन 'रॉयल कोर्ट' ही लंडनची पाच प्रमुख नाट्यगृहे. यात बारा महिने नाटकाचे प्रयोग सतत होत असतात. दुसऱ्या महायुद्धात यापैकी बरीच बंद करावी लागली परंतु त्याऐवजी दुसरी पुष्कळ नवीन निघाली. "ब्रिटिश ड्रामा लीग" आणि "कॉन्फरन्स·ऑफ ड्रामा असोसिएशन" या दोन मोठ्या नाट्य संस्था आहेत. "रॉयल अकादमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट" आणि "लंडन

अकादमी ऑफ म्यूझिक अ‍ॅन्ड ड्रॅमॅटिक आर्ट " या नाट्य शिक्षणाच्या शाळा आहेत.

× × ×

लंडनमध्ये आल्याबरोबर प्रथम मला पाहायला मिळाला तो एक " रेव्हू " ' REVUE '. हा एक अगदी आगळा, आपल्याकडे अपरिचित असलेला नाट्यप्रकार. रचनेच्या बाबतीत काहीसा तमाशाजवळ येणारा ... पण त्यातला उत्तान शृंगार अन् धांगडधिंगा वजा करून. मुळात हा फ्रेंच ' म्यूझिकल कॉमेडी ' चा एक प्रकार मानला जातो.

एकादं सैलसं, विस्कळीत कथानक, बरेचसे विनोदी प्रसंग एकत्र जुळवलेले... अन् त्यातून चालू घडामोडीवर अगर प्रासंगिक विषयांवर विडंबनात्मक किंवा उपहासात्मक टीका, असं एकंदरीत याचं स्वरूप असतं. विनोद अन् टीका हे इंग्रजांचे आवडते विषय . पण विलायती विनोदाचा हा प्रकार काहीसा वेगळा आहे.

' ड्यूक ऑफ यॉर्क ' थिएटरात मी पाहिलेल्या ह्या रेव्ह्यूचं नाव होतं: " बेड–सिटिंग रूम. " इथले प्रख्यात विनोदी नट स्पाईक मिलिगन आणि जॉन अँट्रोबस या जोडीनं मिळून हा प्रयोग सादर केला होता. स्पाईक मिलिगन याचा जन्म पहिल्या महायुध्दाच्या शेवटी भारतात झाला ... अन् दुसऱ्या महायुध्दात तो प्रत्यक्ष लढाईत सामील झाला होता. म्हणून काल्पनिक तिसऱ्या महायुध्दावरचं हे कथानक तो प्रभावीरीतीनं लिहू शकला. तिसऱ्या महायुध्दानंतरचा प्रसंग. तिसरं महायुध्द म्हणजे अण्वास्त्रांचंच युध्द. यात अण्वस्त्र वापरली गेल्यामुळे देशातील लोकांवर झालेले भयानक परिणाम यात कल्पनेनं रंगवले होते.

घरांची विलक्षण टंचाई होते. बहुतेक घरं ' बेड सिटिंग रूम ' बनतात. या युध्दानंतर वस्तूंच्या किमती, विशेषतः घराची भाडी इतकी गगनाला जाऊन भिडतात की त्यामुळे अस्तित्वात आलेल्या भाडे–कायद्याच्या भीतीनं एक माणूस आपला उभा दिवस शवपेटीतच निजून घालवतो... अण्वस्त्रांचा परिणाम होउन एका स्त्रीचं रुपांतर ' चेस्ट ऑफ ड्रॉवर्स ' मध्ये होतं... अन् त्यावेळचे महामंत्री मॅकमिलन यांचं एका पोपटात. या नाटकात सर्वांत उत्कृष्ट

भूमिका होती ती एका ' कॉकनी ' कामकऱ्याची. ती स्पाईक मिलिगन यांनी अत्यंत सहजतेनं वठवली. नाटकातला पुष्कळसा समयसूचक विनोद ते आयत्या-वेळी घुसडून देतात, अशी त्यांची ख्याती आहे व या विनोदाच्या जोरावर प्रयोगभर ते प्रेक्षकाला हसवत ठेवतात. उदाहरणार्थ : एकदां मंत्रिमंडळाच्या बैठकीत सभेच्या अध्यक्षास्थानी महामंत्री ' पोपट ' जाऊन बसतात व लगेच टेबलावर घाण करतात. तेव्हा सभेला हजर असलेले मिलिगन एकदम ओरड-" Look ! He has tabled a Motion ! . " या वाक्याने स्टेजवर व नाट्य गृहांतही हंशा पिकतो.

खुद्द महामंत्र्याच्या नावावरही असला विनोद करण्याचं स्वातंत्र्य या देशांत आहे, हें पाहून आश्चर्य वाटले ... आणि तें स्वातंत्र्य तसं राबवून घेतलं जात आहे, याचं कौतुकही वाटल्याविना राहत नाही.

× × ×

पण इंग्रजी नाट्यसृष्टीची आठवण म्हणजे शेक्सपीयरची आठवण. इंग्रजी नाट्यवाङ्मयाचा तो मानदंड आहे आणि मानबिंदूही आहे. इंग्लंडची ती जगाला सर्वात मोठी देणगी. म्हणून इंग्लंडचं सारं वैभव एका पारड्यात तर दुसऱ्यात एकटा शेक्सपीयर...असं मानणारे लोक पुष्कळ आहेत. आणि का मानू नये ? एकट्या शेक्सपीयरनं जेवढं मोठं शब्दभांडाराचं लेणं इंग्रजी भाषेवर चढवलं तेवढं कुणीही चढवलं नसेल. कुणी त्याच्या काव्यानं वेडे होतात, कुणी त्याच्या भाषेनं...कुणी त्याच्या अमर पात्रावर मोहित होतात, ...तर कुणी कथानकावर. पण त्याच्या नाटकाची विलक्षण मोहिनी मात्र प्रत्येक इंग्रजी मनावर आहे.

शेक्सपीयरचं हे अधिराज्य इंग्रजी मनावरच आहे असं नव्हे... ते आपल्याही मनावर आहे. शाळाकॉलेजातूनच तो आपल्या मनावर आसनस्थ होऊन बसतो. ' टु बी ऑर नॉट टु बी ', ' रोमन्स, कंट्रीमेन, ॲंड लव्हर्स ' हे उतारेचे उतारे इंग्रजी भाषेचे उत्कृष्ट नमुने म्हणून आपल्या-कडून मास्तरांनी पाठ करवून घेतलेले असतात. आपल्या सर्वश्रेष्ठ नाटक-कारालाही आपण उपमा देतो, ती शेक्सपीयरची. ( वास्तविक, कालिदास हा शेक्सपियरच्या आधी होऊन गेला...तरी कालविपर्याचा दोष पत्करून शेक्सपियरची उपमा देऊन आपण नकळत त्याला कालिदासापेक्षा वरचं

स्थान देतो. ) याचं कारण कालिदासापेक्षा शेक्सपियर आमच्या पिढीला अधिक जवळचा वाटतो हे आहे. हे सारं उफराटं आहे, पण खरं आहे. तेव्हा इंग्लंडला जाताना ज्या 'मस्ट' गोष्टींची मी यादी तयार केली होती, त्यात शेक्सपियरच्या नाटकांचा नंबर वरचा होता. मी पोचले तेव्हा इंग्लंडमध्ये 'शेक्सपियर मोसम' होता. एप्रिल ते डिसेंबर 'शेक्सपियर नाट्योत्सव' असतो. या उत्सवात 'रॉयल शेक्सपियर ड्रामा कंपनी' दरवर्षी लंडन आणि शेक्सपियरच्या जन्मस्थळी—स्ट्रॅटफोर्ड इथं—शेक्सपियरची नाटकं करते. इंग्लंडला जाऊन या उत्सवात नाटकं न पाहणं म्हणजे पंढरपूरच्या यात्रेला जाऊन प्रसाद न घेण्यासारखंच होतं. म्हणून पोचल्याबरोबर अरुणला मी माझी यादी देऊन टाकली होती.

त्याप्रमाणे एका शुक्रवारी संध्याकाळी अरुणनं जाहीर केलं.

"तुला शेक्सपियर पाहयचा होता ना? आज फिलीपनं तिकीटं काढलीय..."

"कोणत्या नाटकाची?"

"मिड समर"

"ते काय नाटक आहे?"

"मग? शेक्सपियरचं नाटक नाही का ते?"

"नाही कोण म्हणतो?...पण हॅम्लेट, मॅकबेथ, 'किंग लियर' ही सुंदर नाटकं सोडून ही भुक्कड परीकथा पाहयची म्हणजे काय? अन् तीही सातासमुद्रापलीकडे, खुद्द त्याच्या मायदेशी येऊन?"

"पण आता तिकीटं काढली गेलीय अन् तीही भारी किमतीची ..."

"मग परत करू या. हॅम्लेट किंवा मॅकबेथ लागेल तेव्हा जाऊ..."

"पण यंदा ती दोन्ही इथे लागणार नाहीत. शेक्सपियर कंपनी दरवर्षी काही निवडक नाटकंच करते..."

"निदान 'अंटनी क्लिओपात्रा' तरी...? मिड समरपेक्षा कुठलेही 'हेन्री' सुद्धा चालतील...मला!"

"भलतंच काय?... पहा तर खरा हा प्रयोग! सुंदर होतो, ऐकलंय्...नाही तर स्ट्रॅटफोर्डला जाशील तिथं पाहा हवं ते नाटक..."

आता या पलीकडे जाण्यात अर्थ नव्हता. त्या दिवशी निघताना आधीच निरुत्साह, त्यात भरीला मुसळधार पाऊस. शेवटी छत्र्या, रेनकोट घेऊन कसेतरी पोचलो. थिएटर खच्चून भरलं होतं. आज वर्षानुवर्षं शेक्सपियरच्या नाटकाचे प्रयोग होताहेत...पण लोकांचीही गर्दी कमी होत नाही. तिकिटासाठी झुंबड असते. ती पाहिली म्हणजे शेक्सपियरची इंग्रजी मनावरील पकड किती जबरदस्त आहे, हे कळतं. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी यांची नाटकं म्हटली, की अद्यापही मराठी माणसाचं जसं होतं, तसाच हा प्रकार.

प्रयोग सुरू झाला आणि माझं मन हळूहळू बदलायला सुरवात झाली.

अथेन्स शहर, ड्यूक थीसिअसचा किल्ला, अमेझॉन राणी हिपोलिटा हिच्याशी ड्यूकचा विवाहाचा प्रसंग, परंतु रंगभूमीवर कुठलाच थाटमाट अगर फाफटपसारा नाही...फक्त किल्ल्याची पार्श्वभूमी सुचविणारा एक पडदा...मध्ये एक लांबोळकं टेबल, चारदोन खुर्च्या, ड्यूक व त्याची भावी राणी अगदी सुटसुटीत पोशाखात, त्यावरील सूचक चिन्हांनी आपला दर्जा सुचविणारी. आपला विवाह केव्हा व कसा साजरा करायचा, याबाबत त्यांची चर्चा चालली असताना 'हर्मिया–लायसेंडर' अन् 'हेलेना–डिमिट्रिअस', या दोन जोड्यांची प्रेमप्रकरणं हर्मियाच्या वडिलाकडून त्यांच्या कानी घालण्यात येतात. इकडे विदूषक 'बॉटम' आपल्या चमूसह एक नाटक या लग्नासाठी बसवीत असतो.

एक अंक संपताच नाटकात कामं करणाऱ्याच काही दुय्यम पात्रांनी भराभर पहिल्या अंकातलं सामान उचलून रंगभूमी रिकामी केली. एक कळ दाबली गेली. त्याबरोबर किल्ला नाहीसा झाल अन् दाट जंगल दर्शविणारा दोनचार झाडांचा समूह मध्ये येऊन उभा राहिला ... पंख लावलेली दोघे-जण पुढे आली. त्यावरून ती पऱ्यांची राजाराणी 'ओबेरॉन' अन् 'टिटानिया' असावीत, हे कळलं. त्यांचं दोघांचं भांडण झालं आहे. तेवढ्यात अंगाला घट्ट आवळलेल्या पोशाखात उड्या मारीत एक जण येतो तो लटपट्या, खोडकर 'पक' अन् झिरझिरीत पांढऱ्या पोशाखातल्या उडत्या सुंदर पोरी म्हणजे पऱ्या. रंगसज्जा, वेशभूषा काय ती तेवढीच.

सूचक अन् सुटसुटीत. मायक्रोफोन, ध्वनिक्षेपक कुठेही दिसला नाही, पण शब्द न् शब्द खडा न् खडा ऐकू येत होता. अडखळती संभाषणं, प्रेक्षकांच्याही कानाला ऐकू जाणारं प्रॉम्पटिंग, फर्मा विसरून मध्येच संभाषणानं घेतलेले पूर्णविराम, बावरलेल्या मुद्रा, इत्यादी प्रकार या नाटकात एकदाही आढळले नाहीत. तशांत जागतिक श्रोतृसमुदाय. त्यामुळे प्रत्येक गोष्ट करायची ती कसोशीनं अन् दर्जेदार, हे इंग्रजी मनाला वळण. यामुळं साधं असूनही नाटक रंगायला सुरवात होते.

खोंडकर पकनं जादूच्या वनस्पतीचा रस डोळ्यात टाकल्यामुळे टिटॅनिया, जादूनं गाढव बनलेल्या 'बॉटम' वर प्रेम करू लागते...तोच प्रकार या रसामुळे चार तरुण प्रेमिकांच्या बाबतीत होतो...प्रथम 'हर्मिया—लायसेंडर हेलेना' असा त्रिकोण असतो. तो जादूच्या रसामुळे हेलेनाचा तिरस्कार करणारा लायसेंडर तिच्या प्रेमाचा स्वीकार करतो. रसाच्या जादूची भानगड माहित नसल्यामुळे हेलेनाला ती चेष्टा वाटते. हर्मियाही आपल्या प्रियकराचं मन स्वतःकडे वळवून घेतल्याबद्दल तिच्याशी भांडते... वास्तविक हेलेना हे नाटकात जोड-नायिकेचं पात्र, पण 'डायना रिंग' नावाची नटी ही भूमिका इतकी सुंदर व उठावदार करते... की जादूच्या प्रयोगामुळे नाटकातला हा संघर्ष निर्माण झालाय्, याचा प्रेक्षकांना विसर पडतो... लायसेंडरच्या प्रेमाला खोटं समजून ती त्याचा मार्मिक शब्दात प्रतिकार करते... ती भाषणंही उत्तम होतात... नाटकात शेक्सपियरची भाषा तशीच ठेवली आहे. फक्त प्रयोगासाठी संपादन जेवढं करावं लागलं असेल, तेवढंच. शब्दांचे उच्चारही स्वच्छ असतात. त्यामुळे संपूर्ण संवाद शेवटपर्यंत समजतात. पकच्या:तोंडच्या लांबलचक कवितेच्या ओळी मात्र नीट कान देऊन ऐकाव्या लागल्या.

शेवटी, शिकारीला निघालेल्या ड्यूक थीसिअसच्या येण्यानं वनात जादूच्या रसानं निर्माण केलेला गोंधळ संपतो. आपल्या राणीला गाढवरूपी बॉटमच्या प्रेमात पडलेली पाहून ऑबेरान तो जादूच्या रसाचा परिणाम जादूनंच नाहीसा करतो. अन् सर्वत्र आनंदी आनंद होतो. तिन्ही जोडप्यांचे विवाह साजरे होतात अन् त्यानिमित्त बॉटम आपल्या नाटकाचा प्रयोग करतो. नाटकातला हा विनोदी भाग पाहून प्रेक्षकांची हसून हसून दोन पोटं होतात

अन् आधीच्या दुःखाची " रात्री स्वप्नात अनुभवलेली दुःखं, " असं समजून विसर पडतो.

थिएटरमधून बाहेर पडलो, तेव्हा पाउस थांबला होता. फुटपाथवरच्या तुडुंब गर्दीतून आम्ही चालत होतो. मी गप्प होते. ते पाहून फिलिप म्हणाला,

" बहुधा नाटकाने डोकं दुखायला लागलं तुमचं ना ? "

" नाही. "

" कदाचित भुक्कड परीकथा पाहिल्याचा पश्चाताप होत असेल... " अरुण.

" नाही. "

" सकाळच्या तुमच्या बोलण्यावरून माझ्या तिकिटांचा पैसा फुकट जाणार की काय ही भीती वाटत होती मला. " फिलिप म्हणाला.

" बिलकुल नाही; पण मला सुखान्तिका पाहयला मुळातच आवडत नाहीत. शिवाय हे नाटक आम्हाला एम्. ए. ला होतं. त्यावेळी बिलकूल आवडत नसे. तुला विचित्र वाटेल...पण मला त्यावेळी शेक्सपियरपेक्षा मार्लो अधिक आवडायचा. त्याला नाट्यतंत्र जमलं नसेल... पण त्याची भाषा, कल्पनेची भरारी, भावनेची उत्कटता ... "

" खरंच ! आश्चर्य आहे. "

" मला ठाउक आहे, या बोलण्यानं मी इंग्रजांच्या भावनेला धक्का देत असेन... "

" तसं नाही " फिलिप म्हणाला " पण दोघांची तुलनाच होऊ शकत नाही. "

" ठाऊक आहे ! ... पण माझी आपली त्यावेळची जगावेगळी आवड सांगितली तुला. आज ती नाही. शेक्सपियर फार मोठा आहे ! "

" नाटकातलं स्वप्न पाहत असताना मला तर सारखं वाटत होतं की आपण एका मोठ्या स्वप्नातल्या स्वप्नातलं स्वप्न पाहत होतो. "

" म्हणजे ? " मी विचारलं.

" नाटकातल्या स्वप्नातली ती दोन जोडपी स्वप्नाला सत्य समजून वागत होती. ज्या नाटकात हे स्वप्न चाललं होतं, ते नाटक हे दुसरं स्वप्न— सत्याभास— ते पाहताना आपण प्रेक्षक ते सत्य आहे, असचं घटकाभर समजून

चालतो... अन् तादात्म्य पावतो. अन् तिसरं मोठं स्वप्न आपल्या प्रेक्षकांच्या आयुष्याचं. ज्यात नाटक पाहणं अन् तल्लीन होणं ही एक घटना... त्यातही आपण असेच रंगून जातो...तेही एक स्वप्नच. सारचं "Airy nothing!.. We give it a habitation and a name."

"सारी सृष्टीच स्वप्नवत् आहे निव्वळ सत्याभास असं आमचं ... एक तत्त्वज्ञान म्हणतं." ... मी.

"आमच्या कुठल्याच तत्त्वज्ञानानं हे सांगितलं नाही. मलाच आपलं हे जाणवतं. प्रत्येक घटना घडून गेल्यावर भूतकाळात गेली म्हणजे ती स्वप्न-वत् होते. नाही का? " म्हणजे आयुष्यात असे तो ते स्वप्न आहे हे कळायला नको" फिलिप म्हणाला.

"का कळू नये? स्वप्न पहात असतानासुद्धा हे स्वप्न पाहत आहो, अशी जाणीव जगताना ठेवली की झालं!"

"का! कशाला ठेवायची पण?" मी. आमची चर्चा मध्येंच थांबवीत अरुण म्हणाला; "जोपर्यंत ते स्वप्न सुखद, मधुर असेल, तोवर आयुष्य हे स्वप्न असलं तरी ते मला महत्त्वाचं वाटतं पण मला वाटतं आपली स्वप्न चर्चा इथे थांबवू या. भुयारी स्टेशन जवळ आलंय"

× × ×

शेक्सपिअरचं दुसरं नाटक पाहिलं ते स्ट्रॅटफर्डला. तेही एका अनपेक्षित योगायोगानं.

एखाद्या तीर्थाला जावं, तशी मी त्या ठिकाणी गेले होते. खरोखरच एखाद्या तीर्थाचंच महात्म्य शेक्सपियरच्या या जन्मस्थानाला प्राप्त झालं आहे. दरवर्षी लक्षावधी लोक जगाच्या कानाकोपऱ्यातून या नाट्यसम्राटाला आपली भावांजली अर्पण करण्यासाठी इथं दाटी करतात.

स्ट्रॅटफर्ड अपॉन एव्हन' ( 'ऑन' च्या ऐवजी 'अपॉन' हे अव्यय वापरण्याबद्दल इंग्रजांचा कटाक्ष आहे. ) हे लंडनपासून फारसं दूर नाही. अवघ्या तीन तासाची वाट. मी गाडीनं गेले अन एकटीच स्टेशनवर उतरले. गाव छोटसंच आहे. अठरावीस हजारांची वस्ती वाहनांची गरज नव्हती.

हातात नकाशा "होता. तो वाट दाखवीत होता. हे खरोखर" संताघराची वाट पुसत' चालणं होतं. मागे नाथांचं पैठण पाहयला गेले होते, त्याची आठवण झाली. त्यावेळी असंच काहीसं वाटलं होतं... नाथांचा तो एकसोपी वाडा. तिथलं देव घर, त्यातली द्वारकेच्या व्यापाऱ्यानं दिलेली अडिचविती मूर्ती, नाथांच्या घरी चाकरीला राहिलेल्या 'श्रीखंडया'च्या कावडीनं भरणारा तो रांजण. नाथांची टवाळी करणाऱ्यांचा तो 'कुटाळकट्टा,' एकवीसवेळा नाथांच्या अंगावर यवन थुंकला ती जागा, व एकवीसवेळा त्या शांतमूर्तीनं स्नान केलं .. तो वाळूचा गोदाकाठ, नाथषष्ठीच्या दिवशी गगनाला जाऊन भेदणारा वारकऱ्यांच्या दिंडीचा गजर. हे सारं पाहताना जसं मन भारावलं होतं, तसंच काहीसं आज वाटत होतं... नाथ हे संतकवी होते. संतकवींची अद्‌भुत प्रक्रिया फक्त भारतातच आहे. नाथांच्या आठवणींभोवती विस्मयतेचं, चमत्काराचं गूढ वलय श्रद्धाळू लोकांनी निर्माण केलंय. भावनेला भावुकतेची जोड दिलीय. शेक्सपियर हा नुसता कवी होता; पण जीवनाचा महान् भाष्यकार होता... त्याच्या आठवणीभोवती चमत्कृतींचं वलय नाही. पण विस्मयतेचं आहे. परंतु ते त्याच्या असामान्य प्रतिभेबद्दलच्या विस्मयाचं. त्या प्रतिभेनं दिपून जाऊन नाट्यप्रेमी यात्रेकरूंनी त्याच्या ह्या जन्मस्थानाची जणु वाराणशी बनवली आहे. तिथं येणारांची भावुकताही तीच आहे. इथं जागोजाग त्याची पावलं उमटली आहेत. त्याच्या जन्मगृहात भिरभिरणारी अडखळती चिमुकली पावलं, शाळेतली शाळकरी पोराची हूड, दांडगी पावलं, नाटकाच्या तंद्रीत अव्हॉन नदीकाठची पडलेली तरंगती, अधर पावलं, अन् वृद्धापकाळी पडलेली 'न्यू प्लेस' मधली संथ शिणलेली पावलं... पावलोपावली त्याच्या आठवणीच्या खुणा आहेत. पण स्ट्रॅटफर्डमधून भटकत असतांना नाथांचं पैठण किती उपेक्षित आहे, याची जाणीव होत होती. तिथल्या पडक्या वस्तू अन् कळाहीन, उजाड ठिकाणं पाहिली, म्हणजे ही उपेक्षा जाणवते ! नाथषष्ठीचा उत्सव सोडला. तर वर्षभर आमच्या नाथांची आठवण अनाथ राहते. उत्सव होतो तेव्हा दिंडीच्या गजरानं गोदाकाठ दुमदुमतो, काल्याच्या प्रसादाची मूठ हाती पडते; संबंधित लोकांच्या पोटापाण्याची सोय होते... पण एवढं होऊनही उपेक्षित राहतं ते तें ठिकाण. पण इथं इंग्रज लोकांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी

शेक्सपियरच्या सर्व आठवणी जतन करून ठेवल्या आहेत. 'शेक्सपियर' थिएटरच्या रूपानं, दरवर्षी चार महिने चालणाऱ्या त्याच्या नाटकाच्या रूपानं, तो त्यांनी जिवंत ठेवला आहे.

अलिकडे गेल्या तीस चाळीस वर्षांत अमेरिकेनं शेक्सपियरवर बरंच संशोधन केलं आहे. कॅलिफोर्नियातील 'हंटिंग्टन लायब्ररी' अन् वॉशिंग्टन मधली 'फॉल्जर शेक्सपियर लायब्ररी' ह्या दोन प्रचंड वाचनालयांत शेक्सपियर-वरील ग्रंथांचा अद्वितीय संग्रह आहे. त्यामुळे इतर देशांपेक्षा अमेरिकन प्रवाशांची गर्दी इथे सर्वांत अधिक आढळते.

मी गेले त्यादिवशी अशा प्रवाशांच्या चार मोठाल्या बसेस अधीच येऊन थडकल्या होत्या. सारं गाव या प्रवाशांनी गजबजून गेलं होतं. आल्यावर यात्रेकरूंचे पाय प्रथम वळतात ते शेक्सपियरच्या जन्मस्थानाकडे. 'बर्थप्लेस'



**शेक्सपियरची जन्म-वास्तु-' बर्थ-प्लेस '**
**स्ट्रॅटफोर्ड**

हेच नाव त्याला दिलेलं आहे. हे एक लहानसं दुमजली घर... सोळाव्या शतकातलं. हे लाकडी घर आपल्या इकडच्या वऱ्हाडी खेड्यातील घराप्रमाणे वाटतं. छताच्या म्याली काळवंडल्या आहेत. घराची मूळ दगडी फरशी फुट-

लेली आहे. लाकडाच्या भिंती अन् मधलं छप्पर मूळचंच होत. 'फायर प्लेसेस' हि तशाच ठेवल्या होत्या. परंतु तिथं मांडून ठेवलेली भांडी मूळ नाहीत; त्या काळची आहेत. भिंतीवर ह्या बर्थप्लेसची एक दोन चित्रं होती. जिना चढलो. माडीवर ज्या खोलीत शेक्सपियर जन्मला तिथे, एक पलंग अन् लाकडी पाळणा आहे. पण हा पाळणा आपल्या इकडच्या सारखा नाही. चाक नसलेल्या बाबागाडीसारखा आहे. तो पाहून मी गाईडला विचारलं :

"यात तान्हा शेक्सपियर निजत असे का?,,

"नाही" त्यानं उत्तर दिले... "पण हा तसाच तात्कालीन दुसरा पाळणा आणून ठेवलाय् मुद्दाम ... त्याकाळच्या फर्निचरची कल्पना देण्यासाठीं." इथल्या बहुतेक वस्तू मूळ नाहीत. फक्त शेक्सपियरचं शाळेतलं लाकडी 'डेस्क' तेवढं मूळचं आहे... ते शेजारच्या खोलीत होत. त्याला चिरा पडल्या होत्या;. एखाद्या पवित्र वस्तुकडे पहावं अशा भावानं येणारे-जाणारे प्रवासी त्याकडे बघत होते. मोठ्याच्या छोट्या गोष्टीही मोठ्या बनतात... मोठ्यांच्या स्पर्शाची ही किमया. शेक्सपियरच्या शाळेत एवढी ' डेस्कं ' असतील ... पण एकाचंच भाग्य असं उजळलं!

जिना उतरून खाली आलं की मागच्या आवारात असलेल्या प्रचंड विस्तीर्ण बागेत प्रवेश होतो. बागेच्या भिंतीला लागून एक प्रचंड स्मारकगृह बांधलं जात होतं. शेक्सपियरची ४०० वी जन्मतिथी १९६४ साली साजरी व्हावयाची होती, त्यासाठी तयारी होती.

शेक्सपियर ज्या जागी आयुष्याच्या उत्तरार्धात राहयला गेला व मरण पावला, ते एक दुसरं ठिकाण-'न्यू प्लेस' -जवळच होते. इथच त्याने आपली बहुतेक नाटकं लिहली, म्हणतात. पण आज ही वास्तू नाही. नुसता पाया शिल्लक आहे... अन् शेक्सपियरची बाग. थोड पुढे गेली की रोडकी ॲव्हन नदी.तिच्या काठचा विस्तीर्ण 'बँक्रॉफ्ट' बगीचा... त्यात गॉवर स्मारक आहे. स्मारकाच्या चारी भिंतीवर शेक्सपियरच्या नाटकातील कांही ओळी कोरलेल्या आहेत अन् चार कोपऱ्यात हॅम्लेट, लेडी मॅकबेथ, फॅालस्टाफ आणि प्रिंस हाल या चार पात्रांचे पुतळे आहेत. लहानसहान गोष्टीना सुबक बनवून त्यांना सांभाळण्याची, प्रेक्षणीय बनविण्याची इंग्रजांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. ह्या बँक्राफ्ट बगीचात...एव्हन नदीच्या काठी शेक्सपियर थिएटर

उभं होतं. त्याची पडछाया नदीच्या पाण्यात पडली होती. नदीत बोटी सोडल्या होत्या. सुंदर पांढरी बदकं श्वेत–कमलासारखी पाण्यावर तरंगत होती.

या नदीच्या दुसऱ्या तिरांवर हिरव्यागार वृक्षांच्या गर्द झाडीतून ट्रिनिटी चर्च डोकावीत होतं. इथं शेक्सपियरच्या जन्माची नोंद आहे... (विवाहाची नोंद आहे.)अन् तिथेच त्याची समाधी आहे.

पण जगावर प्रभुत्व गाजविणाऱ्या या असामान्य माणसाची समाधी अगदी साधी सामान्य आहे. सगळ्या मोठेपणाचा अंत होतो तो ह्या साडे-तीन हात जागेतल्या मातीत! तिच्यापुढे माणसाचा सारा अहंकार गळून पडतो.

गेली सतत चारशे वर्षं आपल्या असामान्य प्रतिभेनं साऱ्या जगाला भुरळ पाडणारा, ह्या चिमुकल्या अप्रसिद्ध खेड्यातलं सामान्य जीवन जगणारा हा माणूस. पण मी मी म्हणणारे टीकाकार अन् विद्वान संशोधक, आकाशाला गवसणी घालू पाहणारे कवी, नटश्रेष्ठ अन् कलावंत, अनेक भाषाप्रभू अन् कला तज्ञ, याच्या अफाट शब्दभांडारातून मोती वेचत आहेत. त्याच्या शब्दांच्या ओळींचा अर्थ लावीत आहेत. त्याची मोजमाप करीत आहेत...पण अजून तो एकालाही धड गवसला नाही. त्या प्रतिभावंताला मी मनोमन नमस्कार केला.

हा एवढा मोठा माणूस कसा दिसत असेल? याचा फक्त एकच पुरावा आज शिल्लक आहे. तो म्हणजे त्याच्या समाधीसमोर एका कोनाड्यात ठेवलेला जिरार्ड जॉन्सननं केलेला अर्धपुतळा. आज शेक्सपियरचं जे एकमेव छायाचित्र उपलब्ध आहे, ते या पुतळ्यावरून केलेलं. ह्या असामान्य माणसाचं आयुष्य कसं गेलं असेल? याचीही खात्रीलायक माहिती नाही. आहे ती अपुरी, त्रुटित. त्यातून त्याच्या आयुष्यासंबंधी कयास बांधायचे, सिद्धांत अन् त्यावर प्रतिसिद्धांत मांडायचे. मग त्यातून वादाचा धुरळा उडतो. दंतकथांना फावतं.

त्यामुळ स्ट्रॅटफर्डमधून हिंडताना, शेक्सपियरचं जन्मस्थळ पाहताना, समाधीपाशी उभं राहताना, मधूनच अनेक प्रश्न मनात डोकं वर काढत होते. एवढी अप्रतिम नाटकं लिहिणाऱ्या ह्या माणसानं 'शार्लकोट' पार्कातलं हरीण खरोखरच चोरलं असेल का? उदात्त वैवाहिक प्रेमाची थोरवी आपल्या नाटका-तून गाणाऱ्या या नाटककारानं स्वतःच्या पत्नीसाठी मात्र "सेकंड बेस्ट बेड" तेवढा मृत्युपत्रातून द्यावा, तो का? उच्च शिक्षणाचा लाभ न झालेला हा

लेखक, त्याच्या नाटकात आढळणारं एवढं ज्ञान अन् तत्त्वज्ञान कुठे व कसा संपादन करू शकला ? की ही नाटकं त्यानं लिहलीच नाहीत, दुसऱ्या कुणी लिहिली ? इत्यादी प्रश्न मनाला खड्यासारखे बोचत होते.

पण सामान्य रसिक मनाला ते फार काळ मानवत नाहीत. ते तात्काळ हे खडे निवडून त्यांना बाजूला फेकतं. ह्या प्रश्नांवर उहापोह करणं पंडितांचं, प्राध्यापकांचं, विद्वान् संशोधकांचं काम. मला ती उठाठेव कशाला? ती करणं नाट्यप्रेमी माणसाच्या रक्तात नाही. त्याला नाटकं पाहयची असतात. नाटकातील काव्याचा रस चाखायचा असतो. त्यातलं शब्दसौंदर्य न्याहाळायचं असतं. त्यातील नाट्य अनुभवायच असत. शेक्सपियर कुणी का असेना, कसा का दिसेना, कसा का असेना. त्याच्यापेक्षा त्याची पत्नी आठ वर्षांनी किंवा अठराही वर्षांनी मोठी का असेना तो इथं जन्मला अन् या देशाला अन् जगाला अफाट नाट्यसंपदा देऊन गेला, एवढं सत्य त्याला डोक्यावर घेऊन नाचायला पुरे होतं.

अन् जगातील नाट्यप्रेमी लोक वर्षानुवर्षे तेच करीत आहेत. दरवर्षी त्याच्यावर नितांत प्रेम करणारे त्याचे स्वदेशी बांधव त्याच्या नाटकाचा उत्सव करतात. त्यासाठी जगातील नाट्यप्रेमी रसिकांचा, शेक्सपिअर भक्तांचा मेळावा जमतो. या उत्सवाची परंपरा जुनी आहे. त्यात ब्रिटनचे सारे नामवंत नट राल्फ रिचर्डस्न, सर अलेक गिनेस, सर लॉरेन्स ऑलीव्हियर, डेम सिबिल थॉर्नडाईक, जॉन गिलगुड, मायकेल रेडग्रेव्ह—आपली सेवा आजवर इथं प्रविष्ट करून गेले आहेत.

शेक्सपियरचं खरं स्मारक आज एव्हन नदीच्या काठी डौलानं उभं होतं. तिथं मी पावलं वळवली. या उत्सवात तिथे त्याच्या नाटकाचे दररोज तीन तीन प्रयोग होतात. त्यासाठी दोन दोन महिने आधीपासून तिकिटं राखून ठेवावी लागतात. आयत्यावेळी माझ्यासारख्या अज्ञात वाटसरूला तिथे कसा काय प्रवेश मिळायचा ? पण नशिबानं हात दिला. कुणा एकाचं राखून ठेवलेलं भारी किमतीचं तिकिट तो न आल्यामुळे मला आयत्या वेळी मिळालं. खिशातले बहुतेक पैसे संपले.पण पैशाची किंमत करण्याची ती वेळच नव्हती. मी आत गेले. नाटक सुरुं होऊन गेलं होतं.

'टेम्पेस्ट' नाटकाचा प्रयोग होता. थोडासा विरस झाला. हे 'टेम्पेस्ट'-

ही मला कधीच आवडलं नव्हतं. इथं पऱ्या नव्हत्या. पण एरियल, कॅलिबन हे अतिमानवी, अमानवी प्राणी होते. जादूटोणे होते, जादूच्या जोरावर समुद्रावर उठलेल्या वादळाचे चमत्कार होते.. त्यात फर्डिनाड मिरांडा यांचं प्रेम, पॉस्पेरोवर त्याच्या दुष्ट भावानं केलेला अन्याय, एकाकी बेटावरचा त्याचा एकांतवास, ह्या मानवी भावना पार्श्वभूमीतच राहत होत्या.

पण प्रेक्षक तल्लीन झाले होते ... काही नटाबरोबर नाटकातल्या ओळी पुटपुटत होते, गुणगुणत होते. नट जीव ओतून काम करीत होते....छतावरून हंड्या-झुंबरं लोंबत होती. रंगमंचावरील प्रकाशात चमकत होती. आजूबाजूस सुंदर सोनेरी नक्षीकाम होतं .... पण रंगमंचावरील अधिक जिवंत कलेकडे प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं.

थिएटरला लागून एक संग्रहालय होतं. त्यात शेक्सपियरच्या नाटकांतून कामं केलेल्या नामवंत नटनटींची त्याच्या वेषातली चित्रं, हॅम्लेटचे पोशाख, वेगवेगळ्या नटांनी वापरलेल्या तलवारी, खंजिरं, भाले, पायतणं सारीं मांडून ठेवली आहेत. ते पाहून आपल्या थोर नटांचे दुर्भाग्य जाणवलं. आपल्याकडेही कला आहे. महान नटांची परंपरा आहे ... जुने तर सोडाच. पण आपले नवे नटही तसूभर कमी नाहीत .... पण आपल्याला विस्मृतीचं वरदान आहे, त्यात जुनं नाहीसं झाल आहे.

पण या देशानं मात्र आपला शेक्सपियर असा जतन करून ठेवला आहे. जगद्विख्यात नाटककाराला जन्म दिल्याचा अभिमान हे चिमुकलं खेडं बाळगून आहे. अन् त्याच्या पुण्याईवर जगत आहे. प्रवाशांसाठी उघडलेली हॉटेलं अन् 'शेक्सपियर–सूव्हिनीर्स' विकणारी दुकानं, यावरच बहुतेकांचा चरितार्थ चालतो... या हॉटेल–दुकानांच्या दुतर्फा ओळीतून वाट काढीत मी गावाचा निरोप घेत होते. मन भारावलं होतं, खिन्न झालं होतं.

रात्र पुढे सरकत होती.... रात्रीच्या गाडीनं परतायचं होतं. मी स्टेशनची वाट धरली.

पण जाताजाता पुन्हा एकदा या ठिकाणचं शेवटचं दर्शन घेतलं. ते घेताना आयुष्यांतील जन्ममृत्यू, सुखदुःख समान लेखायला शिकवणाऱ्या एका थोर माणसाचाच आपण निरोप घेतोय, असं वाटलं. तो मला सांगत होता:

'Men must endure
Their going hence,
Even as their coming hither
Ripeness is all.

× × ×

लंडनच्या मुक्कामात शेवटी "Oh ! what a Lovely War !" हे एक संगीत नाटक पाहिल...शीर्षक चमत्कारिक पण आकर्षक होतं. पहिल्या महायुद्धावरचं चार्लस चिल्टन या लेखकाचं हे नाटक 'थिएटर वर्कशॉपने' सादर केल होतं. आजकाल दुसऱ्या महायुद्धाच्या प्रचंडतेपुढे आणि भीषणतेपुढे पहिल्या महायुद्धाची भयानकता फिकी पडते...परंतु यात झालेला मानव-संहार किती अमानुष व अकल्पित होता, हे या नाटकात दाखवलं आहे.

या नाटकाची जन्मकथा फारच मनोरंजक आहे. लेखक चिल्टन याचा बाप पहिल्या महायुद्धात मारला गेला होता. एका सुटीत लेखक फ्रान्स मध्ये असलेल्या आपल्या आजीला भेटायला गेला. असताना, तिनं त्याला वडिलाच्या (तिच्या मुलाच्या) समाधीचा फोटो कोठून आणायचा सांगितल. आरास ह्या विभागात युद्धात मारल्या गेलेल्या असंख्य सैनिकांची थडगी होती. तिथे हिंडत असताना लेखकाला एके ठिकाणी त्याच्या वडिलांचं नाव दिसलं... परंतु हे स्वतंत्र थडगं नव्हतं...सीमेंटची एक भिंत उभारली होती. तीवर सुमारे चाळीस हजार मृत सैनिकांची नावं होती. त्यातच त्याच्या वडिलांच नाव होतं.

इतक्या असंख्य लोकांना एकत्र का पुरलं जावं ? प्रत्येकाला स्वतंत्र समाधी का मिळू नये? कोणतं भीषण नाट्य ह्या ठिकाणी दडलं होत ? या प्रश्नांची उत्तरं शोधत असताना जी माहिती लेखकाच्या हाती आली त्यातून हे नाटक जन्माला आलं.

लेखकानं या नाटकासाठी अखंड परिश्रम घेतले. गेल्या महायुद्धात लढणाऱ्या दोन्ही पक्षाच्या जर्मनी, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आदी राष्ट्रांतील लष्करी रेकॉर्डस, सरकारी कागद-पत्रं, प्रकाशित अप्रकाशित असं सारं युद्ध-साहित्य, लष्करी संग्रहालयांतील ( War Museums ) दप्तरं, व्यक्तिगत

आठवणी, त्याकाळचे वृत्तपत्रीय लेख, युद्धभूमिवर लढणाऱ्या कित्येक अज्ञात सैनिकांनी रचलेली गाणी... इत्यादी प्रचंड साधनसामुग्री लेखकानं या नाटकासाठी गोळा केली.

१९६० साली एका अमेरिकन 'लष्करी संशोधन तुकडी' ने पहिल्या महायुद्धासंबंधी गोळा केलेली ही सारी लेखन साधनसामुग्री "इलेक्ट्रिक कंप्यूटर्स" ना भरवली. ( संभाव्य तिसऱ्या महायुद्धासंबंधीची आकडेमोड करण्यासाठी हे 'कंप्यूटर्स' वापरले जात असत. ) या कंप्यूटर्समधून बाहेर आलेले निष्कर्ष भयानक आहेत. ते असे की पहिलं महायुद्ध घडणं अशक्य कोटितलं असायला हवं होतं. या युद्धात जितक्या घोडचुका झाल्या, तेवढ्या एरवी घडणंच असंभव आहे आणि त्यात रणभूमीवर पडलेल्यांची संख्या इतकी जबरदस्त असणंही शक्य नाही.

या नाटकात, या महायुद्धात सत्तापिपासू नेत्यांनी केलेल्या घोडचुका, त्यापायी हकनाक प्राणाला मुकणारे असंख्य सैनिक, संकटाच्यावेळी देशाच्या साह्यार्थ धावून येणाऱ्या स्त्रिया, त्याच संकटाचा फायदा घेऊन स्वतःची पोळी पिकवणारे भावना-शून्य व्यापारी, या साऱ्यांचं प्रभावी चित्रण होतं.

"या नाटकात दाखवलेली प्रत्येक घटना ही खरी आहे. यात म्हटलेला शब्द न शब्द हा १९१४ ते १८ च्या काळात कुणी न कुणी म्हटलेला, लिहिलेला अगर गायिलेला आहे, असा निर्वाळा लेखकानं दिला आहे.

या नाटकाला घट्ट विणीचं असं कथानक नव्हतं- नायकनायिका नव्हते. नाटक म्हणण्यापेक्षा ती एक वास्तु-रूपक डॉक्युमेंटरी होती. वेगवेगळ्या प्रसंगांतून, सुटसुटीत संवादांतून, लहानलहान दृश्यातून, गाण्यांतून, नृत्यांतून, पहिल्या महायुद्धाची करुण-भीषण कहाणी परिणामकारकरितीनं सांगितली जात होती. रंगभूमीवर समोर प्रसंग घडत होते अन मागच्या पडद्यावर दररोज किती माणसं मारली गेली, यांचे विजेरी आकडे सरकत होते.

'म्यूझिकल कॉमेडी, पाहयच्या अपेक्षेने थिएटरात शिरलो होतो.... पण बाहेर पडलो ते एक भीषण नाट्य पाहिल्यासारखे हबकून. शेवटी व्हर्सायचा तह होतो...युद्ध संपतं, अन् सर्वत्र आनंदी आनंद होतो...सैनिक गाऊ लागतात. म्हणून ही सुखान्तिका म्हणायची एवढच काय ते. लक्षावधी निष्पाप लोकांची अमानुष हत्या कशी होते, दोन चार सत्ताधारी लोकांच्या किंवा

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चुकांच्या पायी आणि खोट्या स्वाभिमानाच्या आणि जयपराजयाच्या भ्रामक समजुतीपायी माणसं तर नष्ट होतात... पण उभीच्या उभी राष्ट्रंही नष्ट होतात, हा विचार मनाला बराच वेळ अस्वस्थ करीत राहिला.

रेमंड फ्लेचर या लेखकानं या नाटकावर अभिप्राय देताना लिहिलंयः

"(गेल्या महायुद्धातील घटनावरून) एक धडा शिकण्यासारखा आहे. १९१४ पूर्वी लोकांचा असा विश्वास होता, की जगात शांतता राखू शकेल तो "सत्तेचा समतोल" (Balance of power) आज त्यांना वाटत आहे, की 'भितीचा समतोल(Balance of Terror) ती राखू शकेल...परंतु (गेल्या महायुद्धाप्रमाणे) अपघात, घटनांचे चुकीचे ठोकताळे...अथवा आपसातील अपसमज ह्या गोष्टी आजही शक्य आहेत...अन् आजचं अणुयुद्ध गेल्या महायुद्धाच्या चार वर्षात जितके लोक ठार झाले तितके चार तासात करू शकेल."

असं हे नाटक प्रभावी ठरावं, यात नवल ते कसलं?

# ११

बाबीसीचं काम संपायला आलं. आता दिवस रेंगाळणार होते. नुसत्या भटकण्यात फार काळ मौज नाही. " ऑल प्ले अँड नो वर्क" हे एकंदरीत कठीणच काम आहे म्हणून आरामात गंमत आहे. नुसती स्थळं बघण्यासाठी राहायचं तर लंडनमध्ये आठवड्याच्यावर कंटाळवाणं व्हावं.

३० जुलैला शेवटचा "वीमेन्स ऑवर" उरकला. अन् बी. बी. सी. च्या विजेरी पाळण्यानं मला सातव्या मजल्यावरून खाली आणून टाकलं. त्याचवेळी वाटलं, आता आपलं बी. बी. सी. चं नातं तुटलं. समोरासमोर उभ्या असलेल्या तिच्या दोन्ही उंच इमारती मला परक्या दूरस्थ वाटू लागल्या. त्यात ओळखीचे चेहरे काम करीत होते, पण त्यांची ओळख झाल्यासारखी वाटत नव्हती. आता आमच्या जागी दुसरे विद्यार्थी येऊन बसले होते अन् शिक्षक त्यांच्यात तितकेच गर्क झालेले होते होते. आम्ही जणू काहीच मागे ठेवलं नव्हतं. समोरच्या 'ऑलसोल्स' वर काही काळ नजर रेंगाळत राहिली. आता लंडनमध्ये असेतो पुन्हा त्यांच्या दिशेनं फिरायचं नव्हतं. इथल्या माणसापेक्षा त्यांच्याबद्दलच अधिक आत्मीयता वाटत होती.

पण माणसांच्या आत्मीयतेचाही अनुभव यायचा होता. लवकरच. त्याच संध्याकाळी. ती संध्याकाळ मी सुशीला वहिनीकडे घालवली. अण्णांना बरं नव्हतं. पायावर ब्लँकेट घेऊन ते शेगडीसमोर बसून होते. चहा, जेवण, गप्पा, टी. व्ही. यात अकरा वाजले. आज अरूण ऑफिसातून परभारा क्रिकेट खेळायला जाणार होता. म्हणून साडेअकराला विजूबंडीनं घरी आणून सोडलं, पण घरी आल्यावर वेगळच ताट वाढून ठेवलं होतं.

दाराशीच खालचं स्मिथ जोडपं माझी वाट पाहत होतं. आत शिरताच मि. स्मिथ सामोरे आले, किंचित घुटमळले अन् अडखळत म्हणाले,

"सॉरी' तुम्हाला एक वाईट बातमी द्यायची आहे."

माझ्या पोटात धस्स झालं.

"तुमच्या मुलाला अपघात झालाय. पोलीस दोन तीनदा येऊन गेले."

"कुठेय तो?" मी कसंबसं विचारलं.

"चेरिंग क्रॉस दवाखान्यात."

"पण अपघात कसा झाला?"

"काहीच ठाऊक नाही त्यांना. चेरिंग क्रॉस पोलीस स्टेशनवरून त्यांना फोनवरून बातमी मिळाली. अन् तुमचा पत्ता देऊन ती तुम्हाला कळवायला सांगितलं."

मला काही सुचेना. मध्यरात्रीची वेळ. मी एकटी.

"हा फोन नंबर दिलाय. तिथं पत्ता लागेल, मला वाटतं." मि. स्मिथ म्हणाले.

फोन करायचा म्हणजे घरापासून दोन फर्लांग चालून जायला हवं. तिथं पब्लिक टेलिफोन होता. मी उठून दाराकडे वळले तेवढ्यांत सौ. स्मिथ म्हणाल्या.

"कशाला? आमचा टेलिफोन वापरा ना. या आत."

तिनं आत नेलं. एक महिन्याच्या तान्ह्याला छातीशी धरून ती शेजारी उभी राहिली. स्मिथनं खुर्ची दिली. बधिर मनानं मी फोन उचलला. तो काही केल्या लागेना. पाच मिनिटानंतर लागला.

" मी अमुक अमुक, अमक्या ठिकाणाहून बोलतेय... माझ्या मुलाला अपघात झाल्याचं पोलीसांकडून आत्ताच कळलं. कशीय् त्याची प्रकृती?"

" कुठल्या वार्डात आहे?" पलिकडून स्त्रीच्या आवाजात प्रश्न आला.

" मला ठाऊक नाही... नुसता अपघात झाल्याचं कळलं."

" जरा थांबा हं ..." दुसऱ्या ठिकाणी तिनं फोन जुळवला.

" हॅलो, केझुअल्टी डिपार्टमेंट."

" मी अमुक अमुक." पुन्हा तोच सारा मजकूर.

" ह्या वार्डात शेवडे नावाचा कुणी नाही..."

" पण तुमच्या दवाखान्यात त्याला ठेवल्याचं पोलिसांनी सांगितलं..."

" जरा थांबा हं ! दुसऱ्या वार्डात बघते... "

" हॅलो ? काय पाहिजे ? " दुसरा वार्ड.

पुन्हा तीच वाक्यं. शेवटी मला ती पाठ व्हायला आली. पंधरा मिनिटं असच चाललं होतं.

" काय नाव म्हणालात ?

" अरुण शेवडे. "

" ते नाव ठाऊक नाही. पण शोरी नावाचा एक पेशंट नुकताच कॅझ्युअल्टीतून आलाय इथं. "

" मग तोच. कसला अपघात झालाय त्याला ?

" त्याच्या स्कूटरची लॉरीशी टक्कर झाली.

" हरे राम ..."

" पार्डन, काय म्हणालात ? "

" माय गॉड, म्हटलं मी ! मला बोलता येईल का त्याच्याशी ? "

" सॉरी. तो मघाशी शुद्धीवर आला, पण आता त्याला झोपेचं औषध दिलंय. "

" मी येऊन पाहून जाऊ का ? "

" कशाला इतक्या रात्री ? त्यापेक्षा उद्या सकाळी दहाला या. "

" कोणता वार्ड ? "

" जॉर्ज वॉर्ड ... "

" पण... "

" गुड नाईट... अँड डोन्ट वरी डियर...स्लीप वेल. "

दुसऱ्या टोकाहून उत्तर आलं.

फोनला तब्बल वीस मिनिटं लागली- स्मिथ जोडपं शेजारी उभं होतं ...मी घुटमळत विचारलं,

"आणखी एक फोन करू का ?" " खुश्शाल करा...काही अनमान करू नका. आजच नव्हे तर पुढेही ...जरूर लागेल तेव्हां आमचा फोन खुशाल वापरा."

मी वहिनींना फोन केला...ती मंडळी झोपून गेली होती.

"उद्या सकाळी दहाला पोचायचय... अन् मला ठाऊक नाही दवाखाना!"

"तू इथ ये आठाला...आपण जाऊ...अन् काळजी करू नकोस." वहिनींनी धीर दिला, पण परका मुलख, मी एकटी, अन् हा प्रसंग! रात्रभर बिछान्यावर पडून होते. डोळ्याला डोळा लागला नाही. लंडनच्या एवढ्याशा मुक्कामात तिथल्या वैद्यकीय खात्याशी संबंध येईल अशी कल्पना नव्हती. तो योग अरूणनं असा आणला.

दुसरे दिवशी सकाळी आठला वहिनींकडे गेले. वहिनींचीही धड झोप झालेली दिसत नव्हती. त्या स्वयंपाकघरात खुडबूड करीत होत्या. माझ्या समोर प्लेट ठेवीत त्या म्हणाल्या,

'ब्रेकफास्ट केली नसशीलच...रिकाम्या पोटी डोकं चालत नाही."

तेवढ्यात बंडी तयार होऊन खाली आला.

"अण्णा अजून माडीवरून उतरले नाहीत. काल बरं नव्हतं... तशात ही बातमी. बंडी आपल्याला गोल्डर्स ग्रीन स्टेशनवर मोटारीने सोडून देईल... तिथून गाडीनं गेलो तर लवकर पोचू..." वहिनी म्हणाल्या.

सकाळच्या प्रहरी सेंट्रल लंडनचे रहदारीनं तुंबलेले रस्ते माझ्या नित्याच्या परिचयाचे होते.

आम्ही गाडीनं स्ट्रँड स्टेशनावर गेलो. तिथून पाच पंचवीस पावलावर समोरच्या बोळात चेरिंग क्रॉस हॉस्पिटल होतं. इमारत जुनीच होती. हे मोठ्यापैकी इस्पितळ होतं. इस्पितळाचं राष्ट्रीकरण झाल्यामुळे हे सगळे दवाखाने सरकारी अधिकारात चालतात. आत गेलो. समोरच्या कठड्याशी 'रिसेप्शनिस्ट' बसलेली दिसली, तिच्यासमोर लोक बारीनं उभे होते. कुणी आपल्या पेशंटसाठी फुलांचे गुच्छ देऊन जात होते... कुणी चिठ्या-चपाट्या समोर सरकवीत होते. भेटायला येणाऱ्या आम्हीच तेवढ्या होतो.

आम्ही भेटायला येण्याचं कारण सांगितलं तेव्हा तिनं आपल्या रजिस्टरातली नोंद पाहिली अन् म्हटलं,

"जॉर्ज वॉर्ड, चौथा मजला, समोर कॉरिडॉरमध्ये लिफ्ट आहे. कालच ॲडमिट झालाय ना?"

"हो"

"पण सकाळी भेटायची वेळा नसते. संध्याकाळी सहा ते आठच्या दरम्यान भेटू शकाल तुम्ही."

"पण काल रात्री फोनवर मला सकाळी दहाला यायला कसं सांगितलं? मी पेशंटची आई आहे."

"मी वार्डातल्या डॉक्टरजवळ चौकशी करते. तवर तुम्ही समोरच्या बाकावर बसा," असं म्हणत तिनं तोंडाला फोन लावला.

आम्ही बाकावर वाट पाहत बसलो. सकाळ पुढे सरकली होती अन इस्पितळ दिवसभराच्या रामरगाड्यासाठी ताजतवानं होत होतं. डाव्या भागांत बहुतेक कँटिन असावं ... कारण तिथून सारखी ये-जा चालू होती. प्रत्येक वेळी तिथलं दार उघडले गेलं, की कपबशांचा किणकिणाट अन् नर्सेसचा किलबिलाट कानावर येत होता. डोक्याला कडक रूमालांचे तुरे अन् तऱ्हेत-ऱ्हेच्या झालरी लावून, बुटाचा कडकडाट करीत नर्सेस इथून तिथे फिरत होत्या. मधूनच बाहेरच्या दारातून हाउस-कोट घातलेले विद्यार्थी-डॉक्टरांचे थवे आत येत होते अन समोरच्या कॉरिडॉरमध्ये गुप्त होत होते. ढकल-गाड्यांतून सामानाची ने आण चालली होती. फरशा पुसल्या जात होत्या.

पंधरा-वीस मिनिट निघून गेली... आमची चुळबुळ पाहून रिसेप्शनिस्टनं वार्डाला पुन्हा फोन लावला.

"मोठे डॉक्टर वार्डात फेरी घालताहेत. डॉ. कोलमन त्यांच्याबरोबर आहेत. ते मोकळे झाले, की पुन्हा फोन करते."

पुन्हा पंधरा मिनिटं गेली ... पुन्हा फोन झाला.

"अजून डॉक्टरांचा राऊंड संपला नाही, पण डॉ. कोलमन स्वतः तुमच्याशी बोलायला खाली येताहेत."

त्यानंतर पांच मिनिटांनी हाउस कोटातला एक पोरगेलासा तरूण समोर येऊन उभा राहिला. मला वाटलं एखादा हाउस-डॉक्टर असावा. आम्ही उठलो.

"पेशंटची आई कोणती?"

"मी आहे." मी पुढे होत म्हटलं.

"तुम्ही?" त्याच्या सुरात अविश्वास होता, पण त्याचा अर्थ लावण्याच्या भानगडीत मी पडले नाही.

"कशीय त्याची प्रकृती?"

"अजून काही सांगता येत नाही. मोठे डॉक्टर राऊंड घेताहेत अजून."

"तू इथ ये आठाला...आपण जाऊ...अन् काळजी करू नकोस." वहिनींनी धीर दिला, पण परका मुलुख, मी एकटी, अन् हा प्रसंग! रात्रभर बिछान्यावर पडून होते. डोळ्याला डोळा लागला नाही. लंडनच्या एवढ्याशा मुक्कामात तिथल्या वैद्यकीय खात्याशी संबंध येईल अशी कल्पना नव्हती. तो योग अरुणनं असा आणला.

दुसरे दिवशी सकाळी आठला वहिनींकडे गेले. वहिनींचीही धड झोप झालेली दिसत नव्हती. त्या स्वयंपाकघरात खुडबूड करीत होत्या. माझ्या समोर प्लेट ठेवीत त्या म्हणाल्या,

'ब्रेकफास्ट केली नसशीलच...रिकाम्या पोटी डोकं चालत नाही."

तेवढ्यात बंडी तयार होऊन खाली आला.

"अण्णा अजून माडीवरून उतरले नाहीत. काल बरं नव्हतं... तशात ही बातमी. बंडी आपल्याला गोल्डर्स ग्रीन स्टेशनवर मोटारीने सोडून देईल... तिथून गाडीनं गेलो तर लवकर पोचू..." वहिनी म्हणाल्या.

सकाळच्या प्रहरी सेंट्रल लंडनचे रहदारीनं तुंबलेले रस्ते माझ्या नित्याच्या परिचयाचे होते.

आम्ही गाडीनं स्ट्रँड स्टेशनावर गेलो, तिथून पाच पंचवीस पावलावर समोरच्या बोळात चेरिंग क्रॉस हॉस्पिटल होतं. इमारत जुनीच होती. हे मोठ्यापैकी इस्पितळ होतं. इस्पितळाचं राष्ट्रीकरण झाल्यामुळे हे सगळे दवाखाने सरकारी अधिकारात चालतात. आत गेलो. समोरच्या कठड्याशी 'रिसेप्शनिस्ट' बसलेली दिसली, तिच्यासमोर लोक बारीनं उभे होते. कुणी आपल्या पेशंटसाठी फुलांचे गुच्छ देऊन जात होते... कुणी चिठ्या-चपाट्या समोर सरकवीत होते. भेटायला येणाऱ्या आम्हीच तेवढ्या होतो.

आम्ही भेटायला येण्याचं कारण सांगितलं तेव्हा तिनं आपल्या रजिस्ट-रातली नोंद पाहिली अन् म्हटलं,

"जॉर्ज वॉर्ड, चौथा मजला, समोर कॉरिडॉरमध्ये लिफ्ट आहे. कालच ॲडमिट झालाय ना?"

"हो"

"पण सकाळी भेटायची वेळा नसते. संध्याकाळी सहा ते आठच्या दरम्यान भेटू शकाल तुम्ही."

"पण काल रात्री फोनवर मला सकाळी दहाला यायला कसं सांगितलं? मी पेशंटची आई आहे."

"मी वार्डातल्या डॉक्टरजवळ चौकशी करते. तवर तुम्ही समोरच्या बाकावर बसा," असं म्हणत तिनं तोंडाला फोन लावला.

आम्ही बाकावर वाट पाहत बसलो. सकाळ पुढे सरकली होती अन इस्पितळ दिवसभराच्या रामरगाड्यासाठी ताजतवानं होत होतं. डाव्या भागांत बहुतेक कँटिन असावं ... कारण तिथून सारखी ये-जा चालू होती. प्रत्येक वेळी तिथलं दार उघडले गेलं, की कपबशांचा किणकिणाट अन् नर्सेसचा किलबिलाट कानावर येत होता. डोक्याला कडक रूमालांचे तुरे अन् तऱ्हेत-ऱ्हेच्या झालरी लावून, बुटाचा कडकडाट करीत नर्सेस इथून तिथे फिरत होत्या. मधूनच बाहेरच्या दारातून हाउस-कोट घातलेले विद्यार्थी-डॉक्टरांचे थवे आत येत होते अन समोरच्या कॉरिडॉरमध्ये गुप्त होत होते. ढकल-गाड्यांतून सामानाची ने आण चालली होती. फरशा पुसल्या जात होत्या.

पंधरा-वीस मिनिट निघून गेली... आमची चुळबुळ पाहून रिसेप्श-निस्टनं वार्डाला पुन्हा फोन लावला.

"मोठे डॉक्टर वार्डात फेरी घालताहेत. डॉ. कोलमन त्यांच्याबरोबर आहेत. ते मोकळे झाले, की पुन्हा फोन करते."

पुन्हा पंधरा मिनिटं गेली ... पुन्हा फोन झाला.

"अजून डॉक्टरांचा राऊंड संपला नाही, पण डॉ. कोलमन स्वतः तुमच्याशी बोलायला खाली येताहेत."

त्यानंतर पांच मिनिटांनी हाउस कोटातला एक पोरगेलासा तरूण समोर येऊन उभा राहिला. मला वाटलं एखादा हाउस-डॉक्टर असावा. आम्ही उठलो.

"पेशंटची आई कोणती?"

"मी आहे." मी पुढे होत म्हटलं.

"तुम्ही?" त्याच्या सुरात अविश्वास होता, पण त्याचा अर्थ लावण्याच्या भानगडीत मी पडले नाही.

"कशीय त्याची प्रकृती?"

"अजून काही सांगता येत नाही. मोठे डॉक्टर राऊंड घेताहेत अजून."

"तू इथ ये आठाला...आपण जाऊ...अन् काळजी करू नकोस." वहिनींनी धीर दिला, पण परका मुलुख, मी एकटी, अन् हा प्रसंग! रात्रभर बिछान्यावर पडून होते. डोळ्याला डोळा लागला नाही. लंडनच्या एवढ्याशा मुक्कामात तिथल्या वैद्यकीय खात्याशी संबंध येईल अशी कल्पना नव्हती. तो योग अरूणनं असा आणला.

दुसरे दिवशी सकाळी आठला वहिनींकडे गेले. वहिनींचीही धड झोप झालेली दिसत नव्हती. त्या स्वयंपाकघरात खुडबूड करीत होत्या. माझ्या समोर प्लेट ठेवीत त्या म्हणाल्या,

"ब्रेकफास्ट केली नसशीलच...रिकाम्या पोटी डोकं चालत नाही."

तेवढ्यात बंडी तयार होऊन खाली आला.

"अण्णा अजून माडीवरून उतरले नाहीत. काल बरं नव्हतं... तशात ही बातमी. बंडी आपल्याला गोल्डर्स ग्रीन स्टेशनवर मोटारीने सोडून देईल... तिथून गाडीनं गेलो तर लवकर पोचू..." वहिनी म्हणाल्या.

सकाळच्या प्रहरीं सेंट्रल लंडनचे रहदारीनं तुंबलेले रस्ते माझ्या नित्याच्या परिचयाचे होते.

आम्ही गाडीनं स्ट्रँड स्टेशनावर गेलो. तिथून पाच पंचवीस पावलांवर समोरच्या बोळात चेरिंग क्रॉस हॉस्पिटल होतं. इमारत जुनीच होती. हे मोठ्यापैकी इस्पितळ होतं. इस्पितळाचं राष्ट्रीकरण झाल्यामुळे हे सगळे दवाखाने सरकारी अधिकारात चालतात. आत गेलो. समोरच्या कटड्याशी 'रिसेप्शनिस्ट' बसलेली दिसली, तिच्यासमोर लोक बारीनं उभे होते. कुणी आपल्या पेशंटसाठी फुलांचे गुच्छ देऊन जात होते... कुणी चिठ्या-चपाट्या समोर सरकवीत होते. भेटायला येणाऱ्या आम्हीच तेवढ्या होतो.

आम्ही भेटायला येण्याचं कारण सांगितलं तेव्हा तिनं आपल्या रजिस्ट-रातली नोंद पाहिली अन् म्हटलं,

"जॉर्ज वॉर्ड, चौथा मजला, समोर कॉरिडॉरमध्ये लिफ्ट आहे. कालच ॲडमिट झालाय ना?"

"हो"

"पण सकाळी भेटायची वेळा नसते. संध्याकाळी सहा ते आठच्या दरम्यान भेटू शकाल तुम्ही."

"पण काल रात्री फोनवर मला सकाळी दहाला यायला कसं सांगितलं? मी पेशंटची आई आहे."

"मी वार्डातल्या डॉक्टरजवळ चौकशी करते. तवर तुम्ही समोरच्या बाकावर बसा," असं म्हणत तिनं तोंडाला फोन लावला.

आम्ही बाकावर वाट पाहत बसलो. सकाळ पुढे सरकली होती अन इस्पितळ दिवसभराच्या रामरगाड्यासाठी ताजतवानं होत होतं. डाव्या भागांत बहुतेक कॅंटिन असावं ... कारण तिथून सारखी ये-जा चालू होती. प्रत्येक वेळी तिथलं दार उघडले गेलं, की कपबशांचा किणकिणाट अन् नर्सेसचा किलबिलाट कानावर येत होता. डोक्याला कडक रूमालांचे तुरे अन् तऱ्हेत-ऱ्हेच्या झालरी लावून, बुटाचा कडकडाट करीत नर्सेस इथून तिथे फिरत होत्या. मधूनच बाहेरच्या दारातून हाउस-कोट घातलेले विद्यार्थी-डॉक्टरांचे थवे आत येत होते अन समोरच्या कॉरिडॉरमध्ये गुप्त होत होते. टकल-गाड्यांतून सामानाची ने आण चालली होती. फरशा पुसल्या जात होत्या.

पंधरा-वीस मिनिट निघून गेली... आमची चुळबुळ पाहून रिसेप्शा-निस्टनं वार्डाला पुन्हा फोन लावला.

"मोठे डॉक्टर वार्डात फेरी घालताहेत. डॉ. कोलमन त्यांच्याबरोबर आहेत. ते मोकळे झाले, की पुन्हा फोन करते."

पुन्हा पंधरा मिनिटं गेली ... पुन्हा फोन झाला.

"अजून डॉक्टरांचा राऊंड संपला नाही, पण डॉ. कोलमन स्वतः तुमच्याशी बोलायला खाली येताहेत."

त्यानंतर पांच मिनिटांनी हाउस कोटातला एक पोरगेलासा तरूण समोर येऊन उभा राहिला. मला वाटलं एखादा हाउस-डॉक्टर असावा. आम्ही उठलो.

"पेशंटची आई कोणती?"

"मी आहे." मी पुढे होत म्हटलं.

"तुम्ही?" त्याच्या सुरात अविश्वास होता, पण त्याचा अर्थ लावण्याच्या भानगडीत मी पडले नाही.

"कशीय त्याची प्रकृती?"

"अजून काही सांगता येत नाही. मोठे डॉक्टर राऊंड घेताहेत अजून."

"दुपारी कर्नल शेवडे येतील. पेशंटला पाहयला. त्यावेळी त्यांना दाखवायला मदत करा." वहिनी मध्येच म्हणाल्या.

"पण ते कोण आहेत, ? .... त्यांचा काय संबंध ?"

"ते भारतीय वकीलातीतील प्रमुख वैद्यकीय अधिकारी आहेत..... अन् पेशंटचे काका" वहिनी.

"पण हे पहा ....."

"पण डॉक्टर कोलमन खाली येणार होते. मी बोलले असते त्यांच्याशीच." मी म्हटलं.

"मीच डॉक्टर कोलमन आहे!" मी आश्चर्यानं पाहत राहिले. जेमतेम मिसरूड फुटली होती. पण लांबलचक पदावली त्याच्या नावामागे होती! मी चाचरत म्हटलं, "आम्ही भेटू शकतो ना ?"

"अं ऽऽ ...खरं म्हणजे ....."

"मला यायला सांगितलं काल फोनवर"

"बरं ... भेटा मग ! ... पण फक्त दोनच मिनिटं."

"तुम्ही म्हणाल तेवढं ... मला नुसतं पाहयचय त्याला."

"अन् बोलू नका शक्य तो.! अर्थात तुम्हाला ठाऊक आहे ते !"

आम्ही लिफ्टकडे वळलो. त्यावर पाटी लिहीली होती:

"ज्याला चालवत असेल...त्यांनी शक्यतो लिफ्ट वापरू नये."

आम्ही चार जिने चढून वर गेलो. वार्डात अजून मोठ्या डॉक्टरांची फेरी संपली नव्हती. चार–सहा विद्यार्थ्यांच्या घोळक्यानिशी ते एकेका बिछान्याशी सरकत होते. आमच्याकडे पाठ होती. आम्ही भीत भीत आत शिरलो... निजलेल्या रोग्यांच्या दुतर्फा रांगेत अरुणचा बिछाना शोधणं अवघड होतं. मी प्रत्येक चेहऱ्याकडे निरखून पाहत होते. शेवटी पांढऱ्या पट्या चिकटलेला एक विद्रूप चेहरा दिसला. डावी बाजू तिप्पट चौपट सुजून आली होती. डोळ्यांत रक्त साठलं होतं, पण उजव्या बाजूनं ओळख दिली. शब्दानं बोलण्यासारखी स्थिती नव्हती...कुणाचीही ... अन् बोलायचंही नव्हतं. शेवटी नुसता हातात हात घेतला ... अन् कसंबसं विचारलं,

"कसं वाटतंय ?"

"छा ऽऽन !! काळजी करू नकोस."

" नाही करणार ... "

" अन फिलीपला फोन करून दे ... तो ऑफिसात कळवून देईल. त्याला नीट सारं सांग ... नाही तर उगाच चिंता करीत बसेल तो .. "

" बरं, तू बोलू नकोस आता. आम्ही संध्याकाळी येऊ पुन्हा ... "

जाताना त्याच्या डाव्या बाजूनं हसण्याचा प्रयत्न केला ..

दोन मिनिट संपली ... अन डॉक्टरही जवळच्या बिछान्याशी आले होते...पाठोपाठ छोट्या डॉक्टरांचा अन् नर्सेसचा घोळकाही सरकला होता... कोलमनने खूण करण्यापूर्वीच आम्ही निघालो होतो.

× × ×

संध्याकाळी आम्ही पुन्हा गेलो. फिलीप सोबत होता. तेवढ्यात स्पड बखले आला. बॉब गेअर येऊन भेटून गेला. आम्ही पोचण्यापूर्वी अरुणचे ऑफिसातले दोघे मित्र येऊन चौकशी करून गेले होते. त्याच्या 'बॉस'चं दिलगिरी व्यक्त करणारं पत्रही आलं होतं. हॅरीही येऊन धीर देऊन गेला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी खालचं स्मिथ जोडपं पुन्हा येऊन चौकशी करून गेलं. खालची स्मिथ पोरगीही दिवसभरात येताजाता विचारपूस करीत होती.

संध्याकाळी आमचे वृद्ध घरमालक मि. आयसेन घाबरेघुबरे होऊन जिना चढून वर आले. बहुतेक दोन दिवस आड टपाल पाहण्याच्या निमित्तानं त्यांची चक्कर होत असे.

" अरुणच्या अपघाताची बातमी मला खालच्या स्मिथनं दिली ... घाबरण्यासारखं काही नाही ना ? "

" तसं दिसत नाही खरं ... सध्या तरी ... "

" मग कधी येणार घरी ? "

" निदान पंधरवडा तरी लागावा .. "

" माझे 'बेस्ट विशेस' द्या त्याला ... म्हणावं लवकर बरा हो. अन् हे पहा, माझ्या भाड्याबिड्याची काळजी करू नका. मुलगा घरी आला, की सावकाश द्या. "

हा घरमालक ज्यू होता.

दोन दिवसांनंतर आमच्या शेजारच्या वृद्ध रेडबोर्न जोडप्यानं मला वाटेत गाठलं.

"कसय तुमच्या मुलाचं ?"

"बरय आतां."

"आम्हाला स्मिथ मंडळीकडून कळलं. तेव्हापासून तुम्हाला भेटण्याची इच्छा होती. आज सापडलात" रेडबोर्न आजी म्हणाल्या.

"फार इजा नाही ना झाली ?" मि. रेडबोर्न म्हणाले.

"नाही, थोडक्यात निभावलं"

"नशीबवान आहात तुम्ही ! नाहीतर स्कूटरचे अपघात हे महाभयंकर. माझ्या एका मैत्रिणीच्या मुलाला स्कूटरचा अपघात झाला... तेव्हाची गोष्ट..."

तो पंधरवडा माझे सुट्यांचे अर्ज, त्यासाठी लागणारी डॉक्टरची सर्टिफिकिटं मिळवणं, परदेशी चलनासाठी प्रयत्न, दवाखान्यांतली रोजची सायंफेरी, मित्रांची ये-जा ... यात गेला. अरूणचा वाढदिवस आला अन् तसाच निघून गेला, पण मित्रमंडळींकडून अभिनंदनपर पत्रं आली, कुणाचे फोन आले. प्रेझेंट्स आली, निरोप आले. पंधरा दिवसानंतर अरूण एकदाचा घरी आला. वहिनी सहकुटुंब येऊन त्याला सोडून गेल्या. डॉक्टरनं आणखी पंधरा दिवस विश्रांती घ्यायला सांगितली. अजून डाव्या गालफडावरचं टेंगूळ राहिलं होतं अन डोळा लालचुटक होता. हनुवटीवरचे टाके निघाले होते. पण व्रण ओला होता. परंतु पाय सुरक्षित धराला लागले होते.

माझ्या छातीवरचा दगड उचलला गेला होता. पण परक्या मुलखात या कठीण प्रसंगी मदतीला धावून आलेली माणसं माझ्या स्मरणात राहणार होती. पहिला मदतीचा हात देणारं ते स्मिथ जोडपं, दवाखान्यातून घरी आल्यावर रोज विचारपूस करून जाणारी ती स्विस पोरगी, सक्रिय सहानुभूती दाखवणारा ज्यू घरमालक, सुटीसाठी डॉ. कोलमानचं सर्टिफिकेट लवकर मिळावं म्हणून जातीनं लक्ष घालणारी हेडनर्स, हॅरिसन, स्पड, बॉब यांनी दाखवलेली आस्था, प्रत्येक कामात सोबतीला राहणारा फिलिप. अन् हॅरी. आणखी कितीतरी माणसं ... या साऱ्यांचं कसं उतराई व्हायचं ? ही इंग्रज माणसं सामान्य शिष्टाचाराच्या पलीकडे न जाणारी, इरस्थवृत्तीची, तुसडी म्हणायची ?

अशा प्रसंगी तिथ घरी स्वकीयांनी केलेली मदत तरी यापेक्षा आणखी काय अधिक राहिली असती?

× × ×

माझे जायचे दिवस जवळ येत चालले होते. इकडच्या काही स्त्री–संस्था आणि त्यांच्यामार्फत होणारी कामं एकदा नजरेखालून घालायची इच्छा होती. कुणाच्या मदतीने ती पुरी होइल, या शोधात मी होते. वहिनी म्हणाल्या,

" कमलिनी देशमुख ... ( नागपूरच्या बाबी जयवंत ) इथेच आहेत ... त्यांची मदत घे... त्यांचा इकडच्या काही स्त्री–संस्थांशी परिचय आहे... "

एक दिवस आम्ही त्यांच्याकडे गेलो. सौ. देशमुखांचे यजमान रिझर्व बँकेच्या लंडन शाखेचे प्रमुख होते. ' स्विस कॉटेज ' भुयारी स्टेशनाजवळ बॉयडेल कोर्टात सातव्या माळ्यावर त्यांचं घर होतं. आधुनिक पद्धतीनं बांधलेलं, आधुनिक मांडणीचं. घरातल्या वस्तूंची निवड, त्यांची रचना, स्वयंपाकघरापासून न्हाणीघरापर्यंत सर्वत्र टापटीप अन् गृहिणीचं आतिथ्य पाहून मन प्रसन्न झालं.

मिसेस देशमुख म्हणाल्या,

" १५ ऑगस्टला इंडिया हाउसमध्ये पार्टी आहे. तिथे विमेन्स कौन्सिलच्या बायका भेटतील ... त्या दाखवतील तुम्हाला जे पाहयचं असेल ते. शिवाय इथल्या हिंदी लोकांचीही ओळख होऊन जाईल... "

इंडिया हाउसमध्ये मिसेस देशमुखांच्या एका विलायती मैत्रिणीचा नवरा आम्हाला आपल्या मोटारीनं घेऊन गेला. यापूर्वी अण्णाबरोबर मी एकदा इथं येऊन गेले होते; त्यावेळीं एका बाजूचा विजेरीवाहक ( लिफ्ट ) बेकाम झाला होता... कोपऱ्यात मातीचा ढीग पडला होता... अवजारं होती. ... बांधकाम चालू होतं... यावेळीं आम्ही दुसऱ्या बाजूनं शिरलो. जिन्याशीच ' लकी डिप ' ची तिकिटं विकण्यासाठी एक महिला ठाण मांडून बसली होती. आम्हीही एकेका क्रॉऊनची तिकिटं घेऊन आंत गेलो. आंतल्या हॉलमध्ये ' लकी डीप ' चा सरंजाम मांडला होता... सौ. देशमुखांची ती इंग्रज मैत्रीण त्याच्या चिठ्ठ्या घेऊन बसली होती. तिच्याभोवती ' नशीब ' काढा-

यला निघालेल्यांचा घोळका होता. लंडनमध्ये बरेचसे भारतीय इथं जमलेले आढळले.

'लकी डिप' च्या तिकिटांचे पैसे आपल्या 'राष्ट्रीय संरक्षण निधी'ला द्यायचे होते. म्हणून मीही नशीब सांगणाऱ्या चिठ्ठयांच्या डबोल्यात हात घातला... पण तिन्हीवेळा माझं 'नशीब' 'कोरं' च निघालं, पण माझा पैसा राष्ट्रसंरक्षणार्थ गेला, एवढंच त्यात समाधान. हेही नसे थोडके! सौ. देशमुख मात्र प्रत्येक वेळी वस्तू गोळा करीत होत्या.

हा नशीबाचा खेळ संपल्यावर इथली गर्दी मधल्या हॉलमध्ये सरकली. तिथे चहाची टेबलं होती. बहुतेक पुरुषवर्ग इथे होता... महाराष्ट्र मंडळाचे तरुण चिटणीस सतीश तुंगारे कार्यकारी मंडळाच्यासमवेत एका घोळक्यात होते. दोन इंग्रज महिलाही होत्या... मिसेस देशमुखांनी परिचय करून दिला.

" या मिसेस होम्स, विमेन्स कौन्सिलच्या अध्यक्ष, अन् या मिसेस पार्कर... खजिनदार! मिसेस शेवड्यांना आपली काही कामं पाहयची आहेत."

मिसेस होम्स पन्नाशीच्या पलीकडच्या असाव्यात, कदाचित नसाव्यात. इथे वयाचा... त्यातून स्त्रियांच्या वयाचा हिशेब करणं व्यर्थ आहे... कडक चेहऱ्याच्या होम्सबाईंनी गंभीरपणे मला विचारलं,

" विशेष काय बघण्याची इच्छा आहे तुमची ?"

" तुमचं सर्वांत चांगलं, सर्वांत यशस्वी रीतीनं चाललेलं जे काही कार्य असेल ते दाखवा ..." होम्सबाईंच्या चेहऱ्यावरची सुरकुतीही हलली नाही. त्यामुळं माझंही हास्य मावळलं. त्या रुक्ष चेहऱ्यानं म्हणाल्या :

" माझ्या मते, आमचं 'वुडबेरी हेल्थ सेंटर' पाहावं तुम्ही."

" चालेल."

मग मिसेस पार्करला उद्देशून त्या म्हणाल्या;

" मला वाटतं, मेरी विल्सन यांना नेण्याची सोय करू शकेल."

" ह्या कोण ?"

" त्या आमच्या चिटणीस आहेत."

" अन् जमलं तर... मला तुमची 'ओल्ड पीपल्स होम्स' ही पाहायची आहेत..."

" ती कशी काय ? " त्यांनी आश्चर्यानं विचारलं.

काय उत्तर द्यावं ते समजेना... शेवटी म्हटलं :

" अगदी सहज. अशा संस्था आमच्याकडे नाहीत, म्हणून समजा हवं तर ! "

तिसरे दिवशीच मिस मेरी विल्सन यांचं पत्र येऊन थडकलं. लंडन मधील विमेन्स कौंसिलतर्फे होत असलेल्या कार्याबद्दलची माझी जिज्ञासा पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला होता. अन् ' वुडबेरी हेल्थ सेंटर ' ला भेट देण्याचा दिवस व तारीख मुक्रर केली होती. स्वतः मोटारीनं त्या आम्हाला नेणार होत्या.

' ओल्ड पीपल्स होम' दाखविण्याचीही सोय त्या करीत असल्याचं कळवलं होतं अन् सोबत स्वतःचा ' स्कूल केअर कमीटीज ' वर लिहिलेला एक लेख पाठवून दिला होता. मिस विल्सनची वृत्ती होम्सबाईपेक्षा अगदी भिन्न होती. त्यांच्या वागण्यात मोकळेपणा होता.

ठरल्याप्रमाणे आम्ही ' वुडबेरी हेल्थ सेंटर ' ला त्यांच्या मोटारीनं गेलो. वुडबेरी डाऊन विभागातील लोकांच्या आरोग्यविषयक आणि कल्याण-कारी गरज भागवण्याच्या हेतूनं ' लंडन काऊंटी कौन्सिल ' तर्फे हे सेंटर चालविण्यात येत होतं. नऊ वर्षापूर्वी एल्. सी. सी. नं ही इमारत बांधली. इमारत छोटी, पण सुंदर होती. वुडबेरी विभागातील नवी घरें व जुनी वस्ती यांतील गरीब लोकांसाठी ही सोय विशेषतः केली होती.

आम्ही संपूर्ण इमारतीतून भटकलो. दवाखान्यातून रोग्यांवर उपचार होत होते. इथल्या व्यावसायिक चिकित्सा ( Occupational Therapy) विभागात लुळे, पांगळे, अंध किंवा अपंग यांच्यासाठी वेगवेगळे उद्योग चरि-तार्थासाठी शिकवले जात होते. एका भागात लहान मुलांसाठी क्रेशेस होती. कामावर गेलेल्या आयांची मुलं इथे सांभाळली जातात. त्यात गोरी मुलं होती, तशीच काळीही.

या वुडबेरी सेंटरमधूनच विल्सनबाई ' स्कूल केअर कमिटी ' तर्फे हे काम करतात. अशा तऱ्हेची संस्था आपल्याकडे नाही. इंग्लंड हे ' कल्याण-कारी 'लोकशाहीराज्य असूनही, आज इंग्लंडमध्ये सरकारतर्फे मोफत मिळ-णाऱ्या शिक्षणाचा संपूर्ण लाभ पुष्कळ मुलं घेऊ शकत नाहीत. शिक्षणापासून

ती वंचित राहतात अन् जी येतात ... त्यापैकी पुष्कळांना कशाची ना कशाची तरी उणीव असते. एखाद्या मुलाला वर्गातल्या फळ्यावरचा मास्तरांनी लिहिलेला मजकूर दिसत नाही, तर दुसरा मधल्या जेवणाची भूक ' पोटेटो चिप्स ' वर भागवत असतो. तिसऱ्याजवळ हिवाळ्याच्या दिवसात घालायला ओव्हरकोट नसेल... अगर व्यवस्थित जोडे नसतील, तर कुणाच्या वाट्याला कौटुंबिक सुख नसतं. पुष्कळदा सरकार या गरीब मुलांसाठी काय सोयी करीत आहे, आपल्या मुलांना कुठल्या सवलती मिळू शकतात, याची अज्ञानी पालकांना माहिती नसते. ह्या सर्व बाबतीत गरजूंना मदत करण्याच्या उद्देशाने तमाम लंडन शहरासाठी ही ' स्कूल केअरकमिटी ' स्थापन झाली. ही १९०९ सालापासून आपलं काम करीत आहे. पण त्याहीपूर्वी म्हणजे इंग्लंडचा मोफत प्रायमरी शिक्षणाचा कायदा १८७० साली पास झाला, तेव्हापासून शाळेचे संचालक व व्यवस्थापक विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे, पोषणाकडे किंवा बारीक – सारीक शारीरिक व्यंगाकडे लक्ष घालू लागले होते. त्यावेळी तिच्या अभावी खाजगी कल्याणकारी संस्थांनी, चर्चनं किंवा शाळेच्या चालकांनी हे काम हाती घेतलं. त्यांच्या या प्रयत्नाला यश येऊन सरकारचं लक्ष त्याकडे वेधलं आणि पुढे त्याने मदतीचा हात दिला.

आज लंडन कौंटी कौन्सिलच्या सर्व शाळांतून समितीतर्फे तीन हजारांवर ' स्कूल केअर ऑर्गनायझर्स ' कामं करीत आहेत. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष देणं, त्यांना पुरेसा आणि सकस आहार मिळत आहे की नाही, थंडीच्या दिवसात पुरेसे कपडे त्यांच्याजवळ आहेत की नाहीत, पायांत घालायला जोडे आहेत की नाहीत, त्यांचे डोळे बिघडले तर नाहीत ना, त्यांच्या घरी त्यांच्या मानसिक वाढीसाठी योग्य ते वातावरण आहे किंवा नाही, नसल्यास पालकांशी विद्यार्थ्यासंबंधी चर्चा करणं, त्यांच्या मार्गातल्या अडचणी दूर करणं, अशी बारीक – सारीक कामंही या कमिटीच्यामार्फत होतात. ही कामं कमिटीनं नेमलेले स्वयंसेवक – आर्गनायझर्स करीत असतात त्यामुळे विद्यार्थ्यांच्याबरोबर पालकांनाही त्यांचा फार मोठा आधार वाटतो. विशेष म्हणजे, बसकंडक्टरपासून ' लेडी ' पावेतो समाजाच्या सर्व थरांतून हे स्वयंसेवक अर्धवेतन घेऊन अगर विनावेतन या पथकात कामं करतात. स्वत: मेरी विल्सन या एम्. बी. ई. होत्या. ह्या कामासाठी स्वयंसेवकांना तसं खास

प्रशिक्षण कुठलंही नसतं. परंतु एल्. सी. सी. या कामाचं शिक्षण त्यांना प्रारंभीच देते.

या समितीतर्फे गरीब विद्यार्थ्यांना शाळेतल्या मधल्या जेवणाची सोय केलेली आहे. तसंच त्यांना कपडेलत्तेही पुरविले जातात. नियमितपणे वैद्यकीय तपासणी होते व हेल्थ सेंटर्समधून त्यांना वैद्यकीय मदतही मिळते.

या समितीतर्फे ' यूथ एम्प्लॉयमेन्ट ब्यूरोही ' शाळांतून स्थापन झालेले आहेत. त्यामार्फत बेकार विद्यार्थ्यांना चाकऱ्या मिळवून दिल्या जातात. तसंच विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देणं, त्यांच्या करमणूकीसाठी ' क्लब्स ' स्थापन करणं, या बाबतीतही नवे प्रयोग समितीतर्फे होत आहेत.

या साऱ्या गोष्टीवरून ' स्कूल केअर कमिटी ' च्या कार्याचा व्याप किती आहे हे दिसेल. अशी संस्था आपल्याकडे असलेली अजून तरी मला माहीत नाही.

× × ×

हेल्थ सेंटर मधून आम्ही बाहेर पडलो...त्यानंतर विल्सनबाई जिथे हे काम करीत त्या विभागांतून त्यानी मोटारीनं हिंडवलं...जुनी वस्ती, गरिबांसाठी बाधलेले नवीन फ्लॅट्स, मजुरांच्या आळी एकामागून एक त्या दाखवीत होत्या. तो सर्व भाग त्यांच्या नित्य परिचयाचा होता...चारपाच मुलं असलेल्या एका गरीब मजूर स्त्रीकडे त्या आम्हाला घेऊन जाणार होत्या. कुटुंबनियोजनाबाबत त्यांना तिला काही सल्ला द्यायचा होता. तिची मुलंही आजारी होती. तिच्या घरी जाऊन त्या तिच्याशी बोलणार होत्या. तिचं घर शोधताना एकसारख्या दिसणाऱ्या घरांच्या ओळीतून आम्ही हिंडत होतो. विल्सनबाई मोटार हाकीत होत्या अन् आजूबाजूच्या स्थळांवर भाष्य करीत आपल्या कामाची माहिती देत होत्या.

एकदा एका घराच्या खिडक्यांना लागलेल्या पडद्यावरून ते घर कुठल्या आर्थिक श्रेणीच्या माणसाचं आहे हे त्यांनी चटकन सांगितलं. माझ्या डोळ्यांना बाहेरून सारे लेसचे पडदे सारखेच दिसत होते.. अन् ती घरं गरीब माणसांची आहेत हे बाहेरून पाहून सांगता आलं नसतं इतकी ती चांगली होती...एकदोनदा अरुणला ' स्लम्स ' दाखवण्याबद्दल मी म्हटलं

होतं. ईस्ट लंडन मधल्या काही मजूरवस्तीतून त्यानं मला हिंडवल होतं... पण 'स्लम्स' बद्दल माझी जी कल्पना होती...तसं कांही दिसलं नाही. सर्व स्वच्छ व नीटस दिसत होतं...हॅमरस्मिथच्या कांही भागात आणि बर्मिंग-हॅममध्ये मला तुलनेनं काहीशी गरीब वस्ती दिसली...एवढंच काय ते ! दोनचारदा शाळेला जाताना 'गूझ स्ट्रीट' भुयारी स्टेशनांच्या तोंडाशी 'अकॉर्डियन' वाजवीत मदतीसाठी हात पुढे करणारे लोक दिसले होते. किंवा एकदोनदा सिनेमा हॉलच्या दाराशी आपली हॅट भिक्षापात्रासारखी धरून भिक्षा मागणारे दिसले होते. पण तेही इतके व्यवस्थित कपडे घालून होते की ते भिकारी असावेत, हे प्रथम लक्षातच आलं नाही.

त्या सकाळी दोन तीन तास आम्ही एकत्र घालविले होते...जाताना विल्सनबाई म्हणाल्या :

"माझा कर्नल शेवड्यांशी तर स्नेह आहेच...पण त्यांच्या कुटुंबाशी ...त्यांच्या वडिलांशीही माझी ओळख होती."

"कशी काय?"

"मी हिंदुस्थानात होते...माझे वडिल मध्यप्रांतात कमिशनर होते. अमरावतीला माझे वडिल व ते एकत्र होते...तिथली आमची ओळख..."

"मग बरीच वर्षे तुम्ही हिंदुस्थानांत असाल ? "

"हो खूप वर्षे...खरं म्हणजे मी तुमच्या आकाशवाणीतही काम केलं आहे..."

"अरे वा ! म्हणजे आपण एकाच फ्रेटर्निटीच्या आहोत."

"मि. फील्डन त्यावेळी डायरेक्टर जनरल होते... दुसऱ्या महायुद्धात मी 'न्यूज बुलेटिन्स' वाचलेली मला आठवतात."

ते ऐकून मला फार आनंद झाला. कौटुंबिक ओळख अन् त्यात एकच व्यवसायात कामं केलेली...त्यानंतर विल्सनबाई माझ्या कामासंबंधी काही वेळ बोलत राहिल्या. त्यांनी घर सोडलं, तेव्हां त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानले. त्यावर त्या म्हणाल्या, "आभार कसले मानता ? तुम्हाला दाखवून आमच्या कामाचीच मी प्रसिद्धी केलीय्."

माझ्या आभाराचं पत्र त्यांना जाण्यापूर्वीच, दोन तीन दिवसांनंतर त्यांचंच पत्र आलं. पुढच्या आठवड्यात मिस पार्कर वृद्धाश्रम दाखविण्याची

सोय करीत असल्याचं त्यांनी कळवलं होतं. त्यांना स्कॉटलंडला दुसऱ्या दिवशी भावाकडे जायचं असल्यामुळे त्या सोबत येऊ शकणार नव्हत्या.

या इंग्रज समाजसेविकेनं दाखवलेली आस्था, अगत्य, आपण काही तरी मोठ समाजकार्य करीत आहोत याचा मागमूस नसलेला निगर्वीपणा, आणि परदेशी पाहुण्यांना आपली काम दाखविण्याविषयीची त्यांची तत्परता मला विशेष स्पृहणीय वाटली.

× × ×

"तुमच्या वृद्धाश्रमात कुठल्या वर्गाचे, कशा तऱ्हेचे म्हातारे येतात?" मेजर कार–गॉम यांना मी प्रश्न केला.

"सर्व तऱ्हेचे म्हातारे इथं येऊन राहतात," मेजर साहेबांनी उत्तर दिलं. "उदाहरणार्थ, ज्यांना म्हतारपणी सांभाळणारं कुणी नाही, ज्यांच्याजवळ पैसा नाही, पण बहुधा ज्यांच्या बरोबरीची मित्रमंडळी नाहीशी झाली आहेत, किंवा ज्यांच इतर नातेवाइकांशी पटत नाही म्हणून ज्यांना स्वतंत्रपणे राहण्याची इच्छा असते, अगर जे एकाकी आहेत, असे सर्व प्रकारचे म्हातारे इथं येऊन राहतात."

मेजरसाहेब तन्मयतेनं सांगत होते. त्यांच्या कपाळावर तीन इंच लांबीचा एक जखमेचा व्रण होता. बहुधा दुसऱ्या महायुद्धाने मागे ठेवलेली ती खूण–लंडनच्या बरमॉंडसी विभागात अॅवेफील्ड सोसायटीतर्फे चालणाऱ्या वृद्धाश्रमाचे ते संस्थापक होते. बरोबर विमेन्स कौन्सिलच्या मिसेस नील आणि सौ. देशमुख होत्या...अन् मिसेस नील यांच्या गाडीतून आम्ही इथे येऊन पोचलो होतो. वृद्धाश्रमातल्या मंडळींना भेटण्यापूर्वी मेजरसाहेबांच्या ऑफिसात बसून आमची चर्चा चालू होती. ऑफिस छोटंसंच, दहा गुणिले बाराचं असावं...मेजरसाहेबांचा मदतनीसही तिथं होता.

"हा वृध्दाश्रम काढावयाची कल्पना तुम्हाला कशी काय सुचली?" मी विचारलं.

"युद्ध संपल्यावर मी निवृत्त झालो. जवळ पैसा होता. काही तरी चांगलंसं सामाजिक कार्य करण्यात स्वतःला गुंतवावं असं वाटू लागलं. त्यावेळी युद्धांत ज्यांचे तरुण नातेवाईक मारले गेले होते, अशी बरीच निराधार वृद्ध

मंडळी माझ्या पाहण्यात होती. ... त्यामुळं वृद्धाश्रमाची कल्पना मला सुचली .....

" म्हणजे तितकी जुनी आहे ही तुमची सोसायटी ? "

" नाही. ती स्थापन व्हायला १९५५ साल उजाडलं. या सोसायटी-तर्फे आज दीडशे स्थानिक संस्था चालवण्यात येतात .... अन् त्यात आज आठशेच्या जवळपास वृद्ध लोकांची देखभाल करण्यात येते .... " मेजर-साहेब म्हणाले.

" इथं येणारे वृद्ध हे बहुधा मध्यम वर्गातील राहत असावेत, नाही का ? " सौ. देशमुखांनी विचारलं.

"असंच नाही. पुष्कळसे श्रीमंत म्हातारेही इथं येऊन राहतात ... कारण एकटेपणा हा केवळ मित्रांच्या किंवा नातेवाईकांच्या अभावी ... किंवा निराश्रिततेतून उत्पन्न होतो, असं नाही. हा एक प्रकारच्या मानसिक, आत्मिक ( spiritual) रोग आहे अन् तो कुणालाही होतो."

"पण मग आत्मिक रोग म्हटला, तर या 'होम' मध्ये राहून तो कसा काय बरा होणार ? त्यावर दुसरं आत्मिकच औषध हवं, नाही का ? " मी हसून विचारलं.

"खरं आहे ते....पण इथे राहून कदाचित् ते सापडण्याची शक्यताही असते." मेजरसाहेबांनीही तितक्याच मोकळेपणी हसून उत्तर दिलं

"मग अशा स्पिरिच्युअल केसेस तुमच्यांकडे बऱ्या आलेल्या आढ-ळल्या का ? "

"सांगणं कठीण आहे...तुम्हीच त्यांना विचारा तुमच्या मुलाखतीत, हवं तर..."

"पण त्यांना असं विचारलेलं आवडेल का ? " माझी शंका मी बोलून दाखविली ... ज्या देशात एखाद्याला त्याचं साध नाव विचारणं हासुद्धा व्यक्तीगत प्रश्न ठरतो, तिथं असला खाजगी प्रश्न विचारणं म्हणजे केवढा गुन्हा ? पण मेजरसाहेब भिस्किलपणे म्हणाले :

"तुम्ही तुमचे प्रश्न किती युक्तीनं अन् कौशल्यानं विचारता यावर ते अवलंबून राहील."

उत्तरादाखल मी मोकळेपणी हसले.

"मेजरसाहेब, आता आणखी एक प्रश्न! इंग्लंड व्यतिरिक्त अशी होम्स युरोपात किंवा अमेरिकेत असल्याचं तुमच्या माहितीत आहे का?"

"निदान मला तरी त्यांची माहिती नाही. कदाचित् तुरळक प्रयत्न केले गेले असतीलही; पण आमच्यासारखी एखादी संस्था असल्याचं ऐकिवात नाही...ती माहिती मिळवण्याचा माझ्या प्रयत्न चालू आहे." मेजरसाहेब म्हणाले. 'पण मला एका गोष्टीबद्दल कुतूहल वाटतं..."

"कोणत्या?"

"तुम्हाला ही 'ओल्ड पीपल्स होम्स' कशी काय पाहाविशी वाटली? तुमच्याकडे तर म्हाताऱ्यांची समस्या नाही ना?"

"समस्येच्या रुपात नाही. कारण अजून तरी आमच्या वृद्ध मंडळींकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन तुमच्यापेक्षा थोडासा भिन्न आहे. आमच्याकडे वृद्धांचा आदर करतात"...मी म्हटलं.

"हो ना!" सौ. देशमुख म्हणाल्या, "त्यामुळे आपल्या म्हाताऱ्या आईबापांना किंवा आजाआजींना, फार काय मावशी, अत्या किंवा दुसऱ्या नातेवाइकांनासुद्धां एखाद्या वृध्दाश्रमात ठेवायची वेळ आली, तर ती गोष्ट केवळ कमीपणाचीच नव्हे... तर मनाला दुखावणारी वाटेल."

"कदाचित तुमच्या धार्मिक समजुतींचा किंवा धर्माज्ञेचा परिणाम असेल तो!"

"असेलही...परंतु त्याचं मूळ आमच्या एकत्र कुटुंबपद्धतीतही आहे. आता अशी कुटंबं बोटावर मोजण्या इतकी उरली आहेत. परंतु विभक्त कुटुंबांतूनही अजून म्हातारे आईबाप आपल्या मुलांजवळ राहतात...अन् व्यावहारिकदृष्ट्याही बोलायचं तर ते राहिल्यानं दोघांच्याही समस्या नाही का सुटत?" मी म्हटलं.

"कशा?"

"आज आमच्याकडेही स्त्रिया कामावर जाऊ लागल्या आहेत..मग संसार चालवणं, मुलं सांभाळणं, अडीअडचणी, त्यांचे व आपले आजार, ह्या गोष्टीत घरात म्हातारी मंडळी असली, तर त्यांची मदत होते... त्या मोबदल्यात त्यांचा सांभाळ करणं, हे योग्यच नाही का? शिवाय एके काळी आपणही म्हातारे होऊ, तेव्हा आपलं कसं होईल, याचाही विचार माणुस नकळत करतोच की?"

"पण तुमच्याकडचे म्हातारे त्रासदायक नसतात का ? त्यांना स्वातंत्र्य नको असतं का ? त्यांनाच कुठे कुणाजवळ राहयला आवडतं ?" मेजर साहेबांनी आपलं मत प्रदर्शित करीत म्हटलं.

"आमच्याकडे तसं नाही अजून तरी !" आपल्याकडच्या म्हताऱ्यांचा कड घेत मी म्हटलं, " आमचे म्हातारेही कधी कधी त्रासदायक असतात, निश्चितच ... परंतु व्यक्ति स्वतंत्र्याचं एवढं स्तोम आमच्या देशात नाही ... त्याचे जसे फायदे आहेत, तसे तोटेही आहेत ... अजून आमच्या कुटुंबांतून एकमेकांसाठी अडचण सोसायची तयारी असते. त्याग करण्याची वृत्ती दिसते ... पण पुढे काय होईल देव जाणे !... कारण पाश्चात्त्य कल्पनांचं वारं आमच्याकडेही झपाट्यानं येत आहे. आमचीही आर्थिक घडी वदलतेय् ना... आमच्याहीकडे असे वृद्धाश्रम काढण्याची कल्पना मांडविली जाते. अलिकडे खुद्द आमच्या नागपुरातही असा एक प्रयोग केला जात आहे ..."

"आमच्याकडे तसं नाही..." मेजरसाहेब म्हणाले, "इतर नातेवाइकांचं तर सोडाच ... पण पतिपत्नीदेखील एकमेकांना कधी कधी इतकी कंटाळतात, की मग त्यापैकी कुणी तरी आश्रमाची वाट धरतो."

त्यांच्या ह्या वाक्यानं मला एकदम एका गोष्टीची आठवण झाली. मी उत्सुकतेनं विचारलं:

'माफ करा, मेजरसाहेब ! पण मी एक गोष्ट इथं आल्यावर ऐकली ... अशाच एका होमशी संबंध आलेल्या एका व्यक्तीनं सांगितली ...पण मला तरी ती खरी वाटली नाही ! ती विचारू का ?"

" कोणती... ? "

" एक वृद्धा एका आश्रमात येऊन राहिली... तिनं कारण काय सांगितलं, तर म्हणे, ' गेली पंचवीस वर्षे मी माझ्या नवऱ्याचं सतत तोंड पाहत आले आहे... त्याचा आता कंटाळा आलाय मला... म्हणून त्याच्याजवळ राहायचं नाही मला ! ' खरंय हे ? "

" हो, खरंय... मीही ऐकली ही गोष्ट... पण त्याच्याही वरताण एक केस आहे. "

" खरं की काय ? "

" एक वृद्ध जोडपं एकमेकांना इतकं कंटाळलं होतं, की गेली कित्येक वर्षं एकाच खोलीच्या त्यांच्या घरात ते मध्ये पडदा घालून वेगळं राहत होतं ...त्यांच्यात संभाषण नव्हतं. शेवटी त्यातली एक व्यक्ती आमच्याकडे येऊन राहिली ! "

मेजरसाहेबांचं वाक्य ऐकून मी स्तंभितच झाले...

आपल्याकडे म्हाताऱ्या दांपत्याला एकमेकाबद्दल काय वाटतं, ते तेच जाणोत. कदाचित आपलीही झाकली मूठ असेल. कुणी सांगावं ? म्हाताऱ्या मंडळींनीच याचं उत्तर द्यावं, ( निदान मनाशीतरी ). मी निष्कर्ष काढत नाहीं. फक्त मनातल्या मनात मी चटकन् प्रार्थना केली :

" परमेश्वरा, अशी साहेबाच्या नगरीतली आधुनिक मनं आमच्या देशात न येवो, म्हणजे मिळवली ! "

× × ×

आम्ही बोलत असताना समोरून एकदोघे म्हातारे जिना उतरून खाली गेले... मेजरसाहेब म्हणाले :

" आता आश्रमांच्या खोल्या तुम्हाला पाह्यच्या असतील तर निघूं या... तुम्हाला त्यांतील वृद्धांशी प्रत्यक्ष बोलता येईल... "

आम्ही अुठलो अन् शेजारच्या घरात शिरलो.

प्रत्येकाला स्वतंत्र खोली होती.

एका खोलीतल्या आजीबाई मासिकं वाचण्यात दंग झाल्या होत्या. त्यामुळं आमचं संभाषण उडत उडतच झालं. " सुखात आहे मी इथे, " असं म्हणून एखाद्या नातवंडाला कुरवाळावं तसं समोरचं मासिक त्यांनी हाती घेतलं.

दुसऱ्या आजीबाई नुकत्याच बाहेरून येऊन प्लेटवर केक काढून रेडीओ समोर बसल्या होत्या... त्यांनाही इथं ' फार छान ' वाटत होतं.

" हा रेडिओ ... छान दिसतोय् ... "

" माझाच स्वतःचा आहे... खूप करमणूक होते त्यानं माझी, " त्यांनी सांगितलं. म्हणजे एकीनं वाचनात तर दुसरीनं रेडिओत विरंगुळा शोधला होता. या आश्रमातले सारेच साठी–सत्तरी अुलटलेले. आजी–

आजोबांचा हा जणुं एक मेळावाच होता. " गळावयाची वाट पाहतो आम्ही पिकली पाने, " अशी प्रत्येकाची स्थिती होती.

ह्या म्हाताऱ्यांच्या दिमतीला एक वृद्धाच " कंपेनियन" म्हणून होती. ... तिलाही संसाराचे पाश नंव्हते. बहुतेक मुलं युद्धात कामास आली होती. नवरा एकाएकी मरून गेला होता. एकच मुलगा शिल्लक होता ... तो पोलीसमन होता कुठतरी. त्या साऱ्यांचे फोटो भिंतीवर टांगून त्यांच्या आठवणीवर ती जगत होती. तिनं आम्हाला चहा पाजला. स्वतः केलेले केक्स खाऊ घातले अन् माडीवर नेलं. बहुतेक आजोबा मघाशीच निसटले होते. आम्हाला सापडल्या त्या फक्त आजीबाई. प्रत्येकीची काही ना काही तक्रार होती. कुणाची पाठ दुखत होती. कुणाचं पोट बिघडलेलं होतं. कुणाला पायांनी चालवत नव्हतं. मात्र " इथं आम्हाला बरं वाटतं, " असं तोंडांनी सगळ्या म्हणत होत्या. तसा त्यांचा प्रश्न सुटला होता. सरकारकडून आठवड्याला आठपौंड प्रत्येकाला मिळत होते... त्यात कसंबसं का होईना, भागत होतं. अन् नातेवाइकांवर अवलंबून राहयची गरज नव्हती. एकेकीची विचारपूस करीत आम्ही त्यांच्या खोल्यांतून हिंडत होतो. वाचनासाठी भरपूर साहित्य होतं. रेडिओ होता.

आम्ही ज्या आजीबाईजवळ शेवटी गेलो, त्या आमच्याशी बराचवेळ गप्पा करीत बसल्या... वय सत्तरी पलीकडेही असावं ...त्या दिवशी त्यांचं एक कसलंतरी पार्सल यायचं होतं... त्यासाठी त्या नुकतत्याच बाहेर जाऊन आल्या होत्या. पण ते मिळालं नव्हतं. त्याची त्या एकसारखी वाट पाहत होत्या... बोलता बोलता मधूनच पलंगावरून उठून खिडकीबाहेर डोकावीत होत्या अन् रस्ता न्याहाळीत होत्या. मग पुन्हा पाठीला हात लावून बसत होत्या. त्यांची पाठ दुखत होती' आम्हा दोन भारतीय स्त्रियांना पाहून त्या म्हणाल्या,

"'माझा अर्धा जन्म हिंदुस्थानांत गेलाय्"

"हो का? कसा काय" आम्ही उत्सुकतेनं विचारलं.

मी हैदराबादला होते... खूप वर्षं ... तिथं एका वसतिगृहात मी मेट्रन होते ..."

"मग परत केव्हा आलात?"

"तुम्हाला स्वातंत्र्य मिळाल्यावर. स्वातंत्र्यानंतर तिथल्या लोकांनी आम्हाला इंग्रज नको, म्हणून सांगितलं ·· म्हणून मी तुमचा देश सोडला."

एवढं म्हणून त्या पुन्हा तुरूतुरू चालत खिडकीशी गेल्या अन् रिकाम्या रस्त्याकडे पाहून म्हणाल्या, "अजून त्याने (देव जाणे तो कोण?) पार्सल आणलं नाही. आता मलाच एवढ्या उन्हांत जावं लागणार, असं दिसतय ..."

आमच्याबरोबर आलेल्या त्यांच्या कंपेनियनने त्यांना मृदु स्वरात म्हटलं:

"अंमळशानं येईलच ... उन्हांत कशाला जायचं?"

पण ते शब्द जणू त्यांच्या कानावर पडलेच नव्हते. त्याची चुळबूळ चालूच होती. थोड्या वेळानं पुन्हा हातांनी पाठ दाबत त्या बोलल्या,

"पण कधी येणार ते पार्सल देव जाणे! अन् माझी तर पाठ दुखतेय."

"मग पडा तुम्ही आता... आम्ही निघतो..." असं म्हणून आम्ही उठलो. तेवढ्यात आजीबाई नादीष्टपणे परत खिडकीजवळ जाऊन उभ्या राहिल्या होत्या.

आम्ही जिना उतरू लागलो... माझ्या डोळयांसमोर एकेका खोलीतले ते शुष्क, सुरकुतलेले, चैतन्यहीन चेहरे दिसत होते... वृद्धाश्रमात सर्व सोयी होत्या... खायलाप्यायला वेळेवर अन् पोटभर मिळत होतं... औषधपाण्याची सोय होती. वाचनासाठी भरपूर साहित्य होतं... रेडिओ होता... वाटेल तेव्हा वाटेल ते करायचं स्वातंत्र्य होतं... कष्ट नव्हते... सुनांचा छळ नव्हता. नातवंडांचा त्रास नव्हता... मुलांच्या बेफिकिर वृत्तीचं दुःख नव्हतं. कसले पाश नव्हते... व्याप नव्हता ...

पण इतकं सारं असूनही मला त्यांचा हेवा वाटला नाही... आपल्या म्हातारपणी अशी सोय व्हावी, असा विचारही मनाला शिवला नाही... उलट असं वाटत राहिलं की, ह्यापैकी प्रत्येकीला नातवंडं असतील. ती कुठंतरी आजीविना, तिच्या मांडीविना, 'आजीच्या गोष्टी' विना भुकेली राहिली असतील. अन् इथं आजीची मांडी नातवंडाविना रिकामी राहिलीय्. तो रिकामेपणा आज कदाचित तिला जाणवत असेल नसेल... कोण जाणे! त्यापेक्षा स्वतःचं हे असं स्वातंत्र्य बरं, असंही तिनं कदाचित् मनाला पटवलं

असेल... पण माझ्या भारतीय मनाला तरी, तिला असं करायला लावणाऱ्या स्वतःच्या मुलानातवंडांपासून तिला विलग करणाऱ्या ज्या काही गोष्टी असतील त्या अतिशय निर्दय वाटल्या.

× × ×



**"वेस्ट मिन्स्टर ॲबे," जेम्स पार्कमधून पिछाडीकडून दिसणारें, लंडन.**

लंडनमध्ये 'महाराष्ट्र'मंडळही आहे. महाराष्ट्र मंडळ म्हटलं, की गुर्जर, वंग, मद्र मंडळंही आलीच. अन् ती तशी आहेतही; निदान असं मला सांगण्यात आलं. पण परदेशात आपली प्रांतीयता नेण्याऐवजी, राष्ट्रीयता न्यावी, इथं अशा प्रांतिक स्वरुपाच्या संस्था असणं मोठंसं इष्ट नाही, असं काहींचं म्हणणं दिसलं.

शिवाय या मंडळातर्फे वर्षाला दोनचार व्याख्यानं, पंधरा ऑगस्टसारखे राष्ट्रीय दिन, अगर एखाद दुसरं नाटक सहली याव्यतिरिक्त फारसे भरीव कार्यक्रम दिसत नाहीत, अशी या लोकांची तक्रार होती, पण मंडळाच्या निमित्ताने लंडनमधील महाराष्ट्रीय मंडळीं एकत्र येतात. १९३२ साली साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांनी हे मंडळ स्थापन केलं, त्यावेळीं इथल्या महाराष्ट्रीय समाजाला एकत्र आणण्याचा त्यांचा प्रमुख हेतू होता.

पंधरा ऑगस्टच्या निमित्ताने मंडळाने 'व्हिपस्नेड झू' ची सहल काढली होती. त्यावेळीं शे-दीडशे लोक त्या सहलीत होतं. लंडनमध्ये इतकी

महाराष्ट्रीय मंडळीं असतील अशी मला कल्पना नव्हती. या सहलीत सामील होण्यासाठी मंडळाचे चिटणीस सतीश तुंगारे यांचं मला निमंत्रण होतं. वास्तविक 'झू' मधल्या मंडळींना पाहण्यात मला स्वारस्य नव्हतं, पण इतर मंडळीना भेटण्याची इच्छा होती. अरूणच्या अपघातामुळे मंडळात ठरवलेला माझ्या व्याख्यानाचा कार्यक्रम रहित करावा लागला होता. त्यानिमित्तानं व्हायचा परिचय तो या सहलीत झाला.

मोठाल्या चारपाच बसेस भरून मंडळी होती. त्यांनी भेंड्या, गाणी, उखाणे, गप्पा, यांनी अक्षरशः बसेस डोक्यावर घेतल्या. जुन्या नाटकातली गाणी, संस्कृत श्लोक, मराठी कविता ह्या गोष्टींची मजा परदेशात काही और असते.

त्यादिवशी माझी प्रकृती जरा वेताबाताचीच होती. तशात हवाही द्वाड होती. सूर्य दिवसभर नव्हताच अन् चावरा वारा सुटला होता. मधूनमधून पावसाचा शिडकावा होत होता. लंडनपासून तीस मैलावर असलेलं हे विख्यात झू पूर्वी व्हिपस्नेड नामक साहेबांचं खाजगी प्राणिसंग्रहालय होतं. काहीशा उंच पठारावर हे निसर्गरम्य ठिकाण होतं. भोंवतालची वनश्री अत्यंत मनोहर होती. लहान लहान उंचवटे, मधूनच खोलगट दरी, तिच्या कडेनं उभी असलेली झाडी, उंचसखल जमिनीचे चढउतार, त्यांच्यामधून लपतछपत वाट काढणारा ओढा मला कॉन्स्टेबल चित्रकारांची निसर्गदृश्यं आठवली. ह्या जागेत मधूनमधून घातलेल्या कुंपणातून नानातऱ्हेचे प्राणी वावरत होते.

कित्येक मैल लांबरुंद पसरलेल्या या संग्राहालयात दोन तासांत जेवढे प्राणी जमले, तेवढे पाहिले. त्यात बंगालच्या वाघांची जोडी, गिरनारचा सिंह होता. ऑस्ट्रेलियाचा कांगारूही होता अन् पाणघोडेही होते. माझ्याबरोबर वऱ्हाडनागपूरच्या मंडळींचा घोळका होता. नागपूरचे अरविंद देशपांडे, मराठे, वसू, देव, इथ भेटले. दुपारी सहभोजनाचा कार्यक्रम झाला. मंडळाच्या अध्यक्ष आजीबाई बनारसे यांच्यातर्फे पाहुणेमंडळींची सोय केली होती. त्यानंतर परस्परपरिचयाचा कार्यक्रम व पत्ते, भेंड्या, बैठे खेळ, हुतुतू, दोन्ही खो खो....यांत संध्याकाळ ओढवली.

× × ×

लंडनमध्ये आजीबाई बनारसेचं नाव ठाऊक नसलेला महाराष्ट्रीय विरळा. पंधरावीस वर्षांपूर्वी त्या पतीबरोबर आपल्या मुलामुलीसह इथं आल्या. त्यांचे पती अचानक वारल्यामुळे त्यांच्यावर भयंकर प्रसंग गुदरला. शिक्षण नाही, पैसा नाही, तशात लहान लहान चार मुली... चरितार्थाचं साधन नाही. अशावेळी हिंदी लोकांसाठी वसतिगृह काढण्याची कल्पना त्यांना सुचली. एका इंग्रज शेजाऱ्याचं कर्ज घेऊन त्यांनी त्याची सुरवात केली. आज त्यांच्या मालकीची दोन घरं लंडनमध्ये आहेत. मोटार आहे. मुलींची लग्न उरकली आहेत. इंग्लंडमध्ये कुणीही नवीन मराठी विद्यार्थी ओळखी शिवाय आला, व त्याला दुसरीकडे सोय नसली, की तो त्यांच्या 'लॉजिंग' ची वाट धरतो. आजीबाईचं हे 'लॉजिंग' प्रत्येकाला घरासारखं वाटतं. लंडनच्या विलायती जेवणाचा कंटाळा आला, की त्यांच्या कडेजावं. आजीबाई मूळच्या यवतमाळच्या. आपला वऱ्हाडी खाक्या अन् वऱ्हाडी मन त्यांनी तिथंही ठेवलं आहे...जेवण मराठी असतं...सणवार, देवधर्मही होतो... आलागेला असतो...

सहलीनंतरच्या आठवड्यात लंडनला गणेशचतुर्थी पडली. तेव्हा आजीबाईकडे गणपती बसला. आम्हाला जेवणाचं निमंत्रण होतं. लंडनमधल्या गजाननाला पाहण्याची मला उत्सुकता होती. अर्थात इतर गणपतीसारखाच हा गणपती होता. त्याला मोदक लाडवांचा नैवेद्य होता ..फक्त विलायती कपड्यात तो दाखवायला गेला अन् या 'सुखकर्त्या दुखहर्त्या' ला आरतीही बूटमोजे घालून म्हटली गेली एवढंच.

ते पाहून मला दुसऱ्या एका गणेशोत्सवात एका डॉक्टरसाहेबांनी केलेल्या भाषणाची आठवण झाली. हे डॉक्टर मजकूर बरीच वर्षं इंग्लंडात राहिलेले. व्याख्यानाची भाषा इंग्रजी होती. विषय "समतोल आहार." बदलत्या काळांत आपण भारतीयांनी आपल्या आहारातही बदल करावयाला हवा, हा डॉक्टरांचा प्रतिपाद्य विषय. सकस ..जीवनसत्वयुक्त आहार करायचा म्हणजे आपल्या सनातन आवडीचे पदार्थ लाडू—मोदक यांच्यावर पाणी सोडायला हवं, हे सोदाहरण विषद करताना डॉक्टरसाहेब म्हणाले :

"फॉर एक्झांपल, लुक एट अवर लॉर्ड गणेश ! ही इज फॉंड ऑफ

लड्डूज अँड मोदक्स ! अँड व्हाट इज द रिझल्ट ? हिज बिग टमी, दॅट यू सी ! ”

समोर बसलेला ‘लंबोदर’ हे भाषण शांतपणे ऐकून घेत होता. श्रोत्यांची मात्र हसून हसून दोन पोटं झाली. ! परंतु ती कशामुळे, हे सांगणं अवघड होतं !

× × ×

# १३

इथला मुक्काम संपत आला होता. इथल्या अनेक सुखद आठवणी मी बरोबर घेऊन जाणार होते....पण जाता जाता लंडनने एकदोन ओरखडे काढले...त्यांची आठवण मनातून जाण्यासारखी नव्हती.

लहानशीच घटना. परंतु इथे आल्यापासून जो विचार वारंवार मनात डोकं वर काढीत होता, त्याला या घटनेनं जोरानं चालना दिली.

एक नेहमीचीच संध्याकाळ.

एका इंग्रज स्नेह्याबरोबर मी फिरायला चालले होते. आमच्या काही पावलं पुढे तीनचार इंग्रजांचा घोळका बोलत जात होता. एकाएकी त्यांच्या संभाषणाकडे माझं लक्ष वेधलं.

"बघा, हा रस्त्यावरचा कचरा बघा!" त्यांच्यापेकी एकजण समोर बोट दाखवीत म्हणाला.

कुणीतरी पॉपकॉर्न किंवा तत्सम वस्तू खाऊन रिकामी पाकिटं फुटपाथवर भिरकवली होती.

"अन् तरी बरं, हेल्प-कीप लंडन क्लीन' ही ओरडत एकसारखी लोकांच्या कानीकपाळी चालू आहे." दुसरा त्वेषाने बोलला.

"पण त्या पाट्या पाहयला तर पाहिजेत ना लोकांनी! मला आश्चर्य वाटतं या लोकांचं, की ठिकठिकाणी कचरापेट्या असताना, लोक कचरा त्यात का टाकीत नाहीत?"

"पण आपले लोक नक्की असं करणार नाहीत."

"नक्कीच! सम इंडियन्स मस्ट बी अराऊंड!"

(काही भारतीय आसपास असावेत)

त्या शब्दांनी माझ्यावर एकदम तीव्र प्रहार केल्यागत झालं. माझ्या

गोऱ्यामोऱ्या चेहऱ्याकडे पाहत माझ्या स्नेह्यानं सांत्वनाचं दुबळं हास्य केलं. परंतु ते शब्द माझ्या जिव्हारी लागले होते.

लंडनमध्ये नाना देशांचे, नाना प्रकारचे लोक राहत असताना, सार्वजनिक घाण दिसली की, तिचा संबंध भारतीयांशी जोडला जावा अन् लोकांना तात्काळ भारतीयांचं तेवढं नाव आठवावं, इतरांचं आठवू नये, ही गोष्ट मला अन्यायाची वाटली. पण हे सारं असं कां व्हावं ? हा विचारही पाठोपाठ मनांत आल्यावाचून राहिला नाही. ही गोष्ट जेवढी मनःक्षोभक तेवढीच विचारप्रक्षोभकही होती. अन् त्या संभाषणानं माझ्या मनांत उलटसुलट विचारांची खळबळ उडाली.

हे विधान केवळ कांही बेजबाबदार लोकांनी केलेलं होतं, असं मानायचं ? कीं भारतीय लोक घाणेरडे आहेत, असा इथें सर्वसामान्य समज होता ? अन तो तसा असेल, तर तो निर्माण का व्हावा ? हा इंग्रजांचा निव्वळ पूर्वग्रह ? की राज्यकर्त्यांच्या मनोवृत्तीचा एक अवशेष ? की वस्तुस्थिती ?

इथे साहेबी संवयीचे, साहेबी पद्धतीनं अन स्वच्छतेनं राहणारे भारतीय मी पाहिले होते. काहीजण इंग्रजी ललनांच्या परीक्षेला उतरून त्यांच्याबरोबर सुखाचा, स्वच्छ संसार करीत असल्याचंही मला ठाऊक होतं. पण ह्याच्या अगदी उलट असलेल्या कित्येक गोष्टींच्या आठवणीही माझ्या मनांत जमा झाल्या होत्या. अन त्या सलत होत्या. कांही दिवसपूर्वी–बर्मिंगहॅमच्या रस्त्यावरून मिस हीलीच्या मोटारीतून हिंडत असतांना विस्कटलेले केस अन अंगावर मळके कपडे घातलेल्या दोन हिंदी स्त्रियांचे अवतार मी पाहिले होते. त्याच्या काही मिनिटे आधीच मोठमोठ्यानं ओरडत जाणाऱ्या हिंदी लोकांचा एक थवा आमच्या समोरून निघून गेला होता. ही दृश्यं मी लंडनमध्ये पाहिली नव्हती. अन ती दृश्यं पाहून त्यावर मिस हीलीशी झालेलं संभाषण मला आठवत होतं.

"बर्मिंगहॅममध्ये फार मोठ्या प्रमाणावर भारतीय लोक राहतात नाही ?" हा माझा साधा प्रश्न होता.

पण त्यावर मिस हीलीनं जे उत्तर दिलं होतं, ते मात्र अपेक्षित नव्हतं.

"हो भरपूर आहेत," ती म्हणाली "अन बहुतेक सारे मजूर,

ड्रायव्हर्स, बसकंडक्टर्स अशासारखेच आहेत अन त्यांनी आमच्या इथल्या दैनंदिन जीवनात अनेक प्रश्नही निर्माण केले आहेत." तिच्या स्वरातली कटुता मला जाणवली.

"उदाहरणार्थ ? " काहीसं वरमून मी विचारलं.

"जागेचा प्रश्न तर आहेच... परंतु त्याबरोबर ह्या लोकांच्या सवयीही इतरांना तापदायक होतात. माफ करा, पण हे लोक एकंदरीतच घाणरडे असतात, अशी लोकांची तक्रार आहे.... आनून या लोकांची घरं कशी असतात... ते पाहण्याचा प्रसंग आमच्यावर सहसा येतं नाही.. पण त्यांचं 'कुकिंग'! माय गॉड ! त्यांच्या स्वयंपाक घरांतून जे नाना तऱ्हेचे चमत्कारीक वास सुटतात, त्यांनी मात्र खरोखरच डोकं दुखायला लागतं. कांदे, लसूण, तुमच्या फोडण्या, काही विचारू नका ! "

तिचं फटकळ वक्तव्य ऐकून – मलाही थोडीशी चीड आली. तरी मी नम्रपणे विचारलं.

"माफ करा... पण मीही स्पष्ट बोलते... आमच्या स्वयंपाकाबद्दल तुम्ही जे म्हणता, तेच तुमच्याही स्वयंपाकाला लागू नाही का ! "

"कसं ? "

"लंडनमध्ये आमच्या खालच्या तळमजल्यावर एक इंग्रज जोडप राहतं... त्यांच्या स्वयंपाकघरातून रोज सकाळी अंडी,... मासोळी ..मटण यांचे जे वास सुटतात... त्यांनी मला रोज कसंतरी होतं... मी शाकाहारी आहे... त्यामुळे मला जवळपास त्या वासांनी मळमळ सुटते म्हटलं तरी चालेल..."

"पण तुम्ही एक शाकाहारी आहात...तसे सगळे भारतीय नाहीत. शिवाय मुख्य म्हणजे आम्ही बहुसंख्येनं आहोत. अन इथले मूळचे रहिवासी आहोत, हे कसं विसरता येईल ? "

"पण ते अल्पसंख्याक असले तरी आज तुमच्या समाजाच्या उपयोगी पडत आहेत नां ? तेव्हां तुम्हीही त्यांच्या काही गोष्टीकडे सहानुभूतीने पाहयला नको कां ? त्यांनी आपलं खाणंपिणं, राहणी, सगळयाच गोष्टी कशा काय बदलून टाकाव्या ?" मी म्हटलं.

त्यावर मिस हीली म्हणाल्या,: "बरं खाण्याचं एक सोडा ... पण... इथ

राहयचं, तर निदान आमची राहणी पाहून तरी या लोकांनी स्वच्छ राहण्याचा प्रयत्न का करू नये? आमच्यात काय गरीब लोक नाहीत?"

अर्थात् याला मजजवळ उत्तर नव्हतं. आणि नुकत्याच नजरेला पडलेल्या दृश्यान तिच्या म्हणण्याला साक्ष दिली होती. तसंच काही दिवसापूर्वी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेलं ऑक्सफर्डचं एक वृत्त तिच्या म्हणण्याला पुष्टी देणारं होतं. ते वृत्त असं की, तिथे भारतीय भाडेकरूंनी भरलेल्या एका घराला एकदा आग लागली होती. ती विझवायला आगीचा बंब घेऊन माणसं आली; त्यावेळी त्यांच्या वाटेत इतके बिछाने आडवे पडले होते, की त्यामुळे आग विझविणाऱ्याच्या कामात अडथळा उत्पन्न झाला म्हणतात. त्यामुळे या प्रसंगानंतर स्थानिक स्वास्थ्य अधिकाऱ्याला या भारतीय लोकांची एक सभा बोलावून त्यांना स्वच्छतेचे अन् आरोग्याचे नियम समजवून द्यावे लागले होते. त्यावेळीं तो इंग्रज अधिकारी भाषणात जे बोलला त्यातली खोच लक्षात घेण्यासारखी आहे. या वृत्तात दिलेले त्याचे शद्ब असे:

"मला ठाऊक आहे, की हे नियम (एकच खोली अनेकांनी न वापरण्याचे इ.) तुम्हाला कदाचित विचित्र वाटतील... परंतु ते तुमच्या भल्यासाठीच केलेले आहेत." ( I know, these laws may seem strange to you, but they have been made for your benefit." )

हे झालं जागेची चणचण असणाऱ्या गरीब कामगारांबद्दल!... अन् विद्यार्थी? त्यांच्याबद्दल इथे काय बोललं जात होतं?

त्यांच्याबद्दलचीही एक आठवण माझ्या मनाला बोचत होती. अन् हा प्रसंग माझ्या स्वतःवरच गुदरला होता.

त्या दिवशी एका इंग्रज मित्राला भेटायला मी त्याच्या घरी गेले होते. ... दारावरची घंटा वाजविल्याबरोबर घरमालकिणीनं दार उघडलं... पण मला पाहताच, तिनं तुसडेपणानं म्हटलं.

" ओ, आय एम सॅारी! आय हेव नो रूम्स टू लेट!" अन् मला बोलू देण्याची संधी न देताच एकदम तिनं दार लोटलं. मी पुन्हा बेल वाजवली. तिनं पुन्हां दार उघडलं, अन् म्हटलं: " ओ, पुन्हा तुमीच!" तेव्हा मी थोडंसं कडकपणे म्हटलं.

" मघाशी माझं बोलणं ऐकून घेतलं नाहीत तुम्ही... मला तुमच्या

खोल्या नकोत... पण तुमच्या माडीवर राहणाऱ्या मित्राला भेटायला आलेय मी... "

" पण ते सध्या घरी नाहीत. "

" नसतील ... पण येतील इतक्यात. त्यांनी मला आपॉईंटमेंट दिली आहे... "

" मग काय करायचं ? ते तर घरी नाहीत. "

" तुमच्या शिष्टाचारात बसत असेल, तर जिन्याजवळच्या या खुर्चीवर बसते मी थोडा वेळ. तेवढयात येतीलच ते " मी खोचून म्हटलं.

माझ्या बोलण्यातली धार तिला जाणवली असावी. तिनं मला आत नेलं अन् स्वतः माझ्याजवळ येऊन बसली... मग माझ्या दुखावलेल्या चेहऱ्याकडे पाहत ओशाळून म्हणाली;

" कदाचित मघाशी माझं वागणं बरं वाटलं नसेल तुम्हाला ! पण काय करायचं ? दररोज दारावरची घंटा वाजवून खोल्या शोधायला येणारी मंडळी त्रास देतात. मला वाटलं, तुम्हीही खोली मागायला आला आहात. "

" अन् मी भारतीय आहे ... म्हणून ती तुमच्याजवळ नाही, असच ना ? "

" तसं नाही ... बिलकुल नाही. " ती कळवळून म्हणाली, " कारण मी वर्णविद्रेषी नाही. दोन हिंदी विद्यार्थी आहेत ... माझ्या घरात. पण यापुढे मात्र हिंदी भाडेकरू ठेवायचे नाहीत, अशा मताची झाले आहे मी ! का ते पाहयचंय तुम्हाला ? "

" का ? " मी कुलतुहलानं विचारलं.

" मग या माझ्याबरोबर ... " असं म्हणत तिनं घरातल्या दोन खोल्या उघडून मला दाखवल्या. तो काय ? अस्ताव्यस्त बिछाने, त्यावर भिरकावून दिलेले कपडे, पसरलेली वर्तमानपत्रं, टेबलावर सांडलेला चहा, बिनविसळलेल्या कपबशा, सिगारेटची थोटकं, वस्तूंवर चढलेली धूळ, हात पुसून मळके झालेले पडदे. हें दृश्य समोर दिसलं. मघाशी घरमालकिणीच्या वर्तनाने जेवढी दुखावले नव्हते, तेवढी – ह्या दृश्याने मी दुखावले...

लंडनच्या रस्त्यावरून भटकताना " टु लेट " ( फॉर व्हाईट्स ओनली ) अशा अर्थाच्या पाट्या कित्येक ठिकाणी दिसतात. काही लोक

अशा जाहीररितीनं आपली भावना प्रकट करतात अन् काहीजण दारावर अशा पाट्या न लावता तुम्ही खोली मागायला गेलात, की ' सॉरी ' म्हणून तुमच्या समोर दार लावून घेतात. एकूण एकच. काही लोक आपली घरं द्यायला राजी होतात. ... पण ती भारतीयाबद्दलच्या प्रेमामुळे नव्हे ... तर त्याला इतर दुसरी कारणं असतात म्हणून.

इंग्लंडमध्ये चारचौघे भारतीय जमले की त्यांच्या बोलण्यातून एकच सूर निघतो. " या गोऱ्या लोकांना आपण त्यांच्या देशात नको आहोत" . वर्षानुवर्ष इथं राहूनही ते आपल्यात मिसळत नाहीत... घरी बोलवणं तर लांबच राहिलं ... त्यांच्या शिष्टाचारातला गोडवा फक्त वरवरचा आहे. " इ. काही लोकांचा असा अनुभव असेलही – पण कुठलीही सर्वसामान्य विधानं करणं नेहमी धोक्याचं असतं. कारण ती खरी नसतात. मग ती इंग्रजांच्याबाबतीत असो, की भारतीयांच्या बाबतीत असो. सगळे इंग्रज तुसडे व शिष्ट नसतील, तसे सगळे भारतीयही घाणेरडे नसतील ...

पण दोन वर्षापूर्वी किलबर्न विभागत झालेली दंगल, साऊथ–आल विभागातील लोकांनी, भारतीयांनी तिथे जमिनी किंवा घर विकत घेऊ नये, म्हणून त्यांच्याविरुद्ध घेतलेली भूमिका, त्यामुळे पॅट्रिक गॉर्डन-वॉकर यांचा निवडणूकींत झालेला पराजय, इंग्लंडचा आगतांचा कायदा... ( इमिग्रेशन ॲक्ट ) या सर्व प्रत्यक्ष घडलेल्या घटना आहेत... अन् त्या आपल्याला अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत.

आज या देशातील सर्वसाधारण लोकांना आपला सहवास नको असतो, निदान आपले इथं विशेष उत्साहानं स्वागत होत नाही, ही वस्तुस्थिती असेलही, पण असं का ?

आपण इथल्या लोकांना प्रिय नसू तर ते आपल्या कोणत्या गुणामुळे ? आणि ही गोष्ट इंग्लंड पुरतीच मर्यादित आहे, की इतरत्रही आपल्या लोकांचा असाच अनुभव आहे ? इत्यादि प्रश्न परदेशात जाऊन आलेल्या लोकांच्या मनात उभे राहतात.

या दोन्ही प्रश्नांची चर्चा, जगातील बहुतेक पाश्चिमात्य अन् पौर्वात्य राष्ट्रांचा प्रवास करून आलेले भारतीय लेखक श्री. जी. व्ही. देसानी यांनी " इलस्ट्रेटेड वीकली " मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या एका मार्मिक लेखात

केली आहे. परदेशांत काय किंवा भारतात काय, परकीय भारतीयांच्या सहवासाला कंटाळतात, ते का? परदेशातील हिंदी लोकांच्या सहवासाचा अनुभव घेतलेले आणि भारतातही दीर्घकाल वास्तव्य करून चुकलेले श्री. देसांनींचे काही परदेशी मित्र, यांनी ह्या गोष्टीची जी कारणमीमांसा त्यांच्या-जवळ केली, ती त्यांनी या लेखात दिली आहे. त्यांच्यामते याची कारणे तीन : एक, भारतीय लोक घाणेरडे आहेत. ( Indians are dirty). दुसरं, भारतीय गडबडे आहेत, ( Indians are noisy) आणि तिसरं, भारतीय खोटारडे आहेत ( Indians lie).

सर्वसामान्य विधानं करणं नेहमी बरोबर नसतं, हे श्री देसानी आग्रहानं सांगतात. एवढंच नव्हे. तर 'राष्ट्रीय चारित्र्य' नावाची गोष्टही आस्तित्वात असतेच असं नाही, असही ते म्हणतात ( National character is a myth). परंतु तरीही भारतीयांच्याबद्दल दुसरे लोक जे काय बोलतात, ते असं आहे... आणि त्याची आपण जेवढी दखल घ्यायला हवी, तेवढी घेत नाही, असं त्यांना वाटतं. मला इतर देशांतील लोकांचा अनुभव नाही. परंतु माझी एका जर्मन इंजीनीअरशी या संदर्भात काही दिवसापूर्वी झालेली चर्चा इथं नमूद कराविशी वाटते. या चर्चेत इंग्लंडमधील काही घरावर आढळणाऱ्या "फक्त गोऱ्यांसाठी" या पाट्यांचा मी उल्लेख त्याच्याजवळ केला, तेव्हा तो म्हणाला.

"अशा पाट्या आता आमच्या इथेही येऊ लागल्या आहेत. भारतीयांच्याबद्दल निदान आमच्या तरी मनात कुठलाही पूर्वग्रह नाही... म्हणून आम्ही आमची घरं त्यांना सर्रास भाड्यानी देतो. पण भाडेकरू निघून गेल्यावर आमची घरं कुठल्या स्थितीत सापडतील, नेम नाही. कुठे बैठकीतल्या सोफ्याचा उपयोग पलंगासारखा केलेला दिसेल तर कुठे दाराच्या पडद्यांचा टॉवेलसारखा? कुठे फर्निचर नानातऱ्हेचे डाग पाडून खराब केललं असतं तर भिंती रंगवलेल्या अन् फरशा घाणीचे थर साचलेल्या! विशेष म्हणजे सामान्य पातळीची माणसंच असं वागतात, असं नव्हे... तर दूतावासांतली कांही माणसंही याच थाटात राहतात. एका ठिकाणी तर मोडलेल्या लाकडी फरशीचा उपयोग सरपणासाठी केल्याचीही घरमालकिणीची तक्रार होती!"

"पण हे वृत्त थोडंसं अतिरंजित किंवा अपवादात्मक असेलसं नाही तुम्हांला वाटत?" मी अविश्वासानं म्हणाले.

"कदाचित असेलही परंतु त्यात सत्यांश आहेच. सर्वचजण फरशी जाळणारे नसतील, पण एकाद्याचंच वर्तन इतर घरमालकांना बिचकावयाला पुरेसं होतं. आमचं सरकार उदार मनोवृत्ती बाळगण्याबद्दल आम्हाला आदेश देतं. त्यावर आमचे लोक काय म्हणतात ठाऊक आहे?

"काय?"

"की श्वेतेतर माणसांना घरं भाड्यांनी देणं आम्हाला परवडत नाही. कारण, हे भाडेकरी घरं सोडून गेले, कीं त्यांनी करून ठेवलेली मोडतोड अन् नुकसान हे त्यांनी दिलेल्या भाड्यापेक्षा पुष्कळ पटीनं जास्त असतं..."

"पण आमच्या सर्वच लोकांबद्दल तुम्ही असं सरसकट विधान कराल का?" मी विचारलं...

"नाही...यालाही अपवाद असतात, नाही कोण म्हणतं? पण साधारणतः तुम्हा श्वेतेतर लोकांची राहणी, तुमच्या सवयी, आमच्यापेक्षा भिन्न आहेत... गोरे म्हटले की भिन्न देशाचे असले, तरी त्यांची राहणी, वागण्याची पद्धत, संवयी, स्वच्छतेचं मान, बरंचसं सारखं पडतं... वर्णभेद असावेत, असं आमच्यापैकी कुठलाच सुसंस्कृत माणूस म्हणणार नाही. पण ते भेद नको म्हणजे सहजीवन हवंच, असं का? यांत गोऱ्या लोकांचीही एक बाजू आहे, ती तुम्ही का समजून घेत नाही?" इंजिनीअर साहेब कळवळून म्हणाले.

"कोणती बाजू"

"वर्णसमानता हवी अन्- ती हवीच, असं मी मानतो – तर सर्व वर्णांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक अधिकार समान घ्यावे . असं आम्ही म्हणू; पण समानतेच्या नावावर आमच्या खाजगी जीवनावर, आमच्या घरावर आक्रमण का? प्रत्येकाच्या खाजगी जीवनात कोण मित्र असावेत, कोणाला घरी बोलवावं, कोणाबरोबर जेवावं, हे ठरविण्याचा ज्याचा त्याचा अधिकार आहे. हा समान पातळीचा, समाज जीवनपद्धतीचा, समान अभिरुचीचा प्रश्न आहे...ती जोवर समान होत नाहीत, तोवर आमच्या खाजगी

जीवनात तुम्ही कसा प्रवेश मिळवणार ? अन् सहजीवनाची अपेक्षा तरी तुम्ही का करावी ? ''

त्याचं हे परखड वक्तव्य मनाला लागणारं होतं ... ते पूर्णांशानं खरं नसेलही ... तरी ते आत्मनिरीक्षण करायला पुरेस ठरावं — निदान आज आपल्याविषयी बाहेरच्या जगात लोकांचं काय मत आहे, हे जाणून घेण्याच्या दृष्टीनं ते कमी मोलाचं नाही.

# १४

विलायतेची वारी करणाऱ्याला शेक्सपियरच्या जन्म–स्थानी गेल्याशिवाय गती नाही; तसंच ऑक्सफर्ड–केंब्रिज ह्याठिकाणी जाऊन आल्याशिवाय त्याच्या यात्रेची सांगता होत नाही. ऑक्सफर्ड, केंब्रिज ही इथली ज्ञानतीर्थं. एक ' तमसे ' च्या काठी वसलेलं, तसं दुसरं ' काम ' नदीच्या तीरावर. इथूनच या देशातली ज्ञानगंगा वाहिली आहे.

" हे आमचे दोन ज्ञानचक्षू ", असं इंग्रज अभिमानानं सांगतो. आणि का सांगू नये ? या देशातले मोठमोठे वैज्ञानिक व शास्त्रज्ञ, कवी आणि लेखक, राजकारणी आणि धर्मज्ञ ह्या विद्यापिठांतून बाहेर पडले आहेत. बाराव्या आणि तेराव्या शतकांत स्थापन झालेल्या ह्या विद्यापीठांना दीर्घ परंपरा आहे. इंग्रज हा परंपरेचा पुजारी. त्यामुळे ही परंपरा टिकविण्याची पराकाष्ठा इथंही आहे. ही विद्यापीठं म्हणजे इथली गुरुकुलंच म्हणायची. ज्ञानोपासनेत आपली अुभी हयात अर्पण करणारे ऋषितुल्य प्राध्यापक आणि तसेच त्यांचे शिष्य आपापल्या साधनेत इथे मग्न असतात. ज्ञानाबरोबर विज्ञानाचीही उपासना चालते अन् ही कित्येक शतकं अखंड चालू आहे.

ही परंपरा पाहिली म्हणजे ह्या विद्यापीठांच्या कित्येक शतकं पूर्वीच अस्तित्वात असलेल्या आपल्या नालंदा तक्षशिला आदि विद्यापीठांची आपोआप आठवण होते. काळाच्या तडाक्यात आपली परंपरा खंडित झाली आणि आपले ज्ञानचक्षू मिटले.

× × ×

ऑक्सफर्ड आणि केंब्रिज ही दोन्ही माझ्या प्रेक्षणीय स्थळांच्या यादीत होती, पण ऑक्सफर्डला जाणं जमलं नाही अन् केंब्रिज एका दिवसात घाई-

घाईनं भुरकावं लागलं. आम्ही गेलो त्या दिवशी पाऊस पडत होता. मधूनच जोराची पावसाची सर येऊन जाई. ती आली की आम्ही एखाद्या दुकानाशी, नाहीतर कॉलेजच्या भिंतीशी, आडोशाला उभे राहत होतो अन् ती निघून गेली की पुन्हा ताजेतवाने होऊन इथल्या ओल्या ' निरुंद गल्ल्यां ' तून पुढची वाट काढीत होतो. बहूतेक गाव विद्यापीठाच्या वेगवेगळ्या इमारतीं नी व्यापलेलं, मधूनमधून दुकानं, इतर वस्ती, हॉटेलं. ह्या इमारती मोठ्या आहेत, पण नेत्रदीपक नाहीत. वातावरणात कुठल्याच प्रकारचा भडकपणा नाही. लंडनची गर्दी, गजबज, धडपड नाही : सारं सौम्य, शांत, स्वस्थ आहे अन् त्यातून '– कॅम ' नदी संथपणे नागमोडी वळणं घेत वाहत जाते.

या 'कॅम' काठीच बहुतेक महाविद्यालयं एकमेकांना खेटून उभी आहेत. त्यामुळं 'सेंट जॉन्स' संपून ट्रिनिटी कॉलेज कुठे सुरु होतं...अन् केअस कॉलेजची भिंत कोणती, असा प्रकार व्हायचा...इमारती जुन्या, दगडाविटांच्या. त्यांच्या भिंती बळकट, मळकट, खडबडीत. मुद्दाम त्या तशाच राखल्या आहेत. इथल्या प्रत्येक वास्तूला परंपरा चिकटली आहे... विटेविटेला इतिहास आहे. न्यूटन कोणता जिना वापरीत असे, वर्डस्वर्थने आपलं 'प्रिल्यूड' कुठे लिहिलं, बायरन आपलं अस्वल कुठल्या जागी ठेवत असे, थॅकरे कुठल्या थाळीत जेवत असे, इ. बारीक सारीक गोष्टींची नोंद आहे. मिल्टन 'खाइस्ट चर्च'चा विद्यार्थी, अन् वर्डस्वर्थ 'सेंट जॉन'चा, तर टेनिसन 'ट्रिनिटी'चा. महाविद्यालयात सर्वांत मोठं ट्रिनिटी कॉलेज. हे आठव्या हेनरीनं बांधलं. सर्व बाबतीत अचाट गोष्टींची महत्त्वकांक्षा बाळगणाऱ्या या राजाला विद्यापिठातलं सर्वांत मोठं विद्यालय आपल्या हातून स्थापन व्हावं, अशी इच्छा झाल्यास नवल नाही. त्याचा पुतळा कॉलेजच्या प्रचंड प्रवेश–दरवाजावर आहे. तेवढा तोच ट्यूडर काळातला आहे.

आतल्या "ग्रेट कोर्ट" ह्या विस्तीर्ण आवारात शिरलं की उजवीकडे न्यूटनचा जिना लागतो. त्यालगतच्या खोल्यांत बसून त्यानं आपलं प्रसिद्ध पुस्तक "प्रिंसिपिया मॅथमेटिका" लिहिलं. खालच्या मजल्यावर थॅकरे अन् मेकॉले यांचं वास्तव्य असे. या चौकातच ट्रिनिटीचं मंदीर आहे. इथे प्रत्येक कॉलेजला लागून त्याचं एक धर्ममंदिर असतं. त्यांत विद्वान संशोधकांचे, कवींचे, राजकारणी पुढाऱ्यांचे पुतळे आढळले. वेस्टमिनिस्टरमध्येही कवींचा

कोंपरा ( Poet's corner ) आहे, तसेच पुढाऱ्यांचे पुतळेहि खच्चून भरले आहेत. धर्माची विद्वत्तेशी, जिवंत इतिहासाशी सांगड घालण्याची इथली ही पद्धत मला विशेष वाटली. यामुळे दोघेही परस्परांचं महात्म्य वाढवीत असतात. धर्ममंदिराशेजारीच विज्ञानाच्या प्रयोग शाळाही चालतात. म्हणजे सनातन ईशभक्तीला आधुनिक विज्ञान-भक्तीची जोड! ट्रिनिटी मदिरांत फ्रांसिस बेकन, मेकॉले, टेनिसन अन न्यूटनचे उभे पुतळे आहेत ...या मंदिराला लागून असलेल्या सेंट जॉन्स कॉलेजमध्ये वर्ड्स्वर्थची खोली होती. याच खोलीतून दिसणाऱ्या न्यूटनच्या पुतळयाचं त्यानं आपल्या 'प्रिल्यूड' कवितेत वर्णन केलं आहे :

" And from my pillow, looking forth by light
Of moon or favouring stars, I could behold
The antechapel where the statue stood
Of Newton with the prism and silent face,
The marble index of a mind forever
Voyaging through strange seas of thought, alone ! "

न्युटनच्या पुतळयाप्रमाणे इथल्या 'क्लॉक टॉवर' मधलं घडयाळही त्याच्या काव्यात आलं. वर्ड्स्वर्थनं "बडबडं घडयाळ" ( लोकेशस क्लॉक ) म्हणून ज्याचा उल्लेख केला, त्यात तासाचे ठोके दोनदा वाजतात – एकदा पुरुषाच्या आवाजात अन् दुसऱ्यांदा स्त्रीच्या. ह्याच चौकाच्या पलीकडच्या कोपऱ्यात असलेल्या एका मनोऱ्यात बायरननं आपलं पाळीव अस्वल आणून ठेवलं होतं.

ट्रिनिटी कॉलेजच्या वाचनालयात मिल्टनच्या काव्याची हस्तलिखितं आहेत. न्युटनचा, तरुण टेनिसनचा अन् बायरनचा पुतळा आहे....बायरनचा हा पुतळा वेस्टमिनिस्टर अॅबेमध्ये ठेवण्यासाठी देऊ केला होता; पण बायरन हा तिथल्या डीनच्या दृष्टीनं पुरेसा नीतिमान नसल्यामुळे त्यानं तो तिथं ठेवण्याचं नाकारलं, असं म्हणतात.

ट्रिनिटीच्या 'न्यू कोर्ट' आवारात टेनिसनचा मित्र आर्थर हॅलम याची खोली दाखवतात. या आवडत्या मित्राच्या सहवासांत कॅमनदी काठी 'वीपींग विलोज'च्या शेजारी बसून, टेनिसननं रात्रीच्या रात्री 'काव्य-

शास्त्र विनोदात ' घालवल्या असतील. यात्त जिवलग मित्राच्या मरणाने हादरून जाऊन त्यानं आपलं विख्यात ' इन मेमोरियम ' हें खंड काव्य पुढे लिहिलं.

ह्या ' ग्रेट कोर्ट ' च्या आवाराबाहेर पडलो. मिल्टनची आवडती कॅम नदी कॉलेजला विळखा घालून वाहताना दिसली. तिच्या काठच्या छत्री-सारख्या वीपींग विलोज, त्यांच्या जमिनीला टेकणाऱ्या फांद्या खरोखर मूक रुदन करीत असाव्यासं वाटलं. या ' कॅम ' वर अंतरा अंतरावर साधे लाकडी, लोखंडी पूल दोन्ही तटांना सांधीत होते. ' न्यूटनचा पूल ' म्हणून ओळख-ला जाणारा लाकडी पूल न्यूटननं बांधलाय. त्यातील एकावर एक टाकलेल्या लाकडी फळ्यांची रचना अर्धवर्तुळातील त्रिज्यांसारखी वाटते. आम्ही पुला-वरून जात होतो. अन् तिथले विद्यार्थी पुलाखालून बोटींनी येजा करीत होते.

आम्ही गेलो, त्यावेळी कॉलेजला उन्हाळयाच्या सुट्या लागल्या होत्या. बहुतेक विद्यार्थी बाहेर गेलेले होते... तरीही " विद्यार्थ्यांना त्रास देऊ नका, त्यांच्या कामात व्यत्यय आणू नका, " अशा पाट्या कुठेकुठे दिसत होत्या ... मधूनच काळे झगे घातलेले ' फेलोज ' इकडून तिकडे जाताना दिसत होते... काही आवारात्या हिरवळीला तुडवीत चालले होते. तो त्यांचाच खास अधिकार. इतरांना या हिरवळीवरून चालणं मना आहे.

ही एक जुनी परंपरा आहे .. तसंच काळे डगले घातल्याशिवाय विद्यार्थ्यांनी बाहेर पडायचं नाही, ही ही परंपरा. ऑक्सफर्ड–केंब्रिजचे बोटीच्या शर्यतीचे सामने होणं, ही गोष्टही परंपरा बनली आहे. एकीकडे इथल्या जुन्यातल्याजुन्या परंपरा काटेकोरपणे पाळण्याची शिकस्त, अन् दुसरीकडे इथल्या प्रयोगशाळांतून नव्यातले नवे प्रयोग करण्याची पराकाष्ठा. न्यूटननं आपला शोध इथे लावला, डार्विननेही इथे संशोधन केलं. एडिं-ग्टन, जेम्स जीन्स ही जोडीही इकडची आणि अणुगर्भाचं विभाजन करणारा लॉर्ड रदरफोर्डही इकडचा. ही नामावळी आणखी कितीतरी वाढवता येते. मला मात्र दुसऱ्याच दोन नावांची आठवण झाली. एकेकाळी ' सारे जहाँसे अच्छा हिंदोस्तां हमारा ' हे गीत गाणारे अन् पुढे पाकिस्तानात जाऊन राहिलेले कवी सर महंमद इकबाल अन आपले जवाहरलाल नेहरू इथलेच विद्यार्थी.

× × ×

या विद्यापीठांनी धर्मभक्ती आणि ज्ञानभक्ती शिकवली, तशीच देश-भक्तीही जोपासली. इथल्या चॅपल्सच्या भिंती दोन जागतिक महायुद्धात कामास आलेल्या तरुण वीरांच्या नामावळींनी भरलेल्या आहेत. युद्धाचं आव्हान मिळताच शेकडो कोवळे विद्यार्थी आपआपापले अभ्यास टाकून रणभूमीवर जायला सिद्ध झाले ... एकट्या ट्रिनिटी कॉलेजातल्या पहिल्या महायुद्धात मेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सहाशेवर अन् दुसऱ्या युद्धातल्यांची चारशेच्या वर आहे !

विद्यापीठाच्या आवारातून बाहेर पडून आम्ही बाजार चौकात आलो. एखाद्या खेडेगावाप्रमाणे छोटासाच बाजार होता...काही चिमुकली दुकानं नानाप्रकारचे 'क्यूरिओज' घेऊन बसली होती. बाजूच्या एका गल्लीत सेकंड-हँड जुन्या पुस्तकांच्या रांगा लागलेल्या होत्या... एकेक पुस्तक एकेका शिलिंगाला मिळत होतं... अन् केंब्रिज पहायला आलेले प्रवासी त्या रांगातून शोध घेत होते. इथल्या विद्यार्थ्यांची, प्राध्यापकांची वापरलेली ती जुनी पुस्तकं होती. त्यांत त्यांची नावं होती. टिपणं होती. इथे शिकायचं भाग्य लाभलं नाही तर निदान इथे शिकून गेलेल्यांनी हाताळलेली पुस्तकं जवळ बाळगण्याचं समाधान ! तेवढाच केंब्रिजचा तीर्थप्रसाद घेऊन ते चालले होते !

× × ×

तीन महिने पाखरांच्या पंखांनी उडून गेले. कोर्स संपला होता. काम संपलं होतं. अरुण बरा झाला होता. आता राहण्याचं प्रयोजन नव्हतं. निघायला हवंहोतं, पण तीन महिन्यांतच या जागेवर माझा लोभ जडला होता. मन घुटमळत होतं. हे सीमा असून असीम भासणारं अफाट शहर; घड्याळाबरहुकुम चालणारं इकडचं गतिमान जीवन, इथली धडपड, इथली निरलस, शिस्तप्रिय, अबोल माणसं, शांत स्वच्छ रस्ते, माझ्या अवडत्या हॅमस्टड टेकडीची हिरवळ, टुमदार नीटस घरं, कधी न आकळणारं आकाश, "स्पर्श कीजेत आकाशी" असे धर्ममंदिराचे टोकदार कळस...या साऱ्यांत मन रेंगाळत होतं. पण दुसरं मन सांगत होतं...

"हे सारं आपलं नाही...याच्याशी आपलं नातं नाही. ही माती परकी आहे...तिचा निर्मम मनानं निरोप घ्यायला हवा."

× × ×

एक आठवड्यानंतर रविवारचं तिकीट मिळालं. मग सर्वांचे निरोप घ्यायला सुरवात केली. आजीबाई बनारसे यांच्याकडे तोंडलीभात, पुरण-पोळी झाली. चित्रकार माळी अन् भागवत पतिपत्नीकडे शिरापोहे झाले. बॉब गेअरकडे ऑस्ट्रेलियन मका खाऊन निरोप घेतला. हॅरी, फिलिपबरोबर नाटक झालं. अण्णा वहिनीकडे शेवटचं घरचं जेवण घेतलं. शनिवारी शेवटचा बाजारहाट उरकला. त्यानिमित्तानं पुन्हा मध्यलंडनमधून भटकून घेतलं. ऑक्सफर्ड स्ट्रीट, स्ट्रॅन्ड, पिकॅडली, बॉंडस्ट्रीट यांच्या वाटा तुडवल्या. आता ह्या नुसत्या दगडा-विटांच्या इमारती वाटत नव्हत्या... त्यांना व्यक्तीत्व आलं होतं. "ऑल सोल्स्" च्या वर्तुळाकार पायऱ्यावरही बसून घेतलं. समोरच्या बी. बी. सी. च्या दोन्ही उंच इमारती न्याहळल्या. संध्याकाळ संपली होती. मावळत्या सूर्याची थरथरती किरणं त्या इमारतीवर टेकली होती. ऑल् सोल्स् चं शिखर चमकत होतं. वाटलं, मी कुणाचा, कशाचा



"क्यू गार्डन" मधील 'पगोडा' - लंडन

निरोप घेत होते? ह्या तीन महिन्यांत त्या शहराची पुरेशी ओळख तरी कुठे झाली होती? ह्या सुंदर सुंदर उंच इमारती म्हणजे लंडन म्हणायचं? ह्या युद्ध-काळात कोसळून पडल्या होत्या; पुन्हा उभ्या राहिल्या होत्या...अन् पुन्हा उद्या कदाचित कोसळणारही होत्या... मग इथली ही धावपळ... त्यात धडपडणारी माणसं... ही खरी होती? की त्या धडपडीतही स्वतःचं भान व तोल राखून आपल्या कोपऱ्यात अव्याहत काम करणारी, ज्ञानाची नवी क्षितिजं गाठणारी माणसं म्हणजे हे शहर होतं? की सामान्य असून असामान्य माणुसकीनं मोठी असलेली माणसं... म्हणजे हे शहर? की इथला उदीमव्यापार, इतिहास अन् परंपरा ही सारी? ह्या शहराचं व्यक्तित्व आपल्याला कुठे आकळलं होतं? परिचय होऊनही ही नगरी अजून ' नेव्हर – नेव्हर लँड ' राहीली होती.

पण जेवढं दिसलं होतं, आकळलं होतं, त्यानं मनाला चटका लावला होता ... एखाद्या नाटकाच्या अर्ध्याअंकातूनच उठून गेल्यासारखं वाटत होतं . कथानकाची रूपरेषा अंमळशी उलगडत होती .. पात्रांचा परिचय होऊ पाहत होता... तेवढ्यात पडदा पडला होता...

× × ×

संध्याकाळ उलटल्यावर फिलिप आला... नंतर हरी आला... पण नेहमीप्रमाणे गप्पा रंगत नव्हत्या ... संभाषण मधूनच अडखळत होतं... मधूनच रेडिओ लागत होता ... मासिकं चाळली जात होती ... शेवटी, ' लास्ट् सपर ! ' झालं. हरी मुका होऊन जेवत होता... आम्ही तिघेच बोलत राहिलो... बारा वाजले. ... दोघे जायला उठले... दाराशी फिलिप-ला उचकी लागली. आम्हीं बस स्टॉपवर पोचवायला गेलो. बस धडधडत समोर येऊन उभी राहिली. तिच्यातून दोघेही दूर निघून गेले. पुन्हां- ते दिसणार नव्हते...

× × ×

सकाळी दहाचं विमान होतं. साडेसाताला विजू-बंडी गाडी घेऊन आले. वहिनीही बरोबर होत्याच.

त्या दिवशी आभाळात सूर्य नव्हता. पावसाची टिपटिप चालू होती. वारा पडला होता. आम्ही मोटारीत बसलो, रेडवोन एव्हेन्यू अजून गाढ झोपेत होता ... तशात रविवार ... सर्वत्र शुकशुकाट ... रिकामे रस्ते ... कोपऱ्यावर मोटार वळली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या धर्ममंदिराकडे मी शेवटची नजर टाकली ... त्यानंतर येणारा तो रोजचा बसस्टॉप, समोरची गल्ली, तिथला टेलिफोनचा डबा, डावीकडची काळवंडलेली ' फिंचले सेंट्रलची ' भिंत, निजलेल्या दुकानांच्या ओळी, तिथल्या कोपऱ्यावर वर्तमानपत्रं घेऊन बसणारा तो रोडका, सोनेरी केसांचा पोरगा... ही सगळी माझ्या रोजच्या परिचयाची झाली होती. त्यांची संवय जडली होती. त्या सर्वांकडे मी डोळे भरून पाहिलं ... मोटार पुढे गेली ...

वहिनी अन् विजू-बंडी क्रॉमवेल रोडवरल्या ' एअरटर्मिनल ' पावेतो होते. विमानतळाच्या बसमध्ये बसण्यापूर्वी शकुंतला परांजपे भेटल्या. स्वीडनला एका महिला परिषदेसाठी त्या चालल्या होत्या. लेडी इक्रामुल्लाही त्याच विमानानं जायच्या होत्या. तिथून पुढे विमानतळावर एकटाच अरुण पोचवायला आला. बस चालू झाली. तीन महिन्यापूर्वी त्याच रस्त्यावरून बस उलट्या दिशेनं सरपटत गेली होती. सगळं तसंच्या तसं, जिकडच्या तिकडे होतं. पाहणारे डोळे तेच होते, पण माझ्या दृष्टीला ते सारं बदललेलं दिसत होतं.

सूर्य मधूनच बाहेर येत होता ... अन् पुन्हा झाकोळणाऱ्या ढगाआड होत होता ... ऊनपावसाचा खेळ चालू होता ... त्याच समवृत्तीनं हाही दुसरा खेळ बघायला हवा होता ...

मधेच अरुण म्हणत होता, " सांभाळून जा. आता पुढचा प्रवास खऱ्या अर्थानं एकटीनं करायचा आहे. "

मुलाला आईबद्दल चिंता वाटत होती... वास्तविक तिनं त्याची चिंता करायची, पण या क्षणाला नातं बदललं होतं.

" पॅरिस, जिनिव्हा, रोम ह्या तिन्ही ठिकाणी हॉटेलात आगाऊ सोय केलेली आहे... प्रत्येक ठिकाणी उतरल्यावर एअर इंडियां डेस्कवर जायचं ...पुढची सोय ते करतील... अन् पॅरिसला सुखरुप पोचताच पत्र पाठव " ... सारं सांगून झालं होतं... अन् तरीही काहीतरी सांगायचं राहिलंय

असं वाटत होतं...कस्टमच्या दाराशी दोघेही जड अंतःकरणानं घुटमळलो. अरुण म्हणाला.

"हे निरोप देणंघेणं नेहमीच अवघड असतं. आता पुन्हा केव्हा भेट होईल देवजाणे... ! वाटतं ... अशा ताटातुटी जगात नसत्या, तर किती बरं झालं असतं!"

"ताटातुटीचं दुःख आहे, म्हणूनच भेटीचा आनंद आहे ना?" मी म्हटलं नि त्याला छातीशी धरलं. मग पाठ वळवली... त्याच्याकडे अन् तिथल्या कित्येक आठवणींकडे!

या 'थोर नगरी' चा निरोप घेता येत होता...अन् नव्हताही...पण इथल्या काही गोष्टींचा निरोप कसा घेता येणार होता मला?

× × ×

"As to the sage, no one will ever
know, whether he existed or not."
Lao Tse

प्रिय हरी,

अखेर लंडनचा आणि तुझा निरोप मी घेतला. तुझ्या देशाचा निरोप मला घेता आला, पण...तुझा निरोप मला घेता यायचा नाही...कधीही... कारण तुझ्या असंख्य मौल्यवान विचारांचा ठेवा मी बरोबर घेऊन चाललेय्. त्या विचारातून तुझं अस्तित्व मला सदैव जाणवत राहणार आहे. तिथल्या माझ्या वास्तव्यात, आमच्या संकटांत, तू जो मदतीचा हात दिलास, आमची वारंवार जपणूक केलीस, जो ओलावा भरलास, त्या सर्वांबद्दल मी तुझी ऋणी आहे.

परंतु कित्येक गोष्टींबद्दल तुझं ऋण फेडता यायचं नाही मला ... तू आमच्या राज्यकर्त्यांचा वंशज, भिन्न वर्णाचा, भिन्न संस्कृतीत वाढलेला... परंतु यांतल्या एकाही भिन्नतेची भिंत तू मध्ये उभी राहू दिली नाहीस. माणसा-माणसांत लहानमोठेपणाचे भेद उभे करणाऱ्या साऱ्या गोष्टी हे जगातलं सर्वांत मोठं पाप आहे असं तू म्हणत असस. आत्मीक गोष्टीत, तत्वज्ञानात, आम्ही फार श्रेष्ठ आहोत, अशी माझी समजूत होती. पण तुझ्या वागणुकीनं...हा समज खोटा पाडला.... .आमचे आदर्श मी पाहिले ते तुझ्यात.

म्हणूनच मला वाटतं, की मानवजात सगळीकडे सारखीच आहे ' Being is more important than becoming. Being comes first... becoming follows of its own ' असं तुला वाटायचं अन् तीच तुझी धडपड होती... या असण्यात तुझं मोठेपण होतं. तुला ते दिसलं नव्हतं ... तसंच दुसऱ्या कुणालाही कदाचित ते दिसणार नाही. बागेच्या एखाद्या कोपऱ्यात उगवलेल्या अनोळखी सुवासिक फुलाप्रमाणे ते जगाला अज्ञात राहील. पण ते मोठेपण मला दिसलं...तेव्हा तुझ्या देशातली एक मौल्यवान वस्तू मी पाहिली, असं मला वाटलं... तुझ्यासारखी माणसं तुझ्या देशात आहेत, म्हणून तुझा देश थोर आहे... ह्या तुझ्या मोठेपणाची एकूण एक आठवण मी माझ्या देशात जपून घेऊन जाणार आहे.

विमानात बसून हे मी लिहिलय्... अन् बाहेर पांढरे ढग अलगत उडत आहेत...

माझ्यासमोर तुझं आवडतं " Parting of the ways " हे लाओत्सेच्या तत्त्वज्ञानाचं पुस्तक पडून आहे...अन् तुझी आठवण होऊन त्यांतलं एक वाक्य समोर वारंवार नाचतय्:

" As to the sage, no one will ever know whether he existed or not "

अन् हे शब्द तुझं वर्णन करणारे आहेत, ह्याची तुला कल्पनाही नाही.

× × ×

# १५

पॅरिस. फ्रेंचांचं आवडतं ' पारी. ' याच्या नावातच विलक्षण जादू आहे. ' जन्माला यावं अन् पॅरिस पाहावं, ' असं माझ्याप्रमाणे प्रत्येकाला एकदा तरी वाटून गेलेलं असावं.

पॅरिस जवळ येत होतं, तसतशा अनेक परस्परभिन्न गोष्टींच्या आठवणी मनात गर्दी करूं लागल्या. फ्रान्सच्या रक्तरंजित क्रांतीची आठवण झाली, ... अन् व्हाल्टेर रुसो ही नावं आठवली ... बॅस्टिलचा किल्ला अन् व्हर्सायचा राजवाडाही इथं दिसणार होता. मग जगज्जेता नेपोलियन आठवला. त्याचं सुप्रसिद्ध थडगंही इथं असेल ! ' जोन ऑफ आर्क ' ही लढाऊ संतीण इथलीच नाही का ? अन् रेडियमचा शोध लावणाऱ्या मेरी क्यूरीचं ' सोरबॉं ' विद्यापीठही इकडचंच ? आणि या शहरातून वळसे घेत वाहणारी सीन नदी ... तिच्यातल्या मत्स्यकृती बेटावर असलेलं भव्य प्रार्थनामंदिर ' नोत्र-दाम, ' ... अन् तिथला तो कुबड्या ? ... त्याचा जनक ह्यूगो, आणि ह्यूगो-प्रमाणेच त्या नगरीचं बहुरंगी अंतरंग धीटपणे उकलून दाखवणारे लेखक झोला, व रोलांही इकडचेच ? अन् सार्त्रही इथलाच नाही का ? विमान जस-जसं खाली येऊ लागलं तसतशी ही एकेक नावं पुढे सरकू लागली... आता डोंगर, दऱ्याखोऱ्या, झाडं, आकार धरू लागली होती. ह्यूगो, झोला यांची लेखणी जितकी प्रभावी ... तितकेच प्रभावी इथला निसर्ग रंगवणाऱ्या मोनेत, मेनेत, सेझां आदींचे कुंचले ! या साऱ्यांची मालिका डोळ्यासमोरून सरकली ... अन् ' लूव्ह ' ची आठवण झाली. पाठोपाठ डेगास अन् लयूत्रेकचं स्मरण झालं... त्यावरून मग लयूत्रेकचं आवडतं ' मूलांरूज,' तत्सम निशागारं अन् पॅरिसच्या विलासी जीवनाची आठवण हळूच मनात डोकावली...

वास्तविक, खरी बहुढंगी, बहुरंगी नगरी ही होती. हिच्या मायाजालात

सापडण्यापूर्वी प्रत्येक आल्यागेल्याला ‘ एथ तुम्ही वाट चुकाल ’असंच ही सांगत होती जणू !

× × ×

पण इथल्या तीन दिवसांच्या मुक्कामात मला इथल्या विविधरंगी जीवनाच्या छटा कशा दिसणार होत्या ? फारतर प्रेक्षणीय स्थळांचं फक्त ओझरतं दर्शन घडणार होतं. पण या जादू नगरीत माझा नुसता प्रवेश व्हाय–लाही कोण यातायात पडली! विमानतळावर उतरल्यावर अक्षरशः भांबावल्या-सारखी स्थिती झाली. अनोळखी मुलुख, भाषा अवगत नाही, तशात, सोब-तीला कुणी नव्हतं. सगळी शोधाशोध एकटीनं करताना जीव मेटाकुटीला आला. प्रवेशद्वाराजवळ पासपोर्ट दाखवल्यावर पहिला प्रश्न विचारला तो ‘ एअर इंडीयाचं डेस्क कुठं सापडेल ’ हा. त्याला ‘ वरच्या मजल्यावर ’ असं उत्तर आलं; पण वर जाण्यापुर्वी सामान घ्यायचं होतं. ते कुठे सापडेल, हा पुढचा प्रश्न.

सामानाची जागा शोधण्यात पंधरा मिनिटं गेली. विमानतळाच्या प्रचंड इमारतीच्या ‘ भूलभुलैया’ तून वरखाली, इथून तिथं, बरीच पायपीट केल्या-वर, शेवटी एका अफाट दालनात माझं सामान दिसलं ... तोवर बाकीचे सारे उतारु आपापलं सामान भराभर उचलून निघून गेले होते. अन् माझं एकटीचं सामान जत्रेत हरवलेल्या पोराच्या मुद्रेनं माझी वाट पाहत एका फळीवर पडून होतं ...

सामान पुष्कळ होतं ... ‘तेवढं सारं हॉटेलात नेऊ नये, तीन दिवसा-पुरतं काढून बाकीचं सारं विमानतळावर ठेवावं, असा सल्ला अगाऊ मिळाल्या-मुळे आता प्रथम शोधायचा तो हमाल...अन् इथल्या देशात हमाल शोधायचा म्हणजे वाळवंटात हिरवळ शोधण्यागत कठीण कर्म! त्यासाठी कुणा-ची मदत मिळते का म्हणून आजूबाजूस नजर टाकली. फ्रेंच लोकांचं स्त्री-दाक्षिण्य जबर असल्याचं ऐकिवात होतं. पण त्यावेळी ही दोन्हीही दुर्मिळ दिसली. लोक चक्क आपल्या दोन्ही डोळ्यांचे कटाक्ष फेकीत खुशाल पुढे जात होते एकालाही संकटात सापडलेल्या या भारतीय ललनेला सोडवायची बुद्धी होत नव्हती. बऱ्याच येरझाऱ्या केल्यावर शेवटी गणवेशातला एक विमान अधिकारी समोरून येताना दिसला.

"इथे हमाल मिळतो का?" अशी त्याला पृच्छा केल्यावर... त्यानं जाऊन एका हमालाला धरून आणलं, पण त्याला इंग्रजी येत नव्हतं. मग खाणाखुणा करून कसंबसं त्याच्या मदतीने लॉकरमध्ये सामान टाकलं. पण एवढ्याचे त्याने सहा फ्रँक्स (६ रुपये) घेतले .. बहुधा फ्रेंच येत नसल्या-बद्दल हा भुर्दंड!

शरीराचे पुन्हा एकदा असेच हाल झाल्यानंतर 'एअर इंडिया डेस्क' सापडलं... पण तेही रिकामं... ते पाहून आज बहुधा शनिमंगळ आदी ग्रहांनी युतिविती करण्याचा घाट घातला की काय, अशी शंका मनांत डोकावून गेली. मधूनच कामाच्या जागेहुन पसार होण्याची, वेळच्या वेळी कामं न करण्याची, वेळेवर ठिकाणावर न सापडण्याची आपल्या इकडची लागण इथपावेतो प्रवास करून आली की काय, असा खवचट विचारही त्यावेळी मनात येऊन गेला. आता अर्धा दिवस इथेच जाणार, अशी मनाची तयारी केली आणि डेस्कला टेकून उभी राहिले. माझ्यासारखे दोनचार उतारूही वाट पहात उभे होते... पंधरावीस मिनिटानंतर एकाने जाऊन कुठून तरी डेस्कामागे बसणाऱ्या पोरीला शोधून आणलं.

माझं तिकिट तिच्या अंगावर घालीत मी रुक्षपणे तिला विचारलं,

"कुठल्या हॉटेलांत माझी सोय केलीय?"

"कुठल्याच नाही..."

"म्हणजे? मला तर लंडनमधल्या तुमच्या ऑफिसात माझी सोय केली असल्याचं सांगितलं."

"पण तसला कोणताच संदेश मला मिळाला नाही."

"आता आली ना पंचाईत!"

"हॉटेलचं नाव दिलं होतं का?"

"नाही, ते तुम्हीच मला सांगायचं होतं इथं; मग आता दुसरीकडे सोय होईल का?"

"बघते...!"

"बरं!... पण फार महाग नको."

"बाथरुम शिवाय खोली चालेल का?"

"चालेल!" तीन दिवस आंघोळ नाही तर नाही. नाही तरी लंडन-

मध्येही बाथरूम असून आंघोळ ' जुम्मे के जुम्मे ' च होत होती, असा विचार मनात केला.

त्या पोरीनं चार दोन ठिकाणी फोन केल्यावर शेवटी मनासारखी जागा मिळाली. ' रु द् लाफाये ' वरचं एक हॉटेल होतं ते.

" कसं जायचं तिथे ? "

" इथून टर्मिनलवर जा. तिथून टॅक्सीवाला नेईल . . . "

" पण इथे भाषेची पंचाइत. मला फ्रेंच येत नाहीं. अन् इथल्या लोकांना इंग्रजी येत नाही. " मग तिनं कागदावर हॉटेलचा पत्ता लिहून दिला. पण माझा तर अखिल टॅक्सीवाल्या जमातीवर अविश्वास अन् इथे दुसऱ्या वाहनांचा अभाव... त्यामुळे टर्मिनलपासून हॉटेल किती दूर आहे, किती वेळ पोचायला लागतो, किती पैसे पडतात, हा सारा हिशेब समजावून घेऊन मगच मी टॅक्सीत पाऊल टाकलं. तरीही मला पॅरिसचे अंधारे बोळ दिसू लागले, परंतु लौकरच हा विशिष्ट टॅक्सीवाला माझ्या अविश्वासाला अपात्र होता, हे माझ्या अनुभवाला आलं. आणि त्यानं अंधाऱ्या बोळाऐवजी, इष्ट स्थळी टॅक्सी नेऊन उभी केली. टॅक्सीत आमचा थोडासा संवाद झाला.

" इंडियन ? " तो.

" यस ! कॅन यू स्पीक इंग्लिश ? " मी.

" उई "

हे , उई ' काय होतं देव जाणे; पण आपल्या " अयाई " सारखं मला ते वाटलं. "

" नो ? " पुन्हा मी.

" उई ! यसयस... लिटिल . . . " त्यानं जोरानं होकारार्थी मान हलवली... म्हणजे इंग्रजी येत होतं तर ! ते सिद्ध करण्यासाठीच जणू त्याचं, पुढचं वाक्य होतं.

" यू कम, सी पारी ? "

" उई ! " मी.

" त्रेझिंतेलिजां... ! " तो पुटपुटला. हा कोणता शब्द देव जाणे. शिवीही असेल एखादी.

" कम टु सी युवर आयफेल टॉवर, लूव्ह ,व्हर्साय. . . "

"ऱ्ये बिआं, ऱ्ये बिआं! गुडगुड..."

त्या गुडगुडाटातच त्यानं माझं सामान आत नेऊन ठेवलं... ही विशेष कृपा होती... हे ओळखून मी भाड्यापेक्षा दोन फ्रँक जास्त त्याच्या हातावर ठेवले. तेव्हां "मेर्सी.. मेस्सी!" असं काहीसं जोरजोरानं म्हणत तो निघून गेला.

तेवढ्यात मागून 'बॉजू मदाम!' हे मॅनेजरच्या तोंडचे शब्द ऐकू आले. मी चमकून मागे वळले. म्हणजे हॉटेलातही इंग्रजीच्या नावाने ठणठणाट की काय? आता मात्र मला माझाच राग आला. नागपूरला एक दोनदा फ्रेंच शिकण्याची संधी आली असताना, तिच्या लिबलिबीत गुळगुळीत उच्चारांना कंटाळून, ती मी सोडून दिली होती. ही भाषा मला फसवी वाटायची. "बोले तैसा लिहे" ह्या उलट ह्या भाषेचा बाणा. स्पेलिंग एक नि उच्चार भलताच. अनुच्चारित असंख्य अक्षरांचा फाफट पसारा या भाषेत कसा काय शिरला, देवजाणे! "Mont Parnasse" ह्या एकादशाक्षरी शब्दाचं 'मोपार्नी' करायचं अन् उरलेले शब्द गिळायचे. 'Montmartre' याचंही 'मोमार्त' हे असलंच रूप! 'Champs Elysees' या शब्दाचा उच्चार 'शांजेलीझे' असेल असं कुणाला स्वप्नातही वाटणार नाही. 'नागपूर' चं 'डेरा-इस्माईलखान' करण्यासारखंच हे होतं. या भाषेनं मला नामोहरम केलं होतं... पहिल्या दोन चार धड्यातच. ती आठवण होऊन मी तुसडेपणानं उत्तर दिलं:

"सॉरी. मला फ्रेंच येत नाही. फक्त इंग्रजी येतं. मला वाटलं तुमचं हे शहर कॉस्मापॉलिटन आहे....तेव्हा निदान हॉटेलातून तरी इंग्रजी येत असेल...."

"येतं ना....आम्हा दोघांना इंग्रजी येतं," शेजारी उभ्या असलेल्या आपल्या स्त्री-मदतनिसाकडे बोट दाखवीत तो म्हणाला. त्यावर चपट्या नाकाची, गुबगुबीत गालाची ती हसरी तरुणी "बॉजू" असं पुटपुटली.

"तिसऱ्या माळ्यावर सोळा नंबरची खोली रिकामी आहे.... तुम्ही आधी ब्रेकफास्ट घेणार, की एकदम लंच?"

"लंच!... पण संपूर्ण शाकाहारी मिळेल ना ते?"

"हो.. हो.. काय काय देऊ?"

"काहीही द्या. भात, भाज्या, फळं, ब्रेड, काहीही चालेल.' त्यानुसार

त्या चुतरेनं स्वयंपाकघरात जाऊन माझी आर्डर दिली नि मग बाहेर येऊन मला वरची वाट दाखवली.

तासाभरानं तयार होऊन मी जेवायला खाली आले. जिन्याशी मी पोचताच ती उद्गारली :

" ओ ! यू लुक सो डिफरंट नाऊ ! सो एलिगंट इन दॅट ब्युटिफुल सारी... "

मला वाटतं, माझ्या या ' एलिगन्स ' वर भाळूनच तिनं माझ्या जेवणाकडे जातीनं लक्ष पुरविलं. पहिल्या वाफेचा गरम भात, उकडलेले बटाटे, अन् उकडलेल्या बिनतोडलेल्या लांबलचक चवळीच्या शेंगा तिनं समोर ठेवल्या.

" ठीक आहे ना ? "

" छान.. ! थँक यू. "

" जेवताना प्यायला काय देऊ ? "

" प्यायला ?.. हा काय प्रश्न झाला ?... " मी मनात म्हटलं. अर्थात् " पाणी." हा शब्द तोंडाशी आला, पण एकाएकी कसलीशी आठवण होऊन दचकून तो मी मागे घेतला.

" युरोपात जेवताना पाणी मागत नाहीत, " असं डॉ. राम पावणस्कर यांनी मला सांगून ठेवलं होतं ... ते युरोपचा प्रवास करून नुकतेच लंडनला परतले होते. एकदा हॉटेलात जेवणाच्या वेळी त्यांनी अशाच प्रश्नाला ' वॉटर ' हे उत्तर दिलं. त्यावर वेटरनं ' मिनरल वॉटर ' ची बाटली आणून दिली.

" नो ! नो ! आय वाँट प्युअर वॉटर, सिंपल वॉटर, ' अक्वा प्युअरा ' ... " हव्या असलेल्या पाण्याची हरतऱ्हेनं व्याख्या करीत पावणस्कर म्हणाले. पण वेटर कोऱ्या चेहऱ्यानं त्यांच्याकडे पाहत उभा राहिला.

" जस्ट टॅप वॉटर... ड्रिंकिंग वॉटर... " डॉक्टर लाचार होऊन म्हणाले, पण त्यावर पाणी तर मिळालं नाहीच; पण आजूबाजूच्या मंडळीत खसखस पिकली. डॉ. पावणस्करांवर गुदरलेला हा प्रसंग मला आठवला.

एव्हाना अनेक चोरट्या नजरा माझ्याकडे वळल्याचं मी हेरलं होतं– माझी साडी याला जबाबदार होती, की माझं शाकाहारी जेवण, की समोरच्या लांबलांब चवळीच्या शेंगा, देवजाणे ! त्यामुळे ' पाणी ' मागून स्वतःचा

असा पाणउतारा करून घेऊ नये, असा पोक्त विचार मी केला. पण मग मागायचं काय ? शांपेन ? पण हे फ्रेंच द्राक्षारिष्ट इथं ' लंच 'च्या वेळी घेतात ? की ' डिनर ' च्या वेळी ? नाहीतर आपले ' एटीकेट ' चुकायचे. त्यापेक्षां घोपट मार्ग बरा. म्हणून मी अगदी खालच्या स्वरात म्हटलं :

" विअर देऊ शकाल ? "

" हो हो... ". माझ्या उत्तरानं तिला आनंद झाल्यासारख्या दिसला. शाकाहारी असले तरी अगदीच भेंड्याची भाजी नाही, असं वाटून की काय, ती आनंदानं उडतच गेली. अन् मला हवा असलेला द्रवपदार्थ घेऊन आली.

एखाद्या ' झू ' मधल्या प्राण्याकडे पहावं, तशा आजूबाजूच्या नजरा आता माझ्यावर स्थिरावल्या होत्या. फ्रान्समधलं हें ' बघणं ' इंग्लंडपेक्षा वेगळं आहे, पण इतक्या क्षुद्र गोष्टीकडे लक्ष द्यायला माझ्याजवळ वेळ नाही अशा अविर्भावात मी समोरच्या अन्नब्रह्मावर ते केंद्रीत केलं.

जेवणानंतर हॉटेल मॅनेजरनं पॅरिसच्या ' कंडक्टेड टूर्स ' चं माहिती-पत्रक हाती दिलं. ही पत्रकं हॉटेलातून ठेवलेली असतात व तिकिटंही तिथे मिळतात. पॅरिसमधली प्रेक्षणीय स्थळं बघण्यासाठी सकाळी, दुपारी अन् रात्री बसेसची सोय असते. सरकारी प्रवास खात्याच्या ह्या बसेस प्रवाशांना हॉटेलातून घेतात अन् परत आणून सोडतात. पॅरिसची प्रेक्षणीय स्थळं वेग-वेगळ्या नंबराच्या सहलीत विभागली आहेत. आपण फक्त हव्या त्या नंबरचं तिकिट घ्यायचं... हॉटेलातील सर्व उतारूंना गोळा करून प्रथम शहराच्या ' ऑपेरा ' ह्या मध्यवर्ती ठिकाणावर बसेस सोडतात. मग त्यांची भाषावार विभागणी होते... अन् पुढे अपल्या तुकडीसह त्यात्या भाषेचे वाटाडे सहलीला निघतात. या वाटाड्यांत मुलींचा भरणा अधिक दिसला. मी ऐति-हासिक पॅरिसची सहल प्रथम निवडली. आमची वाटाडी एक अठरा वीस वर्षांची चिमखडी पोर होती... पण बोलण्यात अत्यंत तरबेज.

सर्वसामान्य प्रवाशासाठी या नियोजित सहली ठीक असतात. परंतु चोखंदळ माणसाचं त्यांत समाधान होत नाही. एखाद्या गुरुमहाराजाच्या मागून भगतगणांनी चालावं, तसा प्रवाशांचा घोळका ह्या वाटाड्यामागून जात असतो. त्यांच्या कलानं, त्यानी ठरविलेल्या वेळात, त्यांनी आखलेल्या कार्य-क्रमानुसार, ही स्थळं बघायची, ते माहिती देतील ती पोटात घालायची.

पॅरिसमध्ये प्रवाशांची गर्दी विलक्षण. त्यात अमेरिकन लोकांचा विशेष सुळसुळाट. त्यात उन्हाळा हा प्रवासी ऋतु. जिथे पहावं तिथे प्रवाशांचे थवे खांद्याला खांदे घाशीत चालत असतात.


'लूव्ह' मध्ये आम्ही गेलो, तिथे अशीच तोबा गर्दी. घोळक्यात घोळके मिसळत होते. एकाच खोलीत दोन तीन वाटाडे आवाज उंचावून आपापल्या तुकडी समोर आपापल्या भाषेत एकाच वेळी प्रेक्षणीय स्थळांवर भाष्य करीत होते. इथे आपल्या वाटाड्यावर एकसारखी नजर ठेवावी लागते; नाही तर एका घोळक्यातून दुसऱ्यात मिसळण्याची भीती असते. हे प्रथम मला ठाऊक नव्हतं. त्यामुळे लूव्हमधली चित्रं बेभानपणे पाहत असतांना मी माझ्या घोळक्यातून निसटून दुसऱ्यात अन् तिथून तिसऱ्यात मिसळले. तरीही लक्षात आलं नाही. जेव्हा भानावर आले, तेव्हा आमची वाटाडी पोरगी दिसेनाशी झाली होती. प्रथम थोडीशी काळजी वाटली. काही वेळ मी तिचा शोध केला अन् शेवटी नाद सोडला. झालं तेही वाईट झालं नव्हतं. आता तरी निदान निवांतपणे, हव्या त्या ठिकाणी, हवा तेवढा वेळ, हवं तितकं उभं राहून सारं काही पाहायला सापडेल, असा विचार करून मी लूव्हमध्ये मनसोक्त हिंडून घेतलं.

× × ×

'लूव्ह' चं संग्रहालय लूव्हरच्या राजवाड्यात आहे. ही इमारत पाहायची म्हणजे एक दिव्यच करावं लागतं. हिच्या अवाढव्य पसाऱ्याची कल्पना प्रथम येत नाही. हिचा व्याप म्हणे ४० एकराचा, म्हणजे व्हॅटिकनच्या तिप्पट मोठा ! चौदाव्या शतकात फ्रेंच सम्राट 'शार्लेमा'-थोरला चार्ल्स-याने लूव्हच्या मूळ किल्ल्याचं राजवाड्यात रुपांतर केलं. पुढे वेगवेगळ्या कालखंडात या इमारतीत भर पडत गेली. त्यामुळे फ्रेंच वास्तुशिल्पाच्या उत्क्रांतीचा जणू संपूर्ण इतिहासच यात पाहायला मिळतो.

ह्या प्रचंड संग्रहालयात वाटाडे आपल्याला उभं करतात ते 'लकून' या शिल्पासमोर. या शिल्पाची कीर्ती मी पूर्वीच ऐकलेली होती. त्याचं छायाचित्रही पाहिलं होतं. जर्मन सौंदर्यशास्त्रज्ञ लेसिंगने यावर लिहिलेल्या भाष्यामुळे हे शिल्प प्रसिद्धीस आलं. ग्रीक कलेच्या अखेरच्या काळांतलं हे शिल्प. लकून हा एक ट्रोजन पुरोहित. तो व त्याची दोन मुलं याना समुद्रातले दोन

अजस्त्र महासर्प विळखा घालून, दंश करून ठार मारतात, हा ग्रीक पुराणातला प्रसंग ह्या शिल्पात सांगितला आहे. या महासर्पांशी झगडत असताना लकूनच्या शरिराची झालेली हालचाल दाखवताना कलाकाराचा शरीरशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास दिसून येतो; तो वाखाणण्यासारखा आहे. त्यावेळीं लकूनच्या चेहऱ्यावरचे भीती, दुःख, त्वेष, लाचारी हे सारे भाव कलाकारानं दगडांत गोठवले आहेत. शिल्प म्हणजे 'फ्रोझन' म्यूझिक असं का



'लकून' शिल्प, लूव्ह, पॅरिस

म्हणतात, याची यावेळी कल्पना येते. हे शिल्प म्हणजे त्या काळच्या ग्रीक वास्तवतावादाचा नमुना म्हणून वाखाणण्यारखं असलं, तरीही लेसिंगनं केलेली या शिल्पाची स्तुती आज काहीना आवास्तव वाटण्याची शक्यता आहे.

लूव्हरमधील दुसरी अशीच नावाजलेली कलाकृती म्हणजे लिओनार्डोची 'मोनालिसा.' 'लास्ट सपर' पेक्षाही ह्या चित्रानं लिओनार्डोला अधिक मोठी कीर्ती दिली. गेल्या कित्येक शतकांपासून हे जगातलं उत्कृष्ट चित्र मानण्यात येतं. यावर कित्येक भाष्य लिहिली गेली, कित्येक कलाकार मोहित झाले. फ्लारेंसमधल्या गिओकोंडो व्यापाऱ्याच्या तिसऱ्या पत्नीचं हें 'व्यक्ती-चित्र.' कुणाला या चित्रात स्त्री सौंदर्याची परिसीमा दिसते, कुणाला मोनोलिसाचं स्मित स्तिमित करतं, तर कुणाला 'देवो न जानाति' अशा स्त्री-स्वभावाचं रहस्य त्यांत दडलेलं दिसतं. व्हासरीला 'The supreme embodiment of the eternal enigma of womanhood' असं ते वाटलं. व्हासरी असंही सांगतो की मोनालिसाच्या चेहऱ्यावरचं ते रहस्य-मय स्मित कायम रहावं म्हणून ते रंगवतांना लिओनार्डोनं काही गायक – वादक भाड्यानं आणून तिच्यासमोर बसवले होते. ते संगीत ऐकताना तिच्या चेहऱ्यावर उमटलेली भावोत्कटता लिओनार्डोला चित्रात टिपून घ्यायची होती.

गंमत अशी, की ज्या महाभागाच्या पत्नीचं हे चित्र लिओनार्डोनं रंगवलं, त्याच्या घरी ते शेवटपावेतो पोचलंच नाही. 'ते अपुरं आहे' या सबबीवर लिओनार्डोकडेच ते बरीच वर्षे पडून होतं.पुढे फ्रेंच सम्राट फ्रान्सिस याने लिओनार्डोला फ्रान्समध्ये येण्याचं निमंत्रण दिलं. कृतघ्न अन् हेवेखोर समकालीनापेक्षा फ्रान्सचा राजाश्रय म्हातारपणी परवडला असं लिओनार्डोला वाटून ते निमंत्रण त्यानं स्वीकारलं आणि तो फ्रान्सला निघून गेला. अन् 'मोनोलिसा' ही त्याच्याबरोबर गेली म्हणूनच ती आज लूव्हरमध्ये दिसते.

चित्रासमोर प्रेक्षकांची गर्दी दिसते. जगाला वेड लावणारं हे सुविख्यात चित्र अगदी लहानसं आहे. जेमतेम दोन – गुणिले – तीन फुटांचं असेल मोनालिसाचं स्मित कोड्यांत पाडणारं असेल तर तिला लाभलेली कीर्तिही आज काहीशी कोड्यांत पाडणारी वाटते. पण ते रंगवून आज पांचशे वर्षावर काळ लोटला – तरीही ते आज सुस्थितीत आहे ... व त्याचे रंगही टवटवीत दिसतात, एवढं मात्र खरं.

लूव्हच्या दुसऱ्या विभागात ' इंप्रेशनिस्ट ' चित्रकारांचं प्रदर्शन आहे. ज्याच्या ' ॲन इंप्रेशन ' ह्या पहिल्या अंकनवादी निसर्गदृश्यावरून या चित्रशैलीला ' इंप्रेनिझम ' हे नाव पडलं, तो कूर्बेट आणि त्याच्याबरोबर मोनेट, मेनेट, पिसारो, डेगास, स्युराट, ल्युत्रक आदि झाडून सगळे अंकनवादी चित्रकार इथे एकत्र पाहयला मिळाले. युरोपांतले हे पहिले बंडखोर चित्रकार. त्यांच्या चित्रांनी एकेकाळी पॅरिसच्या कलाविश्वात खळबळ माजवून दिली होती आणि ज्यांचा समावेश कुठल्याही तत्कालीन प्रदर्शनात होणं सुतराम शक्य नव्हतं, ती चित्रंच आतां सन्मानानं पॅरिसच्या कलामंदिरात जाऊन विराजमान झाली होती. ज्याचा उपहास करण्यासाठी " A visual cocktail " म्हणून टीकाकारांनी विशेषणं बहाल केली तेच शब्द आज बिरूदं म्हणून वापरले जात आहेत.

लूव्हरमधून बाहेर पडून टूलरीज या इतिहास प्रसिद्ध विस्तीर्ण उद्यानाकडे मी फेरफटका मारला एकापेक्षा एक सुंदर फुलांचे गालिचे पसरले होते... अधूनमधून उभे केलेले सुंदर पुतळे या सौंदर्यात भर टाकीत होते ... पण तिथल्या हिरवळीवरून चालतांना एकेकाळी ही हिरवळ फ्रेंच राज्यक्रांतीच्या रक्तानं माखली होती, हा विचार मनात आल्यावाचून राहीला नाही. तिथं एकेकाळी उभे राहिलेले वधस्तंभ मला दिसू लागले. त्यावर कित्येकांची मस्तकं गिलोटिननं कापली होती. रक्ताचे पाट वाहिले होते. रक्त प्यायलेल्या त्या मातीतून आज रंगीबेरंगी फुलं उगवली होती. अन् आपल्या माना डोलावून त्या भीषण हत्याकाण्डाची आठवण प्रेक्षकांच्या मनातून पुसून टाकण्याचा जणू प्रयत्न करीत होती.

या उद्यानातून बाहेर पडले तेव्हा संध्याकाळ व्हायला आली होती. समोर सीन नदी संथपणे वाहात होती. मावळत्या सूर्याची तांबडी लाल किरणं नदीच्या पाण्यात सांडली होती. काठाशी दोन चित्रकार आपले तक्ते घेऊन सीनकाठची ती तांबडी संध्याकाळ रंगवीत बसले होते. तो तांबडा रंग सीनच्या रक्ताळलेल्या पाण्याची जुनी आठवण उभी करीत होता. ह्या सीननं काय काय पाहिलं असेल तिलाच ठाऊक ! ज्यूलिअस सीझरनं हा मुलख पादाक्रांत केला त्यावेळी या नदीचा उल्लेख केला होता... हूणांनी या शहराला आपलं भक्ष बनवलं तेव्हा सेंट जिनिव्हॉव्हनं या नगराचं संरक्षण केलं... त्या-

वेळीं या नदीचं त्याला साह्य झालं असेल, फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळी, चार पावलावरच टूलरीजमध्ये चाललेली शेकडो लोकांची कत्तल तिनं पाहिली असेल. सहस्त्रावधी लोकांच्या रक्ताचे पाट या तांबड्या सूर्यकिरणांसारखे तिच्या पाण्यात मिसळले असतील ... पण ती स्थितप्रज्ञा अखंडपणे निःसंगपणे, वाहात होती ... आणि गात होती –

> " Men may come and Men may go,
> But I go on for ever ... "

× × ×

दुसरे दिवशी व्हर्सायचं तिकीट घेतल. पॅरिसपासून दूर, एका छोट्या उपनगरात हा जगप्रसिद्ध राजवाडा आहे. त्याच्या पुढच्या विस्तीर्ण पटांगणातील फरशीचे दगड तुडवीत आम्ही चाललो होतो. हेच दगड या राजवाड्याचा निर्माता चौदावा लुई याने कित्येकदा तुडवले होते...फ्रेंच माणूस आपल्या आवडत्या राजाला " रॉईसॉलील " म्हणजे ' सनकिंग ' म्हणतो. या फरशीवर अजून आधुनिकतेचा हात फिरला नाही. ती जुनीच आहे... अन् तिचं हे जुनं रूप मुद्दाम कायम राखण्यात आलं आहे.

राजवाड्यात प्रवेश करण्यापूर्वी, या पटांगणातच आपल्या सत्तावैभवाच्या दिमाखात अश्वारूढ असलेल्या ह्या 'राजसूर्याची' तुमची पहिली भेट होते. एक उभं शतक, चौदावा, पंधरावा अन् सोळावा असे तीन लुई आणि बोनापार्ट या फ्रेंच सम्राटांचं निवासस्थान असलेला हा राजवाडा. एखाद्या दाणगटासारखा आडवा उभा पसरलेला आहे.

आत शिरताच या वैभवसंपन्न सम्राटानं पदरी बाळगलेल्या कलावंतांची आठवण होते...त्यांच्या चित्रांनी या राजवाड्याच्या भिंती अन् छतं भरली आहेत. क्रांतीच्या वेळीं इथल्या सुंदर वस्तूंची नासधूस झाली होती, पण नेपोलियन इथं येऊन राहिल्यावर, त्याने इतःस्ततः उधळलेलं इथलं जुनं सामान पुन्हा जमवून गतवैभव परत आणण्याचा प्रयत्न केला. पण जे होतं, त्यातलं अर्धअधिक नष्ट झालं आहे. त्याचा आज मागमूसही नाही. पण जे मागं राहिलं आहे ते त्या वैभवाची कल्पना देण्यास पुरेसं आहे.

या सहलीतही प्रवाशांची चिकार गर्दी होती. भाषेच्या सोयीसाठी

अमेरिकन प्रवाशांच्या घोळक्यात माझा समावेश झाला होता... रोमन देवदेवतांची नावं असलेल्या एका मागून एक दालनांतून, वाटाड्याचं भाष्य ऐकत, त्याच्या पाठोपाठ आम्ही चाललो होतो. त्यात मांडून ठेवलेलं तऱ्हतऱ्हेचं लाकडी सामान, उंची गालिचे, बिलोरी काम, मौल्यवान् वस्तु, भिंतिवरची चित्रं, खिडक्यावरील नक्षीकाम ह्यांवरून आमची नजर भिरभिरत होती...अन् त्यावरून लुईत्रयींच्याकाळी कळसाला पोचलेल्या वैभवाची आम्ही कल्पना करीत होतो.

वैभवाच्या चढत्या क्रमानं ही दालनं प्रवाशांना एका पाठोपाठ दाखवली जातात अन् आरसे महालात ("हॉल ऑफ मिरर्स–") या वैभवाचा कळस दिसतो. चहुंबाजूनी बिलोरी काच मढवले होते...हंड्या झुंबरं छतातून लोंबत होती...मधोमध ठेवलेल्या टेबलावर मेजवानीचा थाट होता. पाहता पाहता त्या गोष्टी सजीव झाल्यासारख्या मला वाटू लागल्या. या वैभवात लोळणारे विलासी राजे अन् त्यांच्या राण्या, त्यांची थुंकी झेलीत अवतीभवती घुटमळणारे ते सरदार दरकदार, एकापेक्षा एक ऊंची वस्त्रालंकारांनी नटलेल्या अन् आपल्या वैभवाचं चढाओढीनं प्रदर्शन करणाऱ्या त्यांच्या सुंदर स्त्रिया, लांगूलचालन करीत इकडून तिकडे फिरणारी इतर दरबारी मंडळी, नोकरचाकरांचा तांडा...यांची गजबज दिसू लागली. इथली चमचमणारी ती सुंदर झुंबरं, त्यात जळणाऱ्या मेणबत्त्यांचे सहस्त्रनेत्र, भोवतालच्या आरशात पडलेली त्यांची प्रतिबिंबं, त्यांचा परावर्तित प्रकाश, यानी हा आरसेमहाल किती उजळलेला राहत असेल? या लखलखत्या प्रकाशात कोणती कृष्णकारस्थानं रचली गेली असतील? कोणती खलबतं शिजली असतील? पण आता या जिवंत राजवाड्याचं संग्रहालय बनलं होतं...आता अधूनमधून भरणाऱ्या खास विधिमंडळाच्या बैठकी, फ्रान्सच्या अध्यक्षाची निवड, किंवा घटना दुरूस्तीसाठी भरणाऱ्या खास घटनापरिषदा...एवढीच वर्दळ तिथं उरली आहे.

वाटाड्या सांगत होता :

"याच दालनात जर्मन सम्राटानं १८७१ चा तह करून फ्रान्सवर आपलं अधिराज्य जाहीर केलं होतं. आणि पुढे याच ठिकाणी पहिल्या महायुद्धानंतर १९१९ साली व्हर्सायचा तह करून फ्रान्सने जर्मनीवर बाजू उलटवली."

कोपऱ्यात निमूटपणे उभं असलेलं एक छोटंसं गुळगुळीत टेबल दाखवीत तो म्हणाला,

" पाहिल्या महायुद्धानंतर ज्या टेबलावर व्हर्सायच्या तहावर सह्या झाल्या, ते हेच टेबल. "

आरसे महालातून फ्रान्सची दुर्दैवी राणी मेरी अंतायनेत हिच्या दिवाणखान्याकडे आमची पावलं वळली. शेजारी राजाचा दिवाणखाना होता. दोहोंची सजावट सारखीच होती. लाकडी सामान, चित्रांनी भरलेल्या भिंती, राणीच्या वापरीतील वस्तू, सुंदर गालिचे, मागच्या बाजूला संगमरवरी पायऱ्या असलेला जिना ... याला ' मेरी अंतायनेत जिना ' असं नाव आता आहे ... ह्या भागातून हिंडत असताना लंडनमधल्या तुसादबाईच्या ' चेंबर ऑफ हॉरर्स ' मधलि लुई-मेरी यांची कापलेली मुंडकीं मला आठवली. अनिर्बंध सत्ता असलेलं हे गर्वोद्धत जोडपं या भागातून दिमाखानं वावरलं असेल ... या संगमरवरी पायऱ्यावरून चढलं उतरलं असेल ... त्यांच्या ताटाखालची मांजरं बनलेल्या युरोपीय राजांनी आणि राजदूतांनी ह्याच पायऱ्या तुडवल्या असतील, त्याच पायऱ्या आम्ही तुडवीत होतो... जिन्याला राणीचं नाव का दिलंय कोण जाणे !

" बहुधा चवताळलेल्या क्रांतिकारकांनी याच पायऱ्यावरून अभागी राणीची मान कापण्यासाठी तिला फरफटत खाली नेलं असेल. " कुणीतरी कुजबुजलं. पण कुणालाच ते विचारण्याचं धैर्य झालं नाही.

जिना उतरून आम्ही बाहेरच्या " पार्क द व्हर्साय " या बागेत आलो. मघाशी राजवाड्यातून हिंडत असताना खाली दिसणारी ही बाग, आम्हाला खिडक्या खिडक्यातून खुणावत होती. परंतु फ्रान्सच्या राजाराणीच्या हृदयद्रावक अखेरीची चित्रं नुकतीच पाहिल्यामुळे दुखरे झालेले आमचे डोळे बागेतल्या " या हिरव्या मखमालीवरती " विसावत नव्हते. बागेत काही पुतळे होते. सुंदर कारंजी होतीं पण ती शुष्क होती. त्यांत पाणी खेळत नव्हतं. " दर रविवारी फक्त साडेचार पाचाच्या दरम्यान ही चालतात, " वाटाड्या सांगत होता, पण आम्ही इतिहासाची फडफडणारी पानं पहात होतो. कल्पनेतच या कारंजातून एके काळी उडणारे फवारे पहात होतो. त्याबरोबर भोवताली जमलेल्या मंडळींच्या हास्याचे फवारे उडताना दिसत होते. त्यांच्या

बरोबर खिदळणाऱ्या मदिरा, मदिराक्षींचे खेळ चालू होते. शाही मुदपाकखान्यात शिजलेल्या अन्नाची ताटं त्यांच्यात उधळली जात होती. त्यांच्या पायांत घुटमळणाऱ्या भाग्यवान सारमेयांच्या तोंडात... बाहेर अन्नाला मोताद झालेल्या प्रजेच्या वाट्याचं अन्न पडत होतं. कदाचित या आतल्या बेहोष जल्लोषात, बाहेर चवताळून उठलेल्या क्रांतिकारकांच्या तलवारींचा खणखणाट ऐकू आला नसेल. राजवाड्यावर चालून येणाऱ्या निर्दय पावलांची चाहूल लागली नसेल... म्हणून पुढे रक्ताची कारंजी उडाली. उन्मत्त विलासातून दुर्विलास निघतो तो असा...

याच बागेत एका कोपऱ्याला लुई आणि मेरी यांच्यासाठी बांधलेले छोटे महाल आहेत. राजाचा मूळ महाल १४ व्या लुईसाठी मन्सार्डच्या प्लॅनवर बांधलाय. प्रमुख राजवाड्यातल्या कोलाहलापासून दूर राहता यावं यासाठी बांधलेली ही एकांत स्थळं. क्रांतिकारकांनी शिरच्छेद करण्यापूर्वी या जोडप्याला अखेरचा एकांतवास मिळाला असेल का? त्यावेळी ती काय बोलली असतील? त्यांचे भयाकुल त्रस्त आत्मे इथे अजून घुटपळत असतील का? नेपोलियनला इथे राहताना काय वाटलं असेल? असे प्रश्न स्वतःलाच विचारीत अन् काळाचे फासे कधी, कसे पडतील याचा नेम नाही, अशी खूणगाठ मनाशी बांधीत भारावलेल्या अंतःकरणाने मी व्हर्साय सोडलं.

× × ×

नियतीचा हा विसंवाद नेपोलियनचं थडगं पाहतानां अधिकच जाणवतो.

कार्सिका बेटातला हा साधा शिपाईगडी. फ्रान्सच्या राजघराण्यातील लोकांची निर्दयपणे डोकी कापून राजशाहीचा नाश करणारी क्रांतिसेना त्याला प्रथम डोक्यावर घेऊन नाचली...अन् पुढे तिनंच त्याच्या डोक्यावर राजमुकुट ठेवला. साऱ्या युरोपीय राजवटींना धाब्यावर बसवणारा, तिथल्या राजेमहाराजांना लाचार बनविणारा जगज्जेता नेपोलियन, पुढे स्वतःच सेंट हेलेना बेटावर लाचारीचं जिणं जगतो... नियतीनं त्याच्याशी किती क्रूर खेळ खेळावेत?

पण फ्रान्सनं आपल्या या आवडत्या वीराची स्मृती जपून ठेवली

आहे. त्याचं थडगं बांधलं आहे, त्याचं देऊळ उभारलं आहे. त्या ठिकाणी त्याने बांधलेल्या कमानी व पुतळे उभे आहेत.

'होतेल द इन्व्हालिडीस' ह्या इमारतीत नेपोलियनचं थडगं आहे. नांवावरून मात्र या जागेत काय असावं याचा बोध झाला नाही. हॉटेल हा मूळ फ्रेंच शब्द. त्याचा अर्थ आपण सरळ खाणावळ असा करतो. सुरवातीला इथल्या गाईड बुकात "होतेल लॅंबर्ट", "होतेल द लांझू", ,' शोनिझां" अशी जवळपास शंभर हॉटेलांची नामावळी पाहिली. तेव्हा ती खाद्यागारं असावीत, अशी प्रामाणिक समजूत झाली. पण खाद्यवस्तूंचा त्यांचा काही संबंध नाही, हे नेपोलियनचा 'होतेल' पाहिल्यावर कळलं. – या 'होतेला'तून संग्रहालयं आहेत. तशीच ती प्रसिद्ध पुरुषांची निवासस्थानंही आहेत.


नेपोलियनच्या थडग्याचा ३४५ फूट उंचीचा धिप्पाड सोनेरी बुरुज आजुबाजूच्या इमारतींना खाली टाकून, वर उंच डोकावतो. हाही मन्सार्डनं बांधलेला. इमारतीचं लोखंडी फाटक ओलांडून गेलं की पुढे मोठमोठाल्या तोफा आपल्यावर रोखलेल्या दिसतात. त्या वेगवेगळ्या युद्धांतून शत्रूकडून फ्रान्सने जप्त केलेल्या आहेत. 'सेंट लुई'च्या मंदिरांत शत्रूकडून जिंकून आणलेले त्यांचे झेंडे फडफडताहेत. 'नेपोलियन चॅपल' मध्ये नेपोलियनच्या वापरातल्या वस्तूंचं संग्रहालय आहे. त्यात नेपोलियनचा पलंगपोस आहे – संपूर्ण बिछाना, मच्छरदाणी, उशी, यासह घालून ठेवला आहे. तुसादबाईच्या प्रदर्शनांतही याच शय्येची हुबेहुब प्रतिकृती आहे. तुसादबाई ही मूळची फ्रेंच ... तिनं नेपोलियनला गौरवावं यात काय नवल? ... नेपोलियनची ही शय्या सेंट हेलिना बेटांतून आणली म्हणतात ... पण ही किती लहान होती! एखाद्या शाळकरी पोराची ती असावीसं वाटतं. पराक्रमांत पराकाष्ठेची उंची गांठणारा हा वीर पुरूष पाच फूटही नव्हता ...

सोनेरी घुमटाच्या खालच्या गोलाकार गाभाऱ्यात नेपोलियनची समाधी आहे. या वर्तुळाच्या परीघावर बारा संगमरवरी खांबाना टेकून बारा विजय देवता-नेपोलियनच्या बारा युद्धातील विजयाची स्मारकं म्हणून-जणु त्याच्या समाधीला अभिवादन करीत उभ्या आहेत. आस्टर लिट्झच्या लढाईत शत्रूकडून काबीज केलेले चोपन्न झेंडेही तिथे रोवले आहेत. या

विजयपताकांच्या सान्निध्यात फ्रेंच लोकांनी नेपोलीयनला निजवलं आहे. नेपोलियनचं सारंच आयुष्य लढण्यात गेलं. त्याला फार थोडी झोप पुरत असे म्हणतात. रणभूमीवर असताना तर कित्येकदा त्याचं झोपेशिवाय भागत असे. सेंट हेलिनातही त्यानं कदाचित झोपेशिवाय दिवस काढले असतील...अखेर त्याला सुखाची निद्रा लाभली, ती या चिरकाल समाधीत. ती पाहताना डोळे पाणावतात. फ्रेंच लोकांनी ह्या थडग्याला मोठं कल्पक नाव दिलं आहे. "चिमुकल्या योद्ध्याचं थडगं." वास्तविक नेपोलियन फ्रेंचांचा 'सम्राट'. त्यानं फ्रान्सला केवळ साम्राज्यच दिलं नाही तर मोठेपण दिलं, कला दिली, कायदा दिला अन् पॅरिसचं आजचं वैभव दिलं. पण हा सम्राट आकारमानानं चिमुकला होता अन् त्याचा पिंड योद्ध्याचा होता. त्यात तो अद्वितीय होता...ही गोष्ट या नावातून त्याच्या लोकाना कदाचित सांगायची असेल...

× × ×

पॅरिसमधलं हे जुनं जसं दिपवतं, तसंच नवंही. आयफेल टॉवर अन् युनेस्कोची इमारत ही इथली दोन आधुनिक आश्चर्यं म्हणायला हरकत नाही. आयफेल इंजिनियराच्या कल्पनेतून जन्माला आलेला हा धातूचा मनोरा पॅरिसच्या कुठल्याही भागातून दिसतो पण त्याच्या अवाढव्य आकाराची कल्पना त्याच्या पायथ्याशी उभं राहिल्यावरच येते. संख्याशास्त्राचाच हा सगळा खेळ अन् हिशेब. एरवी कुठलाच हिशोब माझ्या हिशोबात बसत नाही. पण या टॉवरचे आकडे मी गोळा केले...जवळपास हजार फूट उंचीचा, बारा हजार तुकड्यांचा, पंचवीस लक्ष खिळ्यांनी बांधलेला, अठ्याहत्तर लक्ष सुवर्ण फ्रँक किमतीचा अन् तीस हजार चौरस फूट पायथा असलेला हा मनोरा म्हणजे एक गणिती आश्चर्यच आहे. याच्या खालच्या विस्तीर्ण मैदानाचा उपयोग परेड ग्राऊंडसाठी करतात...अन् पॅरिसमधील पहिली घोड्याची शर्यत इथं झाली म्हणतात. याच्या शिखरावर चढून गेलं, की "आकाशाशी जुळले नाते" असं वाटू लागतं. इथं उभं पॅरिस आपली उंची हरवून बसतं... मोठमोठ्या प्रचंड इमारती जमिनीवर सरपटणाऱ्या वाटू लागतात. अन् सीन नदीची मैलोगणती दूरवरची वेडीवाकडी वळणं दिसू लागतात.



आयफेल मनोरा

इथूव फ्रान्सची 'लष्करी अकादमी' दिसते अन् तिच्यामागे युनोस्कोची इमारत. आयफेल टॉवर हे आयफेलचं एक गणिती धाडस तर युनोस्कोची इमारत हे वास्तुशिल्पाचं धाडस. फ्रान्सचा वास्तुविशारद 'झरफस', इटालीचा 'नेर्व्ही', अन् अमेरिकेचा 'ब्रेनेर' या तिघांच्या कल्पनेतून निर्माण झालेलं हे वास्तुशिल्प पुष्कळांना आवडणार नाही. पण मला आवडलं. हिचं अंतर्बाह्य स्वरूप अभिनव आहे. थोड्या फार फरकानं एकाच धर्तीच्या नेहमीच्या इमारती पाह्यची सवय झालेल्या डोळ्यांना, ही इमारत पाहिल्यावर एकदम धक्का बसतो. पण ही इमारत आपल्याकडे पाह्यला लावते. दुरून एखाद्या

टेकणावर अलगत उभी राहिल्यासारखी ही दिसते सीमेंट–कांक्रीटच्या गुळ–गुळीत भिंतीवरुन नजर नुसती सरपटत जाते...पण हिच्या खडबडीत खांबा–वरुन अन् भिंतीवरुन ती तशी सरपटत नाही, अडखळते. मधल्या पटांगणातलं हेनरी मूरचं शिल्प अन् आतलं भिंतीवरचं पिकासोचं "Icarns" हे रंगीबेरंगी आकृत्यांचं चित्र, आपलं कोपर धरुन समोर उभ राह्यला लावतं, ...जोन मायरो अन् आर्टिगास यांच्या काच कलाकृतीवरुन दृष्टी निघत नाही. ह्या साऱ्या मी घाईघाईनं पाहिल्या...पण त्या मनाला चटका लावून गेल्या.

× × ×

हॉटेलांत परतताना दिवस मावळत होता. अन् या मावळत्या दिवसा–बरोबर पॅरिसचं एकरुप मावळत होत–दुसरं उगवत होत. या शहराची ही दोन रूपं दो दिवसाच्या मुशाफरालाही चटकन जाणवतात. दिवसाचं पॅरिस निराळ, रात्रीचं निराळ. 'पॅरिस बाय डे', 'पॅरिस बाय नाईट' हे शब्द प्रयोगही इथे सार्थ ठरतात. एकीकडे बुद्धीचा, कल्पनेचा विलास पहावा अन् दुसरीकडे रतिविलास...हे दोन्ही 'विलास' फ्रेंच रक्तातच आहेत. इथली कलाप्रदर्शनं, संग्रहालयांच्या शेकडो परी, भव्य इमारती, आकाशाशी हातमिळवणी करणारा टॉवर पाहिला की एकाची साक्ष पटते...अन् रात्री दुसऱ्या पॅरिसची ... दिवसा मोमार्तच्या टेकडीवर डेगास,सेझां, पिकासो यांच्यासारख्या चित्रकारांची कला जन्माला येते. तीच टेकडी अंधार उगवला की आपल्या निशगारांनी फुलून जाते. या रात्रीची धुंदी हॉटेलावरूनही चढते अन् तिथले प्रवासी जिवाचं पॅरिस करायला निशा-जीवनासाठी बाहेर पडतात.

रात्री जेवताना माझ्या हॉटेलमधल्या त्या चतुरेनं मला विचारलं :

"पॅरिस-बाय-नाईट पाहणार ना ? "

"पण आमच्यासारख्या स्त्रिया जातात का तिथे ?" माझी शंका.

"न जायला काय झालं ? शेकडो जातात !" तिचं मिस्किलं उत्तर.

"पण मी एकटी कशी जाऊ शकेन इथून ? "

"एकट्या कशाला ? सोबतीला इतर लोक आहेत ना... ! "

माझं लक्ष लाऊंजमधल्या बाकाकडे गेलं. तिथं जेवण उरकून चार दोन जोडपी 'पॅरिस बाय नाईट' साठी सिद्ध होऊन बसली होती.

"मग फाडू ना तिकिट ? फक्त कुठलं घ्यायचं ते ठरवा."

तिने दिलेल्या पत्रकावरून मी नजर फिरविली. 'मूला रूज' हे ओळखीचं नाव दिसलं... चित्रकार तुलू ल्यूत्रेकचं हे आवडतं ठिकाण. 'पॅरिस बाय नाईट' हे प्रकरण होतं तरी काय? ते पाहण्यासाठी पुढे वाचू लागले :

"Night Drive through the illuminated city and then on to Mont martre, with the oldest cobaret of pario, the Moulin Rouge and its famous french cancan"·

67—Francs

हा सारा मजकूर मला निरुपद्रवी दिसत होता पण रामरक्षा, तुळशी-प्रदक्षिणा, हरतालिका, वटसावित्री, असल्या संस्कारात वाढलेल्या माझ्या-सारख्या भारतीय महिलेनं 'मोमार्त'च्या नुसतं वाटेकडे जायचं म्हणजे तरी काय चेष्टा होती? अब्रह्मण्यम्! माझ्या या कृत्यानं माझ्या बेचाळीस पिढ्या तर धोक्यात नव्हत्या ना, असाही विचार मनात येऊन गेला. आपल्या इथल्या आधुनिक सीता सावित्रींच्या सरोष नजरा दिसू लागल्या पण शेवटी मनाचा हिय्या करून ते ६७ रु. चं तिकिट घेतलं अन् कोंबडीच्या काळजाने त्या दोन जोडप्याच्या पाठोपाठ मोटारीत शिरले.

पॅरिसमधली रोषणाई म्हणजे अखंड दिवाळी. दुतर्फा झगझगणाऱ्या रांगा अन् फुललेले रस्ते यांतून वाट काढीत संथपणे आमची बस चालली होती. रात्रीच्या प्रकाशात कॉनकॉर्ड, नोत्रदाम, आयफेल टॉवर, आर्क द त्रि आम्फ, या गोष्टी नव्यानं पाहिल्यासारख्या वाटत होत्या. वाटाड्याच्या अंगातही जणू रात्र संचारली होती. मधून मधून विनोद करीत पॅरिसच्या ह्या नव्या सौंदर्याची तो ओळख करून देत होता. तासभर ह्या 'सिटी ऑफ लाइट्स' मधून वळसे घेत आम्ही हिंडत होतो.

पॅरिसचं हे रुपही आगळं आहे. निऑनच्या नळकांड्यांनी लखलखणारं हे शहर एखाद्या गंधर्व-नगरी सारखं वाटत होतं... शांझेलीझे, लॅटिन कार्टर्स, बॅस्टिलचा शेजार...ह्या ठिकाणीं जणु रात्र उगवली होती. ज्या किल्ल्याच्या पाडावानं, या देशात लोकशाहीचा पहिला बालेकिल्ला उभा केला, त्याच्या अवतीभवती आता निशागारं उभी होती. दिवसभरझोपलेले इथले 'बूल्वा' आता जागे झाले होते. इथले कॅफे, बिस्रो, लिडो, कॅसीनो, माणसांनी

उतू जात होते... नृत्यागारं बेभान झाली होती. प्रवासी लोकांचे जत्थे ठिक-ठिकाणी घोंगावत होते...

अखेर इष्टस्थळी आलो. समोर एका गोलाकार भिंतीवर 'मूलारुज' ही अक्षरं तरळत होती. अन् तिच्या डोक्यावरचा लाल दिव्यांचा पंखा गर-गरत होता. क्षणभर मलाही गरगरल्यासारखं झालं....माझ्या बाजूला आणखी दोन स्त्रिया बुजरेपणानं उभ्या होत्या. त्याही माझ्यासारख्या एकट्या होत्या. म्हणजे कुणी पुरुष माणूस त्यांच्याबरोबर नव्हतं. एक जोडपं आणखी होतं. आमचा विनोदी वाटाड्या आम्हा स्त्रियांना उद्देशून म्हणाला,

"आता स्त्रियांनी बाहेर थांबावं. पुरुष तेवढे आत जातील...."

"म्हणजे काय ?" माझ्या शेजारच्या दोघींनी आवाज उंचावले.

"म्हणजे....पुरुषांबरोबर आतलं सारं पाहायची तयारी आहे तुमची?"

"आत काय असतं ते एकदा पाहायचंच आहे आम्हाला ! 'स्ट्रिपटीज्' सुद्धा पाहू आम्ही..." ती म्हणाली.

"पहा बुवाऽऽ! पण एकदा आत गेल्यावर मात्र मागाहून मला हाका मारू नका. आता एक वाजता येईन मी."

आम्ही आत शिरलो. आतली रंगसज्जा अगदी विचित्र...अन् भडक होती... गडद रंगाचे पडदे नि गालीचे, मंद दिवे, त्याचा आळसावलेला उजेड, मधूनमधून बदलणारी प्रकाशयोजना ...अन् आंतली गर्दी, सारी गुद-मणारी होती. ल्युत्रेकची चित्रकला जन्मावी, असं इथं काही दिसत नव्हतं. मूळ चित्रंही नव्हती. मध्यभागी रंगमंच होता... बाजूला बसलेला बँड...हलकं संगीत वाजवीत होता. संपूर्ण जागा टेबलांनी, अन् त्याभोवती दाटीवाटीनं बसलेल्या माणसांनी खच्चून भरली होती. त्यावर शॅंपेनच्या बाटल्या फुटत होत्या...पेले भरत होते. रिकामे होत होते....वातावरणात धुंदी होती अन् त्या-बरोबर बुजरेपणाही होता.

दोन-अडीच तास तऱ्हतऱ्हेचे नाच, गाणी, फार्स अन् सर्कशीतल्या सारखे कसरती खेळ चालू होते. नाचाच्या मधून हे खेळ अर्धविरामासारखे मधून मधून टाकले होते. नृत्यांतून नग्नता ही हळू हळू वाढत्या मापानी दिली जात होती. प्रत्येक नाचाला मागची सीनरी, संगीत अन् प्रकाश योजना बदलत होती. त्यातून माझ्या डोळ्यांना अभिजात कला दिसली नाही. पण विलक्षण

कसब मात्र होतं. एका कसरती खेळात एका माणसानं खाली निजून आपल्या पायाच्या तळव्यावर एका लहान पोराला इतक्या भराभर झेललं, की एखाद्या चरख्याच्या चाकासारखा तो त्या तळव्यावर गरगर फिरताना दिसत होता.

दुसऱ्या एका खेळात एका तरुण मुलानं तोंडात कट्यारीची मूठ धरली. मग तिच्या टोकावर टोकाच्या बाजूनं एक तलवार धरली अन् तिच्यावर एक ट्रे, त्यात सहा पेले अन् तेही मद्यानं भरलेले – अन् या साऱ्या वस्तूंचा तोल असा काही साधला होता, की जणू त्या सर्व वस्तू एकमेकांना चिकटव-लेल्या असाव्यात ...


शेवटी नग्ननृत्य दाखवण्यात आलं. परंतु त्यात कुठलीही वीभत्सता नव्हती. वातावरणात धुंदी होती ... मदिरेनं प्रेक्षक बेभान झाले असतील ... पण कुठल्याही प्रकारचा आरडाओरडा, शीळशिट्या, खिदळणं अगर अश्लील शब्दांची फेकाफेक असला कुठलाही प्रकार आढळला नाही. परंतु तें सारं पहात असताना " एवढे ५७ रु. खर्च करून पाहण्यासारखं ह्यांत ' रोमांचकारी ' काय होतं ? " असा प्रश्न मी स्वत:शी करीत राहिले. शेवटी शेवटी तर कंटाळा यायला लागला. अखेर एकला खेळ संपला ... अन् ' मूलांरूज ' मधून मी सुखरूप बाहेर पडले

हॉटेलात पोचायला दोन वाजले. दुसरे दिवशी सकाळी आठाचं विमान होतं ... झोप येत नव्हती. दिवसभराच्या धबडग्यानं अंग ठणकत होतं.

× × ×

सकाळी सहाला मॅनेजरनं खोलीतल्या फोनवरून चहा झाल्याची वर्दी दिली. चहा दिला, टॅक्सी बोलावून दिली ... आणि " ऑरिव्हा " केलं.

एक सकाळ मला इथं घेऊन आली होती अन् दुसरी इथून घेऊन चालली होती.. या तीन दिवसात पॅरिसच्या इमारतींची ओळख झाली होती. तीहि पुरी नाही. पुष्कळसं पाहयचं राहून गेलं होतं. पण त्यापेक्षाही खरं पॅरिस मला अज्ञात राहिलं होतं याची खंत अधिक वाटत होती... प्रवासी पत्रकाप्रमाणे इथली ' स्थळ ' पाहणं म्हणजे पॅरिस पाहणं नव्हतं... त्यानं फारतर शहराचा आकार दिसतो... पण त्याचं निराकारत्व कळत नाही. त्याची लांबीरुंदी कळते... पण खोली समजत नाही.



**" सेंट जर्मेन द प्रे " पॅरिसमधील सर्वांत जुने देवालय.**

सूर्य नुकताच वर येत होता ... अन् पॅरिस आळोखेपिळोखे देऊन जागं होत होतं ... नेपोलियनच्या समाधीच्या गोल सोनेरी घुमटावर सूर्याची कोवळी किरणं टेकली होती अन् आयफेल टॉवर त्रयस्थाप्रमाणे मला निरोप देत होता.

× × ×

# १६

पॅरिसनंतर पुढचा मुक्काम जिनीव्हा. हे स्वित्सर्लंडचे प्रमुख शहर. इथे फक्त एक दिवस काढायचा होता. एअर इंडियाने इथल्या 'होटेल मॉडर्न' मध्ये सोय केली होती. त्यामुळे इथे पॅरिससारखा त्रास पडला नाही.

तिकीट काढताना "जिनिव्हात काय आहे पाहण्यासारखं?" असं अरूणनं तीनतीनदा विचारलं होतं. पण स्वित्सर्लंडला युरोपचं काश्मीर म्हणतात. त्यामुळे त्याचा प्रश्न मला निरर्थक वाटला होता. तिथे इतर काही प्रेक्षणीय नसलं तरी निसर्ग खास्च प्रेक्षणीय असेल, म्हणून टप्याटप्प्यांनी प्रवास करण्याचा मनस्वी कंटाळा असूनही इथे मुक्काम करायचं मी ठरवलं होतं.

परंतु पॅरिसनंतर जिनिव्हा शहर पाहणं म्हणजे दिल्ली पाहिल्यावर रामटेक पाहण्यासारखं वाटलं. पॅरिसचे भव्य प्रसाद अन् राजमार्ग, तिथली प्रचंड स्मारकं, मनोहर उद्यानं, उत्तुंग मनोरे अन् सुंदर धर्ममंदिरं पाहून दिप-लेल्या डोळ्यांना जिनिव्हा हे अगदी सौम्य वाटलं. इथे पॅरिसची धावपळ नव्हती; मिनिटामिनिटाला बंदुकीच्या गोळीप्रमाणे सटासट चालणाऱ्या मोटारी अन् 'मेट्रो' नव्हत्या. तिथला झगझगाट, भडकपणा नव्हता. उतू जाणारी अ-संख्य निशागारं नव्हती. प्रवाशांचे तांडे दिसत नव्हते... अगदी शांत, संथ, स्वस्थ, सौम्य शहर होतं हे... पण पॅरिसचं हे सौंदर्य इथं नव्हतं, तरी निसर्ग-सौंदर्य होतं भरपूर.

इथं आल्प्स पर्वताच्या 'मॉब्लां' आणि 'जुरा' या रांगा चहुबाजूनी दिसतात. त्या रांगाच्या कुशीत, जिनीव्हा लेमान सरोवराच्या काठावर वसलेलं हे टुमदार, नीटस शहर फार रमणीय आहे. आकाशी रंगाचे डोंगर... अन् आकाशाशी एकरूप झालेलं 'मॉब्लांचं' हिमाच्छादित शिखर, मधोमध जिनिव्हा सरोवराचं स्फटिकासारखं स्वच्छ पाणी, त्यांतून निघणारी ऱ्होन नदी. तिच्या-

वर बांधलेले पूल ... ठिकठिकाणी असलेली हिरवळ व उद्यानं, हे सारं विलो-भनीय आहे. इकडच्या पर्वतराजीवरून मनमुराद चढणं, इथल्या मुलायम हिरवळीवर पडून, स्वच्छ, निळ्या आकाशाकडे पहात, कोवळं ऊन खात लोळत पडून राहणं, इथली स्वच्छ हवा पिणं, इथल्या सरोवरातून जलविहार करणं ... ह्यात इथली खरी मजा ...

लंडन, पॅरिससारख्या शहरी जीवनाला कंटाळलेले लोक ही मजा लुटण्यासाठी, इथला निसर्ग शोधण्यासाठी, इथल्या सरोवराकाठी वसलेल्या हॉटेलातून येऊन राहतात अन् तासनतास ' माँ ब्लाँ ' च सौंदर्य न्याहाळीत, नाहीतर लेमान जलाशयात विहार करीत घालवतात. कवींचं अन् चित्रकारांचं हे प्रेरणास्थान आहे. इथले निळे – पांढरे डोंगर, इथले स्वच्छ जला-शय, हिरवळी अन् बागा बायरनच्या कविदृष्टीला सुंदर भासल्या होत्या, ते उगाच नाही.

या शहरातली बहुतेक सुंदर हॉटेलं सरोवराच्या काठी आहेत. पण आगाऊ ती राखून ठेवण्यासाठी पुरेसे दिवस अन् पुरेसं द्रव्य जवळ नसल्या-मुळे माझ्या वाट्याला शहराच्या मध्यभागी असलेलं हॉटेल आलं होतं. ' होटेल मॉडर्न ' हे छोटंसंच पण सुंदर होतं. खोली सातव्या मजल्यावर– जेमतेम पाच बाय सातची. परंतु टेलिफोन, रेडिओ, लेखन – साहित्य, गरम थंड पाण्याचे नळ, बेसिन या साऱ्या आधुनिक सोयींनी सुसज्ज होती. वापरायला स्वच्छ, पांढरेफक्क अभ्रे, चादरी, परीट घडीचे कडक इस्त्रीचे टुवाल, व नॅपकिन; अन् दर माफक. इथली हॉटेलं पाहिल्यावर, परदेशी प्रवाशांची आपल्या इकडच्या हॉटेलासंबंधीची तक्रार रास्त वाटू लागावी.

हॉटेलला लागूनच 'डॉन क्विक्झोट' ( Don quixote ) हे उपहार-गृह होतं. नावाप्रमाणेच इथली सजावट आणि वातावरण ' क्विक्झॉटिक '. पॅरिससारखी इथं पावलोपावली भाषेची अडचण भासली नाही. वाढप्याला इंग्रजी येत नव्हतं, पण त्यानं व्यवस्थापकाला धरून आणलं. त्यानं सुंदर शाकाहारी जेवण दिलं.

इथंही शहरांतली प्रेक्षणीय स्थळं दाखवणाऱ्या बसेसची सोय होती. पॅरिसप्रमाणे वेगवेगळ्या नंबराच्या सहली इथेही असतील अशी कल्पना होती. त्यामुळे ' कुठल्या नंबरची सहल निवडावी ? ' असा प्रश्न मी हॉटेलच्या

व्यवस्थापकाला केला. परंतु ' इथे संपूर्ण शहरासाठीं एकच सहल आहे, ' असं त्यानं सांगितलं.

जिनिव्हात प्रेक्षणीय स्थळं फारशी आढळली नाहीत. दीड दोन तासात सारं जिनिव्हा शहर आम्ही हिंडून आलो. इथलं नॅशनल म्यूझियम अन् युनिव्हर्सिटी छोटीशीच आहे. विशेष पाहण्यासारखं होतं ते ' रिफर्मेशन मॉन्युमेंट '. ही एक साधी लांबलचक भिंत होती. त्यावर युरोपियन धर्मक्रांतीचे प्रवर्तक मार्टिन ल्यूथर, कॅलव्हिन आदि धर्मसुधारकांचे पुतळे त्यांच्या माहिती-सह कोरले होते. सोळाव्या शतकांतच कॅलव्हिनच्या प्रभावानं हे शहर प्रॉटेस्टंट बनलं. तेवढी एकच क्रांती या शहराच्या इतिहासात घडली. एरवी या देशाला मोठमोठाल्या उलाढाली, क्रांत्या किंवा युद्धं ठाऊक नाहीत. कदाचित इथल्या निसर्गरम्य संथ वातावरणात राजकीय महत्त्वाकांक्षेचं स्पर्धेचं किंवा युद्धाचं वैयर्थ्य माणसाला पटत असावं. एकोणीसाव्या शतकात या देशात संघराज्य अस्तित्वात आलं. तेव्हापासून हा देश युरोपीय राजकीय उलाढालीपासून सदैव अलिप्त राहिला आहे. वास्तविक, डाव्या सीमेवर फ्रांस, उत्तरेला जर्मनी अन् दक्षिणेला इटाली, या तीन महत्वाकांक्षी राष्ट्रांनी हा देश वेढलेला. पण या भूमीवर कधीही युद्ध खेळलं गेलं नाही, दोन्ही महायुद्धाची प्रत्यक्ष झळ स्वित्झर्लंडला लागली नाही, याचं नवल वाटतं. उलट, इकडचं वातावरण शांतताप्रिय चळवळींनाच पोषक ठरले आहे. हेनरी डयूनंटनं इथेंच अंतर्राष्ट्रीय 'रेडक्रॉसची स्थापना केली. पहिल्या महायुद्धानंतर 'लीग ऑफ नेशन्स'चं हेच केंद्रस्थान होतं. आजही दुसऱ्या महयुद्धानंतर स्थापन झालेल्या युनोच्यां कित्येक संघटना इथूनच आपली कामं करतात. 'अंतर्राष्ट्रीय कामगार संघटना' ( ILO ) ह्याची मुख्य कचेरी इथंच आहे. या सर्व इमारती आम्ही पाहिल्या. मी गेले तेव्हा आंतर्राष्ट्रीय रेडक्रॉस परिषद नुकतीच आटपली होती अन् तिच्यासाठी आलेले एक दोन प्रतिनिधी माझ्याबरोबर परतीच्या प्रवासात होते. त्यातला एक इंडोनेशियातला होता. बोलता बोलता आपल्या देशाबद्दल विषय निघाला, तेव्हा तो म्हणाला,

" मला ठाऊक आहे तुमचा देश मोठा आहे. कारण तुमचे गांधी अन् नेहरू मोठे आहेत. आम्ही तुमच्या देशाला गुरुस्थानी मानतो. "

दुसरे दिवशी सकाळी रोम.

× × ×

# १७

जिनिव्हा ते रोम हा तास-दीडतासाचा प्रवास. इथे तीन दिवस मुक्काम होता. रोमला पोचेतो मला धावत्या प्रवासाचं तंत्र अवगत झालं होतं. त्यांतले सारे टप्पे पाठ व्हायला आले होते. प्रथम कस्टम्स, मग सामानासाठी लॉकरचा शोध, त्यानंतर एअर इंडिया डेस्कवर हॉटेलची चौकशी, मग चलनाची आदलाबदल, स्थानिक चलन हाती पडल्यावर विमनतळावरून गावातल्या टर्मिनसची बस घेणं, तिथून पुढे हॉटेलचा शोध. पण आता असल्या प्रवासाचा उबग आला होता. आधीच प्रवासाची नावड, त्यातून अशा प्रवासाची दगदग, एका मागून एक स्थळं पाहात वणवण हिंडणं, जेवणाची आबाळ. त्यामुळे रोमला पोचेतो माझं त्राण नाहीसं झालं होतं. आधी ठरल्याप्रमाणे या दौऱ्यात बर्लिन अन् कैरो आदि स्थळं सामील व्हायची होती, पण आयत्या वेळी ती काढून टाकण्याचा निर्णय मी कुठल्या शुभघडीला घेतला, देव जाणे ! आतां 'रोम उरकलं की संपलं' असं म्हणून मी सुटकेचा निश्वास टाकला.

× × ×

पण रोममध्ये पाऊल ठेवलं अन् शरिराचा अन् मनाचा सारा शीण निघून गेला. 'नेपल्स पाहावं, मग मरावं,'' अशी म्हण आहे. मी नेपल्स पाहिलं नाही, पण रोमचं सौंदर्य डोळे भरून पाहताना 'रोम पाहावं अन् मग मरावं,'' असं मात्र शंभरदा मनात आलं.

लंडन, पॅरिस, जिनीव्हा या तीन राजधान्यांप्रमाणे रोम या राजधनीलाही टायबर या सुंदर नदीचं वरदान लाभलंय्. या इतिहासप्रसिद्ध टायबरच्या काठी, सात टेकड्यांच्या पाठीवर, रोम्युलसनं अडीच हजार वर्षांपूर्वी वसविलेलं हे शहर.' सिटी ऑफ सेव्हन हिल्स' म्हणूनही ओळखलं जातं. तसं

पाहिलं, तर लंडन आणि पॅरिस ही दोन्ही, दोन सामर्थ्यशाली साम्राज्यांच्या राजधान्यांची अधिक मोठी, राजकीय दृष्ट्या अधिक महत्त्वाची शहरं. त्यामुळे त्यांना महत्त्व असेल, पण रोमचं महात्म्य मात्र नाही. या शहराभोवती प्राचीन-त्वाचं, मोठेपणाचं वलय आहे. हे वलय तिहेरी आहे. रोमजवळ एकेकाळी अत्यंत बलाढ्य साम्राज्य, खिस्ती धर्मपीठ, अन् कलाविद्यांचं अग्रेसरत्व, ही तीन्ही होती. ज्यावेळी युरोपातील इतर देशातून संस्कृतीचा उदयही झाला नव्हता. त्यावेळी रोम सत्तेच्या शिखरावर होतं. या शहरानं युरोपचा इतिहास घडविला, तसा त्याच्या धर्माचा अन् संस्कृतीचा पायाही बांधला. खिस्ती-धर्माचं पहिलं 'धर्मपीठ' रोममध्येच स्थापन झालं. सबंध युरोपवर या धर्म-पीठानं आपलं आधिपत्यही गाजवलं. या धर्मपीठाबरोबर नाना विद्या, साहित्य आणि कला यांची पीठंही इथं होती. कित्येक शतकं साहित्यिकांची कला-वंतांची, विद्वानांची ही जणू 'युरोपीय-काशी' बनून राहिली होती.

त्यामुळे एका मागून एक येणारे सम्राट, धर्मगुरू आणि कलावंत या शहराच्या ऐश्वर्यात आणि सौंदर्यात चढाओढीनं भर टाकीत गेले. "I found Rome brick, I left it marble." या ऑगस्टस सीझरच्या हिरिरीनं साम्राटांनी ठिकठिकाणी भव्य-प्रासाद आणि विजयाची स्मारकं उभी केली. असंख्य खिस्ती देवालयंही धर्मगुरूमुळे जागोजाग उभी राहिली; व इथल्या कलवंतांनी सुंदर सुंदर शिल्प, मनोहर कारंजी, सजीव पुतळे, भित्तिचित्रं यांनी हिच्या सौंदर्यात अमाप भर टाकली.

रोमनं या वैभवाचा कळस पाहिला, तसा विनाशही पाहिला. आज हे जुनं वैभव जागोजाग आपल्या खुणा मागे ठेवून गेलेलं दिसतं. ठेचेठेचेला हे अवशेष आपल्याला दिसतात. या जुन्याच्या शेजारी नवं रोमही उभं राहिलं आहे. एखादा जुना अवशेष असतो ... त्याला खेटून त्याच्या कुशीतून हळूच डोकं वर काढणारी एखादी नवी इमारत दिसते .. असं जागोजाग आढळतं.

× × ×

रोममध्ये पाऊल ठेवल्याबरोबर वातावरणात एकदम फरक जाणवतो. लंडन, पॅरिस किंवा जिनीव्हा यापेक्षा या शहराचा वेगळेपणा चटकन् लक्षात येतो. मुख्य म्हणजे लंडनप्रमाणे इथे सूर्यदेवता सतत रुसलेली नसते ... पण आपल्या इकडल्याप्रमाणे 'अत्युच्ची पदी थोरही बिघडतो' असंही तिला

इथे म्हणावंसं वाटत नाही, इथलं ऊन मलूल, मंद, लहरी नाही. तसंच पोळ-णारंही नाही. ते प्रसन्न आणि ऊबदार आहे. इथल्या वातावरणात धुंदी आहे, सभोवताली सुखावणारे रंग आहेत, तसेच अंगावरच्या कपड्यांतही रंग आहेत. इथे आल्यावर गेले तीन महिने चोवीस – तासांचा सोबती बन-लेला माझा गरम कार्डिगन पहिल्यांदा अंगावरून निघाला. हवामानाबरोबर लोकांच्या वृत्तीतही फरक जाणवतो. फ्रेंचांप्रमाणे इथल्या लोकांत रंगेलपणा आहे. अन् जोडीला रगेलपणाही आहे. मस्तीही आहे. उभार चेहऱ्याचे, सरळ ' रोमन ' नाकाचे, तरतरीत डोळ्यांचे, इथले देखणे लोक म्हणजे जणू चालती-बोलती शिल्पंच. इथे घाऱ्या, निळ्या डोळ्यांचं प्रमाण घटतं, तसंच पिंगट सोनेरी केसांचंही. काळे केस अधिक दिसू लागतात. लोक एकंदरीत बहिर्मुख, खुल्या दिल्याचे, मोकळे, उत्कट वृत्तीचे वाटतात.

विमानतळावरून येताना वाटते एका ठिकाणी आमच्या बसवाल्याचं आणि समोरून येणाऱ्या एका छोट्या मोटर ड्रायव्हरचं " रॉंग साईड " वरून भांडण जुपलं. दोघेही आपआपल्या वाहनांच्या चाकाशी बसून पंधरा मिनिटं घसा फाडफाडून दुसऱ्याची चूक पटवून देत होते. दोघेही एक इंच-सुद्धा इकडे तिकडे आपली गाडी सरकावयाला तयार नव्हते. शेवटी पोलीस मधे पडला. त्यालाही धाब्यावर बसवण्याचे प्रयत्न चालू होते...शेवटी त्याच्या दंडुकेशाहीला भिऊनच हे भांडण मिटलं. लंडनमध्ये असं दृश्य दिसणं एकंदरीत कठीणच. इथे असा प्रसंग माझ्या तीन दिवसाच्या मुक्कामात तीनदां आला. क्षुल्लक गोष्टीवरुन दोन दोन गोष्टी होणं, बाचाबाची चालणं... हेंही एवढ्यात दिसलं. लोकांच्या स्वभावात एकंदरीत गरमपणा जास्त. आता-पावेतो युरोपात आढळलेले बोलणारांचे दबलेले, मुलायम, हलके आवाज इथे अधिक मोकळे, उंचावलेले झाले होते. आता कुजबुज जाऊन तिच्या जागी 'बोलणं' आलं होतं.

विमानतळावरून बस आम्हाला नेत असताना वाटेत अधूनमधून कचऱ्याचे ढीग, सडकया कलिंगडांचे अन् फळांचे भिरकावलेले अवशेष, भाजीपाल्यांचा पाचोळा ह्या गोष्टी पाहून आता युरोप सोडून आपण आपल्या देशाच्या समीप येत आहोत, असं वाटू लागलं. जिनीव्हापावेतो आढळलेली टापटीप अन् ' टिपटॉप ' गोष्टी लोपत होत्या. हॉटेलातली कडक इस्त्री गेली

होती. पांढरा रंगही मुळापासून ढळला होता. रोज बदलले जाणारे टॉवेल नव्हते. ज्या हॉटेलात मी उतरले होते तिथला लिफ्ट निकामी झाला होता. 'फ्लश' सहजासहजी चालायचं नाकारत होता. न्हाणीतल्या 'उष्ण' अन् 'थंड' तोटयांतून फक्त थंडच पाणी येत होतं. याशिवाय तीनची बस साडे-तीनला येणं, नवख्या प्रवाशाना चुकीचे रस्ते दाखवून त्यांची ब्याद टाळणं, गिऱ्हाइकांशी घासाघीस करणं, वस्तूंची दामदुप्पट सांगून पुन्हा निम्म्यावर उतरवणं... हे ओळखीचे प्रकारही इथे होते.

× × ×

रोममध्ये प्रेक्षणीय अवशेष पावलागणिक आहेत...'टूरिझम' खात्या-तर्फे केलेली बसेसची सोय इथेहि होतीच. सहलींची संख्या पाहून निदान आठवडा तरी इथें घालवायला हवा होता, असं वाटलं...अन् काही 'स्थळं' पाहिल्यावर तर ती पुन्हा पुन्हा पाहिल्यानंतरच पोट भरेल, असं वाटलं.

परंतु हे अवशेष बारकाईनं पाहण्यापूर्वीच प्रथम दर्शनीच रोमच्या आपण प्रेमात पडतो. डौलदार पुतळे अन् सुरम्य कारंजीं यांच्या-शिवाय इथला एकही चौक नसेल परंतु अप्रतिम कारंजी आहेत ती ट्रेव्ही, ट्रिव्होली अन् 'फाऊन्टन ऑफ द फोर रिव्हर्स.' ही सगळीं बघायला वेळ व पैसे अपुरे पडतात. मी फक्त हे 'चार नद्यांचं कारंज' पाहिलं. सतराव्या शतकातला प्रतिभावान् शिल्पज्ञ बर्नीनी यानं आपलं कसब इथे पणाला लावलं आहे. पण विशेष कुतूहल वाटलं ते त्या चार नद्यांची नावं ऐकून...जगांतल्या चार खंडातील चार पवित्र नद्या आहेत त्या—इजिप्तची नाईल, अमेरिकेची रिओ, युरोपची डन्यूब अन् आपली गंगा! पोप इनोसंट या कारंज्याचं उद्घाटन करायला आला त्यावेळीं थुईथुई नाचणाऱ्या या कारंज्या-तील बर्नीनीचं कसब पाहून त्या स्थितप्रज्ञ धर्मगुरूला आपल्या आयुष्याची दहा वर्षं कमी झाल्यासारखं वाटलं, असं म्हणतात. मग, आपल्यासारख्या सामान्यांना तिथे बसल्यावर चिरतरुण वाटल्यास नवल काय?

× × ×

जुन्या अवशेषांपैकी सर्वात प्रचंड असं पहिल्या शतकात लेव्हियसनं बांधलेलं 'कलोझियम'. रोमचा क्रूर राजा नीरो याच्या सुवर्ण गृहाच्या पिछाडीला एकिलिन टेकडीच्या पायथ्याशी ह्या प्रचंड अंडाकृती क्रीडागृहाच्या

भग्न भिंती उभ्या आहेत. 'कलोझियम' हे नावच प्रचंडतेचा निदर्शक असा शब्द भाषेला देऊन गेलं आहे.

पन्नास हजार लोक त्याच्या चार मजल्यांतून बसू शकतील, एवढं ऐसपैस हे क्रीडागृह होतं. पहिल्या मजल्यावर प्रवेशद्वारासमोर राजे लोकांना आपल्या सरंजामासहित बसण्यासाठी जागा. दुसऱ्या मजल्यावर सरदार-दरकदार, तिसऱ्या मजल्यावर प्रतिष्ठित नागरिक अन् सर्वात वरती सामान्य जनता बसत असे. वर्तुळाकार चार मजली भिंतींनी वेष्टिलेल्या मधल्या मोकळ्या क्रीडांगणात तऱ्हतऱ्हेच्या क्रीडास्पर्धा अन् लुटुपुटूच्या लढाया होत. त्या पाहण्यासाठी रोमन सम्राट आपल्या जाम्यानिम्यानिशी येऊन बसत. हे कलोझियम फ्लॅव्हियन युगाच्या ऐश्वर्याचं प्रतीक होतं. म्हणूनच बेडा यानं असं भाकित केलं होतं...की "जोपर्यंत हे कलोझियम उभं राहील, तोपर्यंत रोमचं अस्तित्व राहील...हे जेव्हा पडेल ...तेव्हा रोमही पडेल"

एके काळी हे क्रीडागृह रोमच्या ऐश्वर्याचं प्रतीक असेल, तर ते रोमच्या क्रौर्याचंही प्रतीक आहे, हा विचार ते पाहत असताना मनात येतो...क्रीडांगणाच्या खाली बांधलेली तळघरं होती. त्यातून क्रूर श्वापदं कोंडून ठेवण्यात येत असत. या श्वापदांच्या तोंडी लक्षावधी ख्रिस्ती लोकांच्या अंगाचे लचके तोडण्यात येऊन ते बळी दिले जात...अन् तो खेळ पहायला लक्षावधी रोमन लोकांची गर्दी लोटत असे. ह्या भीषण अत्याचाराची आठवण जोपर्यंत या कलोझियमचे अवशेष राहतील, तोपर्यंत मानवी अंतःकरणातून पुसली जाणं शक्य नाही. ती जशी इथल्या प्रत्येक दगडा-विटातून कोरलेली आहे, तशीच लोकांच्या अंतःकरणातही कोरलेली आहे. रोमचं ऐश्वर्य जसं 'कलोझल' तसं त्याचं क्रौर्यही कलोझल!

जी माती ह्या हुतात्म्यांच्या रक्तानं भिजली, तीच आतां 'पवित्र' मानली जाते. १७५० सालापासून व्हॅटिकनचा चौदावा पोप 'बेनेडिक्ट' याने बळी गेलेल्या धर्मवीरांच्या स्मरणार्थ ही भूमी 'पवित्र' म्हणून जाहीर केलीय. काळ सूड घेतो म्हणतात तो असा.

× × ×

याची प्रचीती रोमच्या अवशेषांतून वाट काढत जाऊ लागलं की ठिकठिकाणी येते. कलोझियमच्या मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर पडलं, की डाव्या

हाताच्या मोकळ्या मैदानात एक चौकोनी पायथा असलेली जागा दिसते. सर्वांत अधिक खिस्तभक्तांना सिंहाच्या तोंडी देण्याचा विक्रम करणाऱ्या अत्याचारी नीरोचा एक प्रचंड पुतळा ह्या पायथ्यावर उभा होता. पण आज तो 'कलोझल स्टॅच्यू'ही तिथं नाही आणि पायथाही नाही. त्याची जागाच तेवढी प्रवासी लोकांना दाखवितात.

ज्या वाटेनं नीरोचा पुतळा गेली, त्याच वाटेनं त्याच सुवर्ण-गृहही (गोल्डन हाऊस) गेलं. कलोझिअमच्या समोरच्या टेकडीवर नीरोचं हे निवासस्थान होतं. नीरोच्या मृत्यूनंतर ट्रॉजन राजानं ते पाडून, त्यावर आपली प्रसिद्ध स्नानगृहं बांधली. पुढे तीही गेली. आज या टेकडीवर बगीचा आहे. त्यात याचे अवशेष दिसतात.

कलोझिअमजवळचा नीरोचा पुतळा गेला. अन् पायथाही गेला; पण तिथली पहिल्या कॉस्टंटाईन राजानं उभारलेली थोरली कमान मात्र डौलानं उभी आहे. कॉस्टंटाईन हा पहिला खिस्ती सम्राट. मोठमोठाल्या रुंद चौकोनी खांबावर स्थिरावलेली ही तिहेरी कमान कॉस्टंटाईन च्या विजयाचं स्मारक म्हणून बांधली होती.

× × ×

अत्याचाराचा नेहमीच पराभव होत आलेला आहे. अत्याचाराचं प्रत्युत्तर प्रतिकार. अत्याचारातून प्रतिपक्षात प्रतिकार शक्ती उभी राहते. जेवढा अधिक अत्याचार तेवढीच अधिक ही प्रतिकार शक्ती. अत्याचारानं तुडवली गेलेली माणसं जोम धरतात. ही शक्ती फोफावते. शेक्सपियरच्या शद्बांत सांगायचं म्हणजे, "Like cammomile, the more it is trodden, the more it grows." त्यांतून हौतात्म्य जन्माला येतं. अशा हौतात्म्याचं सामर्थ्य प्रचंड असतं.

खिस्तीधर्माच्या प्रचारात सर्वत्र हीच गोष्ट अनुभवाला येते. त्या धर्माचा जन्म जसा एका महान् हौतात्म्यातून झाला, तसा त्याचा प्रसारही शेकडो खिस्ती भक्तांच्या बलिदानातून झाला. हे हुतात्मे संत बनले अन् या संताना पुन्हा भक्त मिळाले. वरून जसजसा हा अत्याचार बळावत होता, तसतशी रोमची भूमी आंतून पोखरली जात होती. खिस्तानुयायांची संख्या वाढत होती. रोमच्या जमीनीखालून पोखरलेले मैलोगणती लांब "कॅटॅकोंब्स" पाहिले

म्हणजे मानवाच्या प्रतिकार शक्तीचं सामर्थ्य डोळ्यासमोर उभं राहतं. हे "कॅटॅकोंब्स" म्हणजे जमिनीत ख्रिस्ती लोकांची खणलेली मोठमोठी भुयारं. या भुयारातून ख्रिस्ती लोकांच्या गुप्त-सभा भरविल्या जात, प्रवचनं होत, धार्मिक विधी होत. मृतांना पुरण्यासाठी अन् त्यांची स्मारकं बांधण्यासाठीही त्यांचा उपयोग केला जाई. सहाव्या शतकापासून खणल्या गेलेल्या या भुयारात अनेक ख्रिस्ती संतांच्या आणि हुतात्म्यांच्या कथा सांगणारी भित्तीचित्रं आहेत. या भुयारांतून कला पुन्हा नव्या जोमानं जन्माला आली. कदाचित् हीच पहिली ख्रिस्ती कला. कित्येक शतकं ही भुयारं लोकांच्या तीर्थयात्रेची ठिकाणं होती. त्यांच्या धर्मप्रसाराची केंद्रं बनली होती. पण नवव्या शतकात ही भुयारं संपूर्ण बुजून गेली होती. अन् सोळाव्या शतकात त्यांचा पुन्हा शोध लागला...गेल्या शतकापासून त्यांचं रीतसर उत्खनन चालू झालं आहे.

× × ×

जळती मेणबत्ती हातात घेऊन एकेका ठिकाणावर भाष्य करीत तिथला एक रोमन पाद्री आम्हाला वाट दाखवित होता अन् त्याच्या पाठोपाठ अंधारातून चाचपडत आम्ही पुढे चाललो होतो. मनं अंतर्मुख झाली होती. जमिनीखालच्या याच भुयारी अंधारातून वाट काढीत, ख्रिस्ती धर्म पुढे विजयी होऊन वरच्या प्रकाशात बाहेर आला होता. अन् आपली उत्तुंग देवालयं बांधून इथल्या भूमीत घट्ट पाय रोवून उभा राहिला होता.


रोममध्ये आज जागोजाग नीरोचा पराभव करणारी ही देवालयं विजयी मुद्रेनं उभी आहेत. या देवालयांची संख्या दीडशेच्या वर आहे. प्रवासपुस्तिकेतली त्यांची नामावली वाचल्यावर या शहराला 'देवालयांची नगरी-सिटी ऑफ चर्चेस' का म्हणू नये, असा विचार मनात आला.

× × ×

नीरोच्या पराभवाचं सर्वात मोठं प्रतीक म्हणजे सेंट पीटरचं देऊळ. रोम जळत असताना खुशाल फिडल वाजविण्यात मस्त असलेल्या या उन्मत्त राजानं ज्या ठिकाणी सेंट पीटरचा वध केला, त्या ठिकाणावरच हे जगद्विख्यात देवालय उभं आहे

पीटर हा ख्रिस्ताचा पट्टशिष्य आणि ख्रिस्ताचा पहिला धर्मगुरू पोप. पीटर म्हणजे अभेद्य पाषाण..." या अभेद्य पाषाणावर मी आपलं धर्ममंदिर

उभारीन " हे खिस्ताचे उद्‌गार पीटरच्या कणखर वृत्तीला उद्देशून काढलेले होते. सेंट पीटरनं खिस्ताचे ते शद्ब खरे करून दाखविले.



**सेंट पीटर्स चर्च, रोम**

ही देवालयं म्हणजे धर्माने जुलमी राजसत्तेवर मिळविलेला विजय. त्याचे विशाल घुमट...अन् त्यातून निघालेले, आकाशाशी स्पर्धा करणारे उंच क्रूस पाहिले, म्हणजे खिस्ती धर्माच्या विजयपताकाच जणू फडकत आहेत असं वाटतं.

खिस्ती देवालयं पाहावी रोमचीच. ती एकापेक्षा एक प्रचंड, भव्य, सुंदर आहेत...पण ती केवळ आकारमानानं नव्हे...तर शिल्पांतही. सेंट जॉन लॅटरन्स चर्चच्या मधल्या मंडपात शिरताच तिथे उभे असलेले खिस्त संत-संति-

णींचे अटरा-वीस फुटी उंच पुतळे पाहून मी क्षणभर श्वास रोखून धरला होता. एकापेक्षा एक सुंदर अशा जिवंत प्रतिमाच समोर उभ्या आहेत असं वाटलं. ' सेंट पॉल्स ' देवळांतला सेंट पॉलचा पुतळा पाहून मी नतमस्तक झाले. ' सेंट मेरी मेजर ' या देवालयाची भव्यताही मनाला स्तिमित करणारी आहे. देवालयाच्या पाठिमागच्या पायथ्याशी उभं राहिलं अन् त्याकडे पाहिलं की त्याच्या आकारमानाची कल्पना येते. परंतु " सेंट पीटर"च्या प्रथम दर्शनानेच डोळे दिपतात. या देवालयाचं दर्शन घ्यावं ते खालच्या सेंट पीटर चौकात उभं राहून. हे जितकं अजस्त्र आहे, तितकंच अप्रतिम आहे. ब्रॅमेन्टो, मायकल एंजेलो, कार्लो मॅडर्नो, बर्नीनी या साऱ्या कलावंतांची प्रतिभा यात खर्च झाली आहे. या देवालयानं सेंट पीटर अमर केला, तसेच हे शिल्पकारही अमर केले. संताच्या दिव्यत्वाला ... अमर कलेची जोड...असा हा सुरेख संगम आहे.

देवालयाच्या पायथ्याशी दोन्ही कडांना दोन अर्ध चंद्रांत बसवलेले जवळ जवळ चारशे खांब आहेत अन् त्यात एकशेचाळीस संतांचे पुतळे उभे केले आहेत. आजूबाजूला असलेले हे अर्धचंद्र जणु मधल्या वर्तुळात सेंट पीटर अन् सेंट पॉल हे दोन बाजूला उभे आहेत. त्यांच्यामध्ये चार सिंहांच्या पाठीवर बसवलेलं मनोहर कारंज सतत थुईथुई नाचत असतं. हे कारंजं मागे टाकून, समोर पसरलेल्या पायऱ्या चढत जसजसं जावं तसतशी देवालयाची उंची वाढत जाते अन् माणसाचा साडेतीन हाती देह क्षुद्र वाटू लागतो. या सज्जे देवालयाच्या समोरच्या भिंतीतच दुसऱ्या मजल्यावर दोन खिडकीवजा सज्जे आहेत. इथे बसूनच पोप जनतेला दर्शन देतो. त्यावेळी खालचा सेंट पीटर चौक माणसांनी तुडुंब भरून जातो. पोप जॉनच्या मरणाच्या प्रसंगी हा चौक माणसांनी असाच उतू जात होता.

हे देवालय बाहेरून जितक सुंदर आहे, तितकंच आंतूनही सुंदर आहे. या देवालयात गर्दी जमते ती मायकेल एंजेलोच्या 'पिएटा' ( pieta ) ह्या शिल्पासमोर. यात ख्रिस्ताची तरुण माता व्हर्जिन मेरी क्रूसावरून काढलेल्या ख्रिस्ताला मांडीवर घेऊन बसलेली आहे. या दोन्ही पुतळ्याच्या चेहऱ्यावरील भाव अवर्णनीय आहेत. हे शिल्प एंजेलोनं वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी तयार केलं म्हणतात. या शिल्पानं एका रात्रीत एंजेलोला कीर्ती मिळवून

दिली. " I woke up and found myself famous. " हे बायरनचे उद्गार एंजेलोच्या बाबतीत अधिक सार्थ ठरले. लोकांच्या नजरेला ते शिल्प प्रथम पडलं तेव्हा " ते कोणत्या महान् शिल्पकारानं तयार केलं आहे ? " असं जो तो विचारू लागला; तेव्हा पोरगेलासा एंजेलो पुढे आला, त्यावेळी लोकांना त्यावर विश्वास ठेवणं कठीण गेलं.

या शिल्पातली ख्रिस्त–माता मेरीही ख्रिस्तपेक्षा वयानं फार लहान तरुण दाखविली आहे. "मेरी इतकी तरुण कशी असा प्रश्न एंजेलोला करताच त्यानं अत्यंत मार्मिक उत्तर दिलं होतं :

" ख्रिस्तमाता म्हणजे कुमारिका–व्हर्जिन ... ख्रिस्तमातेचं कौमार्य हे चिरकालीन म्हणून ती सदैव तरूणच दिसायला हवी ! "

सेंट पीटरच्या समाधीवरील वेदी आणि तीवरील भित्तीशिल्प ही मायकेल एंजेलोच्या हातची आहेत. तर दुसऱ्या भागात बर्नीनी ह्या प्रसिद्ध शिल्पकारानं बांधलेलं मखर ( बर्नीनी कॅनपी ) ही एकमेकांशी स्पर्धा करताना दिसतात.

× × ×

सेंट पीटरचं देऊळ हे व्हॅटिकनच्या परिसरात आहे. हे पोपचं स्वतंत्र संस्थान. रोमन सरकार आणि पोप यांच्यातल्या प्रदीर्घ झगड्यानंतर दोघात तडजोड होऊन, संस्थान १९२९साली अस्तित्वात आलं. ह्या संस्थानाच्या रक्षणासाठी स्वतंत्र स्विस् गार्ड्स असून, अंतराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत पोप स्वतंत्र आहे. संस्थानांतली बहुतेक जागा वेगवेगळी देवालयं, धर्मालयं, संस्थांनी कचेऱ्या आणि विविध संग्रहालयं यांनी व्यापलेली आहे.

व्हॅटिकन वस्तुसंग्रहालयाची व्याप्ती इतकी मोठी आहे की संबंध संग्रहालयातून धावता फेरफटका मारणही अशक्य होतं. आम्हाला त्यांतला काही भाग तेवढा दाखवला. मोठ्या मोठ्या विभागात यातील मौल्यवान् संग्रहाची वर्गवार मांडणी केली आहे. युरोपच्या रेनॅसन्स काळांत सुरू झालेल्या या संग्रहालयात आज चित्रशिल्पांचा अद्वितीय संग्रह आहे. दुतर्फा रांगेनं उभ्या असलेल्या या शिल्पातून फरशीवरून वाट काढीत असतांना क्षणभर आपण पृथ्वीतलावर नसल्याचा भास होत होता.

जगद्विख्यात 'लकून' ची एकसारखी दोन शिल्पं इथं दिसली. शिवाय तिसरं पॅरिसच्या 'लूव्ह' मध्ये काही दिवसापूर्वीच पाहिलं होतं. त्यामुळे 'या तिघापैकी मूळ कोणतं ?' असा प्रश्न मी वाटाड्याला केला. पण इथलंच शिल्प मूळ व दुसऱ्या दोन नकला आहेत, असं त्यानं सांगितलं. पण मूळचं कोणतं हे मात्र तो सांगू शकला नाही. 'अपोलो बेलव्हेडेर' चा पुतळा, 'इरॉस,' 'ॲफ्रोडाईट' ही ग्रीक शिल्पं इथे दिसली. चौथ्या शतकातला शिल्पज्ञ प्रॅक्झीटेलिस याच्या या उत्कृष्ट कलाकृती.

एकापेक्षा एक सुंदर शिल्पांनी दुतर्फा गच्च भरलेली ही दालनं पाहत त्यांची संगमरवरी फरशी तुडवित आम्ही व्हॅटिकनच्या चित्र–प्रदर्शनात आलो. ही आर्ट–गॅलरी पोप सहाव्या पायसने सुरू केली अन् सातव्या व अकराव्या पायस या दोघांनी ती वाढविली. सोळा खोल्यातून हे प्रदर्शन पसरलं आहे.


या प्रदर्शनात रेनासन्स काळापासूनची चित्रं आहेत. गिनो, बॅलिनी, गिडो, टिशियन, रॉफेल, व्हॅन डाईक, मेमलिंक या एकापेक्षा एक श्रेष्ठींच्या चित्रांची नुसती लयलूट आहे.काय पाहू अन् काय नको असं होऊन जातं. बहुतेक चित्रातून खिस्ताच्या खिस्ती संतांच्या जीवनातील कथा सांगितल्या आहेत. बुद्ध धर्माप्रमाणेच खिस्ती धर्माने चित्रकलेला कित्येक शतके केवढी मोठी प्रेरणा दिली होती याची कल्पना येते. एकेका चित्रकाराची चित्र जशी अद्‌भुत आहेत तसेच त्यांच्या आयुष्याचे जीवनपटही मनाला स्तिमित करून सोडतात. गिनोची चित्रं पाहताना आपल्या बापाच्या मेंढ्यांची चित्रं पाटीवर काढीत झाडाखाली बसलेला मेंढपाळ पोरगा गिनो-डोळ्यांना दिसू लागतो. त्यावेळचा प्रसिद्ध इटालियन चित्रकार सिमॅबू याच्या नजरेला ती चित्रं पडल्यावर त्याने गिनोला चित्रकलेचं शिक्षण दिलं. त्याच्या चित्रांनीच पुढे युरोपीय चित्रकलेत क्रांती घडून यावयाची होती. इटालियन चित्रकलेचा हा जनक. गिनोनंतर बात्तिशेली. चित्रकलेला नवी शैली देणारा हा बंडखोर. धर्मापेक्षा सौंदर्याची उपासना करणं त्याच्या स्वभावाला अधिक मानवलं. केवळ धर्मासाठी त्यानं आपली कला राबवली नाही. त्याच्या चित्रांतून व्यक्तिनिष्ठ भावनेचा विलास अधिक. पंधराव्या शतकात त्याच्या तोडीचा चित्रकार इटालीत नव्हता. पण इटलीचे खरे लाडके चित्रकार तीन-राफेल, लिओनार्डो अन एंजेलो. जगांतील सर्व चित्रकारांनी शिरोधार्थ

मानावं अशी त्यांची योग्यता. रेनासन्स काळातील ही असामान्य त्रिमूर्ती. त्यांचं आयुष्यही अद्‌भुत. लिओनार्डोला विधात्यानं काही द्यायचं शिल्लक ठेवलं नव्हतं. आपल्या अनंत हस्तानी त्याच्यावर सर्व गुणांची उधळण केली होती. अशी बहुविध असामान्यता शतका शतकांतून एखाद्याच्याच वाट्याला येते. मायकेल एंजेलोच्या प्रतिभेला तोड नव्हती, परंतु दुर्दैवानं त्याचा जन्मभर पिच्छा सोडला नाही. उपेक्षेत अन हाल अपेष्टातच त्याचं उभं आयुष्य गेलं. परंतु राफेल त्या एंजेलोचा समकालीन. त्याच्यापेक्षा धाकटा पण राफेलला या उलट जिवंतपणीच सुखसमृद्धी व कीर्तीचं शिखर लाभलं. रोमच्या रस्त्यावरून आपल्या भक्तगणासह तो अभिमानानं फिरत असे.

त्याच्या चित्रांनी व्हॅटिकनच्या भिंतीच्या भिंती भरल्या आहेत. त्याच ' टांसफिगुरेशन ' हे सर्वोत्कृष्ट चित्र इथे पाह्यला मिळालं. हे त्याचं अखेरच ' मास्टर पीस.' त्यातला थडग्यातून जिवंत होऊन वर आकाशात येशू, त्याच्या दोन बाजूस स्वर्गात भेटलेले मोझेस व एलिजा, खाली जमिनीवर येशूच्या वधामुळे शोकाकुल झालेले पीटर, जॉन, जेम्स हे तिघे शिष्य आणि इतर येशूभक्तांचा समुदाय...राफेलच्या मृत्यूनंतर त्याचं शव, ज्या दिवाण-खान्यात त्यानं हे चित्र रंगविलं तिथं सन्मानानं ठेवण्यात आलं होतं. राफे-लच्या या अप्रतिम 'टान्सफिगुरेशन' ची आठवण मनात घोळत असतानाच सिस्टिन चॅपलची वाट आम्हीं चालू लागलो. सिस्टिन मंदिर पाहयचं म्हणजे मायकेल एंजेलोची कला पाहयची.

× × ×

हे सिस्टिन मंदिर अगदी साधं आहे, चिमुकलं आहे. कुठलीही भव्यता किंवा भडकपणा इथं नाही. मधल्या उंच पीठावर साधा, लहानसा काळसर क्रूस आहे. ह्या साधेपणानंच डोळे निवतात. पण हा साधेपणा छतावरच्या आणि भिंतीवरच्या एंजेलोच्या अमाप सौंदर्याकडे लक्ष वेधावं म्हणून तर मुद्दाम योजिला नव्हता ना ? या साधेपणामुळे माणसानं प्रभावित व्हावं ही अशी सारी योजना होती...पण एकट्या मायकेल एंजेलोची कला इथं नाही. काही भिंती सोळाव्या शतकातल्या कलाकारांनी चितारल्या आहेत. बात्तिशे-लीची नाजुक, हलक्या, हाताची चित्रं होती... बॅप्टिझम ऑफ जीसस,'



## सेंट मेरी मॅग्युअर, रोम

'सरमन ऑन द माऊंट' 'डेथ ऑफ मोझेस' 'पॅसेज ऑफ रेडसी,' 'लास्ट सपर' आदि बायबलच्या जुन्या अन नव्या करारांतील गोष्टी यात आहेत.

सिस्टिनच हे 'लास्ट सपर' भित्तीचित्र पाहिल्यावर लिओनार्डोच्या 'लास्ट सपर' ची आठवण झाली, पण ते मिलनच्या संग्राहलयात आहे, म्हणून सांगण्यात आलं... आपल्या बारा शिष्यांसह येशूनं अखेरचं भोजन घेतलं .."त्यावेळी तुमच्यापैकी कुणीतरी माझा घात करणार आहे." असे उदगार येशूनं काढले त्यावेळी विश्वासघातकी जुडासच्या मनात चलबिचल झाली. ती झाकण्यासाठी त्यानं येशूला परोपरीनं 'तुझी समजूत खोटी आहे' म्हणून सांगितलं...येशूच्या शद्वानं इतर शिष्य व्यथित झाले. ही सारी घटना लिओनार्डोनं अत्यंत कल्पकतेनं चितारली आहे. लिओनार्डोच्या तुलनेनं हे चित्र फार बेताचं वाटलं.

या चित्रकारांत या मंदिराला कलेचं अप्रतिम सौंदर्य देऊन गेलेला सर्वश्रेष्ठ प्रतिभावंत म्हणजे मायकेल एंजेलो. हीं चित्र पाहिली अन आपल्या

पश्चिम पंढरीच्या वारीच सार्थक झाल असं वाटलं. 'झपाटते ती अभिजात कला,' असं माझं सांधभोळं समीकरण आहे. एंजेलोच्या या चित्रांनी मला अक्षरशः झपाटलं. छतावरची सृष्टीच्या उत्पत्तीची नऊ चित्रं आणि क्रूसावरल्या मधल्या कमानीतलं 'फायनल जजमेंट' हे मोठ्ठं भित्तीचित्रं, एवढीच काय ती एंजेलोची–चित्रसंपदा. तो मूळचा शिल्पकार पण त्याच्या असामान्य प्रतिभेचा हेवा वाटून ब्रॅमेतेने त्याची फजिती करण्याच्या उद्देशानं, पोपकडून एंजेलोला ह्या भिंती रंगविण्याचं फर्मान सोडल होतं एंजेलोनं ते ओळखून, ते आव्हान स्वीकारल होतं. ते त्याला वरदान ठरलं अन त्याच्या करवी इतक्या असामान्य कलाकृतीची देणगी जगाला देऊन गेलं. "जगाचा सर्वश्रेष्ठ चित्रकार कोण ?" असा प्रश्न आजही विचारला तरी बहुतेक लोक उत्तर देतील "मायकेल एंजेलो!" एवढी कीर्ती सिस्टिनमधल्या चित्रांनी त्याला दिली.

वयाच्या अठराव्या वर्षीच आपल्या (सेंटपीटर्समध्ये ठेवलेल्या) 'पिएथा' शिल्पानं एंजेलो जगापुढें आला होता...... त्याचा अप्रतिम 'डेव्हिड' पुतळा डोक्यावर घेऊन लोक नाचले होते. पण चौतिसाव्या वर्षी सिस्टिन मंदिरातील चित्रं रंगविण्यासाठी तो आला, त्यावेळी चित्रकलेतील ते त्याचं पहिलं पाऊल होतं...... पण या पहिल्याच प्रयोगानं त्याला दिगंत कीर्ती मिळाली.

सिस्टिनमंदिराच्या छतावरील कथा रंगवायला साडेचार वर्षं लागली. या नऊ चित्रांत विश्वाची निर्मिती, मानवाची स्वर्गीय उत्पत्ती, त्याचा अधःपात व मोक्ष या विषयीच्या बायबलमधील कथा आहेत... विश्वाच्या प्रारंभी असलेल्या कल्लोळातून निर्मितीच्या पहिल्या दिवशी प्रकाशाला अंधारापासून विलग करणारा सर्वशक्तिमान् ईश्वर, त्यांतून सूर्यचंद्राची निर्मिती करताना त्यानं घेतलेली प्रचंड झेप, आदिमानवाची निर्मितीं, ह्या निर्मितीच्या क्षणी अप्रतिम सौंदर्यानं न्हाउन निघालेला आदमचा डौलदार, अर्धवट रेलून पडलेला देह, परमेश्वराच्या दिव्य करांगुली स्पर्शानं चिरनिद्रेतून जागृतावस्थेत आलेली व सृष्टीकडे नवखेपणानं बघणारी त्याची विस्मयचकित मुद्रा, आदमचा निर्जिव, चेतनाहीन वामहस्त, आणि त्याला आपल्या तर्जनीने चेतना देणारा परमेश्वराचा शक्तिशाली दक्षिण-

हस्त... या दोन बोलक्या हातांची ती जुळणी, आदमच्या कुशीतून निघालेली ईव्ह..., ईडनच्या बागेत ज्ञानाचं फळ चाखण्यात क्षणकाल मग्न झालेलं ते आदिमानवाचं जोडपं, त्या अपराधाबद्दल स्वर्गातून त्यांची हकालपट्टी करणारी देवदूताची तलवार, ती डावलताना होणारी आदमची केविलवाणी मुद्रा... अपराधाच्या जाणिवेनं ईव्हच्या चेहऱ्यावर उमटलेल्या कारुण्य, पश्चात्ताप, विषाद, इत्यादि संमिश्र छटा... सारंच अप्रतिम आहे, शब्दातीत आहे.

ही चित्रं रंगवली जात असताना पोप एंजलोला घाई करण्यासाठी रोज डिवचीत असे .. साडेचार वर्षांनंतर अखेर एकदांची ती पुरी झाली... ती पाहण्यासाठी देशोदेशीच्या लोकांची रीघ लागली... लोक ती चित्रं पाहत व आश्चर्यानं मुग्ध होत... तशीच माझीही स्थिती झाली होती... शब्द पांगळे झाले होते...

× × ×

त्यानंतर आल्टरपीस म्हणून ‘फायनल जजमेंट’ हे चित्र एंजेलोनं बावीस वर्षांनंतर रंगविलं... त्यावेळी तो म्हातारा झाला होता... स्वतः पोप आपल्या दहा कार्डिनल्ससह हे चित्र रंगविण्यासाठी त्याची विनवणी करण्यास त्याच्या घरी गेला होता.. एंजेलोच्या प्रतिभेचा हा कळस!... न्यायनिवाडा झाल्यावर खिस्ताच्या उजव्या हाताला... तरुन गेलेले, स्वर्गाकडे झेप घेणारे पुण्यप्राणी, अन् डावीकडे नरकात पडलेले निराश जीव... भीती, दुःख, वेदना यांनी हादरलेले त्यांचे चेहरे, नरकाची वाट दाखवण्यासाठी आपल्या वल्ह्यानं त्यांना डिवचणारा क्रुद्ध नावाडी चॅरन्... या चित्रातील प्रत्येक व्यक्ती विलक्षण जिवंत अन् बोलकी वाटत होती... एकेक सजीव शिल्पच!... जणू ती माणसं चित्रांतून बाहेर पडत होती... त्यात मावणारी नव्हती... ही चित्रं पाहत असताना माझी अक्षरशः... अनिर्वचनीय स्थिती झाली व ‘पारणे फिटले डोळियांचे’... असं वारंवार वाटत राहिलं...

एक प्रातिभ दर्शन समोर घडत होतं. मंदिरात फिक्कट पिवळया रंगाचा प्रकाश सांडला होता. समोर खिस्ताचा शिसवी रंगाचा क्रूस उभा होता. असामान्य मानवी हौतात्म्याचं ते प्रतीक. त्या मानवाच्या उंचीनं

दिपून जाऊन असामान्य प्रतिभा त्याच्या समोर नतमस्तक झाली होती अन आपले प्राण पणाला लावायला निघाली होती. माझ्या डोळ्यांना, देवळाची दारं बंद करून पाच वर्षं शिडीवर आडवं निजून छतावर कुंचल्याचे हात मारणारा मायकेल एंजेलो दिसत होता. या पाच वर्षांत त्याची मान वाकली झाली होती; कंबरडं मोडलं होतं, दृष्टी मंदावली होती. वृद्धत्वानं शरीराचा ताबा घेतला होता; पण आपल्या प्रतिभेचा अखेरचा स्पंद त्याला रिता करायचा होता. अलौकिक हौतात्म्याला अलौकिक प्रतिभेचं लेणं चढवायलाच हवं होतं.

× × ×

रोमचं हे अलौकिकत्व वेड लावणारं आहे. त्याचा स्पर्श आपल्या प्रतिभेला करून घेण्यासाठी युरोपांतील प्रतिभावंत शतकानुशतकं आपली पावलं इथे वळवीत आले आहेत. मिल्टनने आपलं 'पॅरॉडाइस लॉस्ट' हे अमर काव्य लिहिण्यापूर्वी व्हॅटिकनमधल्या लायब्ररीत बसून तिथल्या धार्मिक वातावरणात राहून, ते काव्य रचण्यासाठी योग्य ती मनोवृत्ती व पात्रता संपादन केली होती म्हणतात. बायरनच्या 'चाईल्ड हेराल्ड' च्या चौथ्या खंडाला रोमने प्रेरणा दिली होती. बायरनच्या पाठोमाठ शेलेने या शहराची वाट धरली होती. इकडच्या सोनेरी उन्हावर अन प्रेरक निसर्गावर लुब्ध होऊन कीटस इथं आला होता. ब्राऊनिंग पतिपत्नीचं ह्या देशाबद्दलचं आकर्षण त्यांनी आपल्या काव्यात ग्रथित करून ठेवले. रोमच्या शिल्पचित्रांनी शेकडो कलावंतांची पावलं आपल्याकडे खेचली. शतकानु शतकं ही रीघ लागली. म्हणूनच कदाचित ला फॉंटेननं "All Roads lead to Rome" असं म्हटलं असावं. रोम ही कवींची अन कलावंतांची "मेटर जेरियम" (ग्रेट मदर) मानली जाते, ती उगाच नव्हे.

पॅरिसप्रमाणे राजधानीचं ऐश्वर्य कदाचित रोमला नसेल. तिथले भव्य राजप्रासाद, रुंद राजमार्ग, विजयाची स्मारकं इथं नसतील. लंडनच्या साम्राज्याचं वैभवही आज रोमजवळ नाही. जगांतील कानाकोपऱ्यांतून गोळा केलेल्या दुर्मिळ वस्तूंचे तिथले संग्रह अन त्यांनी गजबजलेली प्रचंड संग्रहालयंही रोमजवळ नसतील. पण रोमची कलासंपन्नता अद्वितीय आहे. प्रतिभा उत्तुंग आहे. तीन दिवस पावला पावलाला आढळणारं इकडचं सौंदर्य मी

डोळ्यांनी टिपून घेत होते अन तरीही तृप्ती होत नव्हती. या शहरानं अनेक साम्रजयांचे कळस पाहिले तसे विनाशही. सर्व भक्षक काळाचे आघात तिने सहन केले. तसे संस्कृती–भंजक रानटी आक्रमकांचे तडाखेही सहन केले. तरीही आज रोमची सौंदर्य संपन्नता कायम आंहे. तिचं महात्म्य कमी झालेलं नाही. आणि म्हणूनच तिला “ इटर्नल सिटी ” ‘अमरपुरी— म्हटलं जातं. ते किती सार्थ आहे, असं वाटू लागतं.

× × ×

विमानानं रोम सोडलं. परिभ्रमणाचा हा शेवटचा टप्पा...पण आता प्रवासातलं कुतूहल संपलं होतं. प्रवास थंड चहासारखा बेचव झाला होता. शरीर शिणलं होतं. तसंच मनही. हे दोन्ही शीण घेऊन नव्या जगातून मायभूमीकडे परतायच होतं , पश्चिम पंढरी’ ची वारी संपलीं होती.

खालच्या भूप्रदेशाला आच्छादून अलगद सरकाणाऱ्या चंदेरी ढगाप्रमाणे माझ्या मनातल्या आठवणीही सरकत होत्या...पाठोपाठ येऊ पाहत होत्या...हताशपणे थबकत होत्या...अन मागे पडत होत्या. विमान मला पुढे पुढे नेत होतं. डौलानं उडत होतं–‘ फार फ्रॉम द मॅडिंग क्राऊड. ” खालच्या कोलाहलापासून दूर पण आदि आणि अंत नसलेल्या अवकाशात... पण आदि आणि अंत असलेल्या या पार्थिव आयुष्यात कुठे तरी कशाचा तरी शेवट होत होता. अन कशाचा तरी प्रारंभ... !

× × ×

पहाट फुटत होती. मुंबई जवळ येत होती. धुरकट, भुरकट आभाळात ओलेजड मेघ भरून होते. अर्ध–उजेड पसरला होता. तेवढ्यात मुंबईचे दिवे दिसू लागले अन कोण जाणे कवि ‘अनिला ’ ची ओळ आठवली...

“ सारेच दीप कसे मंदावले आता ! ”

–अन तरीही माझ्यातलं दुसरं काहीतरी मनाला खालच्या भूमीकडे खेचत होतं... काहीतरी अवर्णनीय, अनाख्येय.

× × ×

५३९३८
४८२

REFBK-0015844

REFBK-0015844